नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

१९७२

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत   विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक : माणिक गोडघाटे
सहसंपादक : जयंत देवघर

सल्लागार मंडळ : डॉ. वि. भि. कोलते, दुर्गा भागवत, शरच्चंद्र मुक्तिबोध, डॉ. द. भि. कुळकर्णी, महेश एलकुंचवार

वर्ष २७ वे   जानेवारी–फेब्रुवारी, १९७२   पौष–माघ   शिशिर   शक   १८९३

या अंकाची किंमत : दीड रुपया

* काही तांत्रिक अडचणींमुळे या अंकाच्या प्रकाशनाला उशीर होत आहे त्याबद्दल दिलगीर आहोत.—**संपादक**

* प्रयोगाच्या परवानगीसाठी पत्ता : **प्रा. वामन पात्रीकर,** बी–१९/३ रविनगर क्वार्टर्स, नागपूर.

सूर्यविलाप

वामन पात्रीकर

Features of behaviour in constant sleeplessness and sleep deprivation are irritability to the point of irascibility, a mental disorganization leading to dreaming while awake, hallucinations and automatic behaviour, occasionally bordering on insanity.

Sleepsicknesses

[लांबून एक आगगाडी निघून जाते. रंगभूमीवर विषण्ण अंधार. अंधारतच बेबीचे बोलणे–स्वर उदास.]

" सांगू बेबी ? ऐक ग ऽ
तूच जिवाभावाची सखी. एकुलती ग !
जसजसं आठवेल, तसं सांगत्ये.
जिथून आठवेल तिथून सांगते.
आपण आठ नऊ वर्षांच्या असू...

सूर्यास्ताचे दृश्य मी भयचकित होऊन बघे. संधिप्रकाशात. चांदण्या ठळकू लागल्या की जाग येई. केव्हातरी.. मनातली हुरहुर मग आणखीच वाढू लागे. आपण एकाकी पडत चाललोय् ही भीती घर करी मनात...

(रंगभूमी उजळू लागते.)

माझी अस्वस्थता पाहून आईच रडे. भयव्यग्रता मग अधिकच वाढायची. रडत-स्फुंदत आई झोपून जायची. मी मात्र जागत राही. हुंदके देत... अनंत प्रश्नांचा विचार करीत—"

(वरचे दृश्य साकारले जाते.)

बेबी : आई—
आई (क्षीण आवाजात) बेबी ? किती वाजलेत ग ?
बेबी दोन. बाबा येतील आई ?
आई गाडी गेली का ?
बेबी : आत्ताच... येतील बाबा ? आई–
आई (जांभई देत) येतील–
बेबी : आता झोपू नकोस ना. ऊठ–
आई (पेंगुळल्या स्वरात) झोपू दे ग.
बेबी इतका वेळ तर झोपलीस.
आई आत्ता डोळा लागला होता ग. डोकं ठणकतंय्. खूप.
बेबी दिवस केव्हा उजाडेल ?
आई (क्षीण स्वरात) उजाडेल.
बेबी भीती वाटते ना एकटीला मला... ए आई ऽ—
आई (त्रासिक स्वरात) कशाची भीती वाटते बेबी !
बेबी वाटतं...झोपलं की आपण मरूनच जाऊ.
आई देवाचं नाव घेऊन झोप बेबी. काही होणार नाही. झोप.
बेबी इकडे पाय करून कसं ग निजायचं ? देवाकडे पाय होतील ना ! देवघर आहे इकडे.
आई देव सगळीचकडे आहेत बेबी.
बेबी पण मला नाहीच झोप येत ग ! काय करू ?
आई (हताश स्वरात) मी तरी काय सांगू बेबी... मी स्वतःच आजारी आहे.
बेबी : म्हणजे तू पण मरशील. मरल्यावर राक्षस मारतात आई ?
आई बेबी, झोप बरं आता.
बेबी मला गोष्ट सांग. सांगना—
आई (अत्यंत अलिप्ततेने) एक कावळा होता. एक चिमणी होती. एका रात्री खूप पाऊस कोसळला–
बेबी रात्री ?
आई : काऊचं वाहून गेलं घर. तो चिमणीकडे गेला मग.

वेवी चिमणी ब्राह्मण असते आई ?

आई असते.

वेवी आई गाय पण ब्राह्मण असते. ?

आई (त्रासिकपणे) गोष्ट अैकायची आहे ना तुला वेवी ?

वेवी (वरमून) सांग.

आई कावळा म्हणाला, "चिऊ चिऊ दार उघड. मला—"

वेवी तहान लागली आई.

आई पिऊन ये.

वेवी भीती वाटते ग. तू चल ना.

आई माझ्यानं नाही ग उठवत...मी आहेना इथे ? जा.

(भीतभीतच वेवी स्वयंपाकघरात जाते. पाणी पिते व घाईनेच परतते)

वेवी (येतायेताच) मग काय झालं ? आई——

आई (कसेतरी) अं ?

वेवी (जवळ बसत) मग काय झालं आई ?
(मोठचाने) आई ऽ
ए आई ऽ
आई झोपली... (रडव्या सुरात)
परत झोपली. (रडत)
ए आई ऽ

[आईला गदगदा हलवते तशी आई उठते. चिडून वेवीला मारू लागते. ती बचाव करीत असताच रंगमंच अंधारू लागतो व पूर्ण काळोख पसरतो.]

[काही काळ सामसूम. घडयाळाची भयाण टिक् टिक् तेवढी अैकू येते. रंगमंच उजळतो तेव्हा थोडया-फार फरकाने पूर्वीचेच दृश्य. आई निद्रिस्त. वेवी तिष्ठत जागी. अचानक घडयाळाचा गजर होतो आणि वेवी भयभीत होते. आई उशालगतचा गजर बंद करते. उठून औषध घेत–]

आई अलार्मला घावरायचं वेवी ? (वेवी फक्त डोळे पुसते.) झोप...

वेवी भीती वाटते ग.

आई ये माझ्याजवळ.

वेवी तुझीय् भीती वाटते.

आई आईला भ्यायचं वेवी ? ये–

वेवी पण तू आजारी आहेस. फट्दिशी मरून जाशील. म ऽ ग ?

आई कुणी सांगितलं वेवी तुला ?

वेवी : सगळेच म्हणतात. तुझा काही नेम नाही म्हणतात... बाबा येतील का ग ?

आई त्यांचं काही नक्की असतं का वेवी ?

वेवी भीती वाटते ग. तू झोपली ना की अगदी तश्शी दिसते.

आई (नेत्र विस्फारून) कशी वेवी ?

वेवी मरल्यासारखी.

आई (रागावून) वेवी–

वेवी तुझा हात उचलला न् सोडला ना कि पटकन् खाली पडतो. गळल्यासारखा.

आई झोप लागल्यावर असंच होतं वेवी. सगळयांचं.

वेवी पण तोंड उघडं ठेवून नाहीच झोपू ग. वाईट दिसतं.

आई (नापसंतीने) वेवी–

[–तोच दारावर उत्सुक थापा अैकू येतात. प्रथम दोघीही दचकतात. पण पाठोपाठ 'वेवी ऽ . . वेवी ऽ ऽ' अशा उतावीळ हाका कानी पडताच वातावरण आनंदी होते. धावत जाऊन वेवी दार उघडते. वडिलांना घट्ट घट्ट विलगते. त्यांचे मुकेसुद्धा घेते.]

बाबा (आनंदातिशयाने) अग अग–

वेवी आता नाही भीती वाटणार...

बाबा कशाची भीती वाटते तुला ?

वेवी रात्रीची, अंधाराची पण.

बाबा वेडी कुठली.

आई मलासुद्धा भिते.

बाबा (हसत) तुला तर मीही भितो.

वेवी घडयाळाची पण भीती वाटते बाबा मला...बाबा घडयाळ कसं बंद करायचं हो ?

बाबा कसं बंद करायचं ? कसं करायचं ग ? (क्षणभराने) अग खेळणं आणलय् ना तुझ्यासाठी.

वेवी हो ? दाखवा ना बाबा.

बाबा पण मला बोलू द्यायचं मग आईशी ?

वेवी हो.

बाबा (सूटकेस उघडीत) कशी तब्येत आहे ग ? डॉक्टर आले होते ? (खेळणे काढतात.) घे वेवी.

वेवी (हर्षभरित होत) ओ हो ! किती छान !

बाबा बघ हं हा टाळचा वाजवतो–

[वेबीच्या आनंदाला पारावार राहत नाही. वडिलांना बिलगून कृतज्ञतेने ती म्हणते–]

वेबी : बाबा तुम्ही घरीच राहत जा. रहाल ना ?

बाबा राहीन. पण आता झोपणार ना तू ? जागी कशी तू इतका वेळ ?

वेबी देवाकडे पाय करून झोपायचं नसतं ना हो बाबा ?

बाबा हो.

वेबी आई म्हणते देव सर्वीचकडे असतात. म ऽ ग ?

बाबा (गोंधळून) तू मांडीवर झोप माझ्या ये–– (तिला मांडीवर घेऊन थोपटतात.)

आई (शांत स्वरात) स्वतः झोपत नाही. माझा पण डोळा लागू देत नाही. वाट्टेल ते विचारत असते. तुम्ही निघून जाता. मी सापडते.

बाबा (काळजीयुक्त स्वरात) डॉक्टरांना दाखवावं लागेल हिलाही. (वेबीला) वेबा ! डोळे मिटा बरं आता. आणि मी आईशी बोलेल ना ! तेव्हा बोलायचं नाही मधे.

वेबी : ब ऽ रं.

बाबा (पत्नीला) आले होते ? डॉक्टर काय म्हणाले ?

[आई काही सांगत असताच रंगमंच काळोखात बुडत जातो. वेबीचे उदास निवेदन पुन्हा ऐकू येते.]

" ऐकतेस ना वेबी ? झोप न येण्याचा विकार लोपही पावला असता ग . अस्थिर का होईना मला झोप लागे. पण मधेच मी दचकून उठे. भीतीनं रडू लागे. तशात बाबांनाही ओळखणं दुष्कर होई . . मग आईच वारली. ती गेली तेव्हा जागीच होते मी. तिला नेलं तेही पाह्यलं मी. धर्माकर्माच्या विधीही बघितल्या. सूर्यास्त बघतानाची धडधड तेव्हाही जाणवली (रंगमंच उजळू लागतो)...पुढे ठाई ठाई आईच्या वस्तू दिसत आणि भयाची उर्मी उसळी घेई. झोपेत येऊ लागलेली स्थिरता अशी ढासळली... मी बाबांजवळ निजे पण पुढे त्यांचं लग्न झालं वेबी. "

[रात्र. वेबी बिछान्यावर निद्राधीन होत असलेली. थोपटणे हलके हलके करीत बाबा उठण्याच्या बेतात. श्यामला–वेबीची नवी आई–दुधाची कपबशी घेऊन येते.]

श्यामला (येतायेताच) अहो–

बाबा (तोंडावर बोट ठेवून) शू ऽ ऽ ऽ. आवाज करू नकोस.

श्यामला (हळू आवाजात) झोपली ?

बाबा झोपतेय्.

श्यामला दूध आणलं ना––

बाबा राहू दे आता . तू जा मी येतोच.

श्यामला औषध पण द्यायचंय् हो तिला.

बाबा (किंचित चिडून) मघाशीच कां नाही दिलंस ?

श्यामला दुधातून द्यावं लागतं ना. दूध आत्ता आलं–

बाबा परत झोपणार नाही ती. चालेल ?

[नवऱ्याच्या डोळ्यातील भाव पाहून श्यामला परतते. काही वेळाने हळूच बाबाही आत जातात. दार लावल्या जाते. काही काळ स्वब्धता क्षणाक्षणाला घड्याळाची टिक् टिक् वाढत जाते. वेबीत तसतशी बेचैन होऊ लागते. अंती घड्याळाच्या आवाजात असंख्य आवाज मिसळतात. भिन्न भिन्न भावाविर्भावात तिला आई जाणव लागते –– अस्वस्थता पराकोटीला पोचल्यावर वेबी किंचाळतच जागी होते आणि बाबा व श्यामला धावत येतात. वेबी त्यांनाही भिते. मग मात्र वडिलांना घट्ट बिलगते. सावकाश सारे ध्वनी विरत जातात. वेबीचे हुंदके तेवढे ऐकू येतात–]

श्यामला भीती वाटली वेबी ? ये मजजवळ.

वेबी तुम्ही इथेच रहा बाबा. माझ्याजवळ.

बाबा तू झोपायचा प्रयत्न कर बघू.

श्यामला थांबा मी दूध आणते– (आणते)–घे वेबी. मघा दूध आणलं तेव्हा झोप लागली होती तुला.

वेबी मला माहीत आहे तू आलेली.

श्यामला मग उठली का नाहीस ग ?

वेबी उठताच येत नाही ग. हातय् हलवता येत नाही.

(पुन्हा रडण्याचा उमाळा येतो.)

श्यामला अहो पुरे झालीत ही औषधं. उद्या डॉक्टर पुरंदऱ्यांकडे चला बघू.

बाबा उद्या कसं शक्य आहे ?

श्यामला तुम्हाला जायचंय् नाही का ? (क्षणभराने) मीच जाईन मग. वेबी. आता झोपणार नं ?

वेबी तुझ्याजवळ.

श्यामला वरं ! आणि भ्यायचं नाही वरं का. (तिला कडेवर घेत) अग कोणी काही करत नाही. समजलं ?

[बेबीला घेऊन जाते. बाबा अस्वस्थपणे फेऱ्या घालू लागतात. आणि रंगभूमी अंधारून येते.]

"तुझ्यापासून काय लपवायचं ? आणि लपवणार तरी कसं ? आपण वाढलो तशा गोष्टी वदलत गेल्या. मध्यंतरी बाबाच् वारले न् नव्या आईनं नवीन लग्न केलं. इतक्या वडामोडी झाल्या पण सूर्योदयाची प्रतीक्षा करीत बसणं माझ्यासाठी नित्यरात्रीची बाब होती. इतरांची झोप मोडावी म्हणून मी नाना तऱ्हा करी. द्वेष ! हो मत्सरच वाटायचा मला झोपणारांचा. घरा-भरातले दिवे लावून मी झगझगाट करी. रेडियोचा खरखराट फुल् व्हाल्यूम वर नेई, आणि त्या रात्री तर नागाचा एक जोड आत शिरल्याची हूल उठवून सगळ्यांचीच झोप मी ठेचून काढली—मन गुंतून रहावं म्हणूनही खटाटोप करी. पुस्तकं चाळीत बसे. कुठकुठली अज्ञात स्टेशनं ऐकत रात्री काढी...एकदा बाबांचा जुना सूटच घालून पाह्यला. एका रात्री सिगारेटही ओढून पाह्यली. (क्षणिक स्तब्धतेनंतर–) सव्वीस नोव्हेंबर एको-णीसशे साठ रोजी—मी अशीच त्रस्त, अस्वस्थ होते...(रंगमंच उजळू लागतो) जवळ येणाऱ्या गुरख्याच्या शिट्या ऐकू येत होत्या. आता हा घरासमोरून जाणार मी ताडलं..."

[बेबी तरुणी आता. अंतरा अंतराने गुरख्याच्या जवळ येणाऱ्या शिट्या. बेबी बेचैन. विचारांती ती गॅलरीत जाते. टाळी वाजवून गुरख्याचे लक्ष वेधते.]

गुरखा (खालून) जी बाई ?

बेबी (शक्य तेवढ्या स्थिर आणि खाजगी स्वरात) उपर आव.

[वळते. मुद्रा बावरलेली. वर येणाऱ्या गुरख्याच्या जोड्यांचा ध्वनी. बेबी त्याला आत घेते. तिला दार लावताना पाहून गुरखा स्तिमित होतो–]

गुरखा क्या बात है बाई ?

बेबी (गोंधळून) तुम्हारा नाम क्या है ?

गुरखा दरबारासिंग. क्यौं ?

बेबी (एकाएकी) तुम ड्यूटी बराबर नहीं करते.

गुरखा हम तो रातभर गस्त लगाते है बाई.

बेबी मैं भी तो रातभर जगती हूं.

गुरखा (विस्मयाने) क्यों ? (बेबी स्तब्ध) हम जायें बाईसाब ?

बेबी (चाचरत) ठहरो...रातभर तुम भी जागते हो ना ?

गुरखा (शंकित स्वरात) बात क्या है बाई ?

बेबी मैं भी सारी रात जगती हूं.

गुरखा (हंसत थोडेसे) तो कोई डॉक्टर के पास जाव बाई. हम—

बेबी (चट्दिशी) तुम यहां आया करो; तुम्हे कार्डस् खेलना आता है ? ताश—आता है ?

गुरखा (धीटपणे) एकही खेल. वो खेल खेलोगी आप ? (हंसत) हमारे साथ ?

बेबी (श्वास रोधून) कौनसा खेल ?

गुरखा तीन पत्ती.

बेबी (उतावीळपणे) मै सीख लूंगी.

गुरखा (सर्द होऊन) याने जुआँ ?

बेबी (तात्काळ) तो क्या हुवा ? मै खेलूंगी.

गुरखा आपको डर नहीं लगता ?

बेबी (निर्धाराने) नहीं.

गुरखा (खाजगी सुरात) घर में आप अकेली है ?

बेबी हां.

गुरखा म-मगर हमको डर लगता है. मैं—

बेबी (धीटपणे) गुरखे भी डरते हैं...? (रुक्षपणे) मेरा डर तो मर चुका है—(जणू स्वतःशीच) एकटेपणाचीच भिती वाटते मला—(हळू आवा-जात गुरख्याला) तुम्हे डरही लगता है ना मैं...मैं बत्ती बुझा देती हूं—

[लाइट ऑफ करते. काळोख.]

गुरखा : (उत्तेजित स्वरात) बाई बत्ती जलाव.

बेबी : (शांत आणि हुकमी स्वरात) दरबारासिंग—चुप रहो.

[प्रक्षोभक संगीत, ते विरल्यावर बेबीचा पुन्हा आर्त आवाज—]

"जगाला आपल्या तगमगीची तमा नव्हती ग ! ह्या गोष्टीचा बभ्रा झाला नाही असं कसं म्हणू ? मी दिवसाही एकाकी पडले. मलाही जगाची पर्वा राहिली नाही—पण दरबारासिंगला मीच

हाकलून लावलं. . .नंतर त्याला थकवा यायचा, ग्लानी यायची. तो झोपून राह्यचा. (सुस्कारा सोडून) किंमत मोजूनही मिळत नाहीत काही गोष्टी हेच खरं ! एक नवी कल्पना मग घोळू लागली माझ्या मनात. निद्रापीडितांनीच एकत्र का येऊ नये—असं वाटू लागलं. तुझं माझं गाव काही वेगळं नाही. लहानही नाही. पण माणसंच निरोगी इतर. कुणि मिळालं नाही . . .पुढे बऱ्याच दिवसांनी एका त्रस्त दांपत्यानं त्यांचा मुलगा स्वाधीन केला माझ्या . . .(रगमंच उजळू लागतो) हाच प्रशांत. . . (जणू हाका मारीत–) प्रशांत (सुस्कारा सोडीत) गेला ? हाही रात्रभीतीनं त्रस्त ! (उदास हंसत) आणि रात्रीचा त्रास न् दिवसाचं दारिद्रय कमी व्हावं हा त्याच्या तीर्थरूपांचा उद्देश होता किंवा असावा. "

[रात्रच. प्रशांत कुठलेसे पुस्तक वाचण्यात व्यग्र. समोरच बेबी प्रशांतकडे एकाग्रतेने पहात. शेवटास न रहावून–]

बेबी : प्रशांत.

प्रशांत : (दचकून) कोण ?

बेबी : रात्रभर तू—

प्रशांत : काय ?

बेबी : वाचनाची आवड आहे तुला ? इतकी ?

प्रशांत आहे. इतकी मात्र नाही.

बेबी : मग ?

प्रशांत हा छंद नाही बेबीताई. बचाव. .एस्केप् आहे.

बेबी : बचाव ?

प्रशांत : हो बचाव. सुटका.

बेबी कशापासून ?

प्रशांत (उत्तेजित होत) भीती... भीतीपासून.

बेबी कशाचं भय वाटतं तुला प्रशांत ?

[भयाने त्याचे नेत्र विस्फारले जातात. चमकतात.]

प्रशांत : (धडपडत) तो विषय नको. . .आठवणच नको ती...मला वाचू द्या...(काही अयशस्वी क्षणांनी) आता होत नाही शक्य ते. होईल ? (पुस्तक आदळीत) विघ्न आणलंत तुम्ही. आता मी भिईन ! (अस्वस्थ फेऱ्या घालीत) कसं हाकलायचं विचारांना ? (ओरडून) कसं ?

बेबी : (हसून) मी सांगते. खुद्द माझीच गोष्ट सांगते. भ्यायचे मीही. लहानपणी. पुढे कळलं— ऐंशी टक्के काळज्या उगीचच्या असतात—

प्रशांत (चिडून) पंधरा टक्केही तेवढया सीरियस नसतात. फक्त पाच टक्के काळज्या काळजी करण्यासारख्या असतात. हेच ना ?

बेबी (हसत) तुला तर माहित दिसतं. बहुतेकदा आपणच आपली शिकार करीत असतो प्रशांत. वुई विकम अवर ओन व्हिक्टिम. माणसाचा मोठा शत्रू स्वत: तोच—खुद्द तोच आहे.

प्रशांत (धापा लागलेल्या) हे सगळं मीही वाचलं आहे.

बेबी मग का भितोस ?

प्रशांत (धडपडत) भयाची सवय जडली आहे मला. मला भीती चढते. भय भिनत जातं माझ्या अंगात विषासारखं. पण तीही एक नशाच ! तगमग, कमालीची व्याकुळता, पराकोटीची थरथर होते मग...फार त्रास. फार फार मन:स्ताप होतो हो...पण मग झोप लागते.

बेबी (चमकून) झोप लागते.

प्रशांत भयाच्या थकव्यानं.

बेबी मग मला कशी नव्हती लागत ? तुला ग्लानी येत असेल.

प्रशांत ग्लानी कुठली. मूर्छा येते. शुद्ध हरपते.

बेबी (समाधानपूर्वक) तेच म्हटलं. (उसळून) बेशुद्ध होणं म्हणजे काही झोप नव्हे. (तुच्छतेने) मूर्च्छेला तू निद्रा म्हणतोस ? Sleep is a—

प्रशांत : (ओरडून) recurring state of inactivity, decrease of consciousness and responsiveness—बेबीताई झोपेवरलं सगळं वाङ्मय मी वाचलं आहे— (हताश स्वरात) रात्र रात्री जागून.

बेबी (स्तिमित होऊन) वाचत का असतोस सतत ?

प्रशांत काय करणार ? (क्षणभराने) वाचू मी ?

बेबी : (निर्धारपूर्वक) नाही.

प्रशांत (विस्मयाने) नाही ?

बेबी होय नाही. तुझ्यातलं भय मला निपटायचं आहे. तुझी व्याधी दूर करायचीय्. तुला ह्या विपत्तीपासून—

प्रशांत आपत्तीग्रस्तांना नेत्रसुख देणाऱ्या गोष्टी कोणत्या असतात सांगू ? स्वत:सारखीच त्रस्त

आणि ग्रस्त इतर माणसं...त्यांची दुःखं, त्यांचं तडफडणं. फार समाधान वाटतं अशांना पाहून– (हसत) तुम्ही तुमच्या सुखावर तिलांजली सोडणार. बेबीताई ? माणसाचा मोठा शत्रू खुद्द तोच:—स्वतःच असतो हे खरंच तर !

बेबी (रागाने) प्रशांत. फार मुजोर आहेस तू. का असा विचार करतोस ? मी तुझी गार्जियन आहे. माझा तू गुलाम नाहीस (थांबून) हसलास ?

प्रशांत हसलो ? मग मी चुकलो. मला फक्त कुत्सित भाव व्यक्त करायचा होता.

बेबी (अधिक रागावून) कशासाठी ?

प्रशांत (त्वेषाने) तुमच्या खोटंचा, फसव्या, तकलादू कळकळीसाठी...उपऱ्या पालकाला कुठली तळमळ, कळकळ, तगमग ? आईवडील सख्खेच ना माझे ? पण सत्य सांगू ? सख्खी असते झोप. सख्खी असते भूक. सख्खे असतात भोग. बाकी सव्व झूट... (कुत्सित हसत) कोण कुणाचं आहे जगात ? कोणी कुणाचं नाही. मुलगा मी त्यांचा. पडलोच ना जाळ्यात तुमच्या ? तुमच्या झोळीत त्यांनी–माझ्या सख्ख्या आईबापांनी— टाकलं मला...

बेबी (चकित होऊन) प्रशांत–

प्रशांत Now about you—माझा पुळका, दया, कीव नाही आलीय् तुम्हाला. तुम्हाला सोबती हवाय्. रात्रभर तिष्ठत जागणारा. तुमचं मन रिझवणारा. असा मग कुणीही चालतो तुम्हाला. गुरखा देखील–

बेबी (ओरडून) प्रशांत–

प्रशांत मी होता मिळवला एक साथीदार.
तो नाही झोपायचा.
दृष्टीला दृष्टी मिळवायचा. हुंदडायचा. रात्रभर जागायचा.
माझा टायगर कुत्ता.
(भयंकर त्वेषाने) पण मारलं साल्यांनी.
पशू. राक्षस. नराधम !
(गदगदून) घरी नव्हतो मी. ह्याच्या गळ्यात पट्टा नव्हता.
माझ्या गळ्यात तुम्ही अडकवला. ठीक आहे.
पण माझा निद्रानाश बरा होणार आहे. क्रॉनिक नाही तो तुमच्यासारखा.
तुम्ही तडफडाल. विद्ध व्हाल. जळत, शिजत जागत रहाल. (थकून)
आणि माझा विकार बरा होणार आहे.
वरा होणार आहे...

[बेबी दिङ्मूढ होते. शक्तिपात झाल्यागत प्रशांत सोफ्यात कोसळतो. संथ पावले टाकीत बेबी त्याच्याकडे जाते व रंगभूमी अंधारून येते.]

"सहचर म्हणूनच तुझी योजना होती रे प्रशांत. पण तू वैर पत्करलं. माझ्या मनाचा पूर्ण थांग गाठलास. माझ्याच मनाचा येवढा तळ मीही कल्पिला नव्हता. अपमानाची ही जाणीव, वर त्याचा विकार दूर होईल ही भिती ! संतापानं मी क्रूर बनले. हट्टाला पेटले. त्याची मी पुस्तकं तोडली त्याला एकटं एकाकी पाडत गेले.(रंगमंच... उजळू लागलेला) नजरकैदेतच ठेवलं मी त्याला. त्याला जास्तीत ज़ास्त छळायचं, प्रसंगी भितीत भरच घालायची त्याच्या असं ठरवलं मी."

[रात्रीचा दुसरा प्रहर. सशाप्रमाणे थरथरणारा प्रशांत सोफ्यात दबून. रेडियोवर संथ पाश्चात्य भयसंगीत. बेबीच्या अस्वस्थ येरझारा सुरू–तशात अचानक उडी मारून प्रशांत उभा होतो. नेत्र भयविस्फारित. केस ताठ. भितीने तोंडून त्याच्या अभद्र किंकाळी फुटते, दचकून बेबीही वळलेली—]

प्रशांत (तोंड लपवीत. रडत) आली. ती आली शेवटी.

बेबी (घाबरून) कोण आली ?

प्रशांत : ती बाई. पांढरीफटक. केस सोडलेली—आत्ता स्वयंपाकघरात गेली—

बेबी : तुला भास झाला असेल प्रशांत.

प्रशांत भास नाही. पाठलागच करते ती. जिथे जातो तिथे येते ती.

बेबी मला नसती का दिसली ?

प्रशांत (घामाझोकळ होत) त्यानाय् नाही दिसायची. आईबाबांना.

बेबी मी पहाते आत जाऊन.

प्रशांत (तिचा हात धरून) नाही नाही. तुम्ही जाऊ नका.

बेबी (उसने अवसान आणून) मला नाही भीती वाटत.

प्रशांत (तिचा हात गच्च धरीत) पण मला वाटते ना. नाही जायचं, इथेच रहा. रहा इथेच. ती तुलाही व्हिक्टिम् करील...व्हिक्टिम्.

[पण बेबी निर्धारपूर्वक स्वयंपाकघरात जातेच. थोड्याच वेळात आत भांड्यांची उतरंड पडल्याचा प्रचंड आवाज. प्रशांत गर्भगळीत होतो. बेबीही धावत येते. तीही विलक्षण भ्यालेली. पण प्रशांत दिसताच तिच्या मुद्रेवर क्रूर, निश्चयी, खुनशी भाव उमटू लागतात. प्रशांत सोफ्यात दडलेला. त्याच्याकडे एक कटाक्ष टाकून पावडरपफनं बेबी सावकाश तोंड पांढरे करते. मग केस धरून प्रशांतचा चेहरा सामोरा करू पहाते.]

प्रशांत (जिवाच्या आकांताने) सोड. सोड माझे केस. चांडाळणी—

बेबी : (दटावीत) इकडे पहा प्रशांत.

प्रशांत : नको ग हात लावू. गार गार आहेत ते. थंडगार. विशविशीत. मी निरपराध आहे ग—

[बेबी खदखदून हसते. क्षणिक कमरेवर हात ठेवते. मग केस मोकळे सोडत—]

बेबी : मला नाही ओळखलं प्रशांत? अरे मी तुझी....

प्रशांत : कोणी नाही...जा तुम्ही. जाच. जा हो. जाता ना?

बेबी : जाते ना.

प्रशांत धन्यवाद. धन्यवाद मी—

बेबी एकदा तुला इकडे पहावं लागेल प्रशांत.

प्रशांत : मग जाऽल?

बेबी : हो. जाईन.

[प्रशांत हळूहळू तोंड फिरवितो. बेबी अधिकाधिक भेसूर व आक्रमक होते. ती दिसताक्षणीच प्रशांत भान हरपू लागतो. भयविस्मित नजरेने तिला बघतच रहातो. आता बेबी त्याला जवळ घेते—]

बेबी पाह्यलंस पिला माझ्या?

प्रशांत (श्वास लागलेला) केस तुझे...मोकळे कसे? चेहरा? तसाच अगदी—तू तीच होतीस? (तिला स्पर्श करून—) वाटलंच मला. भास नाही हा... खरी अगदी खरी होती भीती माझी...सत्य होती. (अगतिकपणे निश्चल होतो. त्याची दृष्टी थिजत जाते. निश्चल, निचेष्ट, ताठ, होत.)

बेबी (मांडीवर त्याचे डोके घेत)—शुद्ध हरपायची नाही प्रशांत. बेशुद्ध नाही व्हायचं...(ठिकठिकाणी हात ठेवून) स्पर्श जाणवतो माझा? वाटतो काही वेगळेपणा? वेगळाई?

[भय-स्वर मधेच तीव्र होतात. बेबीचे प्रशांतला कुरवाळणे सुरूच! बेबाचे संथ पण स्पष्ट निवेदन पुन्हा ऐकू येते—]

"प्रशांत, शांत होत गेला. भयाच्या भीतीनं... नखही टोचावं लागलं नाही मला. मी केवळ हात, बोटं फिरवीत राह्यले...हळुवार हात, हलकी बोटं. दर आवर्तनात थरथर क्षीण व्हायची त्याची...दृष्टी विरत–थिजत जायची...(मोठ्या स्तब्धतेनंतर) वाटलं बेबी सूड घेतला मी... पण आता वाटतं सूड मीच माझा घेतला. त्याची सुटका केली. मी एकटी परत एकाकी. (उत्तेजित स्वरात) पण हे केलं मी की होत गेलं हातून माझ्या? माझी मलाच भीती वाटू लागली होती. अशी अवस्था झाली की भयाची नशा चढते बहुधा. मग भय वाढावं...खूप वाढावं, आणखी चढावं असं वाटू लागतं. भयाच्या कुशीत आपण लवकर मरून जावं, असं वाटू लागतं मग... सगळ्यांनी सोबतच मरावं अशी इच्छा होती. पण एकटा प्रशांतच माझ्या हाती...त्यालाही गमावून बसले. क्रूर, दुष्ट, लुच्चा! माझं भय घेऊन गेला मला एकटं टाकून गेला—कोण कुणाचं आहे जगात? कुणी कुणाचं नाही—

[एव्हाना सर्वत्र काळोख दाटून आलेला. बेबी व प्रशांत तेवढे प्रकाश वर्तुळात. आता बेबीही पुतळ्यावत् स्थिर. दृष्टी शून्यात. तिच्या निर्विकार चेहऱ्याचे ओठ तेवढे हलताना दिसतात आणि आवाज ऐकू येतो]

बेबी : बेबी! प्रत्यक्ष हत्या आपण कुठे केली? आपण विकारग्रस्त आहोत...स्त्री आहोत वर तरुण आहोत...मग दया दाखवतील का ग हे? मला वाई भीती वाटते. फाशी हवीय् ग....आता मृत्यूचीच आस आहे. ज्यानं भय दाखवून माझं बालपण–जीवन नासवलं त्याचीच ओढ आहे आता. भ्यायलाच नको होतं. मृत्यूभयच मग मेलं असतं (खुदकन हसत) पण मृत्यूदंड

[पान ३८३ वर]

प्रबंध-संशोधनाचा बीजमंत्र

द. भि. कुळकर्णी

प्रबंध-पदवीसाठी संशोधन करणाऱ्या अभ्यासकांचा एक स्वतंत्रच वर्ग आहे.

एम्. ए. नंतरची पुढची पदवी म्हणून अभ्यासक या प्रबंध-पदवीकडे पाहत असतात.

या प्रबंध-पदवीमुळे वेतनवृद्धी, बढती आणि प्रतिष्ठा मिळण्याची शक्यता असते; म्हणून एम्. ए. झाल्यावरोवर विद्यार्थी प्रबंध-पदवीचा विचार करू लागतात.

विद्यापीठ अनुदान मंडळ, महाराष्ट्र शासन, विद्यापीठे अशा संशोधनकार्यात आर्थिक साह्य करतात; असे आर्थिक साह्य प्राध्यापकाच्या पगाराच्या मानाने डावे असले तरी आर्थिक स्थिती बरी असलेल्या, अविवाहित अथवा महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्यास ते प्रबंधार्थ संशोधन करण्यास निश्चित प्रोत्साहक ठरते.

रसायनशास्त्र आणि हिंदी या विषयात प्रबंध-पदवीधारकांची संख्या लक्षात येण्याइतकी वाढती दिसते; अशा व इतर यशस्वी संशोधकांची छायाचित्रे-परिचय वृत्तपत्रांतून येत असतात. त्याचाही परिणाम इतर विषयांतील तरुण विद्यार्थ्यांवर होऊन ते आपापल्या विषयांतील प्रबंध-पदवीसाठी झटू लागतात.

विद्यापीठाने प्रबंध-मार्गदर्शक नेमलेले असतात. अशा प्रबंध-मार्गदर्शकाचे शैक्षणिक व्यक्तिमत्त्वही-त्याची अध्यापननिष्ठा, संशोधनपरायणता, मार्गदर्शनाची कळकळ—अनेक विद्यार्थ्यांना प्रबंध-पदवीकडे ओढत असते.

विज्ञानविषयांपेक्षा कलाविषयांमध्ये असे संशोधन करणे, एका संदर्भात, सोपे असते; विज्ञान-विषयात अद्ययावत उपकरणे व मार्गदर्शकाचा सतत सहवास बहुधा आवश्यक असतो. कलाविषयांत, क्षेत्रपाहणी-सारखी जरा जिकिरीची कामे क्वचित असली तरी, उपकरणे आणि मार्गदर्शक यांच्याऐवजी सुसज्ज ग्रंथालये व पत्रव्यवहार यांच्या बळावर विद्यार्थी आपले संशोधन-कार्य पुढे रेटू शकतो. मराठी-हिंदीसारख्या विषयांत, वाङ्मयीन संदर्भात, संशोधनकार्य करावयाचे असले तर कथा-कादंबरी-नाटक-समीक्षा या विषयांचे ग्रंथ सार्वजनिक नगरवाचनालयांतही खूपसे उपलब्ध होऊ शकतात; त्यासाठी संदर्भ-ग्रंथालयांची सतत निकड नसते.

मराठीसारख्या विषयात आज प्रबंध-पदवी घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे त्याला अशी अनेक कारणे आहेत.

ही वाढती संख्या व विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊनच बहुधा डॉ. दु. का. संत व डॉ. स. गं. मालशे यांनी संशोधनकार्याच्या पद्धती सांगणारे उपयुक्त लेखन अलीकडे प्रकाशित केले आहे; इंग्रजी आणि हिंदी या भाषांत तर असे विपुल लेखन आहे. प्रबंधार्थ संशोधन

[पान ३८२ वरून]

दिवसा नको गडे ! म्हणूया फाशी रात्रीच द्या. कधी का सूर्यविलाप केला आपण ? रात्रीरात्रीतूनच केला ना ? दिवसाचं काही आठवतच नाही ग. त्याचं काय देणं लागतो आपण ? आपण फक्त रात्रीच जगलो. . दिवसाचे वाटेकरी इतके. रात्रीचे वाटसरू तेवढे आपण. . फक्त आपण. (स्तब्धता) कैद्यांना इच्छा विचारतात म्हणे शेवटची. फाशी देण्यापूर्वी. मी .सांगते माझी इच्छा. फाशी आपण रात्र आणि दिवसाच्या सीमावेळेला मागू या. काय ? अय्या ! पण सूर्यबिंब संधिप्रकाशातलं नको हं ! सूर्य उगवता असायला हवा. सूर्याला सूर्यविलाप आपला. . .दिसायला नको का ? दिसला पाहिजे—

[रंगमंच अंधारून येतो. अंधारातच पडदा]

* *

सुरू करण्यापूर्वी प्रत्येक विद्यार्थ्याने असा एक तरी दर्जेदार ग्रंथ बारकाईने अवलोकन केला पाहिजे. विषेशत: ग्रंथालयांच्या व संदर्भ–ग्रंथांच्या उचित वापराच्या पद्धती, संदर्भ–सूची तयार करण्याची आवश्यकता व पद्धती आणि तळ–टीपा–प्रकरण–टीपा देण्याचे हेतू व प्रकार या संदर्भात असे ग्रंथ विद्यार्थ्यांस निश्चित मार्गदर्शक ठरतात.

अशा ग्रंथांत 'संशोधनाचे तत्त्वज्ञान' ही विशद केलेले असते. परंतु तांत्रिक विवेचनाचा स्वाभाविकरीत्या होणारा विस्तार व विद्यार्थ्यास प्रारंभिक अवस्थेत तंत्र-पद्धतीची असणारी नवलाई व गरज यामुळे अशा ग्रंथांतील तात्त्विक विवेचन विद्यार्थ्याच्या मनावर पुरेसे ठसत नाही असे दिसते; व म्हणून त्यासाठी स्वतंत्रच लेखन होणे आवश्यक आहे असे वाटते.

मराठीत एम्. ए. झालेला विद्यार्थी प्रबंध–पदवीचा विचार करू लागतो तेव्हा प्रथम तो काय करतो ? एखाद्या आपल्या आदराच्या–अथवा–सत्ताधिष्ठित मार्गदर्शकास गाठतो; त्याला आपला संकल्प सांगतो व त्याच्याकडूनच विषय व विषयाची अधिकृत रूपरेखा यांची अपेक्षा करतो; या बाबतचे–व विशेषत: रूपरेषांबाबतचे–नागपूर विद्यापीठाचे नियम असे आहेत की मार्गदर्शकासही नकार देणे जड जाते.

या बाबतीत विद्यार्थ्याच्या बाजूने उपाय असा आहे की त्याने प्रबंध-पदवीसाठी नाव नोंदविण्याची घाई न करणे ! नाव नोंदण्याचेही लाभ आहेतच. कामाला वेग यतो, आपला विषय सुरक्षित राहतो. हे लाभ लक्षात घेऊनही नाव नोंदणीची घाई न करणे हेच उत्तम; आजपर्यंत तरी या विद्यापीठात एम्. ए. मराठीसाठी एक निबंधाची शंभर गुणी पत्रिका आहे. या पत्रिकेची तयारी करताना कितीतरी विषयांची 'नांगरल्याविण भुई' विद्यार्थ्यास दिसू शकते. असे संशोधन-विषय-बीजही त्याला केवळ शिकारी वृत्तीने सापडणार नाही; आणि सापडले तरी खऱ्या अर्थाने उपकारक ठरणार नाही. त्यासाठी त्याला त्या विशिष्ट विषयात आतून ओढच हवी; मग तो विषय सौंदर्यशास्त्रीय असो, भाषाशास्त्रीय असो अथवा वाङ्मयीन असो—त्याची त्याला आतून ओढच हवी.

असे विषय-बीज सापडले की आपला संशोधन-प्रवास सुरू झाला असे विद्यार्थ्याने समजावे.

आता एकदम मार्गदर्शक किंवा शिष्यवृत्ती यांच्या मागे न धावता त्याने प्राध्यापक व्हावे ! सध्याचे महाविद्यालयीन अध्यापन व प्रबंधार्थ संशोधन यांची सांधेजोड नीटशी होत नाही, हे खरे; तरीही इतर कुठल्याही पेशापेक्षा अगदी संशोधन-सहायकाच्या पेशापेक्षाही असे अध्यापनकार्य प्रबंधार्थ संशोधनास उपकारक ठरू शकते; प्रबंधाचे विषय-बीज वाङ्मयीन असेल तर अधिकच : नाटक-कथा-कादंबरी आदी ललितकृती शिकविताना आपले संशोधन-बीज व आपले अध्यापन यांची व्यापक सांधेजोड शक्य असते. एरव्हीही अध्यापन, सहली, स्नेहसम्मेलने, एन्. सी. सी., शिक्षणक्षेत्रीय राजकारण यांना तोंड देत संबंधित विषय-बीजाच्या अनुषंगाने वाचन-चिंतन शक्य असते. विशेषत: आपल्या विषय-बीजामध्ये खराखुरा रस असतो तेव्हा असे वाचन-चिंतन हे ओझे न ठरता भोवतीच्या जंजाळातून सुटल्याचा व भावात्मक आनंदाचा तो ठेवाच असतो.

अशी काही वर्षे जाऊ द्यावीत.

प्रबंध-पदवीच्या दृष्टीने ही वर्षे वाया जात नसतात; ही पायाभरणीची—नव्हे 'प्लॉट डेव्हलप' करण्याची वर्षे असतात. या काळात जबाबदार प्राध्यापक म्हणून प्रस्थापित होणे, अवांतर व अध्यापनाशी संबंधित असे वाचन-लेखन करणे ही कामगिरी अपेक्षित असते; जी प्रबंधपदवीच्या प्राप्तीस व डॉक्टरची उपाधी शोभून दिसण्यास चांगल्या अर्थाने, साह्यभूत ठरते; एम्. ए. झाल्या-झाल्या प्रबंधार्थ संशोधनात बुडून गेल्यास अभ्यासकाचे वाङ्मयीन जनरल नॉलेज व जनरल जनरल नॉलेज—एकूण व्यक्तित्वच—एकारलेले होण्याची शक्यता असते; त्यामुळे त्याची सामाजिक प्रतिमा तर शबल होण्याची शक्यता असतेच शिवाय अशा एकारलेल्या आणि अपक्व व्यक्तित्वाने केलेले संशोधनही दूषित उतरण्याची शक्यता असते.

अशा डेव्हलपिंगमध्ये चार एक वर्षे अदमासे जाताहेत तोच स्वत: अभ्यासकालाच आपले विषय-बीज चांगले मोडून आलेले दिसू लागते : आपल्या भावी प्रबंधाचा नेमका विषय व त्याची व्याप्ती जाणवू लागते; इथून पायाभरणीला, पूर्वतयारीला प्रारंभ होतो.

—आता त्याने मार्गदर्शकास भेटावे. त्याला सांगावे, "हा विषय माझ्या आवडीचा आहे; त्यावर मी चारएक वर्षे चिंतन-वाचन केले आहे; त्यावर संशो-

धन करण्याची माझी इच्छा आहे; या विषयात आणखी चारएक वर्षे रमण्याची माझी इच्छा आणि तयारी आहे; एवढेच नव्हे तर या विषयाला पुढे ज्या पारंब्या फुटतील त्यांच्या सावलीत अखेरपावेतो मी विसावू शकेन : त्या विस्तारत जाणाऱ्या विषयांवर संशोधन करीन." "मी विषय सुचविला, मी रूपरेषा सांगितली" असे चाचरत किंवा आढ्यतेने म्हणण्याऐवजी अशी वाक्ये ऐकणे कुठल्याही प्रबंध-मार्गदर्शकास अधिक आवडेल ! अशा अधिकारी शिष्याशी मित्रभावाने चर्चा करण्यात आणि त्याला पुन्हा एकदा विद्यापीठाचे नियम, सवलती; संशोधन-विषयाचा आवाका, त्यातील अडचणी, मौजा; संशोधनपद्धतींचा जाच, लाभ, विद्यार्थी-मार्गदर्शक संबंध हे सारे सांगण्यात त्याला समाधान मिळेल. या निमित्ताने आपल्या वैयक्तिक संशोधनजीवनास आणखी एक प्रवाह येऊन मिळाला, यामुळे आपले संशोधनायुष्य संपन्नच होणार आहे, यात त्रास-काच नाही असेच त्याला वाटणार. तो विद्यार्थ्याचा आणि विद्यार्थी त्याचा नित्यासाठी ऋणाईत राहणार.

त्याचे त्यालाच कळल्यामुळे व मार्गदर्शकाने सांगितल्यामुळे आता हा पी. एच्. डी. चा विद्यार्थी संदर्भ-यादी तयार करील. दाते-ग्रंथ-सूची, साहित्य-सहकार इत्यादी ग्रंथ व नियतकालिके यांच्या साह्याने त्याची 'मराठी' संदर्भ-यादी तयार होईल. आपल्या विषयावर आजवर मराठीत कोणी काय काय आणि कुठे कुठे लिहिले आहे, आपल्या विषयाच्या कोणकोणत्या संहिता केव्हा केव्हा प्रकाशित झाल्या आहेत हे तो टिपून घेईल. पण एवढे पुरेसे नाही. या विषयावर इंग्रजी, संस्कृत, हिंदी इत्यादी, मराठी अभ्यासकाला बहुशः अवगत असणाऱ्या, भाषांतही त्याच्या विषयावरील संपत्ती असणार. मग त्या त्या भाषांतील ग्रंथ-सूची, ग्रंथालयशास्त्रपर नियतकालिके, ज्ञानकोश, वाङ्मयेतिहास इत्यादी साधनांच्या साह्याने तो आपली 'मराठी' संदर्भ-यादी आंतरभारतीय आणि आंतरराष्ट्रीय करणार. (विद्येच्या प्रांगणातील मानवता अशी असते !) ही संदर्भ-यादी नेहमीच अपूर्ण राहील. म्हणूनच ती बांधीव आणि बांधीव वहीत नको. सुटया कागदावर भाषावार वा कालवार हवी, उघडया तोंडाची, मोकळया मनाची हवी. ओघाओघाने तिच्यात भर पडेल; बदल घडेल. त्यासाठीच चतकोर कागदाची फाईल. आणि अभ्यासकाने (मनाशीच) म्हणत राहावे, "या यादीतील सर्वांत महत्त्वाची नोंद तर अजून व्हायचीच आहे. माझा प्रबंध !"

आपल्या संदर्भ-यादीतील महत्त्वाचे ग्रंथ व लेख कोणते हे अभ्यासकास, अभ्यासपूर्ण तर्काने नव्हे पण, तारतम्याने—वाटल्यास आतल्या आवाजाने म्हणा—यादी तयार करता करताच लक्षात येते. विषय-बीजाच्या निमित्ताने त्याचे वाचन-चिंतन झाले असते; संदर्भ-यादी तयार करतानाही तो निव्वळ 'ग्रंथपाल' झालेला नसतोच—त्याचे वाचन-चिंतन सुरूच असते; आपल्या विषयकक्षेतील अधिकारी व्यक्ती कोण, कुणाचे आधार पदोपदी दिले जातात हे त्याच्या लक्षात आलेले असते.

—अशा महत्त्वपूर्ण वाटणाऱ्या ग्रंथांचे काळजीपूर्वक वाचन हा पुढचा टप्पा. अशा ग्रंथांची टिपणे काढावयास बसावे तर संपूर्ण ग्रंथच हस्तलिखितात रूपांतरित करण्याचा मोह होतो, ते जिकिरीचे काम; शिवाय ग्रंथालयाची जांभळी तारीख आणि छापील ताकीद मनाला अस्वस्थ करीत असते. ग्रंथ वाचनाने समाधान मिळत असते आणि असमाधान वाढत असते. काय करावे ? उत्तम मार्ग मार्गदर्शकाच्या अभ्यासिकेची वाट धरणे ! तो सांगतो, "तुम्ही महत्त्वाचे ग्रंथ विकत घ्या. महत्त्वाच्या नियतकालिकांची वार्षिक वर्गणी भरा. त्यांचे जुने बांधीव अंक मागवा आणि टिपणे काढण्याची संशोधनपूरक पद्धती समजावून घ्या." ग्रंथ आणि नियतकालिके विकत घ्या म्हणजे खर्चाचे काम. मध्यमवर्गीयांस चिंताजनकच (आणि मध्यमवर्गीयांसच असा संशोधनाचा वगैरे उत्साह अधिक.) किराणा—लाँड्री—करमणूक याप्रमाणे भल्या अभ्यासकाने 'पीएच्.डी.' हे सदरही आपल्या मासिक व्यय-पत्रकात समाविष्ट करून ठेवावे. एवढ्याने काय झाले आहे ग्रंथ-नियतकालिके या व्यतिरिक्त प्रवेश-शुल्क, नोंदणी-शुल्क, सत्र-शुल्क, प्रवास, टंकमुद्रण, परीक्षा-शुल्क (शिवाय औषधपाणी—स्वतःला डोकेदुखी, मित्रांना पोटदुखी !) हा खर्च पुढे आहेच. यापैकी काही सदरातील खर्च विद्यापीठ-विद्यापीठ अनुदान मंडळ भागवेलही; त्या सवलतीकडे आठवणीने लक्ष द्यायचेच; तरीही टंकमुद्रणासारखा खर्च—जो हजाराच्या आसपास सहज जाऊ शकतो आपला आपणच करावयाचा असतो; त्यासाठी बेगमी हवी. नाहीतर पदवी रेंगाळायची किंवा एका विद्यार्थ्याने केले तसे मार्गदर्शकालाच रक्कम मागण्याचे मार्ग चोखाळावे लागायचे !

तत्परतेने ते टिपून घ्या. मार्गदर्शकाशी मन:पूर्वक चर्चा करा. कदाचित, प्रगल्भ म्हणून नव्हे तर तुमच्यापेक्षा भिन्न व्यक्ती म्हणूनच तो एखादा नवा दुवा, नवा आक्षेप, नवा विचार तुम्हाला सुचवेल. समग्र प्रकरणावर घरीदारी चिंतन हवेच. पुन्हा लेख व पुस्तके चाळणे, कार्डे वाचणे आले तरी हरकत नाही. करा. अशा चिंतनात दिवसचे दिवस जातात. तो वेळ वाया जात नसतो. लोणचे मुरत असते. गेले कित्येक दिवस विषयावर प्रभुत्व मिळविणे चालले होते; आता विषयाला आपल्यावर पूर्ण प्रभुत्व मिळविण्याची संधी द्या. हे भारावलेपण फार सुखाचे आणि मोलाचे असते. प्रवंध-लेखनातील संकलनपरता, ठिगळपणा, नाहीसा होऊन इथे त्याला सृजनाचा स्पर्श होतो. आपल्या केंद्रवर्ती प्रमेयाशी सुसंगत अशा अनेक फांद्या आणि पारंब्या दिसू लागतात. लिहिल्याशिवाय राहवतच नाही. तो लेखनाचा शीण व्यासंगोत्तर व चिंतनोद्भव असल्याने दुहेरी सुखद असतो; मोठा जिवंत असतो तो दीर्घ क्षण. या 'थांबा आणि जा' अवस्थेत लेखन झाले तर रफ-फेअर असे सव्यापसव्यच उरत नाही. एकदम फेअर प्रकरण-फेअर प्रवंध. आणि तोही मार्गदर्शकाच्या पूर्ण अनुमतीने !

पण असे पहिले प्रकरण लिहून होण्यापूर्वीच, रूपरेषा तयार केली तेव्हाच विद्यार्थ्याने विद्यापीठात प्रवंध-पदवीसाठी नाव नोंदविलेले असते. त्याला वाटत असते दोन वर्षे केव्हा पूर्ण होतील; प्रवंध केव्हा सादर करीन; नावाच्या मागे—नव्हे पुढे—'डॉक्टर' केव्हा लावीन ? पण दिल्ली बहोत दूर असते. अजून एक वर्षही पूर्ण झालेले नसते. नोंदणीनंतर दोन वर्षे नगद पूर्ण झाल्यावर प्रवंध सादर करावयाचा असतो.

पहिले प्रकरण समाधानकारक झाल्याने अभ्यासकाचा आत्मविश्वास आणि उत्साह दुणावतो. ते रास्तच असते. अशीच आवर्तने पूर्ण करीत त्याला एकेक प्रकरण संपवावयाचे—पूर्ण करावयाचे असते. तो करतोही.

दरम्यान त्याला आणखी काही गोष्टी कराव्या लागतात १. सत्र-शुल्क भरणे. २. लेखनविषयक नियम (शुद्धलेखन) पूर्ण आत्मसात करणे. ३. अनपेक्षित स्थळी देखील प्रवंधविषयक सामग्री आढळू शकते म्हणून व व्यक्तित्वास एकसुरीपणा येऊ नये म्हणून अवांतर वाचन सुरू ठेवणे. ४. प्रवंध-संशोधनार्थ प्रवास. ५. मुलाखती. ६. पत्रव्यवहार. पण महत्वाची गोष्ट म्हणजे आपल्या विद्यापीठातील ह्यांत अधिकारी व्यक्तींशी संपर्क. कसा ? मार्गदर्शकाच्या अनुमतीने प्रवंधातील प्रकरणे मूळ स्वरूपात किंवा परिवर्तित रूपात दर्जेदार संशोधननिष्ठ नियतकालिकांतून प्रकाशित करणे; त्यांची मुद्रिते अधिकारी व्यक्तींकडे अवलोकनार्थ पाठविणे. यामुळे त्यांचाही सल्ला प्रवंध-लेखकास मिळू शकतो; संशोधनाच्या क्षेत्रात स्वत:ची एक अनुकूल प्रतिमा तयार होते. (या शिवाय आणखीही एक मोठाच फायदा होतो; पण व्यवहारचतुर विद्यार्थ्याच्या तो आधीच लक्षात आला असतो !) जेव्हा विद्यार्थ्याचा प्रवंध परीक्षकाकडे जातो तेव्हा त्या विद्यार्थ्याचे नाव परीक्षकाला आधीच ज्ञात असते व ते विद्यार्थ्यास व परीक्षकांस उभयतांस उपकारक ठरते.

'डॉक्टर' अशी उपाधी मिळाल्याबरोवर प्रवंधलेखकाची शैक्षणिक व क्वचित सामाजिक प्रतिष्ठा उंचावते. एका रात्रीत भोवतीचे लोक, नाही म्हणत म्हणत, वेगळ्या नजरेने पाहू लागतात. त्याचे त्यालाच आश्चर्य वाटते. एका रात्रीत आपल्याला शिंगे वगैरे फुटलीत का ?

ती आधीच फुटलेली असतात; अनेक वर्षे पूर्वतयारी करण्यात व अनेक वर्षे लेखन करण्यात; त्याच्या मनाला, व्यक्तित्वाला, आयुष्याला शिस्त, सावधपणा, अनाग्रह, तर्कदक्षता, उद्योगीपणा, विचारशीलता, अंतर्मुखता, सृजनशीलता—म्हणजेच सुसंस्कृतता आणि संपन्नता—आलेली असते. प्रवंध-पदवीपेक्षाही ही कमाई अधिक मूल्यवान ठरते.

कारण याच कमाईवर तो पुढील आयुष्य घडविणार असतो. ही कमाई आयुष्याच्या प्रत्येकच क्षेत्रात त्याला साह्यभूत ठरणार असते. आपल्याच प्रवंध-विषयातील नवे, उपेक्षित विषय त्याला दिसलेले असतात; तिकडे तो मोर्चा वळवितो. कालांतराने अशा उर्वरित विषयांकडे आपले मित्र व विद्यार्थी यांना जावयास सांगतो. तो विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक झालेला असतो. अभ्यासकाच्या आयुष्यात अशी तीव्र उत्क्रांती किंवा टप्प्याटप्प्यावर क्रांती होत जाणे हे प्रवंध-पदवीचे श्रेष्ठ फलित होय.

उघड–झाप

सुहासिनी मुळगावकर

माझ्या खोलीच्या खिडकीत उभं राहिलं म्हणजे दृश्य मोठं छान दिसत होतं. समोरच आडवी पसरलेली हिरवी टेकडी होती. चढावर विखुरलेली, स्वच्छ काचातावदानांची, रंगीत छपरांची घरं होती. पायथ्याशी, खास मुलांसाठी झोपाळे, फिरत्या चक्रावरचे पंचरंगी घोडे, घसरगुंडी, सी–सॉ असं सगळं घेऊन एक पार्क होता. त्याला लागूनच निघालेला पूल माझ्या हॉटेलपाशीच संपत होता. पार्कपासून खाली खूपशा पायवाटा वरोवर कोन धरून वळत होत्या आणि नदीलगतच्या स्वच्छ पांढुरक्या ॲस्फाल्ट रोडला पाहून, वुजून नाहिशा होत होत्या. दुधी-हळदी डेझीची फुलं, उतारावरच्या पाईन, वर्च अशा वृक्षावळींना वळसा घालत, पाऊलवाटांच्या बरोबरीनं, त्यांची संगत न सोडता हसत हसवीत होती. नदी डावीकडून आली होती. तिचा नूर तर न्याराच होता. बऱ्याचशा टेकड्या, त्यांच्यापाठी थोडे उंच डोंगर आणि त्याच्यापाठच्या आणखी उंच पर्वतावर उन्हात चमचमणारं बर्फ, हा देखावा तर सर्वत्रच होता. दूरवर बर्फाच्या डोंगरमाथ्यावरच एकादा तुरळक पांढराशुभ्र ढग आळसावून तरंगत होता. बर्फाचाच तुकडा उडाल्यासारखा. बाकी सगळं आकाश, कुणीतरी खास मेहेनत घेऊन रंगवल्यासारखं निळंशार.

सकाळचे दहा वाजून गेले होते. सूर्य छान तेवत होता. त्याच्याच तर लीला बघत उभी होते इतका वेळ. चमकणारी छपरं, डहुळणारं नदीचं पाणी. दिमाखणारी झाडं न् तेजाळलेली फुलं. पुलावरून रंगीबेरंगी मोटारी सट्सट् जात होत्या. रहदारी मात्र सगळी उलटी. जाणाऱ्या मोटारी डावीकडून आणि परतणाऱ्या उजवीकडून. सगळ्या यूरोपचाच हा कायदा होता आणि स्वित्झर्लंड कधी ब्रिटिश अंमलाखाली न आल्याने तिथले रहदारीचे नियम बदलायचं काहीच कारण नव्हतं. पुलाच्या दोन्ही बाजूंना फूटपाथ होते. नक्षीदार कठड्यांना लगटूनच नक्षीदार दिव्यांचे पुंजके होते. रोज सकाळसंध्याकाळ मी पुलावरून वागेत येत होते. गोऱ्यागोऱ्या टुमटुमीत स्विस् मुलांना मेरी-गो-राऊंडवर बघून सुखावत होते. त्यांच्या हसऱ्या, निळ्या डोळ्यांच्या आया माझ्या साडीकडे कौतुकाने बघत आपापसात कुजबुजत होत्या. मी जवळ आले म्हणजे खूप लांबरुंद हसून, साडी आवडल्याचं सांगत होत्या. भाषेचा एक प्रश्न. तोही यूरोपभर. पण जिनीव्हा, झुरिकसारख्या मोठ्या शहरात निदान ती जागतिक इंग्रजी समजणारं नाहीतर मोडकंतोडकं बोलणारं एकादं तरी गुलवकावलीचं फूल सापडायचं. पण इथे या छोटयाशा फ्रीबुर्गमध्ये कोण सापडणार. तरी तसं अडत नव्हतं कुठे म्हणा.

पण आज होता रविवार. प्रत्येकजण शहराबाहेर सटकण्याच्या ध्यासात. खरं तर हे शहर किती गोजिरवाणं. परीकथेतल्यासारखं. अर्धा तुकडा पूर्व जर्मनीने वळकावलेला. अर्धाच उरलेला. पण त्या उरलेल्या तुकड्यात डोंगर, दऱ्या, नदीनाले, फुलं, वृक्ष, बर्फ, आकाशासकट सगळं काही. तरी लोक आपले शनिवारी बॅगा पॅक् करताहेतच शनिवारी पळून सोमवारी परतताहेतच.

मला तर काहीतरी करावंसं वाटतंय्. पण रविवार म्हणजे सगळं जाम बंद. नदीलगतची खिडकी सोडून रस्त्याच्या बाजूच्या खिडकीजवळ आले. माझी खोली तिसऱ्या मजल्यावर. खालचं वाईन् शॉप बंद. त्याच्या बाजूचं पुस्तकांचं दुकान बंद. पलीकडे ब्युटी पार्लर. मग फ्लोरिस्ट. या बाजूला एक चॉकोलेट शॉप. वळणावर रेकॉर्डशॉप्. सगळं चिडीचूप, नाही म्हणायला–कोपऱ्यावरच्या वर्तमानपत्राच्या स्टॉलजवळ मात्र सातआठदहा माणसं होती उभी, पेपर वाचीत स्वत: विकत घेऊन. इथे ते एक मोठं बोचक पोस्टर लावलेलं असतं जागोजाग. एकजण पेपर उघडून वाचतोय आणि पाठीमागून एक युवती, म्हणजे ती सुस्वरूपच, डोकावतेय् त्या पसरलेल्या पेपरात. की लगेच चिमटा स्वत:चा पेपर स्वत: खरेदी करून वाचा.

तरातरा उतरले खाली–इतकी सुरेख सकाळ. इतकं रुचकर चीज–हॅम्–एग्स्चं स्विस् ब्रेकफास्ट झालेलं. इतकी लोभस थंडी आणि खोलीत काय बसायचं जेवणाच्या वेळेची वाट पहात. लिफ्टचीसुद्धा वाट न पाहता, सरळ येऊन उभी राहिले मॅनेजर समोर. सकाळ आणखीच देखणी झाली. मॅनेजर फ्रेंच. हे फ्रेंच लोक पॅरिस्पेक्षा स्वित्झर्लंडमधेच अधिक रुबाबदार दिसतात की काय. मग मी उघडपणे न भाळतां, माझ्या मजंटा रंगाच्या शहापुरी रेशमी जरीच्या लुगड्या-बद्दलच्या, त्याच्या खास ओल्या वाखाणणीकडे दुर्लक्ष करीत सरळ मुद्यावरच आले. म्हटलं आज रविवार. आता हा मी कसा काय घालवू ते सांग. त्याच्या त्या फ्रेंच निळ्या डोळ्यात एक लबाड खाजगी चमक तरारली. मी सावध होतेच. मी तावडतोब खुलासा केला की म्हणजे सार्वजनिक ठिकाणी. एखादी खास फुलबाग, नाहीतर मासेबिसे वन्य पशुपक्षी वगैरेचं एकादं संग्रहालय, निदान एखादं म्युझियम् असं काही तरी. होतं एक म्युझियम् होतं. हॉटेलपासून जवळच. अर्ध्या एक किलोमीटरवर. पण तू जाशील कशी. बरं. हा घे नकाशा. नीट जा. परत येताना रस्ताबिस्ता चुकलीस ना, तर माझ्या सारख्या एकाद्या सज्जन माणसालाच विचार हो. म्हणजे तो तुझा हात अलगत धरून, थेट इथपर्यंत सोबत करील. मी लक्षच दिलं नाही. नकाशा तेवढा घेतला पटकन्.

म्युझियम् तर सापडलं. इमारत बाहेरून प्राचीन दिसत होती. पण प्रवेशद्वारापासून आतलं सगळं एकदम आधुनिक. तिकीट काढून आत गेले. दालनंच्या दालनं विखुरलेली. वर तीन मजले. खाली तळघरात दोन मजले. चित्रांच्या विभागात आधी शिरले. ओहो. काय सुरेख पेंटिंग्ज्. जुनी तेराव्या चौदाव्या शतकापासूनची. इतिहास बोलणारी. आता काय करू. ही नुसती चित्रं नाहीत. बोलकी चित्रं आहेत. पण मला यांची फ्रेंच भाषा कशी समजणार. हे काय. हं. कुणा चार्लस् द सेकंड नाहीतर जेम्स राजाची प्रशियन् सोयरीक दिसतेय्. आणि ही कोण फ्रेंच राणी द्राक्षाचा मळा निरखताना आपल्या रत्नजडीत शिरपेचातले पाचू चाचपतेय् ? छे. मी माझ्याशीच बोलतेय. चित्रं माझ्याशी बोलायला हवीत. पण त्यांची फ्रेंच न् जर्मन मला कशी समजायची.

बाहेरच्या प्रवेशद्वाराजवळ कुणी मदतगार भेटतं का म्हणून बाहेर आले. तिथल्या त्या तिकीट विकणाऱ्या बाईलाच माझी अडचण सांगितली. ती माऊली धावली न् एका मिडूला घेऊन आली. पण तो निघाला जर्मन भाषाप्रभू. म्हणजे पुन्हा मागील पुढे चालू. तसं मला अगदी एकचाकी जर्मन येत होतं. तेवढ्याची मदत घेऊन त्याला माझ्या जागतिक लोकप्रिय अशा एकमेव इंग्रजी भाषेच्या गाढ ओळखीविषयी सांगितलं. तसे ते दोघेही धावले आणि पंधराबीस मिनिटांनी त्यांनी त्या म्यूझियमचा डेप्युटी आर्ट डिरेक्टर आणून, माझ्या हवाली केला. त्याला दुचाकी इंग्रजी येत होतं. हुश्श् करून, डोळे मिटून मी त्याच्याबरोबर निघाले.

नुसती चित्रं बघताना आणि त्यांचा इतिहास ऐकताना एक तास केव्हाच गेला. मग भिंतीला लटकव-लेल्या गालिचांचे दालन. प्रत्येक गालिचात विणलेला इतिहास. मग पुराणवस्तुविभाग, तिथे हाताने लिहिलेल्या पोथ्या. रेखाचित्रं. तो इंग्रजीत अडखळत होता. मला थोडं जर्मन येतं हे आठवून इंग्रजी शब्द आठवला नाही म्हणणे जर्मन प्रतिशब्द सांगत होता. आपल्याला इंग्रजी येत नाही आणि त्यामुळे तुझी किती पंचाईत होत आहे हे मला वारंवार सांगून मनःपूर्वक खंत करीत होता. पण माझा वेळ खरोखरीच छान चालला होता. चित्रं आणि इतिहास यांना तो वाचा देत होता. पाय दुखत आले होते. पण अजून पुष्कळच पहायचं राहिलं होतं. खालचं तळघर संपवून आता आम्ही पहिल्या मजल्यावर आलो होतो. आणखी दोन मजल्यांच्यावर अॅंटिक् होती आणि तिथे बाराव्या शतकापासूनचे राजवंशाचे रत्न-जडित वस्त्रालंकार होते. मला पाहिजे तर त्या वस्त्रांना मी प्रत्यक्ष स्पर्शही करू शकणार होते. हे खूपच आकर्षक होतं.

एवढ्यात मघाची ती प्रवेशद्वाराजवळची बाई आली आणि आमच्या स्टडी-टूरमधे व्यत्यय आणल्या-बद्दल पुन्हा पुन्हा माफी मागून, किल्ल्यांचा एक प्रचंड जुडगा तिने त्याच्याजवळ दिला. सबंध म्यूझियम् वरपर्यंत सावचितपणे बघ असं हावभावांनी मला सांगून, तिच्या त्या उंच टाचांच्या बुटांचा शक्य तितका कमी आवाज करीत निघून गेली. मला काही नीटसा हा प्रकार समजला नाही म्हणून मी त्याच्याकडे प्रश्नार्थक पाहिलं. तेव्हा त्यानं समजावलं की काही विशेष नाही. आज रविवार असल्याने म्यूझियम् साडेबारा वाजता बंद झालंय्. पण आपल्याला अजून वरचं सगळं बघायचंय् म्हणून तिने किल्ल्या माझ्या स्वाधीन केल्या आहेत.

चल. आता या दगडी जिन्याने आपण वर अँटिक्लाच पहिल्यांदा जाऊ. असं म्हणत तो त्या अरुंद दगडी जिन्याच्या लोखंडी सळयांच्या दरवाजाचं कुलप काढायला लागला आणि मी प्रथमच त्याच्याकडे लक्षपूर्वक पाहिले.

सहा फुटाला एकादा इंचच कमी असेल उंची. जाहीरातीतल्या एकाद्या रुबाबदार तरुणासारखी रुंद पाठ. तंग पँटच्या पट्ट्याला उठाव देणारी कंबर. पोषाखातली रंगसंगती पायातल्या मोजांपर्यंत उत्तम राखलेली. कुलुप उघडून तो माझ्याकडे वळला आणि त्याच्या प्रमाणबद्ध चेहेऱ्याचा रेखीवपणा मला नव्याने दिसला. मानेपर्यंत वाढवलेले सोनेरी केस, कानापर्यंतचे कल्ले, टाय्‌ची सुबक गाठ आणि अरेच्या, सुवासही दरवळतोय कसला तरी भोवती. आफ्टर-शेव्ह-लोशन् भलतंच मादक लावलंय् वाटतं.

"वर जाऊया ना ?"

बापरे आणि हे डोळे दिसलेच नव्हते मघापासनं. ओले ओले, निळेकंच. भलतेच आग्रही.

"अं. वर ना, हो हो, चला ना."

म्हणजे आता या अरुंद जिन्याने याच्याबरोबर वरती जायचं, एकट्याबरोबर.

"माझ्या मागून ये जपून. जिना वाकडा आहे. आणि वर जरा अंधार आहे. छान. म्हणजे चांगलंच फावलं. म्हणूनच घाईघाईने हा विभाग घेतला वाटतं.

"दिसतंय् ना नीट. नाही तर......

नाही तर काय ? माझा हात धर हेच ना. मग तो हातातला हात हळुच कंबरेभोवती आणि मग......

"नाहीतर, डाव्या बाजूला भिंतीलगत लोखंडी कठडा आहे त्याचा आधार घे."

हं. मग हरकत नाही. तू हो पुढे मी येतेच आहे पाठीमागून. अगबाई, आता हा कशाला थांबला मध्येच. उजेडही दिसतोय् झिरपताना. कुतुबमिनारसारखी गॅलरी आहे की काय एकादी.

"या खिडकीतून पहा, सबंध फ्रीबुर्गचं विहंगम दृश्य दिसेल. ये ना. इकडे या खिडकीत ये." आता येऊ तरी कशी तू बाजूला सरल्याखेरीज. एकाच माणसाला उभं रहाता येईल एवढी अरुंद खिडकी. सांगू का आताच की माझे पाय भयंकर दुखले आहेत. आपण जाऊ या खालीच म्हणून. पण हे तरी कसं ? दहा मिनिटांपूर्वी उत्साहाला आधण फुटत होतं आणि एकाएकी हा काय विक्षिप्तपणा. भारतीय मुली अशाच चक्रम्. छे छे. असं त्याचं सामान्यज्ञान नको वाढायला. मग ? आणि खाली गेलो तरी काय ? तो एकटा आणि मी एकटीच. म्यूझियममधे आता चिटपाखरू नाहीय्. सगळी दारं बंद आहेत. किल्ल्यासुद्धा त्याच्या हातात. काय म्हणावं या कर्माला. साडेबाराला बंद होते ही तिनं असं अगोदरच का नाही सांगितलं मला. ती बाई देखील सामील. तरी बरं. यांच्या देशात हव्या तेवढ्या मैत्रिणी मिळतात खुपीने. पण भारतीय नमुना नसेल मिळाला अजून. बाई ग. कुठून या फंदात पडले.

"ती आकाशात गेलेली सरळ रेषा दिसतेय् ना, ती फ्रीबुर्ग मधल्या सगळ्यांत जुन्या चर्चची वरं. अकराव्या शतकातलं चर्च आहे ते. त्याचं घड्याळ या शहराला वेळ सांगतं दर तासाला. पहा तरी इथे येऊन..." तो आग्रहाने अभिमानाने सांगतोय्. पण खिडकीतूनच. मी चार पायऱ्या खालीच उभी. आधारासाठी त्याने हात पुढे केला. परपुरुषाचा अगदी हस्तस्पर्शसुद्धा टाळण्याइतकी काही मी सोवळी नाही. हात धरण्यासाठी म्हणून त्याच्याकडे पाहिलं तर तो त्याचं फ्रीबुर्ग पाहाण्यात गुंगला होता. दृष्टी बाहेर लागलेली. हात माझ्याकरता पुढे केलेला.

हात न धरताच मी दोन पायऱ्या चढले. आणखीही दोन पायऱ्या चढले आणि समोर पसरलेल्या रम्य जादूने खिळूनच गेले. तांबड्या छपरा–चिमण्यांची ती सगळी स्विस् घरं खालच्या थरावर गेली होती. आजूबाजूच्या टेकड्या हिरव्या मखमलीने झाकल्या होत्या. नदीची वळणं किती वाकडी असतात ते पाहून अचंबा वाटत होता. दूरदरच्या पर्वतावर बर्फाचं वाळवण घातलं होतं. मध्यान्हीचा सूर्य सुद्धा आमच्या माथ्यावर न येता समोर पर्वताच्याच माथ्यावर नेत्रदीपक प्रकाशयोजना करीत होता. आणि या सर्व पार्श्वभूमीवर फ्रीबुर्गमधल्या त्या सर्वांत जुन्या प्रार्थना मंदिराचा कळस एखाद्या मानदंडासारखा अविचल शोभत होता.

माझी नजर तेथून निघेचना. पुन्हा पुन्हा या टोकापासून त्या टोकापर्यंत मी मान फिरवीत होते. पाठीमागची पर्वतराजी. त्या शुभ्रधवल हिमराणी. गवताची हरियाली सूर्याची सोनसळी. किती पाहिलं तरी नवीनच वाटायचं आणि वेड लावायला एवढं पुरलं नाही म्हणून त्यात पावसाचा शिडकावा सुरू

झाला. होता होता थेंबांची लय वाढली आणि त्या मधोमध वाहत्या नदीची प्रत्यंचा करून इंद्राने सप्तरंगी धनुष्य ताणलं. ओहो. माझे दोन आणि खिडकीचा तिसरा अशा तीन डोळ्यांनी मी ते स्वप्नदृश्य आकंठ पिऊ लागले.

"स्वित्झर्लंडसारखा निसर्ग जगात कुठे नसेल नाही ?" खरंच की. तो माझ्यामागेच आहे हे विसरलेच होते मी. चांगलं हातभर अंतर राखून उभा होता तो. समोरच्या दृश्याने त्यालाही घायाळ केलं होतं. पाऊसधारा, हिरवळ, बर्फ, सूर्य, भात्यातली सगळी अस्त्रं इंद्राने योजली आहेत. वाराही बेटा त्याच्याच गोटातला दिसतोय्. त्याने शिपडलेल्या सुगंधापेक्षाही त्याचा अंगगंधच अधिक वाहून आणतोय्. माझा होष उडतोय. मस्तक भ्रमण करतंय्.

हा क्षण लवकर सरेल तर बरं. ही अवस्था संपेल तर बरं. नाहीतर अनवस्था प्रसंग ओढवेल. समोरचं इंद्रधनुष्य अजून ताणलेलंच आहे. थेंबांची रत्नं ओघळतातच आहेत.

मा निषाद, मा मा
दया कर.
थांव थांव. नको तो बाण मारूस.
आता तो मलाच लागेल.

खिडकीपासून आता मला बाजूला होऊ दे. पण कशी ? वळले तर त्याच्या पुढ्यातच उभी राहीन. वर बघेन तर त्याच्या डोळ्यांतच गुंतेन. पुढे सरेन तर त्याच्या मजवूत बाहूंनाच अडखळेन.

नको नको. शपथ आहे तुला माझी. तेवढा तो बाण-आवर. तो शांत आहे. मीच वादळ होईन. तो धिरावा आहे. मीच अनावर होईन. तो माझ्यापासून सुरक्षित अंतर ठेवून उभा आहे, पण मला आणीव होतेय् की क्षणाक्षणाला ते अंतर मी कमी करतेय्. हे माझे डोळे, हे माझे हात, हे माझं शरीर. सगळ्यावरचा ताबा उडत चाललाय् माझा. चकवा लागलाय् मला.

"वर ये आता. दिवा लावलाय् मी अॅटिक्मधला." माय गॉड. कधी गेला हा ? आवाज दुरून आला. जवळून, पाठीमागून नाही काही. तरी मी सावकाश वळते तर खरंच तो वरून कुठूनतरी बोलावीत असतो. सात आठ वाकड्या पायऱ्या चढून गेल्यावर अॅटिक्. मुळात जरी तिथे अंधार असला तरी आता विजेच्या दिव्याने भरपूर उजेड आहे. जुनी प्रचंड कपाटं. आजूबाजूला लोखंडी सळया उंचावर. त्यावरून सोडलेले खूप जड मखमाली, रेशमी पडदे. त्यांच्यावर अप्रतिम रेशमी काम. एक कपाट उघडून तो आतला एक भरजरी अंगरखा काढतो. कुठल्या तरी सम्राटाचा असावा. गळ्यापाशी कॉलरजवळ झीगकाम केलेलं. आता एवढ्या वर्षांनंतरही झळझळतंय्.

"झीग फुलांच्या मधले मोती बघ. अजून कसे शुभ्र आहेत" किंचित् हसून म्हणतो तो.

याचे दातही छान, स्वच्छ आहेत. उन्हात मिठाच्या राशी चमकतात तसे लखलखीत. एकसारखे.

आता हा राणीचा झगा बघ. तेराव्या शतकातला. करड्या रंगाच्या मखमलीचा. या मखमलीचा स्पर्श बघ कसा ससाच्या केसासारखा मऊ, लुसलुशीत." म्हणत, माझ्यासमोर तो भलामोठा झगा उलगडतो. हात देखील कसे आजानु. बोटं कलावंताची, लांबसडक. अंगठी कशाला घातली आहे लोखंडी ओबडधोबड कुणास ठाऊक. कशी सुबक बोटं. आणि ती अजस्त्र अंगठी. मुळीच शोभत नाही. सांगू का ?

"मधे मधे, जिथे सोन्याच्या तारेचं काम आहे ना, तिथली चमक अजून कायम आहे पहा." प्रचंड झगा तो. एक शेव निसटला हातातून. तो खाली वाकून गोळा करीत म्हणत होता.

केस किती सोनेरी आहे याचे. मुलायमही असावेत. मघापेक्षा आता विसकटले तरी किती आर्टिस्टिक्. हे काय होतंय्. बाण अखेर सुटणारच का ? या अॅटिक्ला झरोकासुद्धा नाही बारकासा. जीव कसा सारखा सुटू पाहतोय्. आणि त्याच्यात विसावू . . .

"जाऊच या आता खाली. अजून दालनं राहिली आहेत दोन पहायची. तू सुद्धा दमलेली दिसते आहेस."

का, वाकावर वसले म्हणून डोळे मिटून. का होईना. वाटू दे त्याला तसं. तेच बरं. खरं नसलं तरी.

उतरताना पुन्हा ती खिडकी लागली. आता पाऊस जास्तच कोसळत होता. दूरवरचं नाहीच पण पलीकडली घरंही दिसत नव्हती. सूर्यप्रकाश होता पण सूर्य नव्हता. आणि थँक गॉड, इंद्राने धनुष्यही आवरलं होतं. त्याच्या त्या तमाम शस्त्रास्त्रानिशी तो नाहीसा झाला होता.

आता मला स्वच्छ दिसायला लागलं होतं. खरं म्हणजे जिन्यात तसा काही अंधार नव्हता. मी नीट काळजीपूर्वक पायऱ्या उतरून, लोखंडी दारापाशी येऊन थांवले. वरचं दार वंद करून तोही आला. त्या लोखंडी दाराला तो कुलूप लावीत असताना मी त्याला सांगितलं की आता वराच उशीर झालाय् तेव्हा आता ती उरलेली दोन दालनं राहू देत.

"ते खरं. पण पावसाचं काय ? तू जाशील कशी ?"

पाऊस थांवल्यावर जाईन. तोपर्यंत मी वाहेर पोर्च-मधे थांवेन. तू नको आता माझ्याकरता थांवूस. आधीच उशीर झाला आहे वगैरे माझ्या विनवणीकडे लक्ष न देता, मला सुखरूप हॉटेलवर पोहोचवायचं ही आपलीच जवाबदारी असं मानून त्यानं एक योजना लगेच अंमलात आणली. आपल्या एका मैत्रिणीला फोन करून, तिला तिची मोटार घेऊन म्यूझियम्वर वोलावलं आणि तिच्याच गाडीतून मला हॉटेलवर पोहोचवलं.

निरोपादाखल त्याचे किती आभार मानावेत हेच समजेना. त्यावर त्याने माझ्या भारतीयत्वाची, जिज्ञासेची, कलासक्तीची भरपूर स्तुती त्याच्या मैत्रीणीजवळ केली असं त्यानेच मला सांगितलं. कारण तो ते सगळं फ्रेंचमधे वोलला. मग मला खाजगी आवाजात, इंग्रजीत शब्द जुळवीत म्हणाला;

"हे तर सगळं खरं होतंच. पण मुख्य म्हणजे तू मला फार आवडलीस. वघितल्यावरोवर आवडलीस. मी आलो होतो तुला इंग्रजीतला चित्रांचा कॅटलॉग द्यायला. पण तुला वघितल्यावरोवर, तुझ्याशी चार शब्द वोलल्या-वरोवर, कॅटलॉग हळूच ठेवला खिशात आणि स्वतःच तुझ्यावरोवर हिंडून सगळं दाखवायचं ठरवलं. तुला माझी कितपत मदत झाली ते मला नाही ठाऊक. पण मी मात्र तुझ्या वरोवरचा प्रत्येक क्षण एन्जॉय केला."

हॉटेलच्या दारापाशी मोटार थांवली. मला उतरवून घेऊन तो किंचित् थांवला. आणि एकदम आवेगाने माझे दोन्ही हात हातात धरून म्हणाला, "तू मला फार आवडलीस. यू आर माय् इंडियन् लव्ह. आतापर्यंत मी भारतीय व्यक्तीवद्दल जे जे वाचलं होतं ते ते सगळं मला तुझ्यात दिसलं."

इथे तो किंचित् थांवला आणि मग अगदी माझ्या डोळ्यात पहात म्हणाला. "आणखीनुद्धा काही सांगा-वसं वाटतंय्. पण नाही सांगत. न सांगण्यातच त्याची चार्म आहे."

तो गुडवाय् म्हणायच्या आधीच मला काय वाटलं कुणास ठाऊक. मी विचारलं "गाडी चालवतेय् ती तुझी वाग्दत्त वधूच ना ?"

त्यावर फ्रेंच लोकाचं ते खास लवाड हसत गाडीत वसत तो म्हणाला, "तू अगदी हाडाची इंडियन आहेस. ही देखील माझी तुझ्या एवढीच मैत्रीण आहे. गुडवाय्."

मोटार दिसेनाशी होईपर्यंत मी त्या स्वच्छ मनाच्या माणसाकडे पहात राहिले. इंद्राने वाण अखेर भात्यात परत नव्हताच घातला तर.

* *

खालील विषयांवरील महत्त्वाच्या टिपणांचा 'युगवाणी' आस्थेने स्वीकार करील.

१ पु. भा. भावे
२ रसव्यवस्थेची परिभाषा
३ डॉ. झिवॅगो (वोलपट) मधील बर्फाची प्रतीकशक्ती
४ चि. त्र्यं. खानोलकर
५ माधवी मुखर्जी
६ हेमाडपंथी देवळे
७ विभावरी शिरूरकर
८ श्रीकृष्ण पोवळे
९ ऑपेरा
१० गीताई
११ विठोवाअण्णा दप्तरदार
१२ नूरजहाँ (गायिका)
१३ वोगनवेल
१४ स्व. कुंदनलाल सैगल
१५ वी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्या
१६ सूफी पंथ

सोन्याचा पिंपळ

हरीहर चंद्रशेखर घोंगे

सोन्याचा पिंपळ पृथ्वीचे पाठीवर वास्तव स्वरूपात कुठे अस्तित्वात असेल हे शक्यच नाही. विजयादशमीचे मुहूर्तावर आपटयाची, किंवा शमीची पाने वा गव्हाची लव्हाळी सोने म्हणून लुटण्यात येतात. ह्या दिवशी वृक्षाची पाने, सोने होतात. सोन्याचा पिंपळ हे देखिल एक रूपक म्हणूनच घ्यावयाचे आहे. सोन्याच्या पिंपळाचा ज्ञानियाच्या भावजीवनाशी काय संबंध असावा ते ज्ञानदेवाच्या वा नामदेवाच्या अभंगांतून कुठेच सुस्पष्ट होत नाही. पण ज्ञानदेवाचा परिसर मात्र ह्या पिंपळाच्या छायेत आहे. ज्ञानियासंबंधी जेथे भावुकतेने बोलले जाते तेथे इंद्रायणीची धारा असते आणि सोनियाच्या पिंपळाची छाया असते.

नामदेव महाराज म्हणतात*

धन्य इंद्रायणी पिंपळाचा पार ।
धन्य ज्ञानेश्वर पुण्यभूमी ।। ' (अभंग १०३३)

तुकाराम महाराज म्हणतात

जयाचिये द्वारि सोन्याचा पिंपळ ।
अंगि ऐसे बळ रेडा बोले

नीळोबा राय सांगतात;

दारी अजानवृक्ष सुवर्णपिंपळ असुमाये [१]

ज्ञानियांच्या मुद्रांवर जे अभंग उपलब्ध आहेत (डॉ. प्र. न. जोशी ह्यांनी असे अकराशे अभंग संपादित केलेले आहेत.)[२] त्यात वृक्षाची रूपके अनेक ठिकाणी योजिलेली आहेत.—

तो नित्यकाळ पंढरी । आणि देव तेहतीस कोटी ।
वृक्ष जाले निरंतरी । उद्धार करावया कुळाचा
(अभंग १४०)[३]

किंवा

'कल्पना वृक्षाशी देखिले । चिंतामणीस चिंतिले ।'
(अभंग २१०)

किंवा

मूळ ना डाळ शाखा ना पल्लव ।
तो हा कैसा देव आम्हा घरी ।।
(अभंग ३४०)

किंवा

वर मुळे शेंडा खाली दिसे बानो ।
प्रपंची रानोरान वृक्ष बा रे ।। १ ।।
त्रिगुणाच्या शाखा उपशाखा बहुत ।
नाना याती येत पत्रे ज्यास ।। २ ।।
(अभंग ७६३)

अजान वृक्षाचा निर्देशही ज्ञानदेवांच्या अभंगात आलेला आहे. पण पिंपळाचा निर्देश मात्र अकराशे अभंगात कुठेही नाही. अजान वृक्ष हा 'सोन्याचा पिंपळ' असावा असे नामदेवांचे अभंगातून मात्र वाटत नाही. पिंपळ अथवा अश्वत्थाचा इतिहास प्राचीन आहे. अजानवृक्ष त्या तुलनेत आधुनिक असावा असे वाटते.

ज्ञानदेव म्हणतात.

बाप रखुमादेविवरू तुश्टला ।
दान घे घे म्हणोनि बोळला ।
अजान वृक्ष पाल्हाईला ।।
ज्ञानदेवे घेतले दान ।
हृदयी धरूनीया ध्यान ।
समाधी बैसला निर्वाण ।। (अभंग १०५४)

---

* नामदेवांच्या अभंगाचे क्रमांक—महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या नामदेव अभंगाच्या गाथेप्रमाणे आहेत.

१. ज्ञानेश्वरी, शं. वा. दांडेकर. १९६७. पा. १४६

२. सार्थ श्री ज्ञानदेव अभंगगाथा, डॉ. प्र. न. जोशी १९६९.

३. ज्ञानदेवांचे अभंगांचे क्रमांक, डॉ. प्र. न. जोशी संपादित ज्ञानदेव अभंगगाथेप्रमाणे आहेत.

निवृत्ति सखा माझा दीनदयाळु श्रीगुरु ।
अलंकापुरी स्थापियेले ।
दिधला विठ्ठल उच्चारु ।
समाधी जीवन माझेवरी अजान वृक्षतरु ॥
जंववरी चंद्रसूर्य तंववरी कीर्तीघट स्थिरु ॥४॥

(अभंग १०५७)

वरील दोनही अभंग ज्ञानदेवाचे असावेत असे वाटत नाही. कारण 'माझ्यावर अजानवृक्षाची छाया आहे' हे समाधी घेतल्यानंतर ज्ञानदेव सांगणार कसे ? म्हणजे ज्ञानदेव ह्या मुद्रांवर असणारे ज्ञानदेवाचे अभंग दुसऱ्याचे असावेत. अथवा ज्ञानदेवांच्या समाधीविषयी वेगळा विचार करावा लागेल.

समाधी, निर्वाण, इत्यादी अध्यात्मिक अवस्था आणि अजानवृक्ष व पिंपळ ही रूपके ज्ञानदेवाच्या तत्त्वज्ञानाशी सुसंगत असावीत.

पिंपळपूजनाची परंपरा

पिंपळाचे पूजन भारताला अती प्राचीन काळापासून ज्ञात आहे. सिंधूच्या काठी जी संस्कृती उत्खननातून प्रगट झाली तीत पिंपळाच्या पूजनाचे तत्कालीन लोकांच्या धर्मात महत्व होते असे दिसते. सैंधवी संस्कृतीत ज्यां मुद्रा उपलब्ध झालेल्या आहेत त्यांवर पिंपळाच्या कुठे पाच फांद्या, कुठे अकरा फांद्या दिसतात. ह्या फांद्यांत तत्कालीन कोणते तत्त्वज्ञान लपलेले आहे ते शोधून काढणे अशक्य आहे. कुठे ह्या पिंपळाला सर्पांनी विळखे दिलेले दिसतात. पाताळातील वृक्ष आणि अंतरिक्षातील अहिरबन्धन ह्या दोन सर्पांचा निर्देश ह्या चित्रातून प्रगट झाला की काय ते देखील सांगता येत नाही. पण सर्पवेष्टित राजदंड मात्र पुढे भूमध्य समुद्रावरील संस्कृतीत प्रचारात आलेला दिसतो. अश्वत्थाचा निर्देश ऋग्वेदात दोन स्थळी आलेला आहे. १० व्या मंडळात अश्वत्थाला औषधीचा जनक म्हणून गौरविलेले आहे (१०–९७–५).

अश्वत्थे वो निषदनं । पर्णे वो वसतीष्कृता

पुरुच्छेपाचा पुत्र दिवोदास ह्याच्या सूक्तात 'अश्वत्थाचे छायेत विजय प्राप्त होतो' अशा अर्थाची रचना आहे. (यमश्वत्थमुपतिष्ठन्त जायवो । ऋ. १–१३५.८).

प्राचीन परंपरेत अश्वत्थाला पूजाविधानांत महत्त्व होते हे सैंधवी संस्कृतीतील अवशेषावरून व ऋग्वेदातील अश्वत्थाच्या निर्देशावरून दिसून येते. सैंधवी संस्कृतीतील मृतक संस्काराचा जर अभ्यास केला तर त्या परंपरेत प्रेतांना जमिनीच्या आत पुरीत असत. शतपथ ब्राह्मण ग्रंथात आणि छांदोग्य उपनिषदात प्रेतांना पुरण्याच्या व प्रेतशृंगाराच्या प्रथेचे वर्णन केलेले आहे. ऋग्वेदातील सातव्या मंडळात 'मृण्मयं गृहं' अथवा मृत्तिकेच्या घराचा निर्देश आहे तो मृतावरील बांधलेल्या समाधीचा निर्देश असावा (ऋ. ७–८९–१).

सैंधवी संस्कृतीतील परंपरेत पूजनीय असलेला पिंपळ वा ऋग्वेदात औषधीचा जनक म्हणून गौरविलेला पिंपळ, आणि सैंधवी संस्कृतीतील मृतकांना पुरण्याची पद्धती ह्याचा कुठे तरी मेळ बसत असावा. पिंपळाच्या पूजनाचा, आणि मृतांना पुरण्याच्या पद्धतीचा संबंध असावा असे वाटते. बुद्धाचे कालखंडात पिंपळाचे विशेष महत्व होते. ज्या वृक्षाखाली बुद्धाला ज्ञानप्राप्ती झाली तो वृक्ष अश्वत्थाचा होता. बौद्धकालीन शिल्पात जेथे वृक्षपूजनाचे प्रसंग कोरलेले आहेत तेथे पिंपळ वृक्ष दिसून येतो. ह्या वृक्षासमोर अनेक प्राणी, विशेषत: गजदळ, भिक्षु व इतर नागरिकजन नतमस्तक झालेले दिसतात. बुद्धाचे तत्त्वज्ञान ज्ञानमार्गाशी संबंधित आहे. त्या अर्थी पिंपळाचा संबंध ज्ञानप्राप्तीशी, पर्यायाने ब्रह्मचर्याशी असावा. पिंपळाला इकडे ब्रह्मचारी वा मुंजा म्हटले जाते. बोधीसत्व वृक्षदेवतांच्या स्वरूपातच अवतीर्ण होत असे वर्णन जातकांतून प्राप्त होते. 'चैत्य गाभारे' आणि 'चैत्य वृक्ष' ह्यांचा संबंध केवळ बौद्ध धर्माशी जोडला आहे. चैत्यापासूनच पुढे 'चैतन्य' हे तत्त्व रूढ झालेले दिसते. स्कंदपुराणात पिंपळाच्या पूजनाचे विस्तृत विधान दिलेले आहे. बौद्धकालीन शिल्पांत जेथे चैत्यांची प्रतिमा कोरलेली दिसत नाही तेथे वृक्षाची प्रतिमा कोरलेली असते व वृक्षाच्या पायथ्याशी 'पार' बांधलेला दिसतो. कुठे वृक्षाच्या सभोवताल कठडे घातलेले दिसतात. बौद्ध धर्माचा ज्यावेळी विरोध प्रारंभ झाला त्यावेळी बौद्धांना जे जे प्रेय आणि श्रेय वाटत होते ते विरोधकांनी हेय ठरविले. जातकांत बली अर्पण करण्याच्या ज्या प्रथा वर्णन करून सांगितल्या आहेत त्यांत वडाचा निर्देश आहे. पण आता 'वड' पवित्र ठरलेला आहे बौद्धाशी संबंधित असणाऱ्या पिंपळाचे बोधी वृक्ष म्हणून महत्त्व पुढे अमान्य ठरवून वट वृक्ष हाच 'बोधी वृक्ष' होता असा प्रचार सुरू झाला, पण बौद्धकालीन शिल्पांत वटवृक्षाचा अभाव आहे. कारण कोणत्याही

शिल्पात वृक्षाला पारंब्या दाखविलेल्या नाहीत. तात्पर्य पिंपळाचे महत्त्व कमी झाले. कारण तो चैत्य वृक्ष होता. क्रमाक्रमाने पिंपळावर भूत वा ब्रह्मराक्षसाची वसती असते असाही समज दृढ होऊ लागला. पिंपळाचा ज्या वेळी विचार करावा लागतो त्या वेळी त्याचेकडे चैत्य वृक्ष म्हणून बघावे लागते. युद्धाचे प्रसंगी चैत्य वृक्ष कापून टाकावेत असे जे महाभारतात नमूद झाले आहे त्यावरून पिंपळादी चैत्य वृक्षाचा संबंध हिंसाचाराशी नसावा. म्हणूनच त्यांना काढून टाकण्यात येत असावे. गीतेच्या पंधराव्या अध्यायात अश्वत्थाचा निर्देश आहे. पण त्याकडे संसारवृक्ष म्हणून बघण्यात येते. शंकर व रामानुज ह्या दोहोंची टीका अश्वत्थ हे एक अविनाशी संसाराचे रूपक म्हणूनच अवतीर्ण झालेली आहे. ज्ञानेश्वरीत देखील ह्या बाबतीत आचार्यांचेच अनुसरण दिसते. पण ज्ञानदेवांच्या घरी मात्र अश्वत्थाचे पावित्र्य मान्य होते असे दिसते. नामदेव म्हणतात, करावे सार्थक रखुमाईने तेव्हा । आरंभिली सेवा अश्वत्थाची ।।' (अभंग ८८५). सिद्धोपंताचे घरी पिंपळाचा वृक्ष होता. सिद्धोपंत हे सिद्धपंथी असावेत. ज्ञानदेवांचा पंथ देखील सिद्ध पंथ होता. ज्ञानेश्वरी हा देखील सिद्धपंथाचा पूजनीय ग्रंथ असावा. पण ज्ञानेश्वरीत जे उपलब्ध होते ते ज्ञानदेवाचे कोणते आणि ज्ञानदेवानंतरचे कालखडात ज्ञानेश्वरीत झालेला वदल किती हे कळण्यास देखील आज पुरावे उपलब्ध नाहीत. पण काळाचे ओघात ज्ञानेश्वरीवर वरेच शल्यकार्य झाले असावे. प्राचार्य शं. वा. दांडेकरांसारख्या अधिकारी विद्वानाने तशा अर्थाचा सूर काढलेला आहे व हा मुद्दा चर्चेला घेतलेला आहे.[४] त्या चर्चेचा निष्कर्ष असा आहे.

ज्ञानेश्वरी

ज्ञानेश्वरीतील समाप्तीचा विचार करता पुढील निगमने प्राप्त होतात. (१) मूळ लेखकाने ज्या प्रतीवरून आपली प्रत उतरून घेतली त्या प्रतीत शके बाराशते इत्यादी ओवी नव्हती. (२) ती ओवी ज्ञानदेवानंतर कोणी तरी रचलेली आहे. ती ओवी सच्चिदानंद बावानेही रचलेली नाही. कारण त्या काळी 'बाबा' असे रूप प्रचलित नसून बावा असे रूप प्रचलित होते. ज्ञानेश्वरांनी ज्या गीतेवर टीका लिहिली तिचे सातशेच श्लोक आहेत. 'राजवाडे ज्ञानेश्वरी'च्या प्रतीत सातशेएक श्लोक आहेत. काही ओव्या प्राचीन ग्रंथाच्या प्रतीत दिसत नाहीत.[५] राजवाडे प्रतीत शेवटी एक श्लोक आहे तो असा : 'श्री सद्गुरु मुकुन्देन दत्ता ज्ञानेश्वरी शुभा.' ह्यावरून ज्ञानेश्वरीची प्रत मुकुंदराजाने विद्याधर नावाच्या शिष्याला दिलेली होती असे दिसते. त्यावरून ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी मुकुंदराजापूर्वी अस्तित्वात होती असे दिसते. शके १२१२ असा पाठ जर प्रक्षिप्त ठरविला तर ज्ञानेश्वरीचा जन्म केव्हा झाला ते ठरत नाही. आणि ज्ञानदेवांनी समाधी कोणत्या काळात घेतली तेही समजत नाही. ज्ञानेश्वरीच्या काही महत्त्वाच्या हस्तलिखित व छापील प्रतींची माहिती देताना प्राचार्य दांडेकरांनी ज्या ३१ प्रतींची यादी दिलेली आहे त्यांत ओव्यांची संख्या सारखी नाही. त्यावरून ज्ञानेश्वरीची मूळ प्रत कोणती होती हे ठरविता येत नाही. आपल्या हाती आलेली ज्ञानेश्वरी एकनाथांनी शुद्ध करून दिलेली आहे. एकनाथांचे काळात ज्ञानेश्वरीचे अनेक पाठ आणि पोथ्या अतित्वात असाव्यात. ज्ञानेश्वरी अस्तित्वात आहे, पण ती ज्ञानेश्वराचीच असावी काय, असा संभ्रम उत्पन्न करण्यास प्रा. दांडेकरांची प्रस्तावना पुरेशी आहे. ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेत राजवाड्यांवर टीका करताना कै. दांडेकरांनी राजवाड्यांवर जे आरोप केलेत तेच आरोप कै. दांडेकरांवर करता येतील. ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानाची पदे पाहता पाहता, स्वतः दांडेकरांनाच ज्ञानदेवाच्या अभंगांचा विसर पडला.

ज्ञानदेवी

ज्ञानेश्वरीपूर्वी ज्ञानदेवी नावाचा ग्रंथ उपलब्ध असावा असे दिसते. अभंगांचा जर विचार केला तर ज्ञानदेव व ज्ञानेश्वर ह्या दोन व्यक्ती वेगळ्या असाव्यात असे म्हणावयास पुरावे आहेत. 'बापरखुमादेवीवरु'च्या मुद्रेवरील अभंग ज्ञानदेवाचे असावेत असा अभंगांतर्गत पुरावा मिळतो पण भाषेच्या निकषावर ज्ञानेश्वराचे अभंग नामदेवानंतरच्या कालखंडातील वाटावे इतके स्वच्छ मराठीत आहेत. ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांनी गीता भाष्याचे नाव कुठेही सांगितलेले नसून, 'गीतार्थाचा आवरु' 'गीतार्थाचे वर्म' असेच ज्ञानदेव सांगतात. सच्चिदानंद बाबांनी जी टीका केली तिचे

---

४. सार्थ ज्ञानेश्वरी, शं. वा. दांडेकर, आवृत्ती चौथी, पान २५ ते ३५.

५. ज्ञानेश्वरी, प्रस्तावना, पान २८.

नाव 'ज्ञानेश्वरी' आहे. गीताभाष्यात ज्ञानदेव म्हणतात 'तेथ महेशान्वय संभूते । श्रीनिवृत्तिनाथ सुते । केले ज्ञानदेवे गीते । देशिकार लेणे ।।' येथे वास्तविक ज्ञानेश्वरी समाप्त व्हावयास हरकत नव्हती. तरी, 'शके बाराशते बारोत्तरे । तै टीका केली ज्ञानेश्वरे । सच्चिदानंद बाबा आदरे । लेखकु झाला ।।' अशी शेवटी ओवी आहे. तीवरून सच्चिदानंद बावांनी ज्ञानेश्वरीवर टीका केली असे दिसते. नामदेवाचे नामकरण करणारा हाच जर बावा ब्राह्मण असेल तर नामदेवांच्या काळात बावा असा पाठ अस्तित्वात होता असे दिसते. 'माझे जन्मपत्र बावाजी ब्राह्मणे । लिहिले त्याची खूण सारु ऐका' (अ. १२४०). सच्चिदानंद बावा नामदेवाचे काळात असावेत व त्यांनीच 'ज्ञानेश्वरी' टीका लिहिली. पण ज्ञानेश्वरीचे पूर्वी ज्ञानदेवांची वेगळी गीतेची टीका अस्तित्वात असावी असे दिसते. तिचे नाव ज्ञानेश्वरी नसून 'ज्ञानदेवी' असावे.

'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी'. एकनाथ महाराज म्हणतात 'देशभाषा ज्ञानदेवी गीतार्थ वदे' नामदेव महाराज म्हणतात, 'ज्ञानदेवी समाधि सांग । हरिपाठ कीर्तने ।' किंवा 'ज्ञानदेवी धरिता ध्यान । ध्याता होय समाधान ।' जनी म्हणते 'ज्ञानेश्वर अभंग बोलिले ज्या शब्दा । चिदानंद बाबा लिही त्यास ।।१।। निवृत्तीचे बोल लिहिले सोपाने । मुक्ताईची वचने ज्ञानदेवे ।।२।।' वरील अवतरणे जर लक्षात घेतली तर ज्ञानदेवी नावाचा ग्रंथ अस्तित्वात असावा असे दिसते.

ज्ञानदेवांच्या मुद्रांवर जे अभंग दिले जातात त्यांत ज्ञानदेवी ह्या—मुद्रांवर देखील काही अभंग आहेत. ह्या अभंगांचा अर्थ सांगताना व संपादन करताना ज्ञानदेवी म्हणजे ज्ञानेश्वर माउली अशा संदर्भात ह्या अभंगांकडे बघितले जाते. पण ज्ञानदेवीचा हा अर्थ चूक आहे. ज्ञानदेवी हे नाव ग्रंथाला उद्देशून आहे असेच त्या अभंगांवरून वाटते. अर्थात् ज्ञानदेवी ह्या मुद्रांवर असणारे अभंग कोणाचे ह्याविषयी निश्चितपणे सांगता येणार नाही. ज्याला 'ज्ञानदेवी' ह्या ग्रंथाविषयी आदर आहे त्याने हे अभंग केले असावेत. ज्ञानदेवीचे निर्देश अनेक ठिकाणी आहेत. पण ज्ञानेश्वरीचा निर्देश मात्र डॉ. प्र. न. जोशी ह्यांनी संपादित केलेल्या ज्ञानेश्वरांच्या म्हणून सांगितलेल्या अभंगांत एखाद दुसरे ठिकाणीच आहे. ह्या अभंगांत जेथे ज्ञानदेवीचे निर्देश आहेत तेथे ते ग्रंथ ह्या संदर्भात आहेत. पण विचारवंतांनी तिकडे दुर्लक्ष केले.

'ज्ञानदेवी अभ्यास केला'; 'ज्ञानदेवी जप केला' 'ज्ञानियास ज्ञान, ज्ञानदेवी ध्यान', 'ज्ञानदेवी माळा केली', 'ज्ञानदेवी घर केले तेथे हरिरूप साठविले', 'ज्ञानदेवी भगवंत साधे', 'ज्ञानदेवी आराध्य लिंग'; 'ज्ञानदेवी वंदिले संपूर्ण', 'ज्ञानदेवी रम्य रमले समाधान'; 'ज्ञानदेवी नाम रामकृष्ण ठसा', 'ज्ञानदेवी अभ्यास मोठा', 'ज्ञानदेवी पाहिले । हरिनाम साधुनी घेतले', 'ज्ञानदेवी हरि सेविला', 'ज्ञानदेवी ध्यान कोटी', 'ज्ञानदेवीं भक्तिपंथ', 'ज्ञानदेवीं सार धरिले', 'ज्ञानदेवीं ध्यान केले'.

असे आणि इतर अन्य उल्लेख जर लक्षात घेतले तर ज्ञानदेवी हा ग्रंथ होता व तोच ग्रंथ पूजनीय होता आणि ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाची बीजे ह्या ग्रंथात साठविलेली होती हे दिसते. ज्ञानदेवीत अंतर्भूत असणारे तत्त्वज्ञान, व ज्ञानेश्वरीत अंतर्भूत असणारे तत्त्वज्ञान ह्यांचा तौलनिक अभ्यास करणे अशक्य आहे. कारण ज्ञानेश्वरी अस्तित्वात आहे, पण ज्ञानदेवी मात्र अस्तित्वात नाही.

बौद्धांवर शैवांचे कलम

• ज्ञानदेवीतील तत्त्वज्ञानाचा शोध घेता येत नाही कारण ज्ञानदेवीची ३०० वर्षांचे कालखंडांत ज्ञानेश्वरी झालेली होती. पण ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानाच्या सरितांचा शोध घेताना कै. शं. वा. दांडेकर वा डॉ. शं. दा. पेंडसे ह्यांनी ज्ञानेश्वराच्या आचार्यानुसरणाचाच शोध घेतला आहे. पण ज्यावेळी भारताच्या भूमीवर विशेषत: महाराष्ट्राच्या भूमीत आचार्यांच्या तत्त्वज्ञानाचा उद्‌गम झालेला नव्हता त्याचे आधीच दक्षिणेला नागार्जुनाच्या शून्यवादी तत्वज्ञानाचा गाढ प्रभाव होता. महाराष्ट्राची भूमी बौद्धधर्माच्या प्रसारासाठी अतिशय अनुकूल होती असे महाराष्ट्रातील शिल्पांवरून व कोरीव लेण्यांवरून लक्षात येते. महाराष्ट्रातील संतांना विशेषत: ज्ञानदेवांच्या सिद्ध परंपरेला मान्य असणारे श्रीशैल्य पर्वताचे स्थान हे तर 'मंत्रयानाचे' प्रमुख केंद्र होते. नाथपरंपरेतील गहिनीनाथ ह्यांचेकडून निवृत्तीनाथांना व पुढे ज्ञानदेवांना जो गुह्य उपदेश लाभला ते 'गुह्य' महायान धर्मपंथाने बुद्धाच्या गुह्य उपदेशाला दिलेले नाव आहे. नाथांचे हे गुह्य तत्त्वज्ञान मुळात मंत्र-

यानी तत्त्वज्ञान होते. नाथांच्या सगुणपरंपरेत शिव आणि पार्वतीला शैव धर्माच्या उदयाचे काळी प्रवेश मिळाला. पण नाथांचा आदिपुरुष आदिनाथ हा शंकर नसून तो अवलोकितेश्वर वा बुद्धाचा लोकनाथ अथवा जगन्नाथ असावा. ह्या जगन्नाथानेच पुढे विठ्ठलाचे आणि कुठे शंकराचे रूप धारण केले. धर्ममंगल ह्या बौद्धग्रंथात मीननाथ, गोरखनाथ, हाडीप हे सारे सिद्ध अवतीर्ण झालेले असून ह्या ग्रंथांत शून्याची व्याख्या केलेली आहे. बौद्धांच्या लोकनाथाला 'शून्य-मूर्ती' म्हणून संबोधतात. ज्ञानदेवांनी विठ्ठलाला शून्याचे ठायी ठेवलेले आहे हे लक्षात येईल. बंगालात ह्या लोकनाथाची पूजा 'धर्मठाकुर' म्हणून करतात. धर्म ठाकुर ही देखील शून्यमूर्तीच आहे. धर्मठाकुराची पूजा करण्यासाठी अब्राह्मण पुरोहिताची नियुक्ती केली जाते. जगन्नाथाच्या मूर्तीला देखील ठाकुर असेच म्हणतात. कबिराने आपल्या देवाला ठाकुर असेच म्हटले असून त्याचे तत्वज्ञान शून्यवादी होते. निदान आचाराची बैठक ही तर 'महायानवादीच' होती. क्रमाक्रमाने बौद्धांच्या मूर्तीला विष्णूचे वा शंकराचे रूप देण्यात आले. बौद्धांची आरामगृहे वा चैत्यगृहे शैव मंदिरांत परिणत करण्यात आलीत. शून्याला शंख म्हणून संबोधण्यात आले. शंकर हा देखील बुद्धासारखा बैरागी बनविला गेला. तीच प्रक्रिया रामाचे बाबतीत 'योग-वाशिष्ठा'त घडून आली. मुळात जगन्नाथ व तदनंतर बौद्धांचा 'लोकनाथ' म्हणून अस्तित्वात असणारा 'विठ्ठल' विष्णुमूर्ती म्हणून मान्य झाला. कधी तो शंकर म्हणून गौरविला गेला. पण मुळातील त्याचे बौद्ध स्वरूप मात्र हरपून गेले. थेऊरवाडचाचे रूपांतर देऊळ-वाडचात झाले. पौनीचे उत्खनन हा तर त्याचा बोलका पुरावा आहे. अकराव्या बाराव्या शतकापासून शून्य-वादी बौद्ध विचारांवर शैवपंथाचे कलम होऊ लागले. शून्यवाद वेदांताच्या पांघरुणाखाली दडपून टाकला गेला. बुद्धाने श्रीशैलपर्वतावर गुह्य उपदेश केलेला होता हे महायानधर्मातील विचाराचे सूत्र जर लक्षात घेतले तर मंत्रयानाच्या उदयाची केंद्रे धान्यकटक व श्रीशैलपर्वत ही दोन स्थळे दक्षिणेतच होती. महाराष्ट्रातील नाथपंथ व विठ्ठलभक्तीचे लोण कर्नाटकाच्या मार्गाने महाराष्ट्रात झिरपले ते मंत्रयान, व मंत्रयानातून पुढे उत्क्रांत झालेला शून्यवाद, वज्रयान, सहजयान, अशा विभिन्न तत्त्व-ज्ञानाच्या सरितांचा एकत्र स्रोत घेऊन झिरपलेले होते. ज्ञानदेवाचे कालखंडात वेदांताचा प्रभाव एकीकडे आणि शून्यवादी सिद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव दुसरीकडे, असा संघर्ष दिसतो. ज्ञानदेवाच्या अभंगांत शून्यवादी तत्त्व-ज्ञानाचा ठायी ठायी प्रभाव दिसतो. म्हणून ज्ञानेश्वरीत वेदांती तत्त्वज्ञान निरखून पाहण्यापेक्षा विज्ञानवादी, व शून्यवादी तत्त्वज्ञानाचा प्रभाव पाहणे इष्ट होईल व ज्ञानदेवाच्या तत्त्वज्ञानावर वेगळा प्रकाश पडेल. ज्ञान-देवाचा वेदांत शुद्धाद्वैती होता असे ज्यावेळी सांगण्यात येते त्यावेळी तो शून्यवादी होता असे सांगताना कुठे तरी परंपरागत अस्मिता सत्य कथनाचे बाबतीत आड येते.

शून्यवाद

शून्यवादी तत्त्वज्ञानाचा विस्तृत उहापोह करण्याचे हे स्थळ नव्हे नागार्जुन व चंद्रकीर्ती हे दोन आचार्य ह्या तत्त्वज्ञानाचे प्रवर्तक आहेत. नागार्जुनाचा 'माध्य-मिक कारिका' हा शून्यवादी तत्त्वज्ञानाचा प्रमुख ग्रंथ होय. नागार्जुन व चंद्रकीर्ती दक्षिणेलाच उदयाला आलेत. नागार्जुन कृष्णभक्त होता. त्याचा कालखंड निश्चितपणे सांगता येत नाही. शून्यवादी तत्त्वज्ञानाचा उदय होण्यापूर्वी ते तत्त्वज्ञान 'मंत्रयानात' रुजलेले होते असे दिसते. मंत्रयानातून शून्यवाद, शून्यवादातून वज्रयान, व त्यातून सहजयान असा विकास सांगता येईल. 'अदाहि अविनाशि च शून्यता वज्रमुच्यते' ह्या वचनावरून शून्यवाद म्हणजेच वज्रयान हे लक्षात येऊ शकते. नागार्जुनाच्या शून्यवादांत भक्तिवाद, आत्म्याचे अस्तित्व, व्यावहारिक व पारमार्थिक सत्य आणि संतांना प्रिय असणारा आचारमार्ग स्वीकृत आहे. शून्यता नागार्जुनाने उपनिषद्प्रणित ब्रह्माला दिलेले दुसरे नाव आहे. ब्रह्माची व्याख्या करताना उपनिषदे नेति—नेति म्हणतात. नागार्जुन त्याच अर्थाने शून्य म्हणतो. नागार्जुनाचा शून्यवाद आचार्यांना समजलेला नाही[६] किंवा तो आचार्यांच्या वेदांताआधीच अस्तित्वात असल्यामुळे आचार्यांची अवस्था दयनीय झाली. ज्ञानदेवाचे गुरु निवृत्तीनाथ ह्यांनी गुह्य अशा महामंत्रयानाचा उपदेश ज्ञानदेवांना केलेला होता. 'निवृत्ती गुह्याचिया महामंत्रा' किंवा 'ज्ञानगूढगम्य ज्ञानदेवा लाभले। निवृत्तीने दिले माझे हाती' अथवा 'निवृत्तीने गुज सांगितले' ह्या

६. शून्यवादि पक्षस्तु सर्वप्रमाणविप्रतिषिद्धं तन्निराकरणाय नादरः क्रियते। (शांकरभाष्य)

अभंगांतील गुह्य वा गुज ह्यांचा संबंध बुद्धाच्या गंभीर अनुशासनात शोधावा लागतो. गूढ अनुशासनाविषयी 'माध्यमिक कारिकेत' नागार्जुन म्हणतो.

द्वे सत्ये समुपाश्रित्य बुद्धानां धर्मदेशना ।
लोकसंवृति सत्यं च, सत्यं च परमार्थतः ।।
येऽनयोर्न विजानन्ति भेदं परमतात्त्विकम् ।
ते कदाऽपि न जानन्ति गम्भीरं बुद्धशासनम् ।।

रत्नावली नामक ग्रंथात नागार्जुन म्हणतो :

'धर्म यौतकमित्यस्मान् नास्त्यस्तित्वव्यतिक्रमम्
विद्धि गम्भीरमित्युक्तं बुद्धानां अनुशासनम् ।।'

बुद्धाचा उपदेश गूढ होता असे वरील अवतरणावरून दिसून येतेच. आचार्यांनी नागार्जुनापेक्षा वेगळे सांगितले असे म्हणता येत नाही हेच गुह्य ज्ञान ज्ञानदेवास लाभले.

'गहिनीनाथ सांगे निवृत्तीचे कानी ।
पावले ते ज्ञानी सिद्ध पंथे ।।
ज्ञानदेव म्हणे गुह्य हे सप्तक ।
अनुभववू लेख पाहिलिया ।।३।।

(अभंग ४२९)

'पारमार्थिक व लौकिक अशी दोन सत्ये आहेत' हा बुद्धाने दिलेला गूढ उपदेश. पारमार्थिक सत्य म्हणजेच शून्य होय. ह्याच कल्पनेच्या अनुरोधाने ज्ञानदेवाची अनेक रूपके लक्षात येतात. जग हे स्वप्नाभास आहे, ते मृगजळ आहे, अशी ह्या संसाराविषयी शून्यवादी तत्त्वज्ञानाची धारणा आहे. शून्यवादी तत्त्वज्ञान नाथांनी उचलले, व तेच ज्ञानदेवाला प्राप्त झाले.—नागार्जुन म्हणतो की ज्याने शून्य जाणले त्याने सारेच जाणले.

सर्वं च युज्यते तस्य शून्यता यस्य युज्यते ।
सर्वं न युज्यते तस्य शून्यं यस्य न युज्यते ।।

ज्ञानदेवाचा शून्यवाद

नागार्जुनाच्या कारिकेचे भाषांतरच ज्ञानदेवांनी दिलेले आहे.

'शून्य शोधिले नाही जेणे । कांय विवरण केले त्याने । अज्ञानपणे पुगणे । गाढव जिणे पशूंचे ।। १ ।। वर्णाकृती शून्याचार । हा नाही ज्या विचार । न घडे साक्षात्कार । जाण सर्वथा तया नरा ।। २ ।। आधी शून्याची शोधणी केली । मग सद्वस्तु प्राप्ती झाली । महाशून्याचा वर्ण निळा । अव्यक्त तेजाचा ओतिला गोळा । ऐसे शून्याचे नाही ज्ञान । तंववरी अवघेच अज्ञान ।।

(अभंग ७४३)

ज्ञानदेव म्हणतात. 'शून्याचे जे बीज योगियांचे गूज' (७५७), 'महाशून्यीं संचरला निवृत्तीराज' (७५५), 'महावाक्यार्थ ते शन्य कैसे बापा' (७८१), 'डोळयांची पाहा डोळा शून्याचा शेवट । नील बिंदु नीट लखलखित ।। १ ।। विसावो आले पातले चैतन्य तेथे । पाहे पां निरुते अनुभवे ।। २ ।। पार्वती लागे आदिनाथे दाविले । ज्ञानदेवा फावले निवृत्ती कृपा ।।४।।'

बंगालमध्ये धर्मठाकूराची मूर्ती जशी शून्यमूर्ती आहे तशी ज्ञानदेवाची विठ्ठलमूर्ती शून्यमूर्तीच आहे. 'नवा आत ओवळी औटपीटा जवळी । शून्यातीत काळी सुकुमार ।' (७८४). ज्ञानदेवाचा विठ्ठल शून्यापलिकडे आहे. 'बाप रखुमादेवीवरु शून्याहुनी वेगळे'

(अभंग १०७१)

कुठे ज्ञानदेव शून्याला ॐकार म्हणून संबोधतात. 'प्रणवासी रूप नाही कांही छाया'

शून्याचे उल्लेख

'सत्रावीचे गावी शून्याचा विस्तार । प्रणव निराकार सदैव असे', 'शून्यातील सारे चराचर हे' 'शून्य हे निःशंक आत्मज्योती ।', 'शून्याचे भुवनीं स्वरूप अविनाश', 'ज्ञानदेव म्हणे नयनातील शून्य'

ज्ञानदेवी शून्य नयनी देखिलें
सर्वत्री संचले एक शून्य' (अभंग ८१६)
ज्ञानदेव म्हणे सर्वची हें शून्य ।
वस्तु परिपूर्ण सर्वा ठायी ।' (अभंग ८२०)

अभंग ८२२ मध्ये

शून्याचा उद्भव सांगतो या बोला ।
औटपिठीं वाहिला सूक्ष्म मार्ग ।।९।।

ह्यात ज्ञानदेवांनी शून्याचा विस्तार सांगितलेला आहे. एका अभंगात ज्ञानदेव म्हणतात :

मीच माझा डोळा मीच शून्यांत निळा ।
माझा मी वेगळा तयामध्ये ।। (अभंग ८२८)

ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञानावर अशा रीतीने शून्यवादीची छाप पूर्ण दिसते. ह्या शून्यवादी तत्त्वज्ञानाचे संदर्भात ज्ञानदेवांच्या जीवनाचा विचार केला तर ज्ञानदेव बौद्ध होते असे लक्षात येते. ते बौद्ध होते म्हणूनच आळंदी व पैठण येथील ब्रह्मवृंदांचा त्यांचेवर रोष होता. ह्या बौद्ध धर्माच्या प्रभावामुळेच अंतिम अवस्था प्राप्त करण्यासाठी ज्ञानदेवांनी संसाराचा त्याग केला. संसारत्याग

ह्या मध्यम मार्गाने प्रतिपादन केलेल्या साधनमार्गाशी सुसंगत आहे. ज्ञानदेवांच्या चरित्रात संसारत्याग करणारे गृहस्थ विठ्ठलपंत आहेत. हे विठ्ठलपंत म्हणजेच ज्ञानदेव असावेत. ज्ञानदेव हे विठ्ठलपंत असतील वा नसतील पण ज्ञानदेव नावाचे तत्त्वज्ञानी शून्यवादी होते. त्यांचे गुरू निवृत्तीनाथ हे देखील 'सिद्धपंथी म्हणजेच शून्यवादी होते. ह्या शून्यवादी बौद्ध परंपरेत ज्ञानदेवांचा पिंड घडला असल्यामुळे त्यांना पिंपळ पवित्र वाटत होता. पिंपळाचे महत्त्व ज्ञानदेवांच्या जीवनात वेगळ्या अर्थानेही आहे—त्यासाठी ज्ञानदेवांच्या समाधीचा विचार करावा लागतो.

ज्ञानदेवाची समाधी

ज्ञानदेवांच्या समाधीचे अभंग नामदेवांनी रचलेले आहेत. ज्ञानदेवांच्या समाधी प्रकरणाप्रमाणे निवृत्ती व सोपानदेवांची समाधी प्रसंगाचे रसभरित वर्णन नामदेवांनी आपल्या अभंगगाथेत सांगितलेले आहे. समाधीचा अर्थ लक्षात घेतला व उपनिषदांपासून तो पतंजलीच्या योगशास्त्रापर्यंत शोध घेतला तर समाधी ही सजीव देह गाडून घेण्याची अवस्था आहे असे कुठेही आढळत नाही. उपनिषदांत किंवा पतंजलीच्या योगशास्त्रात ती अध्यात्माची परमोच्च अवस्था म्हणून वर्णिलेली आहे. पण व्यवहारात मात्र मृतदेहाच्या दफनावर वा दहनावर व्यक्तीची स्मृती म्हणून जे थडगे वा वास्तू उभारलेली असते तिला समाधी असे म्हणतात. मृताची अंत्यक्रिया धर्मशास्त्राप्रमाणे दोन प्रकारे होऊ शकते. उपनयन संस्कार जर झाला नसेल तर प्रेताला गाडावे लागते. उपनयन संस्कारानंतर मात्र प्रेताचे दहन केले जाते. मृत व्यक्तीला ज्याप्रमाणे 'वैकुंठवासी' वा 'कैलासवासी' असे संबोधण्यात आले तरी प्रत्यक्षात ती व्यक्ती वैकुंठाला वा कैलासाला गेलेली नसते, त्याचप्रमाणे संतांच्या मृत्यूला समाधी अवस्था असे म्हटले ह्याचा अर्थ व्यक्तीने जिवंत देह गाडून घेतला असे म्हणणे चूक आहे. सर्वसामान्य व्यक्ती काय किंवा संत काय परमार्थाच्या जगात आत्मवादी असले तरी व्यवहारात देहवादीच असतात.

नामदेव ज्यावेळी ज्ञानदेवांच्या समाधीप्रसंगी आकांत करतात त्यावेळी ज्ञानदेवांनी जिवंत समाधी घेतली म्हणून आकांत करतात वा ज्ञानदेवांचा मृतदेह दफन करण्याच्या प्रसंगी जणू संजीवतेचा प्रत्यय घेऊनच विलाप करतात; वा आळदी येथे असणारी ज्ञानदेवांची समाधी बघून, आपल्याला ज्ञानदेवाच्या कालखंडात लोटून देऊन त्या संपूर्ण दुःखद घटनेचा प्रत्यय घेतात; हे सांगता येत नाही. पण नामदेवांनी सोपान व निवृत्तीनाथांच्या समाधीचे जे वर्णन दिले आहे ते ज्ञानदेवांच्या समाधी प्रसंगासारखे करुणतेने ओथंबलेले नसले तरी नामदेवांची भूमिका विशद करण्यासाठी महत्त्वाचे आहे.

नामदेवांची यात्रा

समाधीचे अभंग काळजीपूर्वक वाचलेत तर असे दिसते की नामदेवांचे कुटुंब व वैष्णवांचे मेळे यात्रेसाठी निघालेले असावेत. निरनिराळ्या ठिकाणी कीर्तनाची सुपारी मिळाल्यामुळे वा निरनिराळ्या समाधींचा जीर्णोद्धार करण्याचे प्रसंगी अथवा समाधीचे स्थळी प्रतिवर्षी होणाऱ्या उत्सवात कीर्तन करण्यासाठी नामदेव, आपली वारकऱ्यांची यात्रा सोबत घेऊन आळंदी, वटेश्वर, आपेगाव, त्र्यंबकेश्वराला भेट देण्यासाठी आलेले आहेत. कित्येक काळापासून ह्या स्थळी ज्ञानदेव, सोपान, निवृत्ती, मुक्ताबाई ह्यांच्या समाध्या अस्तित्वात असाव्यात. मृत देहावरील अवशेषांवर चैत्य वा स्तूप बांधण्याची प्रथा बौद्धांपासून प्रचारात आली. गौतमबुद्धाच्या देहाचे अवशेष, निरनिराळ्या ठिकाणी पाठवून अशोकाने हजारो स्तुपांची रचना केलेली होती. बौद्ध धर्माचा प्रचार करणारा महाभाग जेथे वास्तव्य करीत असे त्याला 'संघाराम' किंवा 'थेरवाडा' असे म्हणत. पुढे ह्या संघारामाचे रूप 'आराम' असे झाले. थेरवाड्याचे रूप, धेडवाडा वा थेउरवाडा अथवा देऊळवाडा, असे झाले. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ता हे बुद्धसंघातील महाभाग म्हणून लोकांच्या स्मरणात असावेत व त्यामुळेच त्यांना भावंडे म्हणून संबोधण्यात येऊ लागले. मुळात हे 'ब्राह्मणबंधु' असावेत. ह्या समाधींच्या आत चिरशांत असणाऱ्या महाभागांच्या जीवनाच्या कथा अस्पष्टपणे तेथील आसमंतात रेंगाळलेल्या असाव्यात. नामदेवांनी त्या वेचून घेतल्या आणि सजीव केल्या.

सोपानाच्या समाधीच्या अभंगांत नामदेव म्हणतात.

> **ऐसा सोपान संबोखिला । महाउत्सव आनंद झाला**
> **या वटेश्वरी सगुण सुलभे । समारंभ प्रतिवर्षी**
>
> (अभंग १०९९).

सोपानाची कथा सांगून नामदेव भुलेश्वरी येतात (अभंग ११३६). तदनंतर ते सिद्धेश्वराला आले (अभंग ११३६).

मार्गी चालतात भक्त आणि हरी ।
आले भुलेश्वरी अवघे जण ।। ३ ।।
भुलेश्वरालागी पूजा केली सांग ।
भक्त पांडुरंगे तीन रात्री ।। ४ ।।
तेथुनि वैष्णव चालियेले हरी ।
आले सिद्धेश्वरी देवभक्त ।। ४ ।।

तेथे त्यांना चांगदेवाची समाधी दिसली. तेथून वैष्णव नेवाशाला आले. तदनंतर ते विजयादशमीच्या मुहूर्ताला टोकेश्वराला गेले. त्यानंतर त्यांनी पैठणची वाट धरली.

चक्रतीर्थी पोहा म्हणती आला थोर ।
वैष्णवांचे भार उतरले ।।
नामा म्हणे हरी सहज आली वाट ।
आपेगाव कोठे सांगा स्वामी ।।
(अभंग ११६३)

आपेगावाला त्यांनी मुक्ताची कथा सांगितली. नामदेवांचे बरोबर जो पोहा आहे त्याचे स्वागत सर्वत्र होत आहे. ह्या पोह्याबरोबर पांडुरंगाची पालखी आहे असे वाटते. ठिकठिकाणच्या समाधींना भेट देत नामदेव समोर जात आहेत. नामदेवांनी जे आख्यान सांगितले ते त्यांचेसमोर, डोळ्यादेखत जरी घडले नसले, तरी त्यांच्या प्रतिभेला मात्र स्थळकाळाची मर्यादा नाही. कोणी सांगावे ह्या समाध्या मुकुंदराजाच्या आधीपासून असतील आणि ज्ञानदेवांची काव्ये व ज्ञानदेवी नामदेवांअगोदर शे-दोनशे वर्षे पूर्व अस्तित्वात आली असावी. आळंदीला ज्ञानदेवीचा परिचय नामदेवाला झालेला असावा.

आळंदीचा पिंपळ

आळंदी व आळंदीचा पिंपळ अतिशय प्राचीन काळापासून अस्तित्वात असावा असे दिसते.

नामा म्हणे कैसे दिधले । हे ज्ञानासी सिद्ध लाधले ।
(९७२)
नामा म्हणे शिवादिक । सिद्धेश्वरी मिळाले सकळ ।
पाहाती विठ्ठल कौतुक । ज्ञानदेव समाधीचे । (९७६-८)
आळंकापुरी हे शीवपीठ । पूर्वी तेथे होते नीळकंठ ।'
(९७८)
पंढरीहुनी हे मूळपीठ । जुनाट पै वैकुंठ ।'
(अभंग ९८७)

असे नामदेव सांगतात. पुढे नामदेव म्हणतात—

सुवर्णाचा पिंपळ तिहीं केला ठाऊक ।
त्या समीप देखा कल्पतरु ।। (९८८)
सुवर्णाचा अश्वत्थ । द्वारि स्थापुनि निवास ।
भोवते देव्हडे तापस । समाधीस बैठले ।। १००० ।।

समाधीविषयी नामदेव सांगतात—

ज्ञानदेव बैसले समाधी । पुढे आजानवृक्ष निधी ।
वामभागी पिंपळ क्षिती । सुवर्णाचा शोभत ।।४।।
(१००४)
अजानवृक्ष तळीं हरिकथा । नित्य जो नर करि तत्वता ।
तो न जाय यमपंथा । ऐसे जगन्नाथ बोलिले ।।६।।
द्वारी सुवर्णाचा अश्वत्थ । नित्य पुजलिया स्वस्थ ।
लक्ष्मी न सांडी तया सत्य । सकळ आर्तो पूर्ण होती ।७।
अभंग (१०१३)

आळंदी ही सिद्धपेठ होती असे नामदेव सांगतात. जवळच इंद्रायणी वाहत होती. (अभंग १०२७) येथेच सिद्धोपंतांची वसती होती. दारासमोर पिंपळ होता. ज्ञानदेवाने समाधीसाठी हेच स्थळ निवडले.

देव म्हणे स्थळ सिद्ध हे अनादि । येथेच समाधी ज्ञानदेवा ।।१०३६।।
मग सिद्धेश्वरी येते झाले । सिद्धेश्वरालागी पूजिले निव्वळ मागितले स्थळ समाधिसी ।
अजानवृक्ष आरोग्य अपार । समाधीसमोर स्थापियेला ।
(१०८८)

नामदेवांच्या अभंगावरून आळंदीला दोन समाध्या होत्या असे ठरविता येते. एक ज्ञानदेवीची समाधी व दुसरी ज्ञानदेवांची समाधी. ज्ञानदेव शून्यवादी होते हे लक्षात घेतले म्हणजे त्यांचा ज्ञानदेवी हा बौद्धग्रंथ होता. ह्या ग्रंथात शून्यवादाची वचने होती. ह्या मूळ ग्रंथाला पिंपळाखाली समाधी दिली गेली असावी. कारण त्रिपिटकातील वचने कोरून त्यावर चैत्य उभारण्याची परंपरा बुद्ध संप्रदायात परिचित आहे. ज्ञानदेवोला समाधी दिल्यानंतर तीवर चैत्यवृक्ष म्हणून पिंपळाची उभारणी केली असावी. अथवा पिंपळाचे पाराखाली विवरात ज्ञानदेवीला समाधी दिलेली असावी. पिंपळाखालचे विवर आधीपासूनच तेथे अस्तित्वात होते. काही शतकांचे अगोदरच त्या विवरात कुणा सिद्धाची समाधी असावी व त्यावर पिंपळाचा वृक्ष लावलेला असावा. परंपरागत समजुतीने हा पिंपळ पवित्र पिंपळ म्हणून पूजनीय झाला

असावा. ज्ञानदेवी नावाच्या ग्रंथाला समाधी दिली असे ज्ञानदेवाच्या अभंगातूनही स्पष्ट होते.

'ज्ञानदेवी पाहिले । हरिनाम साधुनी घेतले । ते समाधीस केले । पुष्पशयनीं आसन ।। (अभंग ११२), ज्ञानदेवी माळा केली । सुखाची समाधी साधिली ।। जिव्हा उच्चारणी केली । अखंड हरिनाम ।। (अभंग ११३) ज्ञानदेवी समाधी स्थान पैं विठ्ठल । (अभंग २४९).' ज्ञानदेवी नावाच्या ग्रंथाला समाधी देण्यापूर्वी जो सोहळा आळंदीला झालेला आहे त्याचे वर्णन नामदेवांनी केलेले असावे—पोथ्यांची पारायणे, पोथी-श्रद्धा, ही अजूनही कायम आहे. पोथीचा, उत्सव पोथीची मिरवणूक व पोथीची समाप्ती अजूनही होत असते. ज्ञानदेवीला समाधी दिली, ते कृत्य व तुकारामाने आपल्या अभंग गाथांना इंद्रायणीत जलसमाधी देण्याची कृती ह्या दोनही कृतींचा अर्थ एकसारखाच असावा.

आजान वृक्षाखाली ज्ञानदेवाची समाधी असावी. ज्ञानदेवाची समाधी आजान वृक्षाखाली असावी असे सुचविणारे अभंग ज्ञानदेवाच्या नावावर प्रक्षिप्त आहेत.

'शांती दया क्षमा ऋद्धी । हेही पाहाता मज उपाधी । तुझीया नामाची समाधी । कृपानिधी मज द्यावी ।। १३ ।। बापरुखुमादेविवरु तुष्ठला । दान घे घे म्हणोनि बोलला । अजानवृक्ष पाल्हाईला । मग बोलिला विठ्ठल हरि ।। १४।। (१०५४)'

'समाधी जीवन माझेवरी अजानवृक्ष तरु ।। जवंवरी चंद्रसूर्य तंववरी कीर्ति घट स्थिरु ।। ४ ।। (अभंग १०५७).'

नामदेवांच्या अभंगांच्या अनुरोधाने आजानवृक्ष व पिंपळ ह्या मध्ये 'स्थळी' ज्ञानदेवांनी समाधी घेतली असे दिसते. ज्ञानदेवाच्या समाधीचा संबंध आजानवृक्षाशी आहे. ज्ञानदेवीच्या समाधीचा संबंध पिंपळाशी आहे.

फक्त सोनियाचा पिंपळ ज्ञानदेवाची कथा सांगू शकतो. ज्ञानदेव नावाचे कुणी शून्यवादी गृहस्थ होते. शून्यवादी आचाराशी सुसंगत असा गृहस्थाश्रम त्यांनी केला होता. पण पुढे पारलौकिक सत्याच्या शोधार्थ संसाराचा त्याग करून चैतन्याच्या शोधार्थ ते श्रीपादस्वामीकडे गेले. उपनयनाचा संस्कारही नष्ट झाला. श्रीपादांच्या अनुज्ञेने त्यांना पुन्हा गृहस्थाश्रमात परतावे लागले. उपनयन संस्कार एकदाच होत असल्यामुळे पुन्हा उपनयन संस्काराने ब्राह्मण धर्मात येण्याची अनुज्ञा नव्हती. म्हणून ते जातीबाहेर राहिले, ब्रह्मचारी राहिले. सहजयानात अशा अवस्थेला 'पशु' म्हणून संबोधिलेले आहे. ज्ञानदेवांनाही पैठणच्या ब्राह्मणांनी पशु म्हटलेले आहे. पैठणच्या ब्राह्मणांनी ज्ञानदेवांचा छळ केला. कारण त्यांचे तत्त्वज्ञान श्रौतस्मार्त धर्माशी विरोधात उभे होते. शून्यवादी असल्यामुळे ब्राह्मणांना त्यांचा द्वेष होता. कारण पैठणच्या ब्राह्मणांवर शांकराद्वैताचा प्रभाव असावा असे दिसते. उपनयन संस्कार पुन्हा न होऊ शकल्यामुळे ज्ञानदेवांना मरेपर्यंत 'ब्रह्मचारी' राहावे लागले. आणि मृत्यूनंतर त्यांना अर्थातच धर्मशास्त्राच्या नियमाने पुरण्यात आले. ज्ञानदेवाचा देह पुरण्यासाठी तेच स्थान निवडले गेले, जेथे बौद्धांचा प्रभाव पूर्वापार असावा. जेथे शून्यवादी बौद्धांचा थेऊरवाडा असावा. जेथे बौद्धाची मूर्ती असावी. जेथे सिद्धांची परंपरा नांदत असावी. जेथे बोधीवृक्ष म्हणून सोनियाच्या पिंपळाचे पूजन होत असावे.

पैल तो गे काऊ कोकताहे

वर्तमान परंपरेत कावळा अशुभ समजला जातो. त्याचे ओरडणे अशुभसूचक असते. त्याच्या स्पर्शाचा विटाळ होतो. पण ज्ञानदेवाचे अभंगात कावळयाचे ओरडणे शकुनाचे लक्षण समजले जाते. कावळयाला दहीभाताची उंडी देण्यास ज्ञानदेव तयार आहे. त्याला हातात घेऊन त्याच्या पावलात सोन्याची कडी घालताना कुठे विटाळाची भावनाही स्पर्शून जात नाही. ज्ञानदेवाच्या परंपरेत कावळा पवित्र समजला जातो. पितरांना पिंड देण्याचे वेळी आपल्या परंपरेत कावळयाचे महत्त्व असते. पिंपळाच्या पाराखाली पिंडदानाची प्रक्रिया करावयाची असून कावळयाने पिंडाला स्पर्श केल्याशिवाय मृतक संस्काराची सांगता पूर्ण होत नसते. अश्वत्थाचा संबंध पितरपूजनाशी असावा. पितरपूजा मुळात असुरवादी तत्त्वज्ञानातून उदयाला आली. असुरांचे तत्त्वज्ञान निरीश्वरवादी व देहवादी तत्त्वज्ञान होते. ह्या तत्त्वज्ञानात आचारशुद्धतेची उत्क्रांती होऊन बौद्धपंथ निर्माण झाला व सुखवादी विचारसरणीतून 'लोकायत' आणि 'तंत्र' जन्माला आले. देवयान व पितरयान हे दोन मार्ग आहेत. ह्यांपैकी एका मार्गाने मृताला जावयाचे असते. 'देवयानी,' मृताला जाळतात कारण देव अंतरिक्षात असतात. 'पितरयानी' मृताला गाडतात कारण यमाचे वसतिस्थान पितरांचा राजा

[पान ४०४ वर]

संशोधकांच्या धोपटमार्गाचे बळी : श्रीनामदेव [उत्तरार्ध]

ब. स. येरकुंटवार

सारांश हा, की गेल्या एक दोन वर्षांत श्रीनामदेवांवर वर जे लिहिले गेले आहे त्याचा दर्जा मन खिन्न करणारा आहे. आम्ही संशोधक साकल्याने व सर्वांगांनी संतवाङ्मयाचा व संतजीवनांचा अभ्यास करीत नाही, पृथक्पणे व एकांगीपणे करतो. काही ग्रंथांचा व लेखांचा ओझरता निर्देश या दृष्टीने करता येण्याजोगा आहे. डॉ. पेंडश्यांचे, एरव्ही नीटस असलेले 'ज्ञानदेव आणि नामदेव' यातील विवरण फार वेदांती ठशाचे व 'गीतारहस्या'च्या छापाचे आहे; डॉ. अ. ना. देशपांड्यांचे संकलन पोतडीवजा असून त्यात मीमांसेचा नीटनेटकेपणा तर नाहीच, उलट दातओठ खातच ते सारा विषयप्रपंच करतात असा त्यांचा 'प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास' वाचून अभ्यासकाचा नक्कीच ग्रह होतो; डॉ. कोलत्यांचे प्रतिपादन (त्यांचे लेख व भाषण) मनात जबरदस्त पूर्वग्रह पोसून केल्यासारखे दिसते; विशेषणच द्यावयाचे झाल्यास डॉ. देशपांड्यांचे विवरण बहिर्धूम आहे तर डॉ. कोलत्यांचे अंतर्धूम आहे; डॉ. इनामदारांचा प्रबंध (संत नामदेव) काही बरी धडपड करताना दिसतो, पण त्यातही उथळपणा जाणवतोच. प्रा. ल. ग. जोग यांचे 'नभोवाणी'वरील व्याख्यान समतोलपणा राखण्याचा आयास करताना दिसत असल्यामुळे उल्लेखनीय वाटते, पण तेही काही चिररूढ बौद्धिक लोकभ्रमांच्या आहारी गेलेले पाहून विषाद होतो. 'श्रीनामदेवदर्शन' हा जाडजूड ग्रंथ समयोचित असला तरी त्यांतील, एखादा-दुसरा अपवाद टाकला, तर सर्व लेख धोपटमार्गी व गुऱ्हाळी आहेत. डॉ. दु. का. संत यांचा 'नामदेवांचा मानवतावाद' हा लेख स्वतंत्र प्रज्ञा दाखविणारा आहे. युरोपियन इतिहासातला 'मानवतावाद' आपल्या संतांच्या अंगी चिकटविणे पढतमूर्खपणाचे कसे आहे हे या लेखात उत्तम मांडले गेले आहे. तसेच डॉ. अ. ना. देशपांड्यांचे पुढील प्रतिपादन, त्यांच्या घडाभर संतविषयक लेखनात, इतक्या प्रौढपणे, गंभीरपणे व प्रबुद्धपणे क्वचितच आढळेल ! ते समर्पकपणे लिहितात, "सामाजिक, आर्थिक व राजकीय अशा सर्व प्रकारच्या आधिभौतिक जीवनात कोणतीही आणि कितीही परिवर्तने घडून आणली, तरी या जीवनाची द्वंद्वात्मकता आणि तज्जन्य दुःखमयताही अपरिहार्यपणे कायमच राहणार आहे, हे अबाधित सत्य नामदेवांना मनोमन पटलेले असल्यामुळे ते सर्व प्रकारच्या लौकिक पातळीवरच्या समाजसापेक्ष आंदोलनाबाबत वा उपक्रमाबाबत पूर्णपणे उदासीन राहिलेले आहेत" (पृ. ६९२). हाच विचार त्यांनी आपल्या ग्रंथाच्या उत्तरार्धात मांडला होताच हे खरे. अशी आहे एकूण 'प्रमाण–प्रमेय–पद्धती'ची आज दैना !

प्रारंभी सांगितलेल्या लक्षणानुसार 'प्रमाण–प्रमेय–पद्धती'चा अंगीकार करून संतवाङमयाचा अभ्यास केल्यास कोणकोणत्या प्रमुख गोष्टी लक्षात येतात याची मुद्देवार नोंद करून मग आपण प्रत्यक्ष श्रीनामदेवांकडे वळू.

(१) संत कोणास म्हणावे ? परमार्थाचा कोणताही साधक संत नसतो. संत हा साधक असतोच, पण साधक संत असतोच असे काही नाही. भक्तिमार्गी साधक म्हणजे संत. ज्याचे ज्ञान, ज्याचे सामर्थ्य, ज्याचे विभूतिमत्त्व, ज्याचे थोरपण ईश्वरावलंबी असते, तो संत.

(२) श्रीतुकारामांनी म्हटल्याप्रमाणे, 'संत ते नव्हती माणसाऐसे' हे ओळखलेच पाहिजे. याचे कारण असे, की जो देहाचे निरसन करीत नाही तो संत होऊ शकत नाही. सांसारिक माणूस देह निरसन करीत नाही. भक्तीच्या बळावर देह निरास करून शूरपणा गाजविणारी व्यक्ती म्हणजे संत. 'भक्ति तो कठीण शूळावरील पोळी । तिकडे तो बळी विरळा शूर ।।' (श्रीतुकाराम).

(३) शूर व रडतराऊत म्हणजे प्रकाश व अंधार. प्रसंगवशात् मनुष्यस्वभावास धरून क्वचित् पडलेल्या

कष्टांबद्दल व झालेल्या आघातांबद्दल आर्त उद्गार संतांनी काढले असले, तरी त्यांचा स्थायीभाव 'तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ।।' असा धीर-गंभीर असतो. तुम्ही आम्ही त्यांच्या 'छळा'ची 'रेमट-कहाणी' सांगून 'शब्दरंजवणी' करावी! यामुळेच संतांच्या भिन्नजातीय मनोरचनेची कल्पना आपाततःही आम्हाला येऊ शकत नाही. समाज व संत यांतले नाते, तुमचे–आमचे जसे असते, त्याहून भिन्न असते. आपल्या सत्त्वपरीक्षेचा निकष समाज आहे ही धारणा संतांची असते. 'तुका म्हणे माझे चित्त शुद्ध होते । तरी का निंदिते जन मज ।।' याप्रकारे कसवटीच्या भट्टीत टाकून घेणारा मर्द जीव म्हणजे संत. या भट्टीची कादंबरी रचणारे आम्ही–तुम्ही अ–प–संत, ना–पसंत!

(४) 'जनीं जनार्दन' ही संतधारणा नीट उमजून घेतली पाहिजे. 'युरो–अमेरिकन' व 'भांडवलशाही' (बुर्जुआ) ढवीच्या 'व्यक्तिप्रतिष्ठा' व 'लोकशाही' या विनबुडी कल्पनांवर आणि मत्सर व अनिर्बंध चुरस या वृत्तींवर पोसलेले आम्ही ही धारणा समजण्यास अपात्र आहोत. रोमाँरोलाँ या सर्वमान्य गंभीर विचारवंताने भारतीय रचनेशी तुलना करताना एका ठिकाणी 'egotistical democracy of the West' असा खोचक शब्द वापरला आहे; अशा 'अहंगंडा'चे विष पोटात भरलेल्या लोकशाहीच्या कल्पना पत्करून संत–जीवनाची मीमांसा करणे निरर्गलतेचे आहे.

(५) संत दैन्य, दुबळेपणा व दुटप्पीपणा यांना वाऱ्यासही उभे राहू देत नाहीत. त्यांच्या ठिकाणी 'double standard' नसते. 'तुका म्हणे करूनि दावी । त्याचे पाय माझे जीवी ।।' हा संतपणाचा प्रखर बाणा असतो. संतांनी वेद व वर्णाश्रम यांच्या बाबतीत दैन्य, दुबळेपणा, दुटप्पीपणा दाखविला असा आक्षेप घेणाऱ्यांनी त्यांच्यावर अमानुष अन्यायच केलेला असतो. या बाबतीत त्यांची जी प्रामाण्यबुद्धी दिसून येते तिच्यासंबंधी तुच्छतापूर्वक आक्षेप घेणारे विद्वान 'कामी स्वतां पश्यति' ही कालिदासोक्ती तर सार्थ ठरवीत नाही ना! आजची आमची संशोधनपद्धती व विद्वता वृत्तपत्रपांडित्याच्या प्रभावाने व शासनाश्रयाच्या लालचीने डागळली आहे. या गोष्टींच्या नटनाटचाच्या चाळयांनी आज आम्ही इतके लहान झालो आहोत, की संतांच्या अंतःकरणाची जाणीव आम्हाला पूर्णपणे पारखी बनल्यासारखी झाली आहे. सत्यनिष्ठेकरिता हवे ते मोल द्यावयास सदैव तत्पर असलेल्या संतांनी नामर्दपणाने व दुटप्पीपणाने वेद व वर्णाश्रम यांची कोंडी फोडली नाही याचे आज आम्हाला जे शल्य वाटते, तेही

[पान ४०२ वरून]

म्हणून पाताळात असते. बौद्ध परंपरा पितरयानी परंपरा आहे. त्यामुळे मृताला जमिनीत गाडल्यानंतर त्यावर अंडाकार पृथ्वीची – आकृती बांधून वर अश्वत्थाचे स्वरूपात छत्र व हर्मिका उभारलेली असते. ह्यालाच स्तूप वा चैत्य असे म्हणतात.

> **यस्मिन् वृक्षे सुपलाशे देवैः संपविते यमः**
> **अत्रा नो विश्यतिः पिता पुराणां अनुवेदति ।।**
> **(ऋ. १०. १३५. १)**

ह्या वृक्षाच्या पानांवर देवासहित यम (सोम) प्राशन करतो तेथे आम्हा विशपतींचे प्राचीन पितर प्रेमाने वसती करोत. पिंपळाच्या वृक्षाशी यमाचा संबंध आहे म्हणूनच पिंपळाचे पाराशी पिंडदान केले जाते.

ज्ञानदेवाच्या संदर्भात जर विचार केला तर त्याच्या जीवनाची कथा सांगण्यात पिंपळाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. बौद्ध परंपरेत तो वाढला होता त्यामुळे मृत्यूनंतर त्याचा देह पिंपळाशेजारी गाडला गेला. भूत आणि मुंजा यांची वसती असणारा व अपवित्र असणारा पिंपळ ज्ञानदेवाच्या परिसरात सोन्याचा पिंपळ म्हणून वंदनीय ठरतो आणि ज्याचे ओरडणे वा स्पर्श अशुभ समजला जातो त्या कावळयाला ज्ञानदेव प्रेमाने विचारतात—

> **दुधे भरुनि वाटी लावीन तुझे ओठी ।**
> **सत्य सांगे गोठी विठो येईल कायी ।।४।।**
> **आंबया डाहाळी फळे चुंबी रसाळी ।**
> **आजिचे रे काळी शकून सांगे ।।५।।**
> **ज्ञानदेव म्हणे जाणिये ये खुणे ।**
> **भेटती पंढरीराणे शकुन सांगे ।।६।।**

'सोनियाचा पिंपळ' ज्ञानदेवांचे वेगळेच चरित्र सांगेल. त्याचे बोलणे फक्त समजून घेणे आवश्यक आहे.

* *

'प्रमाण–प्रमेय–पद्धती'चा चोळामोळा केल्यामुळेच ! आज, विचारांती, वेद व वर्णाश्रम त्याज्य ठरले तर आपण त्यांना मोठ्या समारंभाने तिलांजली देऊ या ! पण सद्यःकालीन स्थितीच्या भाराखाली चेपले जाऊन ऐतिहासिक स्थितीचे विकृतीकरण करणे म्हणजे मानवतावाद खासच नव्हे ! ऐतिहासिक स्थितीला इतिहासाचेच निकष लावले पाहिजेत, सद्यःकालीन राजकारणाचे नव्हे !

संतांच्या मानवतावादाचे खरे स्वरूप

(६) आधुनिक संज्ञांची नक्कल करून संतांबद्दल बोलावयाचे झाल्यास असे म्हणता येईल, की त्यांचा 'Scientific Humanism' होता, रेनासान्स व फ्रेंच राज्यक्रांती यापासून आजवर वाहात आलेला आमचा 'Utopian Humanism' आहे. या विधानाचे थोडे स्पष्टीकरण दिले पाहिजे.

(अ) संतांच्या देश, काल व वस्तू याविषयींच्या प्रतीती व धारणा, तुमच्या आमच्या जशा आहेत, तशा नव्हत्या. पुनर्जन्म, कर्मविपाक, आत्मतत्त्व, योग, मंत्र इ.च्या सत्यत्वावर अधिष्ठित असलेल्या त्यांच्या प्रतीती व धारणा विशाल होत्या. जवळजवळ प्रत्येक संत आपल्या पूर्वजन्माबद्दल व कर्मविपाकाबद्दल मनोगत व्यक्त करतो. चोखोबारायांपासून तो ज्ञानोबारायांपर्यंत आत्मतत्त्वाचे विशदीकरण, नाम–मंत्राचे महात्म्य, योगाची तारकता इ.ही त्यांच्या उद्‌गारात काठोकाठ असतात. जगच्चक्राच्या क्रमपरिणामाचाही सखोल विचार त्यात ओतप्रोत असतो. पण हे पूर्णपणे विसरून आम्ही संत–मीमांसा करतो व साहित्यिक डौलाने इतिहासातील काही गुन्हेगारी त्यांना चिकटवितो. कै. कोल्हटकरांबाबत लिहिताना श्री. माडखोलकरांनी पुनर्जन्म, कर्मतत्त्व इ. बाबत अलिकडे मोठ्या हिरीरीने लिहिले आहे, पण त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात (बडोदे, २७, २८, २९ डिसें. १९६९) मात्र संत–मीमांसा करताना या गोष्टी कोपऱ्यात बसविल्या आहेत. खुद्द कै. कोल्हटकरांच्या जातिभेद व चातुर्वर्ण्य विवरणातही त्यांनी यांचा स्पर्श होऊ दिला नाही ! त्यांच्या भाषणाचे सविस्तर परिक्षण 'प्रज्ञालोक'मध्ये केले आहे (वर्ष १२, ४). या प्रसंगी जनाबाईचा एक मार्मिक, विदारक व मिष्किल अभंग तीव्रतेने आठवतो. संत आणि देव यांच्यांत फारकत करता येत नाही, ते एकमेकाचे अंगच होत, एक वगळून दुसरा ग्रहण करता येत नाही इ. प्रतिपादन करताना जनाबाई म्हणते, 'संत आणि देव मानी जो वेगळे । तेणे येथे आगळे केले दोष ।। माता ते वेगळी कुच ते उरींचे । म्हणोनियां त्याचे मर्दन करी ।।...म्हणे जनी चांडाळा बोलावूं नका ।।' तत्त्वज्ञान आणि अतींद्रिय अनुभव, तज्जन्य धारणा व श्रद्धा यांची संतांशी फारकत करून केलेली मीमांसा उपरोक्त कुचमर्दनाच्या जातीतीच आहे ! कठोर व तुसडे आहे हे म्हणणे, पण ते वास्तव आहे !!

'अदृश्य दर्शनें संतांचेनि' हे श्रीतुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे संतजीवनविषयक सत्य असल्यामुळे, त्यांच्या मानवतावादाला अतींद्रिय शास्त्राचा पाया असतो हे आज आम्ही सोईने विसरतो. प्रा. डोळक्यांच्या 'डॉ. दप्तरींची मीमांसा' या प्रबंधावर लिहिताना अतींद्रियानुभवाची आठवण करून देणाऱ्या श्री. माडखोलकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात हा गाभा मात्र वगळून टाकला !

(आ) पूर्वोक्त दोन मानवतावादांत फरक जो आहे तो जरा जास्त विशद करावासा वाटतो. एकूण संतकोटीत आपल्याला दोन प्रकार आढळतात. अनुभवाच्या उत्तरोत्तर उच्च पायऱ्या गाठता गाठता संत अशा एका अवस्थेत येतो की जीत वस्तूवस्तूतला भेद मावळलेला असतो आणि 'अवघी भूते साम्या आली' असे घडलेले असते. या अनुभवाच्या गाढतम ठशाचा परिणाम होऊन, देहभानावर आल्यावर काही संत प्रत्यक्ष जीवनात अभेदाने वागतात. याच्या उलट, त्यांच्याच कोटीचा अनुभव असलेले दुसरे संत, देहभानावर आल्यावर, काही एका शास्त्राच्या निष्ठेने प्रत्यक्ष जीवन जगताना भेदभाव दाखवितात. श्रीनामदेवांनी 'आदी'मध्ये शुद्धिपत्राबाबत तिघा भांवडांचा जो चर्चारूप संवाद दिला आहे, तो या दृष्टीने अभ्यासण्याजोगा आहे. यात तिसराही एक प्रकार आपल्याला आढळतो. पण तो मात्र खालच्या प्रतीच्या साधकाचा असतो, पूर्वोक्त संतकोटीतला नसतो. वृत्तीनेच काही जीव असे असतात, की ज्यांना सूक्ष्म व शास्त्रीय तरतमता कळत नाही व म्हणूनच ते आरंभापासूनच अभेदवादी असतात. गीतेच्या भाषेत बोलावयाचे, तर असे म्हणावे लागेल, की ते तामस मनोधारणेचे असतात. गाढतम अंधारात सर्व वस्तुजात बुडल्यावर जशी ती समान होते तसे या साधकाचे असते. याच्या उलट, कोटिसूर्यांच्या लखलखाटात सर्व वस्तुजात

अस्तास गेल्यावर जसा अभेद निर्माण होतो, तसे पूर्वोक्त संतकोटीच्या बाबतीत होते. निर्विकल्प अवस्थेच्या अत्यानंदाचा मोह निर्धाराने दाबून टाकून जिरवून टाकावयाचा आणि जगास उपयोगी पडावयाचे अथवा त्याच अवस्थेच्या लयीत फर्यादपणे जीवन काढावयाचे असे दोन मार्ग या संतकोटीच्या बाबतीत संभवतात. काहींनी पहिला मार्ग पत्करलेला असतो, तर काहींनी दुसरा. पहिला मार्ग पत्करणाऱ्यांचे जीवन 'क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया' असे कठीण असते. निर्विकल्प अवस्थेतला अभेद, त्याचा आनंद व उच्चतमता ही हृदयात तशीच टवटदीत व तीव्र ठेवून व सर्वांविषयी समान कळकळ बाळगून जगाच्या हिताकरिता भेद राववावयाचा आहे ही मोठी दुष्कर गोष्ट आहे. श्रीतुकारामांनी, 'अर्भकाचे साठी । पंते हातीं धरिली पाटी ।। तैसे संत जगी । क्रिया करूनि दाविती अंगी ।। बाळकाचे चाली । माता जाणुनि पाउल घाली ।। तुका म्हणे नाव । जनासाठी उदकी ठाव ।।' असे मर्मज्ञपणे अभिव्यक्त केल्याप्रमाणे, भोवतालच्या विविध अधिकाराच्या जीवांकरिता तारतम्याने जीवन घालविणारा अभेद प्रतीतीचा व समान कळवळ्याचा संत दुर्ज्ञेय असतो. श्रीतुकारामांनीच 'ग्रंथाचे ते अर्थ नेणती ते खळ । बहु अनर्गळ झाले विषयीं ।। नाही भेद म्हणून भलतेचि आचरे । मोकळा विचरे मनासवे ।। तुका म्हणे विषा नांव ते अमृत । पाप पुण्या भीत नाही नष्ट ।।' या अभंगात म्हटल्याप्रमाणे, या कोटीच्या संतांचा मानवतावाद हा अनौचित्यवाद नसतो, तो समुचितवाद असतो. हिताची कसोटी शास्त्रीय असते आणि शास्त्र म्हटले, की त्यात अधिकारभेद येतोच. म्हणूनच त्यांचा मानवतावाद भिन्नजातीय असतो. आता हे खरे, की या भेद अभेदाच्या गूढ रुचिर संधीच्या धारणेत स्खलन व विकृतीकरण सुशक्य असते आणि अभेदप्रतीतीच्या लयीत औचित्याचा भाग न ठेवता फर्यादपणे वागणाऱ्या संतांच्या धारणेत तसा संभव नसतो. पण याचबरोबर हेही खरे, की पहिलाच समान कळवळ्याने जगाच्या हिताच्या उपयोगी पडू शकतो आणि दुसरा आत्म-निमग्नतेमुळे तसा पडू शकत नाही. उदाहरणार्थ, श्रीगोविंदप्रभु व भगवान् श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या अस्पृश्यसंबद्ध साधनेचा उल्लेख करता येईल. सारांश असा, की सुविख्यात महाराष्ट्रीय संतांचा मानवतावाद शास्त्रीय होता हे अभ्यासकांनी उमजले पाहिजे.

संतांच्या दृष्टीने भेदाभेदाची व्यवस्था

(७) याच मुद्यावरून ओघानेच, 'भक्तीच्या क्षेत्रापुरता अभेद व व्यवहारात मात्र भेद' हा जो आक्षेप निर्बुद्धपणे घेतला जातो त्याच्या फोलपणाचा निरास होईल. आंतरिक धारणांच्या दृष्टीने वर स्पष्टीकरण केले आहे. बाह्य जगाच्या दृष्टीने ते इथे करावयाचे आहे. 'Scientific Humanism' चे प्रमेय नीट उमजले, की अभ्यासकांच्या ध्यानात या दुटप्पीपणाच्या आक्षेपाचे वैयर्थ्य येईल. जगाच्या निदर्शनास अंतिम सत्य अधून मधून आणून देण्याकरिता व अभावितपणे निर्विकल्पतेच्या प्रतीतीत वाहून गेल्याचा सहज परिणाम म्हणून या कोटीतल्या संतांकडून क्वचित् शास्त्रबाह्य आचरण केल्यासारखे होते. पण हा अपवाद सोडला, तर ते अधिकारानुरूप भेदभाव करताना आढळतात व वरवर पाहणाऱ्यास हा दुटप्पीपणा वाटतो. पण तो तसा वस्तुतः नसतो. काही अपरिहार्य व वस्तुनिष्ठ कारणांमुळे तो येतो. पारमार्थिक दृष्टचा एकरस व भेदशून्य असलेले तत्त्व देश, काल व वस्तु यांच्या रूपात ज्यावेळी परिणत होते, त्यावेळी ती मूळची निरपेक्षता व स्वयंभूता खोवून बसते आणि सापेक्ष व परतंत्र बनते. म्हणजे मूळ काही गुणधर्म हारपतात व वेगळे गुणधर्म येतात. त्यामुळे आंतरिक प्रतीती एकरसतेची व अभेदाची आणि व्यवहार मात्र विविधरसाचा व भेदाचा असे द्वंद्व अवशतेनेच उत्पन्न होते. संतांचाही त्याला इलाज नसतो. आधुनिक विज्ञानातले उदाहरण या दृष्टीने उद्बोधक आहे. जगातल्या सर्व वस्तू मूलतः विद्युन्मय आहेत, पण ही वैद्युतिक अवस्था जाऊन जेव्हा अनेक पदार्थ उत्पन्न होतात तेव्हा तिच्याच पोटी कोळसा व हिरा, हिंग व कस्तुरी, कडुनिंव व ऊस, शेण व लोणी अशी द्वंद्वेही निर्माण होतात. तसेच मानवाच्या बाबतीत. परमेश्वरी अंश व जीव या दृष्टीने आई, पत्नी, मुलगी व बहिण यांत अभेद, पण सृष्टिक्रम व जगद्व्यापार यात मात्र अटळ असा भेद. कोणीही झाला तरी तो मिटवू शकत नाही, आपाततः भासमान होणाऱ्या दुटप्पीपणाच्या आहारी जावेंच लागते. एखादा कामपीडित गुंड व एखादा लुटारू, मूलतः परमेश्वरी अंशच असला तरी व त्या दृष्टीने त्याच्या त्याच्या वृत्ती ईश्वरी अवस्थेतून निघालेल्या आहेत असे म्हटले तरी, त्याच्याशी व्यवहार सृष्टिक्रम व जगद्व्यापार यांना अनुसरूनच ठेवावा

लागतो. पहिल्या जीवाच्या कळवळ्याने आपली पत्नी समर्पण करणे आणि दुसऱ्या जीवाच्या दृष्टीने आपल्या घराची दारे उघडून देणे हा संतपणा नव्हे ! मार्क्सच्या भाषेत बोलावयाचे जर असे म्हणणे बरोबर ठरेल, की 'metaphysically' एखादी गोष्ट सत्य असली तरी प्रत्यक्षात वागावे लागते 'historically'. ती वस्तू सृष्टिक्रम व जगद्व्यापार यात जे नाव-रूप घेऊन आकारास आली असेल, तदनुसारच पावले टाकावी लागतात. श्रीतुकाराम महाराजांनी याच दृष्टीने 'व्याघ्राचिये भुके वधावी ते गाय । याचे नाव काय पुण्य असे ?' असे खोचक व समर्पक म्हटले आहे. एखादी व्यक्ती व्यवहारातून बाहेर पडलेली असू शकते, समाजाचा समाज तसा बाहेर पडत नसतो. तो केवळ कपिला षष्ठीचा योग असतो !

(८) भक्तीच्याच संदर्भात, संतांच्या भूमिकेचा आणखी एक पैलू उघड केला पाहिजे. तंत्रशास्त्रात 'प्रवृत्ते भैरवीचक्रे सर्वे वर्णा द्विजातयः' असे तत्त्व आहे, तसेच भक्तिशास्त्रात 'प्रवृत्ते भक्तिचक्रे तु सर्वे वर्णा द्विजातयः' असे आहे. हा वस्तुनिष्ठ स्वाभाविक परिणाम आहे. देवतेचे प्रत्यक्ष सान्निध्य, केवळ भावविवश कविकल्पना नव्हे, जिथे असेल, तिथे, तिच्या तेजाने व प्रभावाने, सर्व नद्यांना सागरात समानता येते, त्याप्रमाणे सर्व जीवांना सारखेपणा येतो. त्या देवतेचे ते महिमान असते. अशा चक्रप्रवृत्तीत म्हणजे सचेतन स्पंदलहरींच्या कल्लोळात, जे काही शास्त्रविरुद्ध घडले असेल तेही परिमार्जित होते. ते त्या देवतेचे सामर्थ्य असते, एकत्र आलेल्या जीवांचे नव्हे. अशा तऱ्हेने ईशतत्त्वाशी जे जोडले जातात त्यांना गीतेने 'नित्ययुक्त', 'नित्याभियुक्त' इ. विशेषणे दिली आहेत. अशांचा 'मी योगक्षेम वहातो' म्हणून परमेश्वर पत्कर घेत असतो. ही अवस्था ओसरून गेली, की एकत्र आलेले जीव 'historical' बनतात व त्यांचे जीवनही तसेच व्यतीत होते. श्रीतुकारामांनी 'गंगा न देखे विटाळ । तेंचि रांजणीहि जळ ।।' या अभंगात फार मार्मिकपणे व मौलिकपणे हे रहस्य व्यक्त केले आहे. एखादे तीर्थक्षेत्र, एखादा परमोत्कट धार्मिक प्रसंग, एखाद्या उच्च कोटीच्या सत्पुरुषाच्या सहवासाचे प्रभामंडल यात घडणारी किमया नित्याची नसते; आणि तो अधिकारही विरळ असतो. कुंथून ही किमया घडविता येत नाही व तिने पुष्टी आणता येत नाही. चंद्रभागेच्या वाळवंटात वर्णाश्रमास अंमळ विश्रांती जी मिळाली तिच्या मुळाशी हे भक्तिचक्र आहे. हे न ओळखता, दंभमानचेष्टेच्या विष्ठेंत लोळणारे आणि क्षीण व वांझ भावाचे आम्ही ज्या वेळी संतांचा डौल आणतो, त्या वेळी शेणकिड्यासारखेच शोभतो हे काय सांगावयास हवे !

(९) असा डौल आणणाऱ्यांवर देखील संतांनी निर्दय फटकारे मारले आहेत, याचा आम्हाला विसर पडतो. वर्णोचित जीवन न घालविता, अधःपातात लोळत, दंभाभिमानाने समाज नासविणाऱ्यांच्या विरुद्ध संतांनी जशी तीव्र मोहिम केली, तशीच वेगडी अभेदवाद्यांविरुद्धही केली. सोयीवारपणे ही गोष्ट आम्ही झाकून ठेवीत असतो. या मोहिमेचे कारण उघड आहे. हे दोन्हीही माणसाच्या हिताच्या व उन्नतीच्या आड येणारे डोंगर आहेत. श्रीनामदेवांनी, 'आणिक एक वर्तेल अपवित्र । ब्राह्मण सांडितील वेदमंत्र । आचार सांडूनि होती शूद्र । ऐसे अपवित्र कलियुगीं ।। थोर वर्तमान पडेल काळु । चहुंवर्णांचा होईल एकचि मेळु । कोणी कोणाचा न धरिती विटाळु । मग गोपाळु निघते जाले ।।' या व इतर अभंगांत दोन्हीही टोकांना निंद्य ठरविले असून, दोघांच्याही दंभाभिमानाला चपटे लगावले आहेत. आणि इथे हे मुद्दाम सांगितले पाहिजे, की ते पूर्वपरंपरेस धरूनच केले आहे. वैदिक शास्त्रे व धारणा यांचीच ती शिकवण आहे. अगदी बदनाम झालेल्या मनुस्मृतीची देखील ! होय मनुस्मृतीही !! त्या संबंधी अधिक विवरण मी 'प्रज्ञालोक'मधील मनुस्मृतीवरील लेखमालेत केले आहे (वर्ष १३ व १४). श्रीनामदेवांनी चोखोबारायांना परमार्थाची दीक्षा दिली ती देखील तदनुसारच दिली, नवीन व बंडखोरीचे असे त्यात काहीही नव्हते; अनंतभट्टानेही चोखोबारायांचे अभंग उतरविण्यासारखी सेवा केली तीही नवीन व विशेष नव्हती. नाविन्य व विशेषता, पात्रता अंगी नसताना मानवतावाद अंगात आणणाऱ्या आम्हा महानुभावांमध्ये आहे. आम्ही आमचे एकांतात परीक्षण केले तर हे कळून येण्या जोगे आहे !

(१०) संतांसारखी माणुसकीची कोवळीक व ऊब नसता, त्यांची नक्कल करून 'रोकडी' वाटणारी कलाकृती आम्ही निर्माण करू शकतो हे मर्ढेकर, विंदा करंदीकर व इतर यांचे काव्य दाखवून देत आहे. 'माणुस पैशापासरी । अणुयुगीं ।।' हा मर्ढेकरी विपाद अथवा 'सामान्यांना काही । अर्थ आहे ।।' अशी काकु-

ळती करून 'रक्तारक्तातील कोसळोत भिंती । मानवाचे अंती गोत्र एक ।। छप्पन भाषांचा केलासे गौरव । तोचि ज्ञानदेव जन्मा येवो ।। जागृतांनो फेका प्राणांच्या अक्षता । ऐसा योग आतां पुन्हां नाहीं ।।' असला करंदीकरी 'आततायी'पणा हृद्य व चर्वणीय आहे यात शंकाच नाही. पण म्हणून काही या कलाकृतींना संतसाहित्याची सर येत नाही. जीवनाची नक्कल म्हणजे कलाकृती, जीत जीवनातला जिवंतपणा पूर्णपणे उतरणार नाही ही खबरदारी घ्यावी लागते! काहीतरी कृत्रिमता, काहीतरी उणीव, काहीतरी जडता पोटात वागविल्याशिवाय कलेस जन्मता येत नाही. संतसाहित्यात या गोष्टींना वावच नाही. तिथे 'करणीचा होय चुरा' हाच न्याय व परिपाक. अशी आमच्या व संतांच्या अंत:करणाची विरुद्धधर्मी जाती असल्यामुळे आम्ही क्रांति–कथांमध्ये व क्रांति–जातकांमध्ये रमतो, संत तसे रमू शकत नाहीत!

क्रांतीच्या तत्त्वाने मानवावर परम उपकार केले आहेत हे अजून ठरावयाचे आहे आणि तरीही आम्ही संतांना क्रांतिकारक म्हणून रंगवीत असतो. आमची स्थिती एखाद्या वाराही न सोसवणाऱ्या व थयथय नाचणाऱ्या अवलक घोड्यासारखी आहे, संतांच्या अंत:करणाची जाती मात्र कडकड करून निश्चल होऊन बसणाऱ्या लोण्यासारखी आहे. श्रीतुकारामांनी 'पाठेळ करिता न साहवे वारा' या अभंगात सुंदर चित्रण केले आहे. हर्षामर्ष पोटी जिरवून सारा भार घेण्याइतपत सोशिकता, समंजसपणा, परिपक्वता, प्रज्ञावंतता जेव्हा कमवावी तेव्हा समाज–प्रबोधनाचे कार्य करावे, ही संतांची कसवटी व हातोटी आहे. श्रीतुकाराम म्हणतात, टाकीच्या घावांनी फुटला, तर तो देव ढुंगण पुसावयास लोक घेतात, त्यात टिकला तर 'त्याच्या पडे पाया जन मग' असे होते आणि तिथेच समाजाच्या स्थित्यंतराची (transformation) सर्व सामग्री सिद्ध होते व ती प्रक्रियाही अमाप उसळते!

(११) 'Scientific Humanism' लाच धरून विचार केला, तर 'संत आणि समाजसुधारणा' यासंबंधींची आजची उलटसुलट चर्चा भ्रामक व पोकळ वाटते. खरोखरच, समाज–सुधारणा म्हणजे काय, हा प्रश्न हुडसून खडसून विचारण्याजोगा आहे. समाजसुधारणा म्हणून आज जे समजले जाते, तिने खरोखरच लाभ होतो का हे जगाच्या इतिहासात अजून सिद्ध व्हावयाचे आहे. संतांच्या बाबतीत संत स्वत: आपले जीवन काय समजतात व तदनुसार ते कसे जगतात याला (operational concept) सर्वाधिक महत्त्व. त्यांच्याबद्दल तुमच्या आमच्या ज्या अपेक्षा, त्या अनाठायी व वायफळ. तशा अपेक्षा आपापल्या क्षेत्राला धरून कोणीही बाळगू शकतो, पण तो काही संतजीवनाचा अभ्यास व लाभ नव्हे; असलाच तर तो आमच्या जीवनात त्या वासनांचा ध्यास व हव्यास होय! मागे श्री. शंकरराव किर्लोस्करांनी, महाराष्ट्रात औद्योगिक क्रांती न केल्याबद्दल ज्ञानेश्वर–मंडळाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले होते! समाजसुधारणा, राजकीय सुधारणा, आर्थिक सुधारणा, साहित्यिक सुधारणा इ. इ. चा शौक असलेल्या प्रत्येकाने संत–मंडळाला वेठीस धरले आहे! म्हणजे संत ही जणू विजनी सापडलेली निराधार, अनाथ दीन–दुबळी अबलाच! वेगवेगळ्या शिलेदाराने आपापल्या परी राबविण्याजोगी!!

समाज–सुधारणेच्या दृष्टीने संतांबद्दल बोलावयाचे तर असे म्हणावे लागेल, की ते समाजसुधारक होते व नव्हतेही. समाजात, वैदिक परंपरेत ज्यांना 'यम' म्हणतात, 'सामासिक धर्म' अथवा 'दैवी संपत्ती' म्हणून ज्यांना म्हणण्यात येते, त्यांची कटाक्षाने व सायासाने पुन: प्रतिष्ठा करणारे, म्हणून संत समाज–सुधारक होते; त्या व्यतिरिक्त काहीही करणे शास्त्रविहीनतेचे आहे अशी प्रतीती व धारणा असल्यामुळे, आमच्या मनात असलेल्या गोष्टींची चवढव न करणारे म्हणून संत समाजसुधारक नव्हते. जगच्चालक ईश्वर, सृष्टिक्रम, जगद्व्यापार, युगे व मन्वंतरे, नियमबद्धता इ. तत्त्वे वगळून केलेली संतमीमांसा म्हणजे भला मोठा भोपळा! या गोष्टी असत्यही असतील आणि आम्हाला त्या पटतही नसतील! पण तो प्रश्न स्वतंत्र आहे. संतांना त्या मूलभूत वाटत होत्या हे लक्षात घेऊनच मीमांसा व्हावी हीच गोष्ट प्रधान आहे. माणसाची माणुसकी ज्या वृत्तीवर खरी अधिष्ठित आहे त्यांचा कैवार घेऊन समाजात आटापिटा करणारे व चंदनाप्रमाणे देह झिजविणारे जे ते संत, ही मौलिक गोष्ट लक्षात घेतली की समाजसुधारणाविषयक वितंडवाद सहजच निरस्त होतो.

संतांच्या अंत:करणाची भिन्नजाती


(१) संतांच्या अंत:करणाची जातीच भिन्न असल्यामुळे त्यांच्या वाङ्मयातून इतिहास काढणे हे

मोठे डोळसपणाचे, सावधतेचे, विशाल दृष्टीचे काम आहे. याचे कारण हे, की भक्तिमार्गातले अंतःकरण भावतरल व उत्कट असते. त्यात भावसाम्राज्याची एवढी अफाट दौलत असते, की ती इतिहासदृष्टीच्या साच्यात व पद्धतीत बसत नाही. आम्हाला संतवाङ्मयातून व्यक्तिचित्रण व समाजचित्रण करण्याची जी तृष्णा असते, तिची तृप्ती करताना या भावसाम्राज्याच्या काही वैशिष्टयांची जाणीव आम्हाला नसतेच म्हटले तरी चालेल. 'आचरणे खोटी। केलीं सलताती पोटीं ।।' अशा प्रकारचे श्रीतुकारामांचे उद्‌गार पाहिले, 'माझे गुणदोष जरी विचारिसी ...... अंगुष्ठापासोनि मस्तकापर्यंत' ही अपराधाची व पापाची राशि आहे असले श्रीनामदेवांचे कथन पाहिले, की इतिहासदृष्टि, या संतांनी पूर्ववयात कुठे कुठे झक मारली हे शोधण्यास भरधाव पळत सुटते. वस्तुतः या उद्‌गारांचा संबंध विद्यमान व्यक्तिजीवनाशी नसतो, भावजीवनाशी असतो. 'डोळचामध्यें जैसें कणु। अणु तेहि न समाये।। तैसे शुद्ध करी हित। नका चित्त वाटवूं।।' (श्रीतुकाराम) अशी साधना करणारे संत विवेकाचे पिंड असल्यामुळे दुःखी असतात आणि त्यातून त्यांचे हे उद्‌गार बाहेर पडतात. 'परिणामतापसंस्कारैर्गुणवृत्तिविरोधाच्च सर्वं दुःखं विवेकिनः' या योगसूत्रावरील व्यासभाष्यात जे स्पष्टीकरण केले आहे, ते जणु या अभंगाचे मूळ रूपच होय. व्यासभाष्य म्हणते, 'अक्षिपात्रकल्पो हि विद्वानिति यथोर्णतंतु पात्रे न्यस्तः स्पर्शेन दुःखयति नान्येष्यु गात्रेषु; एवं एतानि दुःखानि अक्षिपात्रकल्पं योगिनमेव विलश्यन्ति नेतरं प्रतिपत्तारम्...' कोळचाच्या जाळचाचा तंतु किती सूक्ष्म व मृदु असतो पण तोही डोळचास खुपतो, तसे संतांचे असते. हृदयाकाशात चमकून गेलेली एखादी क्षणजीवी कल्पना वा वृत्ती देखील सहन न होण्याइतपत शुद्ध होत असलेल्या अंतःकरणाचे भावसाम्राज्य इतिहासाच्या जड दृष्टीला दिसणे केवळ अशक्य आहे. दुसरे असे, की भावविवशता इतकी पराकोटीस पोहोचते, की क्षणमात्रही विलंब तळमळावयास लावतो. श्रीसमर्थांचे 'पस्तावलो कावलो तप्त झालो। तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलो।।' हे तगमगणे, 'जळत हृदय माझे जन्म कोटचानुकोटी' हे त्यांचे विलक्षण व्याकुळ होणे आमच्या टप्प्यांत येणे कठीणच. तिसरे असे, की अदृश्य दर्शनाचे गाढ जीवन असलेल्या संतांचे देश–कालही भिन्न असतात. 'मज दूर हो दूर हो म्हणती' म्हणून सशल्य पस्तावा करणारे श्रीचोखोबा, 'मी मागच्या जन्मी नीळ वानर होतो, माझ्याकडून काही अपराध घडला व मला हा जन्म आला' असे ज्या वेळी पश्चात्तापाने म्हणतात, त्यावेळी त्यांच्या देश–कालविषयक व्यापक धारणाच व्यक्त होतात. आणखीही काही गोष्टी निदर्शनास आणता येण्याजोग्या आहेत. श्रीरामकृष्ण परमहंस प्रभृती संतांच्या जीवनात त्या स्पष्ट दृग्गोचर होतात. पण त्या विस्तारभयास्तव आटोपत्या घेणे भाग आहे.

छळ, जांच इ. इ.च्या ज्या कथा अतिरिक्तपणे रंगविल्या जातात त्यात इतिहास दृष्टीचा हाच प्रमाद होतो, की ती संत जीवनाचे नभोवितान ग्रहण करू शकत नाही. यासंबंधी दोन गोष्टी अवश्य लक्षात याव्या लागतात. त्या अशा—

(अ) ईश्वरी अस्तित्वाची जाणीव ही अशी काही वस्तू आहे, की तिच्यातून जीवाला स्वतःच्या लघुतेची तीव्रता जाणवत राहते. त्यामुळे तो कमालीचा विनम्र होतो; आणि विनम्रतेच्या पोटी 'हीन दीन जात मोरी पंढरीके राया' हा उद्रेक निघतो. 'सामाजिक आशया'चा त्याशी संबंध नसतो, छळाचे रडगाणे त्यात नसते. 'शेवटील स्थळ नीच माझी मति' या श्रीतुकारामांच्या उद्‌गाराप्रमाणे श्रीज्ञानदेव, श्रीएकनाथ इ.सारखे शास्त्रवेत्ते प्रज्ञावंतही मनोगत व्यक्त करतात, स्वतःच्या अज्ञानाची कीव करून करुणा भाकतात याचे कारण नीट लक्षात घेतले जात नाही. सर्वशक्तिमान् व अनंत अशा ईश्वरी अस्तित्वाच्या तीव्र जाणिवेने येणारी लीनता आणि अहंकारनाशाकरिता करावा लागत असलेला आटापिटा व काकुळती यांनी संतजीवन मोठे उत्कट व विविधरंगी झालेले असते. त्या त्या वेळच्या सृष्टिक्रमानुसार व इतिहासाच्या ओघानुसार कनिष्ठ प्रत प्राप्त झालेल्यांना करुणा भाकण्यास आणखी एक कारण सापडते एवढेच. त्या कारणात आम्ही समजतो तशी कुरकुर वा गाऱ्हाणे सदासर्वदा असतेच असे नव्हे. कमालीच्या लीनतेबरोबर, अनन्यता, शरणागतता इ. वृत्तीही असल्यामुळे संतांच्या कथनात एक प्रकारची गाढता व घनता येते हे समजणे आवश्यक आहे.

(आ) संतजीवनाचा एक अतिमनोहर पैलू म्हणजे बालक भाव. त्यानेही त्यांच्या कथनात गडदपणा व घनपणा येतो. 'पांडित्यं निर्विद्य बाल्येन तिष्ठासेत्'



या औपनिषदिक उपदेशाप्रमाणे साधकाची नित्य अवस्था असते. बालकभाव म्हणजे निरभिमानता आणि सरळ, मोकळी, निर्भय, निःसंकोच अंतःकरण वृत्ती. त्याचबरोबर, श्रीतुकारामांनी 'आळी करावी ते कळते बाळका । बुझवावे हे कां नेणो तुम्ही ।।' असे म्हटल्याप्रमाणे प्रेमातुर हटवाद. अशा चित्तांतून निघालेले उद्‌गार इतिहासाच्या दृष्टीस अनाकलनीय असतात. 'सामाजिक आशया'चा शोध व व्यक्तिचित्रण यांची ऊठसूठ उठाठेव करणारे आम्ही हा बालकभाव कितपत जाणू शकतो याचेच आज संशोधन करावे लागेल ! असो——

समाजसुधारणा, इतिहास-संशोधन, क्रांति, मानवतावाद इ. विषयी मी आतापर्यंत कडवटपणे व फटकळपणे जे लिहिले आहे, त्यावरून असा ग्रह होण्याचा संभव आहे की मला यांची किंमत नाही, मी त्यांच्या विरुद्ध आहे; आणि हा बहाणा करून इथपर्यंत केलेली चर्चा 'reactionary', 'unprogressive', इ. छाप मारून बाजूस सारण्याचा प्रयत्न होणेही शक्य आहे. तेव्हा, मला हे प्रांजळपणे नमूद केले पाहिजे, की तसे मुळीच नाही. शास्त्रीय, न्याय्य व हितकर अशा सर्व गोष्टींची, इतराइतकीच चाड व आस्था मला आहे. पण असे लिहिण्यातला हेतू हाच आहे, की संतजीवन व संतवाङ्मय या गोष्टी 'प्रमाण-प्रमेय-पद्धती'ची तमा न बाळगता हाताळल्या गेल्या आहेत हे लक्षात आणून द्यावे. बेवारशीपणाने या गोष्टींचे आज जे शवविच्छेदन होत आहे त्याला आळा बसावा, प्रचलित प्रघाताला जोराचा धक्का द्यावा एवढाच नम्र हेतू माझ्या या लिहिण्यात आहे; कोणाचा अवमान करण्याचा वा निंदा करण्याचा नाही !

यापुढील भागात श्रीनामदेवांच्या गाथेच्या पाठनिश्चितीच्या बाबतीत कसा गोंधळ झाला आहे, त्या दृष्टीने कोणकोणत्या गोष्टी ध्यानात घेतल्या पाहिजेत, त्यांच्या जीवनातील कालक्रम इ. ची शहानिशा करू.

* *

अनुक्रमणिका

पाषाणघंटेचा आवाज

वसुधा माने

मुखावर प्रसन्नपणा, डोळ्यात मानवी भाव, सरळ नाकावर ब्राह्मणी नथ, गळ्यात पुतळ्यांची माळ ... तिच्याकडे पाहाता पाहाता मला प्रथम आठवण आली ती आजीची आणि तिच्या गळ्यातल्या मोत्यांच्या पोळ्यांची. मग नजरेत भरला तिचा गर्भरेशमी पैठणीपदर. संध्याकाळी जेव्हा दिवेलागणीच्या वेळी लक्ष्मुबाईचं आगमन होतं तेव्हा तिला पाटावर बसवायचं असतं, हळदकुंकू लावून तिची ओटी भरायची असते, मोती-पोवळ्यांनी. घवघवीत मुद्रेची, मोठ्या मोठ्या पिंग्या डोळ्यांची माझी आजी मला शिकवायची

"लक्ष्मीबाई आली
लक्ष्मीबाई आली ग ऽऽ
आली तशी ग तशी ग उभी करा ऽ
मोती पोळ्यांनी पोळ्यांनी ओटी भरा ऽऽ."

आणि माझ्या बाल मनात प्रश्न उमटायचा की मोत्यांच्याही पोळ्या करतात काय ? पुरण-पोळ्या करतात तशा ? मग त्या खातं कोण ? अंबाबाई ?

यातल्या शेवटच्या प्रश्नाला तेवढं आजीकडून 'हूं' असं उत्तर मिळालं होतं. बाकीच्या माझ्या संशय-रत्न-मालेकडं तिचं लक्ष नव्हतं हे उघड होतं. पुढं यथावकाश या मोती-पोळ्यांचं कोडं उलगडलं खरं. पण मनात कुठंतरी अंबाबाई म्हटलं की पुरणाच्या पोळ्यांसारख्या मोत्यांच्या पोळ्या नजरेसमोर यायच्या.

कोल्हापूर म्हणजे अंबाबाई हे तर खरंच; पुढं जेव्हा चित्रं माझ्याशी बोलायला लागली तेव्हा पै. आबालाल रहिमानंनी आपल्या कुंचल्यांतून चितारलेलं कोल्हापूरचं दुसरं भाग्य दिसलं. रंकाळा तलाव. शिंपल्यात मोती कसा असतो ते काही मी अजून पाहिलं नाही. पण रंकाळा बघून वाटलं की अंबाबाईच्या नथेतलं सर्वांत मोठं मोती ते हेच. हे पाणी म्हणजे अत्यंत अप्रतिम लावण्यवती षोडशवर्षीय कन्याच. अंबाबाईचं कन्यारूप. त्या पाण्यावर हलक्या गुलाबी, गर्द किरमिजी, लाल, पिवळ्या वाफा उठत होत्या. ऐन दुपारच्या झगझगीत निळाव्याखाली ही मुग्धा लाजत होती, आळसावत होती, नाना विभ्रम करीत होती. दिवसाच्या कोणत्याही प्रहरी पाहावं, रंकाळ्याचं कोणतं ना कोणतं मनोहारी स्वरूप नजरेस पडतं; आणि रात्री नक्षत्रजडित आकाश त्याच्यात वस्तीला उतरतं. हलत्या लाटांनी जिवंत होतं. पाण्याला एरव्हीही व्यक्तिमत्त्व असतं. अगदी रस्त्याच्या कडेला साचलेल्या डबक्यातल्या गढूळ पाण्यालाही. शहराच्या ऐन वस्तीच्या मध्यभागी असूनही रंकाळं स्वतःचं स्वतः होतं. त्याचं रूप वर्णन करायला रंगाचा कुंचलाच हवा. इतक्या रंगच्छटांना भाषेत शब्द कुठले असणार ?

शहराच्या ऐन गजबजलेल्या भागात एक काळ्याभोर पाषाणखंडांचा तलाव आहे. त्यात एक भलं मोठं कमळ उमललेलं आहे. आज इतकी वर्षं झाली, राज्यांची, राज्यकर्त्यांची उलटापालट झाली पण हे कमळ तसंच उत्फुल्ल राहिलं. एखाद्या एकांतप्रिय माणसानं चार चौघात वावरून सुद्धा आपला एकटेपणा सार्वभौम ठेवावा तसं हे अंबाबाईचं देऊळ आहे. त्याचा भलामोठा उंबरठा ओलांडून आत गेलो की ऐहिक जगाचे व्याप, ताप, संताप मागे राहतात. मला वाटतं, काळ्या पाषाणातच ही जादू असावी.

उंबऱ्यावर आपण उभं राहिलो की केशरी ज्योतीच्या टिकल्या चमचमताना दिसतात आणि जगन्मातेचं प्रसन्न दर्शन होतं. तिथं तसं उभं राहून अंबाबाईला पाहाताना माझ्या मनात आलं मरण एक क्षण पलिकडे असताना परमेश्वरी तेजाचं असं आश्वासक रूप दिसत असेल का ? असणार. कारण इथलं ओळखीचं अंगण सोडून जाताना मानवमनाचा थरकांप होईल हे काही जगदीश्वराला सांगायची गरज नाही. काळोख भरल्या खोलीत बाळाला भीती वाटत असेल तर आई त्याचं बोट धरतेच की नाही ? समजा हातात तान्हं बाळ असेल तर मग ती त्याला पदर धरू देते. पण आपल्या निकट अस्तित्वानं त्याला आधार देते. अंबा-

बाईचं ईषद्दर्शन मला जेव्हा जेव्हा आठवतं तेव्हा तेव्हा माझ्या मनात माझ्या आजीचा प्रेमळ स्वर घुमतो.

" सुधे, आई लवकर यावीशी वाटती ना ? मग ये. तुला करुणाष्टक शिकीवते. ते दिवसातून चारदा म्हटलंस की आई लवकर येईल. "

पण आई तर तीन महिन्यांनी यायची होती. एरव्ही गणित न का कळत असेना, तीन महिने म्हणजे तीनच महिने एवढं ज्ञान त्या वयात होतं. मग एक जिज्ञासा. देवाची प्रार्थना केली की दिवस लहान होतात ? असतीलही. पण आजी म्हणाली की दिवसांना पंख फुटतात देवाच्या कृपेनं आणि मग ते भुर्रकन् उडतात. देव अशक्य ते शक्य किती सूक्ष्मपणे करतो ते कळत न कळत आजीनं मला शिकवलं. तीन महिने तीन महिन्यांच्याच गतीनं गेले पण त्याचं श्रेय मात्र माझ्या बाळमनानं तेव्हा अंबाबाईला दिलं.

कैक वर्षं गेली. आजीही जगन्मातेच्या राज्यात गेली. हा प्रसंग, ही शिकवण मनाच्या अडगळीत गडप झाली होती. आज आता अंबाबाईच्या महाद्वारावर उभं राहिल्यावर तो सगळा भूतकाळ जिवंत झाला. इतकी वर्षं संसारातल्या भल्याबुऱ्या प्रसंगात कुणाचा पदर मला आधार देत होता त्याचं ज्ञान झालं. माहेरी यावं तशा हलक्या मनानं मी उंबरा ओलांडला नि महाद्वारातून आत पाऊल घातलं.

ही एक नगरीच आहे. देवालाही आपण आपल्या सारखंच बनवलं आहे. आपण कधी एकटे राहतो का ? काके, मामे, मावश्या हजार जण आपल्याला आवती भोवती हवे असतात. देवाच्या देवळातही काही ना काही निमित्ताने इतर देव राहत असतात. कुठंही बघा, इथंही दत्तापासून ते झाडून सगळेजण आपापल्या तंबू-राहुटया ठोकून हजर होते.

अंबाबाई देवी खरी. पण स्त्रीच. आणि स्त्रीला संसाराचा लोभ कधी सुटलेला कुणी ऐकला आहे ? सुपाटोपलीचा, जात्यापाळण्याचा, तीन दगडांचा संसार तिलाही प्रिय आहे. आसपासची दुकानं म्हणजे फणी करंडा, बांगडया, कुंकू, किसणी, पोळपाट, लाटणी, चाळण्या, पितळेची भांडी असा प्रपंच आहे. खेळण्यांची दुकानंही आहेत आणि ती किती आवश्यक आहेत हे ज्यांनी सुरेल बाळरडण्यांनी रात्री जागून काढल्या आहेत त्यांना सांगायची आवश्यकता नाही.

या सर्व ऐहिक पसाऱ्यात त्या पाच दीपमाळांचा पुंजका अंगभूत पाषाण स्तब्धपणे उभा आहे. काळो-खाचीच वात न् काळोखाचाच दिवा. मग उजेडही पस-रेल तो तमाचाच ! त्यात त्या डुबून गेल्या होत्या. नवजात अर्भकाच्या डोळ्यांतल्या काळेपणासारखा कोवळा पण गच्च काळोख त्यांच्या आसपास झरत होता. अंबाबाईचं अस्तित्व, आसपासचं मानवी जीवन, स्वतःचा असलेपणा सगळं सगळं या अनादि अनंत निराकार निर्गुण काळोखात कुठच्या कुठं गडप होत होतं. नगण्य होतं. कधीही न ऐकलेला एक स्वर माझ्या हृदयात सांगू लागला. " सर्व खोटं आहे. हा स्वयंभू अंधार एवढाच खरा. याच्या गर्भात प्रकाशाचं बीज आहे. पण तरीही हाच खरा. "

आपल्या शरीराच्या घडणीत पंचमहाभूतांचा वारा आहे म्हणतात. पण या विश्वाच्या जन्माआधी-पासूनच्या स्थितीचा—तमाचाही—वाटा—मोठा वाटा त्यात असला पाहिजे. हा तम हसला न् प्रकाश जन्माला आला. हसणाऱ्याला जग साथ देतं त्याप्रमाणे प्रकाशात इतरेजन सुखी होतात. स्वतःशी जेव्हा संवाद साधायचा असतो तेव्हा काळोख आवश्यक होतो.

भल्या मोठ्या काळ्या दगडी पारावर या पाच दीपमाळा एकमेकींना बिलगून उभ्या आहेत. धीरगंभीर-पणं. आवारात आणखीही दीपमाळा आहेत पण त्या चारचौघासारख्या आहेत. या पाचजणींना एकत्र ठेव-ण्याची कल्पना ज्या कुणा कलावंतानं काढली असेल त्याच्या मनात काय काय येऊन गेलं असेल !

त्या दीपमाळांच्या शेजारी बसून किती वेळ गेला हे कळायला काही मार्ग नव्हता. पण फार वेळ बाहेर खेळत राहिलं आणि तरीही कोणी रागवायला आलं नाही तर कसं आपल्या मनाला अपराधी वाटतं तसं मला हळूहळू वाटायला लागलं. मी निमूट उठले आणि अंबाबाईच्या सभामंडपात जायला निघाले.

खरं म्हणजे तो आहे ' सोपा '. सोप्याच्या जमि-नीवर वरीच कासवं मुक्काम ठोकून आहेत. कधीपासून तरी. त्यांच्या पाठींचा गारगार स्पर्श माझ्या तळव्यांना झाला आणि मनात एक पहाट उगवली. तिला दिवा-ळीचा वास होता. शेजारच्या विठोबाच्या देवळातून भजनाचे मंद सूर घेऊन ती दिवाळी माझ्या लहानपणात आली आणि तिथंच झोपी गेली. आतापावेतो काही तिला

जाग आली नव्हती; ती इथं आली. ही कासवं माझी लहानपणीची सवंगडी होती. माझी छोटीछोटी दुःखं मान–अपमान यांनी ऐकले होते. आपल्या दगडी कवचाआडच्या लुसलुशीत कोवळचा मनात त्यांनी जपून ठेवले होते. इतक्या वर्षांनी त्यांचे झालेले मोती त्यांनी इथं अंबाबाईच्या साक्षीनं माझ्या हातात ठेवले.

त्यांच्या पाठीवरून पाय देत देत मी अंबाबाईपुढं गेले. तिचा हा गाभारा म्हणजे माजघरच होतं. पुष्कळशा सवाष्णी जमल्या होत्या. तिला–मोठ्या आईला–हळदीकुंकू देऊन झाल्यावर इतरांना देत होत्या.

हीच ती अंबाबाई. गोव्याला 'धालो'च्या गाण्यात भेटलेली. आनखशिख दागिन्यांनी मढलेलं तिचं रूपडं त्यात वर्णलेलं आहे. मोत्यांनी भरलेला भांग, कमरेचा सायरपट्टा म्हणजे कमरपट्टा, गळचात गळसऱ्या आणि हजार निऱ्यांची पैठण नेसलेली ही अंबाबाई घोडचावर चढली आणि भरधाव घोडा फेकीत कोल्हापुरास आली. तेव्हा ती कशी दिसली ? तर मशालीवाणी, वाऱ्याच्या झोतावरोवर अधिकच प्रज्वलित होणाऱ्या दिवटीसारखी ती झळकली. गोवेकर स्त्री म्हणते

आई माझी पालखी पालखी वळखली
आई माझी दिवटी दिवटी झळकली ।

इथं अंबाबाईची पावलं खरोखरच हजार निऱ्यांच्या घोळाखाली लपली आहेत. पण ती सोनकेवडचाच्या पानासारखी सुवासिक पिवळी गोरी आहेत हे मला माहीत आहे. फक्त त्यावर जोडवी मासोळचा आहेत की गोव्याच्या सलमुद्या आणि पायजणं (पैंजण) आहेत ते मला दिसलं नाही. हात जोडल्यावर मनामध्ये करुणाष्टक निनादून गेलं. जणू एक काहीतरी गोष्ट मी केव्हा तरी कुणाला तरी कबूल केली होती. ती देऊन झाली.

अंबाबाईची मूर्ती ही साध्यासुध्या लोकांना सगुण रूप हवं म्हणून उभी आहे. तिचं आत्मरूप तिच्या उजव्या हाताला आहे: श्रीयंत्राचा पाषाण. हा सदैव ओला असतो. त्याच्यावर कुणी पाणी ओतीत नाही की अभिषेक करत नाही. पण स्थान जागृत असल्याची ती खूण आहे. इतकी पापं घडली, आम्ही इतके मूर्खासारखे वागलो पण देवीची कृपा ढळली नाही. आई कातावली की धपाटे घालते पण तिचं प्रेम काही नष्ट होत नाही. अंबाबाई रागावते की नाही माहीत नाही.

गर्भागारांतून बाहेर आले आणि पुन्हा एकदा देवळाकडं पाहिलं. काळचा करंद पाषाणाचं हे हेमाडपंती बांधणीचं देऊळ मला पाहता पाहता तांबडचा सूर्लच्या शंकराच्या देवळाची आठवण देऊन गेलं. खळाळणाऱ्या झऱ्याच्या काठी जंगलात वसलेलं ते देऊळ —त्याची घंटाही पाषाणाची होती. अंबाबाईच्या देवळातही काळीशार प्रशस्त घाट किती शोभून दिसली असती !

बाहेर पारावर बसल्या बसल्या मनात काही येत होतं. जात होतं. अचानक नजरेसमोर रंकाळा आला. वरचं आकाश रंगांसहित हृदयात वस्तीला असूनसुद्धा रंकाळा एकटा आहे. एकटा आहे पण रिता नाही. संपूर्ण आहे. सर्व जगावर कृपेचा वर्षाव करणारी कल्याणी अंबाबाई तशी एकटीच आहे. सार्वभौम आहे. आपली असूनही तिचं मात्र कुणीच नाही. मातेची अवस्था अशीच असते. तिला एक मूल होवो की एकशे एक ! सगळी मोठी झाली की भरारा निघून जातात. मग त्यांच्या कल्याणाची काळजी मनात बाळगून आई एकटीच घरात उरते. सणासुदीला, सटीसामाशी मुलं एकत्र जमतात. आईभोवती प्रेम, त्याग वगैरे शब्दांचे दिवे उजळतात. निघून जातात. अंबामातेची न् मानवी मातेची कहाणी तशी एकच !

गावातल्या देवळाचा कळस इतका उंच असावा. की कुठूनही त्याचं दर्शन व्हावं. पण आता गावं फारच ऐसपैस असतात; आणि स्काय–स्क्रेपर्स उठवण्याच्या कैफात देवळाचा कळस कोण लक्षात घेतो ? पण कोल्हापुरात वावरताना मला मात्र क्षणोक्षणी तो कळस दिसत असे. सबंध शहर जणू तिच्या तालावर श्वासोच्छ्वास करतं आहे असा भास होत असे. वास्तविक तसा काही प्रकार नव्हता. कोल्हापूरवर अंबाबाई इतकाच हक्क सांगणारी टेंबलाई आहे अन् राजघराण्याची तुळजाभवानीही आहे. पण तरीही कोल्हापूर म्हणजे अंबाबाई हेच खरं !

अं हं ! कोल्हापूर म्हणजे अंबाबाई न् रंकाळा हे जास्त खरं !

* *

॥ क वि ता ॥

दोन कविता : विलास गिते

गोष्ट

तिने विचारली म्हणून त्याने सांगितली
एक गोष्ट : पेंटिंग सोडल्याची–
सूर्यफुलांच्या ताटव्यांवरून जड पावलांनी
परतणाऱ्या उन्हाचं लँडस्केप फसल्याची,
कॅन्व्हासवर अंधार उतरल्याची.

तिने झाकले डोळे त्याच्या दुःखाने
तेव्हा जाणवला तिलाही तो कॅन्व्हास,
नंतर व्याकुळ पावलांनी ती परतली–
सूर्यास्तानंतरच्या काळोखात कलून
अदृश्य होत जाणाऱ्या
मलूल सूर्यफुलासारखी.

त्याच्यासाठी पुन्हा
उरला फक्त अंधार :
कोरा कॅन्व्हास.

* *

लतखोर

आतापर्यंत नजरांची बरीच ट्रँक्विलायझर्स घेतली
पण मन झालं नाही शांत;
ग्लानी मात्र अपरिहार्यपणे चढली
माझ्या सौरंगी वेदनेला.

सांत्वन करणारांनी शब्द दिले,
शब्द नव्हते त्यांनी स्पर्श; अश्रू मात्र
अस्तित्वाच्या भिंतीआड
माझे मीच मोजले माझ्यासाठी
मीच माझ्याशी मांडलेल्या मृत्यूमय एकांतात.

दूर दूर रंगीन निऑनचा गमगीन प्रकाश
रस्तेच रस्ते रस्तेच रस्ते रस्तेच रस्ते
माझे बेइमान पाय अजून कसे नादानपणे
अभिसार करताहेत बेवफा गजलशी...

आणि पुन्हा शेवटी लतखोर मनाने ठेवली आहे
सेल्समनने ठेवावी आपल्या सँपल–बॅगमध्ये
एखादी सिगारेट–केस
आठवणीने, तशी
व्यथांनी भरलेल्या हृदयाच्या एका कोपऱ्यात
माझी कविता...

* *

झाडे : रे. भ. भारस्वाडकर

सगळेच कसे शांत शांत आहे
ऋतुमानाप्रमाणे कुजके रंग बदलून घेणारी
ही बाग—कुंड्यांमधून स्तब्ध ठाकलेली झाडे !
सडलेली माती उलथून का टाकत नाहीत
ही स्वतःला जीवंत म्हणवून घेणारी झाडे;
कुंडीचे आवरण झुगारत का नाहिय
ही जातीवंत कलमांची नामावळी !
वारा अजून पडलेलाच निःशब्द.
थडग्यावरील क्रॉससारखी ही झाडे
गत अस्तित्वाच्या केवळ एका खुणेसारखी उभियेत
त्यांना कुणीतरी गदगदा हलवायलं पाहिजे
त्यांच्या नसानसातून धुमारे फुटायला पाहिजेत.
कधी काळी माझी कविताही एक वादळ होऊन येईल
—तोपर्यंत ही झाडे अशीच स्तब्ध रहातील ?
(ईश्वर त्यांच्या पानात सळ सळ उत्पन्न करो !)

* *

लिहा ते लेख रक्ताने : सौ. अंजलि ठकार

अरेरे....वाहती वारे झुकांड्या देत काळाला
दिशाभूल होउनी पाने उडाली गर्दिगर्दीने

अता या जीर्ण फांद्यांची लाकडे लाख किमतीची
पहा ना माळल्या वेण्या फुलांस्तव फेकुनी नाणे

कुणाचे आर्त हो टाहो फुटूनी व्यर्थ विरलेले
झुलेना व्रात्य हिंदोळा पुराणे गोजिरे गाणे

अधांतरि हास्य फसफसते....उतू जातात बेहोष
शहाणे फुगवती छाती तोच ये लाट वेगाने

वळूनी पाहण्याचेही मुळी ना राहिले भान
नाकतोंडात ये फेस अनर्थहि पुढिल ओघाने

गडप हो अटळ इतिहास कुठे ती लेकरे बाळे
कुशीतून जपुन वाढविले जया झाकून शेवाने

किती दडपून ठेवावे उरी कढ....दाटते पाणी
सृष्टिच्या कवतिकास्तव ये पावसाळाहि नेमाने

एकदा घाव तरि घाला तुटो पारंबिपारंबी
मुळाशी जखडलो होतो....लिहा हे लेख रक्ताने.

* *

एक असंबद्ध कविता : नागनाथ कोत्तापल्ले

गर्भातल्या गर्भात वाढणारा मृत्यू तशी पसरते रात्र
चढत जाते कमानीपर्यंत मद्यप्यांची झिंग
कड्याकपारींमधून
वाढत जातो काळोख
भासाभासांची पाऊलं घरभर बर्फगार रांगोळ्या
वडावर टांगलेल्या मेघांचा घुत्कार बांध फुटून अनावर
: उगवून येणारे कोंभ काठाकाठाने
....लवत जातात पापण्या श्रांतपणे टेबलावर
हरवत जाताहेत अकृत्या वर वर आसमंतात....

* *

रेषांचे इलियड : उ. रा. गिरी

कौमार्याच्या वहीत केव्हा
चितारलेले काहीबाही
अप्रगल्भ हे हात अहेतुक
करून बसले वेडी घाई.
—आज परंतू 'त्या' घाईतिल
उलगडले रेषांचे इलियड
तुझे नवे रेखाटण अधुरे
बघतांना, 'शिशिरातील पतझड'.

* *

कविता : सोपान हळमकर

भोवताली हा काळोख वाढू लागलाय्
भरतीच्या पाण्यासारखा......
आणि मी—मी बुडतोय ईश्वरा गळाभर
तुला दिलेल्या अनंत व्याकूळ हाकांत
तुझ्या अस्तित्वाची एकही खूण
सापडली नाही अद्याप माझ्या जगण्यात
मी फक्त अनुभवतोय मृत्यूचा साक्षात्कार;
भयाण दुपारी; निस्तब्ध झाडांच्या पानांतून;
मी पाहतोय ईश्वरा, रोज सूर्य लाल उगवणारा
मी पाहतोय ईश्वरा; गल्लीबोळातून तुझा
हैदोस चाललेला
मी पाहतोय ईश्वरा; लाठ्या, काठ्या; गोळीबारातून
रोज एक नवा नेता तुझी कृपा घेऊन जन्मणारा
मी पाहतोय ईश्वरा; चाकूच्या मुठीला
हिरा चमकणारा
मी पाहतोय ईश्वरा; पाण्याची दया मागणारा काफिला
आणि मी पाहतोय ईश्वरा;
तुझा हात त्यांच्या ओठावर वाळूचे कण रगडणारा
ईश्वरा; मी नाकारतोय तुझे अस्तित्व
ईश्वरा; मी नाकारतोय तुझे कर्तृत्व
ईश्वरा; मी बंद करतोय तुझी महाद्वारं
उद्याची सकाळ तरी तुझ्याशिवाय पाहू दे
उद्याचा सूर्य तुझ्याशिवाय जगू दे ईश्वरा !

* *

काय उरणार : वा. रा. सोनार

दिवस काखेत मारून दोन दिशांनी उडतांना
भितच आड येते यंत्रांच्या निनादाची.

चारा शोधतांना चोची आदळत ठेवतो दिवसाच्या
डफावर
सोईने ठरवून घेतलेली रीत गर्दीत जगण्याची.

दिशातून ओघळले मणी येऊन मिळतात सायंसूत्राशी
गजबजून गेलेली मनातून चाळ थरथरते
चिवचवित तारेशी.
सुटलेले थंडगार अनाद-वारे सखे सोबती
घसरणाऱ्या वाळूखाली
तेव्हाही ठेवतो अपसूक गाज, दूर ढकलीत
दुःखे श्वासांखाली.
गुहेतून गुरगुरणाऱ्या या श्वापदांचे आवाज
केवळ माझ्यासाठी सये,

ऐकण्यासारखे तेवढेच एकदा ऐकून घेतल्यावर
तुझ्या कानी पडू नये असे काय उरणार माझ्याजवळ !

* *

एक सकाळ : एकनाथ देशमुख

परमेश्वराच्या तेजोमय पोलादी डोळ्यांना
मंदिरातून घंटानादाने दिलेली आर्त हाक
दिशादिशातून कोसळणाऱ्या धर्माला पाहिजे आहे आधार
आभाळपर्यंत पोचत नाही रे अजून कळस
नुकतेच पापाने भीत भीत उघडले आहेत डोळे
पश्चात्तापही कसा हरवून बसला धुक्याच्या पलीकडे
परमेश्वरा तुझ्या डोळ्यात नाही ना रे लपलेला ?
अशी भिरकाव तुझी पवित्र नजर......
की पश्चात्तापाला मिळेल भरभक्कम ताकद
प्रत्येक पापाला पुरून उरण्याइतकी
आणि उजळून निघतील खोल...खोल
मनाचे कानेकोपरे
नाही रे येणार खाली टाकलेल्या विश्वासाला मृत्यू !

* *

जन्मासंबंधी एक कविता : यशवंत मनोहर

अभागी भावनांना श्वासांचे मचूळ दाणे घालीत
अनिच्छेनेच आयुष्य ओढीत आणले.
अजून पोटाशी घेतले नाही कोणत्याही दिवसाने
फाटक्या वाटेवर एकाकीच आक्रंदन करतात माझी स्मरणे
दिसतील म्हणून थडगी उकरून साथीदारांचा
शोध घेतला
कुठेच कधी मन विसावून थांबले नाही
सांगेन म्हणतो ह्या जन्माने केलेली माझी फसवणूक
आणि तुमची भाषा मला येत नाही.

तुमच्या पूजनीय अशा सांस्कृतिक विकृतीची
शपथ घेऊन सांगतो
तत्त्वज्ञानाचे हवाले देऊन माणसांना खाणाऱ्या
तुमच्या जगात
मला नितांत चुकल्यासारखे वाटते
जीव लागत नाही दोस्तहो तुमच्या जमावात
भडभडून परक्यासारखे वाटते
अजून तुमच्या जगण्याची सवय मला होत नाही
सांगेन म्हणतो ह्या जन्माने केलेली माझी फसवणूक
आणि तुमची भाषा मला येत नाही.

विसाव्या शतकाच्या मध्यावर तुमच्यात आलो.
दीनवाणा झालो
जेव्हा दिसला धाप लागलेला म्हातारा सूर्य –
एका समग्र झाडांच्या गावात बिमार
तुम्ही घातलेल्या काटेरी कुंपणाने फाटून पडलेला वारा
तुम्ही भ्रांतीच्या लेकरांनी स्वतःवर लादून घेतलेले
अवकाशव्यापी धुके. सोयीने
तशी तुमच्या डोळ्यांभवतीची तटबंदी
तुमच्या आंधळ्या सुखांचा हलकल्लोळ...
मला द्यावेसे वाटले तेव्हा माझे निरर्थकत्व सुळी
जेव्हा मी गलबलून जाताना ऐकली–
तुमच्या वांझपणाने बिनदिक्कत चालविलेली–
विझल्या दिव्यांची उजळणी...
आणि माझे प्रारंभ मुके झाले.
थिजत चाललोय तुमच्या सर्वंकषत्वाचे केविलवाणे
ध्यान पाहून

तुमच्या वाटांवरती मला माझी जागा दिसलीच नाही
सांगेन म्हणतो ह्या जन्माने केलेली माझी फसवणूक
आणि तुमची भाषा मला येत नाही.

शतके तुडवीत तुम्ही वाहून आणलीत
अडीच हजार वर्षांपूर्वीच्या शब्दांची प्रेते. सादर.
त्या बाल उत्साहात जगत्या श्वासांचे उगम
तुम्हाला दिसलेच नाहीत.
मरणेच सिद्ध करीत येताना केवळ
तसे आदिअंती निर्मिलेत मृगजळाचे सोयीस्कर प्रदेशही,
तुम्ही फिरवून ठेवलेला हा विश्वपसारा,
तारका, झाडे, डोंगर, नद्या कुणीच माझ्याशी बोलत नाही
सांगेन म्हणतो ह्या जन्माने केलेली माझी फसवणूक
आणि तुमची भाषा मला येत नाही...

हाकांमधून रक्तच फुटत आले निरंतर
फक्त गुहांमधील काळोखच निनादत राहिला
तुमच्या अध्यात्माने भीतीचा गाळ थापला
माझ्या डोळ्यांवर
आणि स्वतःलाही मी पाहू शकलो नाही कधी.
आणि अध्यात्मासकट तुमच्या सर्वंकष सभ्यतेने
फसवीत फसवीत मला लोळागोळा केले.

जेव्हा दिसले मी प्रयत्ने संपविला जातोय
तुमच्या जमावात.
तेव्हा मी चिडलो स्वतःवर. तुम्हावर.
तुमच्यात मला आणून सोडलेल्या या माझ्या जन्मावर.
मतलबाच्या जत्रेत मला कुणीच माझे दिसत नाही
सांगेन म्हणतो. या जन्माने केलेली माझी फसवणूक
आणि तुमची भाषा मला येत नाही.

आता स्वतःच्याच श्वासांवर मी क्रूर सूड घेतोय
मेंदूमधल्या स्मशानात, काळातून, तुम्हातून
स्वतःला वजा करून घेतोय
हा वणवा हा स्वार्थ. हे मतलब. हे अघोर हेतु.
ही बेईमानी. हो पिळवणूक. ही तत्त्वज्ञाने.
हा सक्रीय दुस्वास. ही गळचेपी. ही नाकेबंदी.
हे खच्चीकरण. हे मृगजळ. ह्या भिंती. ह्या वृत्ती...
अस्तित्वाचा कापूस पिंजून काढणारी
ही एकेक क्रूर धनुकली...
दोस्त हो, इथे जीव लागत नाही.
इथे जीव जगत नाही......
सांगेन म्हटले होते ह्या जन्माने केलेली माझी फसवणूक
आणि तुमची भाषा मला आली नाही...

* *

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी विदर्भ साहित्य संघ, संपादक व सल्लागर मंडळ सहमत असतीलच असे नाही.

वि. सा. संघाच्या सभासदांना 'युगवाणी'चा अंक पाठविला जातो. ज्या महिन्यापासून सभासदत्व स्वीकारले जाईल त्या महिन्यापासून पुढील उरलेल्या आर्थिक वर्षाच्या काळात निघणारे अंक पाठविले जातील.

केवळ युगवाणीचे वर्गणीदारांकरिता वार्षिक वर्गणी १० रु. फक्त. एका अंकाची किंमत दीड रुपया.

तीन अल्पकथा

सुधाकर जोशी

गुलाम

उर्वरीत आयुष्य विकून मी एक पांढरा अबलख घोडा घेतला. त्यावर पै, पै जमवून विकत घेतलेला खोगीर चढवला आणि ऐटीत वर बसून टाच मारली.

डोळ्यात डोंगर, दऱ्या, नद्या, तलाव पार करायची धुंद होती. गर्वोन्मत्त विशाल वृक्षांना आसूड फडकवित नंतमस्तक करायचे होते. काळयाशार फत्तरावर स्वतःच्या विजिगीषू अस्तित्वाच्या मुद्रा ठायी ठायी उमटवून त्यांची प्रस्तर–मस्ती जिरवायची होती.

होते अनेक बेत.

पण टाच मारून घोडा उसळतो न उसळतो तोच, माझ्या गळयात दोर फेकून मलाच कुणी तरी अडविले.

ज्याला पैसे मोजले होते तो मला म्हणाला,

तू तर आपले आयुष्य मला विकलेस. तेव्हा तुला स्वतःच्या मनाप्रमाणे वागण्याची मुभा कशी ?

तू तर गुलाम आहेस आता.

गुलाम.

आरसा

त्या वृद्ध पुरुषाच्या चेहऱ्यावरील असंख्य सुरकुत्यात मी काही काळ विलक्षण गुंतून पडलो.

मोठ्या प्रयासाने त्या बाजूला सारून आत शिरलो तेव्हा काही दिसेचना. अंधारच अंधार. प्रवास सुरूच ठेवला.

मग थोडासा प्रकाशाचा स्पर्श. त्या प्रकाशात मला दिसलेत बँकेच्या काउन्टरवर पैसे काढायला थांबलेले सावटलेले चेहरे. प्रत्येकाच्या हातात गुळगुळीत टोकन्स.

जसजसा मी खोल गेलो तसतसा प्रकाश तीव्र होत गेला. सूर्यफळ तोंडाला लावून रसप्राशन करणाऱ्या अनेकांच्या ओळी. त्यात एक ओळख पटली.

तिथले दृश्य भलतेच विचित्र. एकीकडे चमचमणाऱ्या सूर्यफळांची रास व दुसरीकडे दोन तरुण, फळांच्या वरची खपली काढून लोकांचे हाती देत होते.

घ्या. घ्या. आणि मजा करा.

प्रत्येकाच्या हातात औट घटकेच्या सशक्त आणि बलवान आयुष्याचे रहस्य खेळत होते.

पुढल्या प्रवासात प्रकाश आणखी सौम्य झाला.

सौम्य धवल प्रकाशाच्या वर्तुळात मर्फीची मुलं अंगठे चोखीत उभी होती.
मी जेव्हा परत वर आलो तेव्हा फार उशीर झाला होता.
सुरकुत्या मिटून गेल्या होत्या आणि मी आतच अडकून पडलो.
आता नवीन सूर्य उगवेपर्यंत असेच सुरकुत्यांमागचे आयुष्य.

साधा प्रश्न (?)

आयुष्याची ऊवदार झूल नाईलाजाने फेकून द्यावी लागली त्यानंतरची गोष्ट.

मी असाच वस्त्रहीन, कुडकुडत चित्रगुप्ताच्या देवडीवर प्रश्नांची सरबत्ती झेलत उभा.

नाव ?

राघवेन्द्र प्रभाकर पणशीकर.

राहणार ?

१४८, शंकरनगर, नागपूर.

हलके फुलके प्रश्न. मी सहज उत्तरे दिलीत.

तुला अमेरिकेच्या व्हाईट हाऊसमध्ये कोण राहतं हे माहित आहे ?

होय. निक्सन. रिचर्ड निक्सन आणि त्यांचे कुटुंब. त्यापूर्वी श्री जॉन्सन...केनेडी...आयझेनहॉवर

साधूच्या हातातील माळेतील रुद्राक्षमणी जसे चटचट सरकतात तशी माझी उत्तरे सहजतेने बाहेर पडत होती.

आणि दहा डाउनिंग स्ट्रीटवर ? त्रिमूर्तीत कोण रहायचं ?

क्रेमलीनमध्ये ?

मी फटाफट उत्तरे देत होतो. कारण सर्व जगाचे ज्ञान माझे तोंडपाठ. मी भयंकर आनंदी. स्वर्गप्रवेशाची माझी मुलाखात फारच यशस्वी ठरत होती. माझ्या पीएच्. डी.ज, माझे प्रबंध, माझे विवेचन, माझे आकाशाएवढे विशाल ज्ञान काही काही वाया गेले नव्हते. सूर्याखालचा कोणताही प्रश्न अनुत्तरित राहू नये एवढी खबरदारी मी निश्चितच घेतली होती.

मी गालातच हसलो. देवडी पार केली की मग हसायचेच होते. मुलाखत संपली की काय म्हणून चित्रगुप्ताकडे रोखून पाहिले तो एक प्रश्न भिरभिरत आला.

आणि १४९, शंकरनगरमध्ये कोण राहतं ?

आणि मी विलक्षण गडबडलो.

दरवाजा फट्कन बंद झाला.

खरंच कोण राहतंय तिथे ?

॥ पु स्त के ॥

सीमावृक्ष

हरीहर चंद्रशेखर घोंगे

महाभारतातील व्यक्तिरेखांचा परिपोष करणाऱ्या अनेक वाङ्‌मयीन कलाकृतींची आता रेलचेल झालेली आहे. सीमावृक्ष त्याच पसाऱ्यात उगवून विस्तारलेली एक कलाकृती आहे. सीमावृक्षातील कथानकाचा नायक भीष्म हा आहे. डॉ. रा. शं. वाळिंबे ह्यांनी सीमावृक्षाचे बीजारोपण केलेले आहे.

सीमावृक्षाच्या निर्मितीशी एक ध्येय आहे. विशिष्ट वाचकवर्गासाठी त्याचे लेखन आहे. सीमावृक्ष ज्यांचे हाती पडणार आहे त्यांचे ठायी श्रद्धेपेक्षा विचारांचे मूल्य अधिक आहे. डॉ. वाळिंबे ह्यांनी सीमावृक्षात युगान्तातील संशोधनाला उत्तर दिले आहे. म्हणूनच महामहोपाध्यायांपासून तो धावळी नेसणाऱ्या म्हाताऱ्यापर्यंत जो 'भीष्म' परिचित आहे त्यापेक्षा अधिक सूज्ञ, आणि प्रौढ भीष्म सीमावृक्षातून प्रगट व्हावा हे अपेक्षित आहे. पण सीमावृक्षातील भीष्माचे चरित्र आणि चारित्र्य संशोधकाच्या लेखणीतून उतरलेले नसून एखाद्या कथेकऱ्याने कीर्तनात भीष्माची कथा सांगावी तशीच भूमिका लेखकाने घेतलेली आहे. थोडक्यात 'सीमावृक्ष' हे मराठी भाषेतील 'भीष्मपुराण' आहे. सीमावृक्षातील संशोधनात नवे गवसत नाही. जुनाच सोमरस जुन्या चषकातून वाचकांना पाजलेला आहे. 'महाभारतातील एक व्यक्तिरेखा' म्हणून भीष्माचे चरित्र वर्णन करून सांगण्यासाठी '.सीमावृक्षाची' निर्मिती असती तर कदाचित ह्या कलाकृतीच्या परीक्षणाचे निकष वेगळे ठरले असते. सीमावृक्षाची त्र्याणव पाने वाचल्यानंतर ह्या लेखनाचा प्रपंच ज्ञानदानाऐवजी दक्षिणेसाठी असावा असे जाणवू लागते.

सीमावृक्षाचे वाचन करताना एक विचार मनात उगवून जातो. हे सारे लेखन भीष्माविषयीच्या आदराने प्रेरित झालेले नसून डॉ. इरावती कर्वे ह्यांच्या युगान्ताविषयीच्या असूयेच्या बीजातून फोफावून आलेले आहे. असूयेचे हे बीज प्रस्तावनेत गोवलेले आहे (प्रस्तावना पहिला परिच्छेद) हा 'इरावती द्वेष' ठायी ठायी प्रगट होतो. डॉ. इरावती कर्वे ह्यांनी 'युगान्त' नावाच्या कलाकृतीत 'शेवटचा प्रयत्न' नावाच्या प्रकरणात भीष्माच्या त्यागमय जीवनाची फलश्रुती वर्णन केलेली आहे. भीष्माच्या प्रतिज्ञापालनात प्रवाहपतित्व होते. किंवा भीष्माच्या जीवनात पराक्रमाला कुठेही जागा नाही असे डॉ. इरावतींचे मत. स्वतंत्रपणे आपणाला प्रेय वाटणारी मते साधार प्रगट करण्याचा हक्क ह्या विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मान्य झालेला आहे. ह्या दृष्टीने भीष्माच्या चरित्राचे पवाडे सांगण्यास प्रत्येक भाटाच्या लेखणीचा हक्कही तेवढाच सुरक्षित आहे. पण संशोधकांना वेगळी भूमिका वठविणे आवश्यक असते. डॉ. वाळिंबे कीर्तनकार किंवा पुराणकथेकरी असते तर सीमावृक्षाचे कौतुक झाले असते. संशोधक म्हणून भीष्माच्या चारित्र्यातील विसंगती तपासून पाहाणे त्यांचे कर्तव्य ठरत होते. संशोधक म्हणून डॉ. वाळिंबे सीमावृक्षाच्या बुंध्यावरून घसरत घसरत शेवटी परंपरागत धुळीत येऊन पडले. डॉ. वाळिंबे भीष्माची अखेर वर्णन करताना लिहितात, 'सर्वांच्या कल्याणाची इच्छा व्यक्त करून तो सर्वांना कडकडून भेटला (पान ९२). . . . शरीरात कोंडून ठेवलेला त्याचा आत्मा त्याच्या मस्तकाचा भेद करून

वाहेर पडला .. आपल्या पुत्राला तिलांजली दिलेली पाहिल्यावर गंगामाता शोकविव्हल होऊन वाहेर पडली ... आणि वसूपासून आलेला भीष्म वसूकडेच परत गेला' (पान ९३). शरशय्येवर मृत्यूची वाट वघणारा जर्जर भीष्म खरेच कडकडून भेटू शकेल काय? नद्यांपासून संतती होणे शक्य आहे काय? मृत्यूनंतर मुलगा वापाच्या ठायी विलीन होतो काय? जेथे काव्य आहे तेथे काहीही शक्य आहे. सीमावृक्ष ही 'अरेवियन नाईटस्'सारखी मनोरंजक प्रदीर्घ कथा नव्हे; ते एका संशोधनाला दिलेले उत्तर आहे. प्राचीन वाङमयाचे इतिहास म्हणून ज्यावेळी परीक्षण करावे लागते त्या वेळी काही पथ्ये पाळावी लागतात. सीमावृक्षात तशा पथ्यांचा पूर्ण अभाव आहे. भीष्माचे पूर्वीचे काळात परशुरामाचे जीवन समाप्त झाले. दोघांच्या काळात कित्येक शतकांचे अंतर आहे. कारण परशुरामाचा इतिहास रामाचे आधीच घडला आहे. रामकथा (रामायण महाकाव्य नव्हे) भीष्माचे अगोदरचे काळात घडलेली आहे. असे असता भीष्माचे आणि परशुरामाचे जर युद्ध होऊ शकते तर एकापेक्षा अनेक परशुराम होऊन गेलेत की काय? वा भीष्म दोन होते? वा व्यास नावाच्या कवीने कल्पना म्हणून हे लिहून ठेवले? वा भार्गवाच्या पराक्रमाला दुय्यम स्थान देण्याच्या उद्देशाने महाभारतात परशुरामाला आणून ठेवले? असे एक ना दोन, अनेक प्रश्न समोर उभे राहतात. डॉ. इरावती कर्वेंचे त्यावर उत्तर असे आहे की हे युद्धच मुळात काल्पनिक आहे. डॉ. वाळिंवे ह्या प्रश्नांची तर्कशुद्ध उत्तरे देत नाहीत.

डॉ. वाळिंबे लिहितात, 'परशुराम आपला गुरू आहे हे माहित असताही भीष्म आपल्या क्षात्रधर्माची त्याला स्पष्ट शब्दात जाणीव करून देतो. आणि याच दारुण क्षात्रधर्माचे पालन पुढे सर्व हयातभर त्याने केले' (सीमावृक्ष, पान ९). भीष्म आणि परशुरामाला एकाच कालखंडात गोवून टाकण्याचे स्वातंत्र्य डॉ. वाळिंवेने घेतले आहे. पण भीष्माचे संबंधी स्वतंत्र विचार करावयाचा झाल्यास त्याच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानासंबंधी अनेक प्रश्न उपस्थित होतात.

भीष्म हा क्षात्रधर्माचा पालनकर्ता आहे की परिचर वसूच्या धर्माचा पालनकर्ता आहे? वसूंची जीवननिष्ठा वा तत्त्वज्ञान क्षात्रमूल्यांपेक्षा वेगळे होते काय? की क्षात्रधर्माशी सुसंगत असे? त्याला वसूंचा पुत्र वा अंश असे का म्हणण्यात आले? शिखंडी पूर्वायुष्यात स्त्री होता म्हणून अवध्य होता वा शिखंडी ही एक परंपरा होती? शिखंडी हे अर्धनारीनटेश्वराला शारीरिक व्यंगामुळे वा क्लैव्यामुळे दिलेले नाव होते? वा लांव शिखा ठेवण्याची प्रथा असलेला तो एक संप्रदाय होता? वसूंचा धर्म अहिंसावादी होता काय? महाभारताचे वाचनातून ह्या प्रश्नांची उत्तरे सापडतात. ह्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी पुराणांचाही आधार घ्यावा लागतो. पण डॉ. रा. शं. वाळिंबे ह्यांनी ह्या प्रश्नांच्या संदर्भातून भीष्माच्या चरित्राचा विचार केलाच नाही. ज्या भीष्माचा 'क्षात्रधर्म' नव्हताच त्या 'क्षात्रधर्मा'ची भीष्माच्या नावाने प्रशंसा करण्यात त्यांनी सीमावृक्षातील परिच्छेद लिहून काढले. क्षात्रधर्म मनूच्या व इक्ष्वाकूच्या कुळात जन्माला आला. 'औत्तमाचे पुत्र क्षात्रधर्माचे प्रवर्तक आहेत' हे पुराणातील विधान डॉ. वाळिंवेंच्या लक्षात आलेले नाही. भीष्माचा आणि मानव परंपरेचा सुतराम संवंध नाही. भीष्म क्षत्रिय नसावाच.

धर्म, नीती आणि सत्य ह्यांवर आधारलेली मूल्ये चिरंतन स्वरूपाची नसून सापेक्ष असतात. ज्यांनी विशिष्ट मूल्यांना चिरंतन स्वरूप दिले असते त्यांना काळावरोवर वदलण्याचे सामर्थ्य नसते; इच्छा नसते. ज्या मूल्यांवर पोट भरते, आदर प्राप्त होतो, वौद्धिक पिळवणूक शक्य होते ती मूल्ये टाकून दुसरी स्वीकारण्यासाठी मानव स्वार्थातीत व धर्मातीत असावा लागतो. भारतातील श्रद्धाळू विद्वानांचे वावतीत हा स्वार्थ नेहमीच उफाळून आलेला आहे. कौरव पांडवांचा इतिहास सांगताना परंपरेच्या पोटभरू दलालांनी ऊर वडवून आपली विसंगत मूल्ये श्रद्धेच्या वाजारात शतपटीने वाढवून घेतलेली आहेत. महाभारत अशाच विसंगत मूल्यांनी भरलेला ग्रंथ आहे. तिथे ज्यांच्या चारित्र्याचे कौतुक झाले आहे आणि जी व्यक्तिमत्वे पूजनीय ठरलेली आहेत ती अतिशय परावलंवी, दुवळी, स्वार्थी, व्यभिचारी, सत्याचा उद्घोष करून सत्यालाच पायदळी तुडविणारी अशी आहेत. त्या युगात जेथे कौरवांकडे अकरा अक्षौहिणी सेना जमते त्यावरून कौरवांचा पक्ष प्रामाणिक आहे असे म्हणता येते. कौरवांना साथ देणाऱ्या राष्ट्रांना आधुनिक सत्ता-संतुलनाची राजनीती राववायची नसल्यामुळे, आधुनिक विस्तारवादी राष्ट्रांसारखी, वा विस्तारवादी राष्ट्रांच्या पित्तूरारखी ती

नतद्रष्ट राष्ट्रे होती असेही म्हणता येत नाही. महाभारताची कथा विस्कळित आहे. त्याच्या आवृत्याही अनेक आहेत. 'भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंडळा'ने महाभारताची सर्वमान्य होणारी प्रत निर्माण करून देण्याचा प्रयत्न केला आहे. पण ह्या प्रतीतून महाभारतातील सर्वमान्य होणारी कथा प्रगट होत नाही. अश्वलायन गृह्यसूत्राचे काळात जे महाभारत उपलब्ध होते तेच भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंडळाला निरनिराळ्या प्रतींत उपलब्ध झाले असावे. पण अश्वलायन गृह्यसूत्रातील महाभारतातील कथा व व्यासाने सांगितलेली जय नावाची गाथा ह्यात किती विसंगती आहे ते शोधण्याचा प्रयत्न प्रतिगामी संशोधकांना अशक्य आहे. आनंद साधले ह्यांनी तसा प्रयत्न करून युधिष्ठिरावरचा मुखवटा काढून टाकला होता. ('हा जय नावाचा इतिहास आहे.'). सीमावृक्षात ज्या भीष्माचा कैवार घेण्यात आला त्याची सारी कृत्ये प्रशंसनीय आहेत काय ? शाल्वाच्या आणि अम्बेच्या प्रकरणात त्याच्या निष्ठुरपणाचा कहर झालेला आहे. कौरवांच्या आणि पांडवांच्या राज्यावर आपली अधिसत्ता अबाधितपणे राहावी ह्यासाठी भीष्माचा खटाटोप आहे. विचित्रवीर्याच्या निपुत्रिक भार्यांवर, सत्यवतीचा 'कानीन पुत्र' व्यास ह्याने केलेला बलात्कार त्याने मान्य करून घेतलेला आहे. ह्या बलात्कारातून झालेली संतती म्हणजे धृतराष्ट्र व पंडु हे दोन दुर्दैवी जीव होत. नियोगाच्या नियमानुसार ही संतती पती अथवा पत्नी ह्यांचे संमतीतून झालेली नाहीच, पण ह्यांच्या रक्तात कुरू वंशाचे रक्तही नाही, त्यामुळे कौरवांचे राज्यावर शंतनूने भीष्माला प्रदान केलेला अधिकार कायद्याचे वा तत्कालीन धर्माचे तत्वांनी सुरक्षित राहतो. नियोगाच्या नियमांनी विचार केला तर पांडवांचा कुरू राज्यावर सुतराम अधिकार प्रस्थापित होऊ शकत नाही. वाटणीचा प्रश्नही निर्माण होत नाही. वृष्णीचा नेता आणि कुंतीचा भाचा कृष्ण ह्याचा संबंध येण्यापूर्वी पंडूची पोरे कौरवांचे आश्रित म्हणून वावरतात. राज्याचे वारस म्हणून त्यांचेकडे कोणीच पाहिलेले नाही. महाभारताचे युद्ध जे घडून आले ते कौरव पांडवांच्या संघर्षातून नसून, मद्रांचा शकुनी आणि यादवांचा कृष्ण ह्यांच्या सत्तासंघर्षातून घडून आलेले आहे. भीष्माच्या वृद्धपणामुळे, गांधारीचा बंधू शकुनी ह्याचे वजन कौरवांच्या दरबारात वाढलेले असते. आणि यादवांच्या अंतर्गत वेबनावात आपली सत्ता कायम राहावी ह्यासाठी पांडवांना हाताशी धरून कृष्णाने 'निक्सनची भूमिका' वठविलेली असते. ह्या संघर्षात भीष्म कृष्णाला अनुकूल आहे. राजसूय यज्ञाचे वेळी भीष्माने यादवांचा नेता कृष्ण ह्याचा अनुनय करण्याचे तत्त्वशून्य लोचट धोरण स्वीकारलेले होते हे लक्षात घेतले म्हणजे वर्तमान काळच्या चीनच्या धोरणाची आठवण होते.

सीमावृक्षात भीष्माला क्षत्रिय म्हणून गौरविण्यात आलेले आहे. भीष्माला दुर्योधनाने सेनापती पदाची वस्त्रे का दिलीत ह्याची नीट मीमांसा डॉ. वाळिंबे ह्यांनी 'सीमावृक्षात' केलेली नाही. डॉ. इरावती कर्वे युगान्तात म्हणतात की अंबेच्या बाबतीत परशुरामाशी झालेले युद्ध...हे कल्पित युद्ध सोडल्यास भीष्म लढल्याचा पुरावा नाही. त्याने कोणताही दिग्विजय केलेला नाही. अशा ह्या भीष्माने म्हातारपणी सेनापतीपदाचा हव्यास का धरला ? (युगान्त, पान ३७) दहा दिवस तो लुटूपुटीची लढाई खेळला (युगान्त पान ४१). सीमावृक्षाचा जो व्याप वाढला तो डॉ. इरावतींच्या संशोधनावर त्याचा पाचोळा साचावा ह्यासाठीच कारण सीमावृक्षातील बराचसा भाग भीष्माच्या पौरुषत्वाचे गोडवे गाण्यासाठी जो कारणी लागला आहे तेथे भीष्मप्रेमाचे शेजारी इरावतीद्वेषही आहे.

सीमावृक्षातील अवतरणे जर तपासून पाहिलीत तर तेथे देखील डॉ. इरावती कर्वे ह्यांनी सादर केलेल्या भीष्माच्या प्रवाहपतित्वाचे भरपूर पुरावे प्राप्त होतात. 'जबाबदार पुरुषाने स्पष्ट बोललेच पाहिजे' असे ज्या वेळी भीष्म दुर्योधनाला सांगतो त्या वेळी द्रौपदीवस्त्रहरणाचे प्रसंगी आणि द्यूताचे प्रसंगी भीष्म स्पष्ट बोलला नाही, त्याचे शल्य डॉ. वाळिंबेंच्या मनाला बोचते, व ते खिन्न होतात (सीमावृक्ष, पान ३५–३६). पण भीष्माचे जीवन अशाच विसंगतींनी भरलेले आहे. कौरवांचे अन्न खाऊन तो सदैव पांडवांची प्रशंसा करतो ही त्याच्या जीवनातील अक्षम्य विसंगती आहे. बलराम आणि विदुर ह्यांच्या मार्गांचे अनुसरण करून तीर्थक्षेत्री निघून जाण्याचे ऐवजी तो सेनापतीपदाला चिकटून राहातो व संहार डोळ्यादेखत पाहातो ही त्याच्या जीवनातील स्वार्थमूलक विसंगती आहे.

ह्या विसंगतीची अधूनमधून डॉ. वाळिंबे ह्यांनी दखल घेतली आहे. पण मुळातच शांतिप्रिय अशा त्यांच्या

लेखणीला भीष्माच्या ह्या विसंगतीचा उकिरडा साफ करणे पसंत नाही म्हणून आपली सात्त्विक नाराजी व्यक्त करून ते डॉ. इरावती कर्वे ह्यांचेवर मात्र रागावतात.

डॉ. वाळिंबे म्हणतात, गोग्रहणात भीष्माने अर्जुनाशी लढताना पराक्रमाची शर्थ केली. तिच्याकडे डॉ. इरावती कर्वेंचे लक्ष गेलेले दिसत नाही. (सीमावृक्ष पान ४०) ह्या युद्धाचा निर्देश युगान्तात नाही हे खरे आहे. पण ह्या युद्धात भीष्माने जो पराक्रम गाजविला त्याचे वर्णन वाचले तर प्राचीन भारतीय शिलालेखातून यःकश्चित प्रदेशाचा सेनापती जसा सप्तखंड पृथ्वीचा विजेता म्हणून गौरविलेला असतो आणि त्याच कालखंडातील वेगळ्या प्रदेशाचा राजा तितकाच पराक्रमी असतो हे लक्षात येते. म्हणजे युद्धाचे वर्णन करण्यासाठी ठराविक पद्धतीची वाक्यरचना ठरून गेलेली होती. स्त्रीसौंदर्य, पुरुषसौंदर्य, निसर्गसौंदर्य, पराक्रमसौंदर्य, दानसौंदर्य वर्णन करण्यासाठी प्राचीन कवींची वाङ्मयीन विशेषणांची जणू टाकसाळच त्याकाळी अशा मुद्रांना घडविण्यात तत्पर असे. तसा पराक्रम प्रत्यक्षात घडविण्याची आवश्यकता होतीच असे समजण्याची गरज नाही. ठाणेश्वराचा राजा हर्षवर्धन हा तर अशा विशेषणांनीच 'हर्षचरितसारात' भीष्मापेक्षाही पराक्रमी भासतो. पण त्याने प्रत्येक आघाडीवर हार पत्करलेली आहे असे त्या काळातील शिलालेख सांगतात. विराट गोग्रहणप्रसंगी भीष्म रथात मूर्च्छित पडला होता आणि त्याचा रथ रणांगणातून सारथ्याला काढून घ्यावा लागला (महाभारताचे भाषांतर, न. र. फाटक), हे डॉ. वाळिंबेंनी वाचले नसावे. बिनबुडाची विधाने करू नयेत अशी जी समज डॉक्टरसाहेबांनी इरावती कर्वे ह्यांना वडिलकीच्या नात्याने दिलेली आहे (सीमावृक्ष, पान ४०) त्याचे आधी स्वयंप्रज्ञेच्या प्रकाशात महाभारताचे समग्र वाचन करणेही डॉक्टरसाहेबांना आवश्यक ठरते असे वाटते. " मूळ महाभारत काळजीपूर्वक वाचलेले नसले म्हणजे असे चमत्कार घडून येतात. आणि विशेष म्हणजे ते 'प्रतिगामी' व 'परंपरावादी' संशोधनाच्या सदरात नोंदले जातात. "

कौरवांच्या मिठावर जगून, कृष्णाचा आणि पर्यायाने पांडवांचा अनुनय करणाऱ्या भीष्माची भूमिका राजकारणात शोभून दिसणारी असली तरी मानवतेच्या मूल्यातून मात्र ती तत्त्वशून्य आहे. भीष्माच्या ह्या तत्त्वशून्य भूमिकेचा गौरव करणारी 'सीमावृक्ष' ही एक लहानशी गाथा आहे.

भीष्माने आजन्म ब्रह्मचर्याचे जे व्रत घेतले आहे ते शिशुपाल म्हणतो त्याप्रमाणे क्लैव्य लपविण्यासाठी घेतले की वसूंच्या परंपरेत विवाहसंस्थाच मान्य नव्हती ? भीष्माची माता आठ वसूंची रखेली होती हे लक्षात घेतले व भीष्म अष्ट वसूंपैकी एकाच्या अंशापासून जन्माला आला होता हे लक्षात घेतले म्हणजे भीष्माची माता गंगा आणि पांडवांची माता कुंती एकाच परंपरेची अपत्ये होती हे लक्षात येईल. गंगेचे सात पुत्र मेल्यानंतर भीष्म जसा शंतनूच्या गादीचा वारस ठरला तसेच देवकीची सात अपत्ये मेल्यानंतर आठवा कृष्ण वसुदेवाचा वारस ठरला. भीष्माची मातृपरंपरा आणि कृष्णाची मातृपरंपरा कुठे तरी मिळती जुळती आहे. ह्याच परंपरेतून वसूंचा पर्यायाने भीष्माचा धर्म, कृष्ण आणि पांडवांशी साम्य ठेवतो असे दिसते. पांडवांचा नेता युधिष्ठिर ह्याच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानात अहिंसा आणि 'सत्य' ह्यांचे जसे अनन्यसाधारण महत्त्व आहे, तसेच अहिंसा आणि सत्य ह्यांचे महत्त्व भीष्माचे जीवनात दिसून येते. सीमावृक्षात भीष्मावर क्षात्रधर्माची आणि पौरुषत्वाची वस्त्रे चढविली आहेत ती डॉ. वाळिंबे ह्यांनी स्वतः विणली असावीत (सीमावृक्ष, पान ६४). (सत्य ह्याचा अर्थ 'Truth' नसून तो एक धर्म होता).

सीमावृक्षात पान ६४ वर भीष्माचे मुखात जो उपदेश दिलेला आहे तो उपदेश भीष्माने जमलेल्या क्षत्रियांना केलेला आहे. 'इदं वः क्षत्रिया द्वारं स्वर्गयापावृतं महत्' हे तो क्षत्रियांना उद्देशून म्हणतो. पण स्वर्गाचे द्वार उघडून देणाऱ्या युद्धात धारातीर्थी पतन झाल्यानंतर भीष्म स्वर्गवासी होत नसून तो वसूंत विलीन होतो. "तोच क्षात्रधर्म भीष्माचे प्रत्यक्ष कृतीत उत्कटतेने प्रगट झाला आहे हे 'पुरोगामी' संशोधकांनी कृपा करून नित्य चित्तात बाळगावे आणि भीष्म 'दहा दिवस . . . लुटूपुटीची लढाई खेळला' अशासारखी बालिश विधाने करण्यात पराक्रम मानू नये." असा टोमणा ज्या वेळी डॉ. वाळिंबे मारतात, त्या वेळी पुरोगामी संशोधकांना डॉ. वाळिंबेंचा 'वृद्धसुलभ हट्ट' लक्षात घेणे आवश्यक असते.

सीमावृक्षात भीष्माच्या भूमिकेच्या संदर्भात जी अवतरणे उद्धृत केलेली आहेत ती तपासून पाहणे आव-

श्यक आहे. विराटगोग्रहणप्रसंगी युद्ध न करण्याची समज त्याने दुर्योधनाला दिलेली आहे. ह्या समस्त प्रकरणात डॉ. वाळिंबे म्हणतात तसा भीष्माचा उग्र क्षात्रधर्म प्रगट होत नाही. भीष्माचे खरे प्रेम पांडवांवर असून तो त्यांचा नित्य पक्षपात करतो असे दुर्योधनाने बोलावयाचे (सीमावृक्ष, पान ४१). हा 'हं नकुळात जन्मलेला सूतपुत्र कर्ण आहे.' (पान ४२) असा कर्णावर आरोप करताना आपण स्वत: आठ बापांपासून जन्माला आलो आहोत हे तो विसरला. कर्णाचा तेजोभंग करण्यासाठी त्याच्या कुलशीलाचा भीष्माने सदैव उच्चार केला आहे. पण शिशुपालाने भीष्माला नपुंसक म्हटले होते तसे उत्तर कर्णाने भीष्माला कधीच दिले नाही. भीष्माच्या पराक्रमावर विसंबून दुर्योधनाने युद्धाचा विचार केलेला नव्हता (पान ४२ शेवटची ओळ). कुरुकुळाचा विनाश समीप आल्यामुळे तुझी बुद्धी चळलेली दिसते (पान ४९) असे विदुर म्हणतो. भीष्म, द्रोण आणि कृप इत्यादी वीर सारे सामर्थ्य पणाला लावून तुझ्यासाठी लढतील अशी तुझी समजूत साफ चुकीची आहे असे गांधारी दुर्योधनाला सांगते (पान ४९). धनाने माझा पाडाव केला आहे असे धर्मराजाला भीष्म सांगतो (पान ५१). तुझ्या अन्नावर मी जगलो त्याचे ऋण मी लढाईत प्राण सोडून 'पराक्रम गाजवून नव्हे) फेडणार आहे असे भीष्म दुर्योधनाला सांगतो (पान ५१).

भीष्माला सेनापती पदाचा मान का दिला? ह्याचे उत्तर डॉ. कर्वे आणि डॉ. वाळिंबे दोघेही देत नाहीत. भीष्म हा कौरव कुळातील सत्ताधारी, गंगेच्या मार्फत वसूंनी कुरूंचे राजकारण सांभाळण्यासाठी पाठविलेला हस्तक होता. कर्णाविषयी तत्कालीन राज्यसत्तांत अनादर होता. भीष्मासारखा वृद्ध नेता जोपर्यंत कौरवांना अनुकूल आहे तोपर्यंतच प्रतिष्ठित राजसत्ता दुर्योधनासाठी लढण्यास तत्पर होतील हे दुर्योधनाने ओळखले होते व म्हणून त्याने भीष्मालाच नेतृत्वाची गळ घातली. भीष्माचे प्रत्यक्ष नेतृत्व दुर्योधनाला अभिप्रेत नसावे. पण पांडवांना अनुकूल असणाऱ्या भीष्माने हे नेतृत्व स्वीकारले—शांती आणि अहिंसा हे तत्त्वज्ञान आचारात प्रेय असले तरी संघर्षाचे काळात ते फारसे टिकाव धरत नसते. भीष्माची राजनीती 'नॉन अलायनमेंटची' होती. सबलतेच्या व शक्तीच्या पार्श्वभूमीवरच अशी राजनीती शोभून दिसते. भीष्म शक्तिवान नव्हता. त्याची शांतिप्रियता सबलाची शांतिप्रियता नसून यादवांच्या अनुनयाच्या धोरणातून, सत्तास्थानावर चिकटून राहण्याच्या स्वार्थी मनोवृत्तीतून, तत्त्वशून्य राजकारणातून, वृद्धत्वाच्या असहायतेतून, क्षात्रहीन पौरुषत्वहीन दुर्बलतेतून; दोगलेपणातून निर्माण झालेली होती. सीमावृक्षात वर्णन केलेल्या भीष्माची भूमिका तपासून बघता डॉ. कर्वे म्हणतात ते बरोबर होते असेच दिसते.

कर्ण दुर्योधनाला म्हणतो, 'तू ह्या नतद्रष्ट भीष्माला सोडून दे' (पान ६०). भीष्म धर्माला सांगतो की माझा शब्द त्यांनी पकडून घेतला म्हणून मी त्यांचेतर्फे उभा आहे व एखाद्या लाचाराप्रमाणे झालो आहे. त्यावर धर्म म्हणतो, 'आपण शब्दात गुंतले आहात तर त्यांचेकडून लढा पण माझे कल्याण व्हावे असा मंत्र द्या.' युद्ध प्रारंभ होताच भीष्म आघाडीवर उभा राहिला (पान ६४). अर्जुनाचा वध करणे हे खरे निकडीचे आहे अशी दुर्योधनाची टोचणी लागताच तुझ्या क्षात्रधर्माचा धिक्कार असो असे म्हणून अर्जुनावर चाल करून गेला (पान ६५). फलित काहीच नसते. कारण पुढे दुर्योधन म्हणतो, 'तुम्ही अंग चोरून लढता आहात म्हणून पांडवांची सरशी झाली' (पान ६७). त्यावर भीष्म म्हणतात, 'राजा पांडवांबरोबर तह कर' (पान ६७). भीष्माच्या एकूण वृत्तीविषयी कौरवांत इतका तिटकारा आहे की कर्ण सांगतो, 'दुर्योधना आताचे आता भीष्माच्या शिबिरात जा आणि त्याला शस्त्र खाली ठेवायला सांग' (पान ७९). ही डॉ. वाळिंब्यांनी उद्धृत केलेली अवतरणे काय सांगतात? भीष्माची कृती क्षात्रधर्माशी विसंगत आहे.

शाल्वाची प्रेयसी अम्बा हिचे प्रकरणात भीष्माची निष्क्रियता आणि द्रौपदीच्या वस्त्रहरणाच्या प्रसंगी त्याचे निष्ठुर मौन, विचित्रवीर्याच्या राण्यांवर व्यासाकरवी होणारा बलात्कार सहन करून घेण्याची त्याची वृत्ती, महाभारतीय युद्धात कृष्णाचा व पांडवांचा सदैव अनुनय करणारी लाचारी हे त्याच्या वृत्तीतील दोष जर लक्षात घेतले तर सीमावृक्षातील हा भीष्म, हा कौरवांच्या राजसीमेवरील सीमावृक्ष नसून, कौरवांचा राजप्रासाद पोखरून टाकणारा, सीमेवरच फोफावून आलेला निवडुंग आहे. तो भावनाशून्य आहे. अन्यथा, अम्बेचा घात स्वत:च्या भावनाशून्य ढोबळ भूमिकेतून झालेला आहे हे लक्षात आल्यानंतर परशुरामाला

(काल्पनिक) पराभूत करणारा भीष्म, शाल्वाच्या विरोधात युद्ध करण्यास उभा ठाकला असता; आणि पराभूत शाल्वाला अम्बेचे पाणिग्रहण करण्यास त्याने भाग पाडले असते तर अम्बेचे प्रकरण 'बांगला देशातील युवतीं 'सारखे झाले नसते. पण अम्बा निर्दोष आहे व निरपराध आहे हे सांगण्यासाठी तो शाल्वाकडेही गेलेला नाही. असे आहे भीष्माचे चरित्र आणि चारित्र्य. ज्याचा कैवार सीमावृक्षात डॉ. वाळिंबे ह्यांनी घेतलेला आहे, त्याच्या संपूर्ण जीवनात भावनेला थारा नाही. आंधळ्या धृतराष्ट्रासाठी त्याने गांधारीला मद्रांपासून विकत घेतले आहे. मानवी मूल्यांना त्याचे जीवनात स्थान नाही. द्रौपदीची विटंबना भर दरबारात त्याने होऊ दिलेली आहे. स्त्रीजीवनाविषयी व स्त्रीसमस्यांविषयी तो अतिशय उदासीन आहे. राजसूय यज्ञाचे प्रसंगी त्याने कृष्णाचा अनुनय केला आहे. कृष्णाच्या कृपाछत्राखाली पांडवांच्या राज्याचेही स्वामित्व आपलेकडे राहावे हा एक स्वार्थ त्यांच्या सुप्त महत्त्वाकांक्षेत रुजलेला आहे. भारतीय युद्धात तो मनापासून लढत नाही, कारण कृष्णाच्या कृपाछत्राखाली असलेल्या पांडवांना तो अंतरातून अनुकूल आहे. वृद्ध आणि गलितगात्र शंतनूला सत्यवतीपासून अपत्य होणार नाही असे भविष्य लक्षात घेऊनच त्याने कौरवांच्या राजसिंहासनावरील आपला हक्क नाकारला. गंगेपासून आठ अपत्ये झाल्यानंतर व भीष्म वयात आल्यानंतर शंतनूने सत्यवतीशी विवाह केलेला आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. विवाहसंस्था भीष्माला अभिप्रेत नसावी म्हणूनच आजन्म ब्रह्मचर्याची त्याने प्रतिज्ञा केली. 'पुं' नामक नरकापासून तारण करणाऱ्या पुत्रासाठी धडपडणारी महाभारतातील दुबळी व्यक्तिमत्वे लक्षात घेतली तर महाभारतकाळी 'पितृॠण' फेडण्यासाठी पुत्रप्राप्ती धर्माचे दृष्टीने आवश्यक असता भीष्म निपुत्रिक राहतो ह्यातच त्याची परंपरा महाभारतातील क्षात्रधर्म परंपरेशी पूर्णतः विसंगत आहे अथवा शिशुपाल म्हणतो त्याप्रमाणे तो देखील क्लैब्यतेचा बळी असावा. – सीमावृक्षात ह्या साऱ्या समस्यांना बगल दिलेली आहे. डॉ. इरावती कर्वेंचे 'इंटरप्रिटेशन' त्यांना मान्य नाही. पण त्यांचे स्वतःचे 'इंटरप्रिटेशन' देखील अत्यल्प आहे.

भीष्मा–द्रोणासारख्या, पांडवांसारख्या आदर्शांनी ही परंपरा दुबळी करून टाकलेली होती. तेच दुबळेपण, जे कर्मठपणाच्या निब्बर मनोवृत्तीत जन्माला येणे अपरिहार्य असते 'सीमावृक्षा 'त फुलून दिसते. पुरोगामित्व आणि प्रतिगामित्व हा वाद सीमावृक्षात असावा. डॉ. वाळिंबेंची वृत्ती पुरोगामी नसली तरी ती निःपक्ष असावी असेही वाटत नाही. सीमावृक्षातील भीष्म त्यांच्या प्रतिगामी विचाराच्या बीजाचे रोपटे आहे. जेव्हा श्रद्धेची झींग येते त्यावेळी कुंतीचे सारे दोषही पवित्र वाटू लागतात. भावांच्या रक्तरंजित सिंहासनावर आरूढ होणाऱ्या धर्मराजाला, तू भावांचा बळी घेतला आहेस असे सत्य सांगणाऱ्या ब्राह्मणाचा चार्वाक म्हणन मुडदा पडतो. आमच्या प्राचीन वाङ्मयीन कृतींचे जर परीक्षण केले तर तेथे cause आणि effect ह्यांचा अन्योन्य संबंध कुठेच नसतो. गंगा नदीतून भीष्माचा जन्म होऊ शकतो. कार्यकारण संबंधाकडे दुर्लक्ष केले असल्यामुळे व श्रुतिप्रामाण्य स्वीकारल्यामुळे किंवा आप्तवाक्य प्रामाण्याच्या आधारे भारतीय परंपरेतील साऱ्या समस्यांना उत्तरे देण्याची प्रक्रिया पोसून ठेवली गेल्यामुळे ही परंपरा आणि ह्या परंपरेला पूजनीय असणारी व्यक्तिमत्वे कालबाह्य आणि कालविसंगत ठरतात. सीमावृक्षासारखे वृक्ष विचारांच्या सीमारेखांवर उभे आहेत तोपर्यंत भारतीयांच्या विचारांच्या सीमांना कुंपण घातले जाणार हे निश्चित. भारतातील जातीय संघर्ष, पंथभेद, ह्यांतील विचारांना खतपाणी देण्याचे कार्य ह्या देशात निर्माण झालेल्या इतिहास व पुराण लेखकांनी, धर्मशास्त्रकारांनी केलेले आहे हे लक्षात घेतले म्हणजे पुरोगामित्वावर आरोप करण्याच्या नादात सीमावृक्षाच्या सावलीत प्रतिगामित्व जपून ठेवणारी मनोवृत्ती ठाण माडून बसलेली नाही काय ?

['सीमावृक्ष '–डॉ. रा. शं. वाळिंबे, सुविचार प्रकाशन, पुणे–नागपूर, किंमत ६ रुपये, पृष्ठे ९३.]

भागवतोत्तम एकनाथ

मधुकर रामदास जोशी

पुण्यतोया गोदावरी काठावर महाराष्ट्राचे विद्या-केंद्र पैठणनगर वसलेले आहे. त्या नगरातील संतमंडळी सदा सावधान असत व त्यांना ज्ञानकथा मनापासून आवडत असे. सुदैवाने एकनाथासारखा रसाळ वक्ता त्यांना लाभला. एकदा त्यांनी एकनाथाचा गौरव करून त्याला सांगितले की, "हे एकनाथा, तुझ्या मनात आमचे मन घातले आहे व तुझ्या शब्दात आमचे अनुसंधान आहे." पैठणस्थ श्रोत्यांना याची यथार्थ जाणीव होती की, एकनाथ केवळ रसाळ वक्ता आहे असे नव्हे तर, त्यांना जनार्दन गुरूकडून भागवत पुराणाचे रहस्यही ज्ञात झाले आहे. चतु:श्लोकी व एकादशस्कंध भागवता-वरील एकाकार नावाची टीका जनार्दनांच्या आज्ञेवरूनच एकनाथांनी रचली. भागवतटीका एका जनार्दनाची वाङ्मयमूर्ती आहे. एकनाथांच्या परिणत व ऋतुंभरा प्रज्ञेचे अभिजात दर्शन ह्या रसाळ टीकेत दिसते. भागवत एकाकार टीकेचे यथार्थ विवेचन व एकनाथांच्या विचार-विश्वाच्या मूलगामी भूमिकेचे विवरण, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध पंडित व संतवाङ्मयाचे साक्षेपी अभ्यासक व महापंडित डॉ. शं. दा. पेंडसे यांनी केले आहे. ग्रंथाचे नाव भागवतोत्तम संत एकनाथ असे आहे. यामधील भागवतोत्तम पद श्लिष्ट दिसते. ग्रंथात एकूण अकरा प्रकरणे आहेत. प्रारंभी प्रास्ताविक आहे. चतु:श्लोकी भागवत एकादशस्कंधटीका व अभंग या तीन वाङ्मय-कृतींच्या आधारे लेखकाने विवेचन केलेले आहे. प्रास्ता-विक व प्रकरण एक मध्ये लेखकाच्या भूमिकेची जाणीव होते. चतु:श्लोकी भागवताचे विवेचन करून तत्त्व-ज्ञानातील अन्वय–व्यतिरेक विवेचनाने एकनाथांनी जे तात्त्विक विवेचन मांडले त्याचे महत्त्व पटवून दिले आहे. अन्वय–व्यतिरेक विवेचन पद्धतीची नीट ओळख न करून घेता काही अभ्यासक विचित्र व वस्तुस्थितीशी विसंगत विधाने कशी करतात हे लेखकाने उत्तमप्रकारे दाखवून दिले आहे. प्राचीन मराठी वाङ्मयाच्या अध्य-यनार्थ शास्त्रशुद्ध पद्धतीने तत्त्वज्ञानाचा अभ्यास फार आवश्यक आहे. ह्या महत्त्वाच्या मुद्याकडे डॉक्टर-साहेबांनी अभ्यासकांचे लक्ष वेधले आहे.

दत्तात्रेय शिष्य कथन । करिता जनार्दन आठवला

एकाकार टीकेत आढळून येणारा तत्त्वविचार एकनाथांना गुरुपरंपरेतून मिळाला होता. ह्या परंपराप्राप्त विचाराचे उपबृंहणच एकनाथांनी केले आहे. त्यांची गुरुपरंपरा नारायण–विधि–अत्रि–दत्तात्रेय – जनार्दन अशी आहे. परंतु त्यांच्या गुरुपरंपरेमध्ये चांदबोधले यांचे नाव आढळते, असा मुद्दा उपस्थित करून चांद-बोधले हे सूफी आहेत असे समजून काही अभ्यासकांनी जे नवीन विचार मांडले, त्यांचा समाचार डॉ. पेंडसे यांनी घेतला आहे. या बाबतीत पेंडसे यांनी दोन मह-त्त्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत. (१) गुरुपरंपरेच्या बाबतीत एकनाथ हेच महत्त्वाचे साक्षीदार आहेत व ते कोठेही चांगबोधले यांचा निर्देश करीत नाहीत. (२) श्रीगोंदेकर शेख महमदाने योगसंग्रामात दिलेली माहिती उत्तरकालीन आहे डॉ. पेंडसे यांच्यामते सुफींनी मुद्दाम ह्या प्रवाद उठविलेला होता व त्यामुळे "आमच्यातील जुने व नवे भलेभले लोकही चकले." एकनाथचरित्रातील ही घटना बनावट असावी. मूळ साधनांचा अद्यापही पूर्ण शोध लागला नसताही व दिवसानुदिवस नवीन पुरावे उपलब्ध होत असता चांदबोधले हेच जनार्दनगुरू हे काही संशोधकांनी मांडलेले मत, कमालीचे वादग्रस्त आहे. शिवाय गंमत अशी की, शेख महंमदाच्या मते दिगंबर त्याचे गुरू आहेत. यावरून शेख महंमदाच्या सांगण्यात विसंगती आहे. चांगबोधले हेच चंद्रभट असे मत मांडून वा. सी. बेंद्रे यांनी तर आपण किती उत्तम प्रकारे विचारात गोंधळ करू शकतो याचे उदाहरणच घालून दिले आहे. संशोधनक्षेत्रात एखाद्या मुद्याबद्दल वाद असेल तर साधनसामग्रीच्या चिकित्सेत कालनिर्देश देणारा पुरावा महत्त्वाचा म्हणून लक्षात घ्यावा लागतो. योगसंग्रामाची रचना शके १५६७ ची असून भागवताची रचना शके १४९५ मधील आहे. अर्थात भागवतात आलेली गुरुपरंपरेची हकीकत प्राचीन व अधिक विश्वस-नीय आहे. एकनाथांना जनार्दन स्वामीस जो दत्ता-त्रेयांचा साक्षात्कार झाला तो माहित होता. त्यांच्या मते यदु–अवधूत संवादातील अवधूत म्हणजे दत्तात्रेय आहे. यावरून यदु–अवधूत संवाद हा दत्तात्रेय परंपरेतून

शुकदेवांनी भागवतात समाविष्ट केला. सहस्रार्जुन, यदु प्रमाणेच जनार्दन हे दत्तात्रेयांचे शिष्य आहेत. एकनाथांना यदु–अवधूत व भिक्षुगीतेचे मर्म जनार्दनांनी कथन केले. हा तत्त्वविचार मूळचा दत्तात्रेय परंपरेतील आहे. नारायण–ब्रह्मा–अत्रि–दत्तात्रेय परंपरेमधून भागवताचे रहस्य जनार्दन गुरूंना मिळाले. जनार्दनांचे गुरू तथाकथित चांगबोधले आहेत असे मान्य केले तर सहस्रार्जुन व यदु हेही चांगबोधल्यांचे शिष्य ठरतील काय? पण ढेऱ्यांसारखी मंडळी ह्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून एकनाथावरच आरोप करतात की, त्यांनी आपली गुरुपरंपरा लपवून ठेवली. गुरुपरंपरेबद्दल एकनाथ खोटे बोलतात हा निष्कर्ष ढेऱ्यांच्या संशोधनातून निघतो. यामधून एकनाथावर उघड अन्याय होतो. शिवाय गंमत अशी की, खुद्द एकनाथांनी आपल्या एका अभंगात असे म्हटले आहे की, 'मुक्तिमंडपामाझारी निजनाम गजरी। दत्त प्रगटला कीर्तनामाझारी ।।" ह्या अभंगातील घटना काशी येथील आहे. एकनाथांचे काशी येथे वास्तव्य शके १४९२–९५ दरम्यान होते. यावेळेस चांगबोधले समाधिस्त झाले होते.

यावरून असे स्पष्ट आहे कीं, कीर्तनात प्रगट होणारे दत्तात्रेय चांगबोधले नव्हते. चांगबोधले हे जर नारायण–अत्रि–दत्त परंपरेतील म्हणून मान्य केले तर ते सूफी कसे ठरतात? "नाथांच्या साहित्यावर जो सूफींचा प्रतिक्रियात्मक व संस्कारात्मक प्रभाव जाणवतो" असे विधान रा. चिं. ढेरे करतात ते वस्तुस्थितीनिदर्शक नसून ते केवळ **कल्पनाजन्य बुद्धिविलसित** आहे. शहादत्त, गिरीधरनाथ व चांगबोधले या सत्पुरुषांशी जनार्दनांचा मित्र म्हणून कदाचित् संबंध आला असावा एवढीच संभवनीयता आहे असे फार तर म्हणता येईल. एकनाथ जनार्दन हे दत्तोपासक आहेत. जनार्दनांना दत्तात्रेयांचा साक्षात्कार झाला. स्वप्नबोध व साक्षात्कार यांचे उल्लेख अनेकांच्या चरित्रांत आढळतात. जनार्दनांची योगसाधना असावी व योगामुळे जी दर्शने होतात त्यांची वर्णने व अनुभव अनेकांनी नमूद करून ठेवले आहेत. म्हणून योगसाधनेत समाधिस्त असताना दत्तात्रेयांनी त्यांना बोध दिला. भारतीय धर्मेतिहासात साधक व सिद्धांचे गुरू म्हणून दत्तात्रेय समजले जातात. जनार्दनांना दत्तात्रेयांचे जे दर्शन झाले त्याची हकीकत जनार्दनांनीच एकनाथांना कथन केल्यामुळे नाथांनी दत्त जनार्दनांची भेट भागवताच्या नवव्या अध्यायात सांगितली. म्हणून नारायण–ब्रह्मा–अत्रि–दत्त–जनार्दन–एकनाथ ही जी परंपरा विश्वसनीय व अधिकृत मान्य करून, डॉ. पेंडसे यांनी जे विवेचन केले आहे ते बरोबर आहे. मात्र नाथ चरित्रातील ह्या घटनेचा अधिक तपशील देऊन फाटक, बेंद्रे यांच्या कल्पनाजन्य तर्कटांचा समाचार घेतला असता तर वाचकांची अधिक सोय झाली असती.

ते श्रीधरीचें व्याख्यान। भावार्थदीपिका जाण।।

एकनाथांनी आपली एकाकार टीका श्रीधराच्या भावार्थदीपिकेचा अभ्यास करून लिहिलेली आहे. डॉ. पेंडसे यांनी प्रथमच मूळ श्रीधरी टीका व एकाकार टीका यांचा तुलनात्मक अभ्यास आपल्या ग्रंथात मांडला आहे. मूळ श्रीधरी पदपदार्थयुक्त असून भावार्थ कथन करण्याकडे श्रीधरांचा रोख आहे. तर एकनाथ 'महाराष्ट्राच्या भागवतधर्माचे प्रमुख भाष्यकार' आहेत. एकाकार टीका भागवतधर्गाचे रहस्य प्रतिपादन करणारी असल्याने काही ठिकाणी नाथांचे अर्थ केवळ वेगळे नसून कसे मार्मिक आहेत हे डॉ. पेंडसे यांनी उत्तम प्रकारे दाखवून दिले आहे. कर्म, अकर्म व विकर्म या तीन पदाबद्दल एकनाथ श्रीधरापेक्षा ज्ञानेश्वराचा मागोवा घेतात व त्यामुळे गीता, भागवत यांच्यात भागवतधर्मीयांना मान्य असलेला अनुबंध कोणता आहे, याचे जे विवरण डॉ. पेंडसे यांनी केले आहे, ते वारकरीपंथाचे व्यवच्छेदक लक्षणच होय. श्रीधरी व एकनाथी टीकेत ४३४ श्लोकांशी साम्य असून जवळजवळ १००० श्लोकांवर एकनाथांचे स्वतंत्र भाष्य ही गोष्ट प्रथमच डॉक्टरांनी प्रकाशात आणली आहे. एकनाथ आपल्या टीकेत श्रीधराप्रमाणेच अनेक श्लोकांची भूमिका मांडतात. एकनाथ पूर्वकालातील महानुभावीय भास्करांची उद्धवगीता सांकेतिक लिपीत अडकून पडल्यामुळे ती एकनाथांना कदाचित् उपलब्ध झाली नसावी. परंतु बोपदेव व बहिरा जातवेद यांच्या टीकाही मिळाल्या नसाव्यात असे दिसते. बोपदेवाने आपले ग्रंथ हेमाद्रिच्या प्रेरणेने लिहिले असले तरी त्यातसुद्धा हरिभक्तीचा विचार आढळतो. त्याचप्रमाणे चैतन्यवल्लभ संप्रदायात—विशेषतः वल्लभमतातील पुष्टीतत्त्वाचा विचार जो आढळतो, त्यापेक्षा एकनाथांनी आपल्या टीकेत मांडलेला भक्तिविचार श्रीधरीव्याख्येचा मागोवा घेऊन सादर केला आहे; कारण की, एकनाथांची टीका ही मूळ भागवतसंहिता–श्रीधरी व्याख्या–ज्ञानेश्वरी–योगवाशिष्ठ यांच्या आधारे आहे. श्रीधरा-

पेक्षा नाथटीकेचे वेगळेपण दाखवताना संन्यासावद्दल नाथांनी जी विचारभिन्नता दर्शविली आहे ती लक्षात घ्यावी असे जे पेंडसे म्हणतात त्याचा अधिक चिकित्सा-पूर्ण अभ्यास होणे आवश्यक आहे. 'अदन्ति चैकं फलमस्य गृध्राः ग्रामेचरा एकम् अरण्यवासा' (अ. १२–श्लो. २३) यामधील 'हंसाः विवेकिनः अरण्यवासाः संन्यासिनः' असा जो श्रीधरांनी अर्थ केला आहे त्यापेक्षा एकनाथांचा अर्थ अधिक संयुक्तिक व मार्मिक कसा आहे हे पेंडसे यांनी दाखवून दिले असले तरी संन्यास या आश्रमापेक्षा संन्यासपद्धती भिन्न भिन्न संप्रदायांत कशी होती हाही मुद्दा लक्षात ठेवला पाहिजे. क्रममुक्ती-वद्दल श्रीधरीवेदान्तसार–पंचदशी यांच्यात एकवाक्यता आहे. संन्यासावद्दल नाथांचे अभिप्राय त्यांच्या ग्रंथांत सर्वत्र विखुरलेले आहेत. म्हणून त्यांच्या वाङमयावरून असे दिसते की, तत्कालीन संन्यास संस्थापेक्षा सकल संकल्पांचा त्याग=संन्यास असा अर्थ करून गृहस्था-श्रमातसुद्धा असे आचरण करता येते ही नाथांची भूमिका होती व ती वारकरी पंथाला मान्य झाली.

ब्रह्मत्व आले इंद्रिय कर्मा ।

सर्व संकल्पाचा त्याग म्हणजे संन्यास ह्या भूमिके-तून एकनाथांनी जे वर्णन केले त्यामुळे वारकरी पंथाला शास्त्रीय पाया लाभला. एकनाथी वाङ्मयात यदु–अवधूत, भिक्षुगीत, श्रीकृष्ण उद्धव, (भागवत) व भावार्थरामायणात शुक–जनक, व राम–वशिष्ठ यांचे जे संवाद आले आहेत त्या मधून संन्यास ज्ञान इत्यादी प्रश्नांचा ऊहापोह एकनाथांनी केला आहे. 'सर्वेंद्रियी चित्तसमाधान । ते ज्ञान विज्ञान अतिशुद्ध' (भा. रा.) तटस्थेपेक्षा ज्ञानमार्गावर जास्त भर देताना भावार्थ-रामायणात जनक म्हणतात की,

सर्वेंद्रियी निरत । ज्ञान नाही नित्यमुक्त
ते ज्ञान साशंकित । पूर्णत्व तेथे असेना ।।
अगाध सद्गुरुगरिमा । ब्रह्मत्व आले इंद्रिय कर्मा ।।
सहज भेटी परब्रह्मा । देह धर्म चिदत्वे ।।

वारकरी पंथात 'कर्मे इशु भजावा' असे ज्ञाने-श्वर माऊली म्हणते तर इंद्रिय कर्मांना ब्रह्मत्व आल्याने देहधर्म चिदत्व पावतात असे एकनाथ म्हणतात. संन्यासावद्दल एकनाथांनी ठिकठिकाणी विचार केला असून रुक्मिणीस्वयंवर व भावार्थ रामायणांतर्गत सीता स्वयंवरात तर त्यांनी संन्यासी व्यक्तीची थट्टाही केलेली आहे. म्हणून संन्यासापेक्षा गृहस्थाश्रमाचे महत्त्व त्यांनी वारंवार सांगीतले आहे. डॉ. पेंडसे यांचे मते मूळ भागवत परमहंसांची व परमहंसांसाठी रचलेले असून त्याचे स्वरूप वैराग्यपर होते. तर गीता ही कर्मयोगपर आहे. वारकरी उर्फ महाराष्ट्रातील भागवत धर्माचे वैशिष्टच सांगताना हा पंथ भागवताकडून गीतेकडे वळला असे डॉक्टरसाहेब सांगतात. अर्जुन हा योद्धा आहे तर उद्धव गलितगात्र भक्त आहे असाही एक मुद्दा डॉ. पेंडसे मांडतात. डॉक्टरसाहेबांचे हे विवरण वादग्रस्त व चिन्त्य आहे. मला तर या ठिकाणी त्यांच्यावर टिळक मताचा प्रभाव पडल्याचा भास होतो. वास्तविक गीता ही ब्रह्मविद्या आहे. ती व्यासांनी रचली तर भागवत व्यासपुत्र शुकदेवाचे आहे, गीता हे उपनिषद् व योग-शास्त्र आहे व भागवत निगमकल्पतरूचे रसाळ फळ आहे. वृष्णीकुलोत्पन्न श्रीकृष्णकथा वर्णन करणारी सात्वतसंहिता म्हणजे भागवत होय. दोन्ही ग्रंथांत उपदेश करणारा श्रीकृष्णच आहे. परंतु भागवत पुरा-णावर त्यांचा दुसरा एक आक्षेप आहे. तो म्हणजे भागवताच्या काळी जन्मावरून वर्ण ठरविले जाऊ लागले, पान २४५. डॉक्टरसाहेब म्हणतात, 'गीतेच्या काळी वर्णव्यवस्था ही जन्मावर अवलंबून नसून प्राधा-न्याने गुणकर्मावर अवलंबून होती, पान २४५. भाग-वताच्यामुळे पोकळ अहंकार निर्माण होऊन वर्णसंस्थेचा अधःपात झाला (पान २४५) डॉक्टर साहेबांच्या ह्या विवेचनात गीता–भागवत असा क्रम अभिप्रेत आहे. तो बरोवर असला तरी भागवत पुराणाची रचना इसवी सन पहिल्या व दुसऱ्या शतकांतील आहे. डॉ. पेंडसे यांच्या मते 'नारद–शुकाचार्यांची सर्वसंगत्यागाची प्राचीन परंपरा आणि **जैन–बौद्धांचा संन्यासवाद** या दोन्ही गोष्टींचा परिणाम भागवतावर झाला' (पौरा-णिक भागवत धर्म, पान ३७५). परंतु असे दिसून येते की, जैनबौद्धांची संन्यासस्था व संन्यासपद्धती वैदिकां-पेक्षा भिन्न आहेत. वैदिक परंपरेतील संन्यासी मंडळींची गुरुपरंपरा नारायण किंवा शिवापासून सुरू होते. त्यांत वशिष्ठ, पाराशर, शक्ती, व्यास, शुक, ब्रह्मा, अत्रि, दुर्वास, (काश्मिरी शैव परंपरा) इत्यादी वैदिक ऋषी व नारायण, ब्रह्मा, उमापती, दत्तात्रेय ह्या देवता येतात. शैवपरंपरेतील आदिनाथ, मत्स्येंद्र, गोरक्ष ही सिद्ध मंडळी आहेत. तांत्रिकांमधील दिव्यौघ व सिद्धौघ-मधील नावेसुद्धा वैदिकांतील आहेत.. भारताच्या धर्म-

जीवनातील गुरुपरंपरा लक्षात घेतल्या तर ह्यांमधील सर्व मंडळी **संन्यासी** असून वैदिक आहेत हे स्पष्ट होईल. माझे असे अनुमान आहे की, संन्याससंस्थेचे नाते जैनबुद्धांशी संबंधित नसून वैदिक दत्तसंप्रदायी अवधूत परंपरेशी आहे; कारण दत्तात्रेय अवधूत असून त्यांचा वैदिक परंपरेत गुरू म्हणून उल्लेख येतो ! जैन–बुद्ध परंपरेत दत्तात्रेय देवता नाही. नारायण–ब्रह्मा–अत्रि–दत्त अशी भागवताची परंपरा असून ती वैदिक संन्यासी परंपरा आहे. याला उपोद्‌बलक पुरावा खुद्द भागवतातच आहे.

अदन्ति चैकम् फलमस्य गृध्रा ग्रामेचरा एकमरण्यवासाः।
हंसा य एकं बहुरूपमिज्यैर्मायामयं वेद स वेद वेदम् ।।
(अ. १२, श्लोक २३.)

या श्लोकाचा संबंध, "द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाकशीति ।।" या वैदिक मंत्राशी आहे. भागवतात सुद्धा अगोदरच्या श्लोकात "द्विसुपर्णनीड" या पदाचा उल्लेख येतो. वैदिक संन्यास परंपरेचे जे विविध प्रवाह कालौघात उत्पन्न झाले त्यांत भागवत-कर्त्या शुकाचीही एक परंपरा होती. त्यामध्ये शंकराचार्य, श्रीधर ह्यांची नावे येतात व दुसऱ्या परंपरेत अत्रि–दत्त–जनार्दन–एकनाथ ही नावे येतात. म्हणून जैन-बौद्धांच्या संन्यासवादाचा परिणाम भागवतावर झाला असे म्हणता येणार नाही. इसवी सनाच्या पहिल्या दुसऱ्या शतकात भागवत निर्माण होत असता त्या वेळेस जन्मावरून वर्ण ठरविले जाऊ लागले हे विधानसुद्धा इतिहास, शिलालेख व ताम्रपट यांचे अध्ययन केल्यावरही टिकू शकणार नाही.

गीता व भागवत यांच्या तुलनेत भागवतसंहिता परमहंसाकरिता असून ती संहिता वैराग्याचे महत्त्व प्रतिपादन करणारी आहे असे वारंवार डॉक्टरसाहेब मांडतात. व या अभिप्रायाबरोबर यामधून ध्वनित होणारा संन्यासधर्म वैराग्यपर असल्याने तो समाज-जीवनात संयुक्तिक नाही असेही सूचित करतात. वास्तविक परमहंसांचा मार्ग, निरीश्वर, सांख्य व मीमांसा दर्शनांचा विचार करून 'ज्ञानोत्तर' अवस्थेच्या विचारांचे मंडन करण्यासाठी आहे. भागवतपुराणातील भक्तीवर सांख्य, मीमांसक, जैन व बौद्ध यांचा प्रभाव नाही. जैनबौद्धांचे तुरळक उल्लेख दिसून येत असले तरी ते सत्पुरुषांच्या संदर्भात आहेत. दर्शनांच्या संदर्भात नाहीत. सांख्य व विशेषतः योग वैराग्यप्रधान असून भारतातील वैदिक अवधूत परंपरेशी त्यांची जवळीक होती. पूर्वमीमांसा ह्या ज्ञानशाखेने जी भूमिका घेतली त्याला उत्तर ज्ञानप्रधान वेदान्ताने व ज्ञानप्रधान भक्तीने दिलेले आहे. ज्ञानदेव एकनाथांचे विरोधक पूर्वमीमांसक होते. उत्तरमीमांसेशी नारद, शुक, कपिल, अत्रि, दत्तात्रेय इत्यादी वैराग्यप्रधान ऋषींचा संबंध आहे. या मंडळींनी यज्ञ, संन्यास, ज्ञान यांचा विचार केला आहे. ब्रह्मविद्येची ही मंडळी उपासक आहेत. परमहंस हे ब्रह्मविद्येचे उद्‌गाते आहेत. म्हणून उपनिषत्प्रधान अशी ब्रह्मविद्येची परंपरा कथन करणारी गीता त्यांना ज्याप्रमाणे प्रिय आहे त्याचप्रमाणे परमहंसांचे भागवतही ह्यांना मान्य आहे. डॉक्टरसाहेबांनी पूर्वमीमांसा व भागवतधर्म यांचा विचार केला असता तर भागवतधर्माची पार्श्वभूमी अधिक स्पष्ट झाली असती. मीमांसकांवर टीका करताना श्रीधर व एकनाथ यांच्या भूमिकेत सारखेपणा आढळतो. उदा. अ. १४ श्लोक १० वरील श्रीधरी टीका व एकनाथी टीका.

भाष्यकारातें वाट पुसतु

श्रीधरी भावार्थदीपिकेच्या पदपदार्थांचा मागोवा घेऊन एकनाथ आपली टीका लिहितात. डॉ. पेंडसे यांनी प्रथमच ह्या ग्रंथात श्रीधर एकनाथांच्या टीकेतील साम्यस्थले दाखवून दिली आहेत. तर काही ठिकाणी थोडा फरक एकनाथ करतात. उदा. अ. ११. श्लोक ३८ मधील "उद्यानोपवनक्रीड" हे पद पाहा—

श्रीधर—

उद्यानम् पुष्पप्रधानम् । उपवनम् फलप्रधानम्
आक्रीडः क्रीडास्थानम् ।

एकनाथ—

देवालय करावे गहन । वन उद्यान उपवन
खेंडकुलिया विश्रामस्थान । आराम जाण करावे ।।
नाना जातींचे वृक्ष ते वन । फळभक्षी वृक्ष ते उपवन
पुष्पवाटिका तें उद्यान । कृष्णार्पण पूजेसी ।।

काही ठिकाणी एकनाथ अचूक शब्द वापरून श्रीधरी टीका अधिक सुस्पष्ट करतात. उदा. —

अ. १०, श्लोक २० मधील 'आघात' पदावर श्रीधरी टीका 'वधस्थानम् प्रति' अशी आहे तर एकनाथ वर्णन करतात.

जैसा सूळी द्यावया जो नेइजे ।। ओवी ४९२

त्याचप्रमाणे अ. ११, श्लोक १८ मधील " अधेनुम् इव रक्षतः " पदावर श्रीधरी मार्मिक आहे की नाथांची टीका अधिक सरस आहे असा गोड संभ्रम वाचकाला पडतो. काही पदांवर एकनाथ अगदी वेगळे व म्हणन अभिनव-पूर्व असे भाष्य करतात. उदा. अ. २९, श्लोक ४५ मधील 'हरिमेधस्' पद.

मेधस् हा मूळ शब्द. परंतु हरिमेधसा शब्दाचा विग्रह मात्र, 'हरतीति हरिः मेधा यस्य तेन' असा होतो. एकनाथ पुढील पदावर भाष्य करतात.—

" त्यजूं न शके हरिपदा । हरीचे ठायी पूर्ण श्रद्धा ।।
यालागी जाण हरिमेधा । बोलिजे प्रबुद्धा उद्धवाते ।।
जो करी हरिचिंतन । त्याचे चित्ताचे हरि करी हरण
जो करी हरीचे स्मरण । त्याचा संसार संपूर्ण हरि हरि ।।
ऐशिया हरीच्या ठायी सर्वदा । पावलियाही मुक्तिपदा
उद्धवाची सप्रेम श्रद्धा । या लागी ' हरिमेधा ' त्यास म्हणती ।।

श्रीधरापेक्षा एकनाथ काही ठिकाणी मनोरम असे स्वतंत्र भाष्य करतात. अ. ३१, श्लोक ६ मधील " योगधारण-याग्नेय्याऽदग्ध्वा " पदावर नाथांचे स्वतंत्र भाष्य आहे. याप्रमाणेच अ. ९, श्लोक १२ मधील 'अनिन्धनम्' पदावर भाष्य करताना श्रीधर म्हणतात, " इन्धनम् गुणाः तत् कार्यम् च तद्रहितम् तद् युक्तम् योगशास्त्रे मनसो वृत्तिशून्यस्य ब्रह्माकार तथा स्थितिः या संप्रज्ञात-नामासी समाधि अभिधीयत इति ।" तर एकनाथ म्हणतात,

जैसा अग्नि असे काष्ठांच्या मेळी ।
मंथिल्या काष्ठाची करी होळी ।।
काष्ठ नाशूनि तत्काळी ।
त्यजूनि इंगळी उपशमे ।।

श्रीधरी व एकनाथी टीकेतील काही पदांचा विचार व त्यामधील विचारसौंदर्याची स्थळे डॉक्टरसाहेबांनी दाखविली असती तर अनेक वाचकांची सोय झाली असती व ते एकनाथाकडून श्रीधराकडे आपोआप वळले असते.

एकनाथी टीकेचे वैशिष्टय केवळ तात्विक चर्चेत नसून त्यामधील रसाळपणात सुद्धा आहे. श्रीधराची टीका संपूर्ण भागवतावर असली तरी तिचे स्वरूप डॉक्टरसाहेब म्हणतात त्याचप्रमाणे संक्षिप्त आहे. एकनाथ आपल्या टीकेत मूळ संस्कृत श्लोकाचा मराठी अनुवाद करतात एवढेच नव्हे तर अतिशय रसाळ असे भाष्यही करतात. उदा :—अ. १, श्लोक ६ मध्य श्लोक लावण्य पदावर भाष्य करताना श्रीधरस्वामी म्हणतात, " लोकानाम् लावण्यस्य निर्मुक्तिस्त्यागो यया यामपेक्ष्य लोकेषु लावण्यम् नास्तित्यर्थः यद्वा लोकेभ्यो लावण्यस्य निमुक्तिः दानं यतः यत् संपर्केण लोकलावण्यवंतो भवन्ति इत्यर्थः " याच्या जोडीला याच पदावरील ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४८, ४९ या नाथांच्या ओव्या वाचल्यानंतर त्यांमधील मार्मिकता व रसाळपणा किती मोहक आहे याची जाणीव होते.

काही पाठभेद

'भागवतोत्तम एकनाथांनी भागवतावर टीका लिहिताना मूळ श्लोक आपल्या ग्रंथात उद्धृत केले असण्याची शक्यता जास्त आहे. यासाठी श्रीधरी भावार्थ-दीपिका असलेली संहिता नाथांच्या समोर होती. भागवत संहितेमध्ये आर्ष प्रयोग विपुल आहेत. श्रीधरी टीकेत आर्षप्रयोगयुक्त संहिता आढळते; परंतु गीता-प्रेसने प्रसिद्ध केलेल्या भागवत प्रतीत व एकनाथकृत प्रतीत काही' पाठभेद दिसून येतात. डॉक्टरसाहेबांनी काही पाठांकडे वाचकांचे लक्ष वेधलेच आहे उदा. पान १३५ वर " संतोष " हा पाठ आहे. त्याच पानावर अ. १७, श्लोक १६ मधील 'क्षांती' पाटाऐवजी 'शांती' पाठ एकनाथांनी स्वीकारला. **असेच काही पाठ**

(१) अ. ६, श्लोक ४७
" **वाताशना ये ऋषयः** " एकनाथी पाठ
" **वातरशना** " गीताप्रेस प्रत

(२) अ. ७, श्लोक ८
पुंसो युक्तस्य एकनाथ
पुंसो ऽ युक्तस्य गीताप्रेस प्रत

(३) अ. १, श्लोक १७
साम्बस्य ददृशुस्तस्मिन्मुसलं कुलनाशनम् एकनाथ
साम्बस्य ददृशुः तस्मिन् मुसलं खल्वयस्मयम गीताप्रेस प्रत

यावर श्रीधरी टीकेत पुढीलप्रमाणे नोंद आहे—

खलवयस्मयम् अयस्मयम् ।

एकनाथांनी कुलनाशम् पाठ स्वीकारून जे भाष्य केले ते जसे स्वतंत्र आहे तसेच श्रीधरी टीकेहून भिन्न आहे. हा पाठ एकनाथांनी कोणत्या संहितेमधून घेतला ?

(४) अ. ५, श्लोक ८
गृहेषु मैथुन्यसुखेषु चाशिषः एकनाथी पाठ
गृहेषु मैथुन्य परेषु चाशिषः गीताप्रेस प्रत

(५) अ. ५, श्लोक ४१
शरणं गतो मुकुंदं परिहृत्य कर्तुम् एकनाथी पाठ
शरणं गतो मुकुंदम् परिहृत्य कर्तम् गीताप्रेत प्रत

(६) अ. १८, श्लोक ३
वतः न धावेत् गीताप्रेस प्रत
वतः न धावत् एकनाथी पाठ

(७) अ. १८, श्लोक ४
वर्षास्वासारषाड् जले श्रीधरी टीका
वर्षास्वासारषाड्वल जले एकनाथी पाठ
(आठले प्रत)

वैदिक भागवत धर्म

वैदिक आर्ष रूपे भागवतात वारंवार आलेली आहेत. ह्या वैदिक रूपांचा अर्थ स्पष्ट करताना एकनाथ वैदिक संज्ञा व वैदिक विचारांचा धागा पकडतात. भागवताची पारमहंस संहिता वैदिकांची आहे. त्यात नारायण, ब्रह्मा, दत्तात्रेय, अत्रि, कपिल, वशिष्ठ, पाराशर, शक्ती, नारद, शुक मंडळी वैदिक विचारांचेच उपबृंहण करतात. भागवतात सूर्य–विष्णू–कृष्ण–विठ्ठल ह्या वैदिक देवतांची उपासना आहे. त्यांची भक्ती करणारे भक्त मंत्र घेतात. महाराष्ट्रातील भागवत धर्माचा मंत्र " रामकृष्ण हरि " असा आहे. तुकाराम व नामदेवांना मंत्रोपदेश मिळाल्यानंतर पूर्णत्व आले. त्यांना जो मंत्र मिळाला तो वैदिक परंपरेचा असून त्यांची गुरुपरंपराही शुद्ध वैदिक आहे. विठ्ठल मंदिरात आप्तोर्यामसारखे यज्ञ होत असत व विठ्ठलाला **पवमान वैदिकसूक्ताने** अभिषेक करतात. विठ्ठलासमोर असलेला गरुड हा विष्णु देवतेशी संबंधित आहे. म्हणून भागवत पुराणातील आर्षरूपे वैदिक वाङमयाचेच उपबृंहण करणारी आहेत. त्यांमधील काही शब्द, वाक्प्रचार, परिभाषा व काही तर मंत्रात्मक ऋचा आहेत. भागवताच्या पहिल्याच श्लोकातील ' सत्यम् परम् धीमहि ' हे क्रियापद गायत्री मंत्रातील आहे. यावर टीका करताना श्रीधरस्वामी म्हणतात, ' गायत्र्यां प्रारम्भेण गायत्राख्य ब्रह्मविद्यारूपम् पुराणम् एतत्."

अ. २७, श्लोक ४१ " स्विष्टकृत " पदावर एकनाथ म्हणतात,

कां पुरुषसूक्त सोळा ऋचा । हा होमाचा विधिमार्ग
मग स्विष्टकृताचें अवदान । साधके द्यावे सविधान
ऐसे हे माझे निजभजन । भक्त सज्ञान जाणती ।।

अ. १७, श्लोक १२ " त्रिवृन्मुख " पदावरील एकनाथांचे भाष्य.

त्या वेदापासाव त्रिविध मख । त्रिमेखलायुक्त मीचि देख
जेथे होत आध्वर्यव हौत्रिक । कर्म विशेख ।।

भागवतसंहितेमधील आर्षरूपे हेच दर्शवितात की संहिता रचणारे वैदिक परंपरेशी परिचित आहेत. आर्ष रूपे वेगळी. असाधुरूपे वेगळी. आर्षरूपे मांडणारी मंडळी म्हणजे व्यास, वाल्मिकी व शुकदेव होत. त्यांनी लौकिक भाषेत आर्षप्रयोगांचा वापर करून मूळ वैदिक परंपरेचाच मार्ग स्वीकारला. कारण ही मंडळी "तपः स्वाध्यायनिरत " असल्याने " छन्दोवत् कवयः कुर्वन्ति " नियमाचे पालन करणारी आहेत. म्हणूनच महाकवींना वंदन करताना व्यास, वाल्मिकी, निवृत्ती, ज्ञानदेवांचा समावेश महाकवींमध्ये एकनाथ करतात. त्यांच्या मते ज्ञानदेवांची वाणी छंदमय आहे. म्हणूनच ज्ञानदेव एकनाथादी मंडळींनी महाराष्ट्रातील भागवतधर्माची सेवा केली. ह्या भागवतधर्माचे नेमके स्वरूप व वैदिक परंपरेचा प्रगट झालेला आविष्कार डॉक्टरसाहेबांनी " भागवतोत्तम एकनाथ " ग्रंथात मराठी वाचकांसमोर जो मांडला आहे, त्याबद्दल सर्वजण त्यांना धन्यवाद देतील यात मुळीच संशय नाही.

* *

' भागवतोत्तम एकनाथ ' : डॉ. शं. दा. पेंडसे
नागपूर प्रकाशन, नागपूर–१२
पृष्ठे : डेमी ३००; किंमत १५ रुपये.

जेव्हा माणूस जागा होतो

यशवंत मनोहर

वाटते, मानवी बुद्धि–शक्तीचा सर्वात जास्त भाग आजवर इतरांना फसविण्यातच, लुबाडण्यातच खर्ची पडला असावा. माणसांना जनावरांप्रमाणे वागविण्याच्या परंपरा काही धूर्तांनी अगदी प्राचीन काळापासून केवळ मतलबासाठी सांभाळीत आणलेल्या दिसतात. त्यासाठी शब्दही गुलामाप्रमाणे राबविले. जगातील अर्ध्याहून अधिक वाङ्मय केवळ स्वार्थसंगोपनासाठी अवतरलेले आहे असे इतिहास सांगतो. माणसांना गुलाम करावे, आपले जगणे सुकर करावे, त्या गुलामांना गुलामीचे पारमार्थिक पातळीवरून मोल पटवून द्यावे, माणसाला दास करावे नि त्याला त्याच्या त्या हीनत्वाचे, दास्यत्वाचे आध्यात्मिक महात्म्य नि दैवकृत अपरिहार्यता पटवून द्यावी. त्याचे दास्य, गुलामी, शूद्रत्व चिरंतन करण्याचा प्रयत्न करावा. आपल्या सुखाचे मार्ग निष्कंटक करावे. या बाबींना वाङ्मयाच्या बऱ्याच मोठ्या भागात प्राथम्य प्राप्त झालेले दिसते.

प्राचीन भारतात तर काही माणसांनी गुलाम असणे, दास असणे, त्यांनी पशूंचे जीवन जगणे हा धर्माचा एक अपरिहार्य आणि आध्यात्मिक प्रतिष्ठा पावलेला एक महत्त्वाचा भाग राहिलेला आहे. आजही भारतातील काही भागांत माणसांना गुलाम, पशू म्हणून जगावे लागते. काही धूर्त सुशिक्षितांनी हा दावेदार काळोख त्यांच्या माथी मारलेला आहे. माणुसकीचा अवमान, उपमर्द अशाच काही धूर्तांनी प्राचीन काळापासून केलेला आहे. आजही ओल सापडली की, ही विषारी हरळी आपला मायावी, जुलमी प्रपंच थाटते.

प्राचीन महाराष्ट्रातही गुलामांच्या परंपरा होत्या, आजही आहेत. केवळ माणुसकीचा सन्मान करणारी दारे इथे किती आहेत ? प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष इथेही माणसांना पशूंपेक्षा वेगळी वागणूक मिळत नाही. म्हणजे पाच हजार वर्षांची अध्यात्माची परंपरा इथे अशी कार्यप्रवण झालेली आहे ! एवढे सारे होऊनही इथल्या अनेकांना अजून माणुसकीचे मोल कळायचे राहूनच गेले आहे. प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे आजही मानवी मूल्ये इथे बाजारात उभी केली जात आहेत. येथील असंख्यांच्या आतला हिशेब वेगळा आहे. बाहेरची, दर्शनी मांडणी वेगळी आहे.

मराठीतील लेखकांच्या बाबतीतही हेच खरे आहे. मानवी मूल्यांची पायमल्ली सहन न होऊन किती लेखक त्या मूल्यांच्या बाजूने प्राण पणाला लावून उभे राहू शकतात ? किती जणांजवळ अशी आस्था आहे, हिंमत आहे ? लेखक जर स्वतःला माणूसच समजत असतील, माणसाचे त्यांना अगत्य असेल, तर माणूस जेव्हा अगदी पार कोसळविला जातो तेव्हा त्यांच्यावर पडणाऱ्या जबाबदारीची जाणीव ह्या लेखकांना आहे काय ? मानवी प्रतिष्ठेचा, मूल्यांचा खून झालेला पाहून किती लेखकांचा भडका उडू शकतो ? लेखक जर माणसांच्या जीवनासंबंधीच लिहितो, त्यावर मान मिळवितो, त्या माणसांच्या जीवनावर जगतो त्या माणसांच्या जीवनाला कीड लागली, ते विरूप झाले तर ते जीवन निरोगी आणि सुरूप करण्याचे उत्तरदायित्व आपल्यावरही आहे अशा निष्ठा किती लेखकांजवळ आहेत ? मानवी मूल्यांच्या प्रतिष्ठेसाठी किती लेखकांनी आजवर तन, मन आणि शब्द वेचलेले आहेत?

इथे मला हे स्पष्टपणे म्हणावयाचे आहे की, मराठी लेखक केवळ पांढरपेशांच्या मनोरंजनासाठी लिहितो. त्याला मान पाहिजे. पैसा पाहिजे. त्यासाठी इंग्रजी वगैरे पुस्तके वाचून तो उत्कृष्ट रंजनप्रधान वाङ्मय निर्माण करू शकतो इथल्या जीवनाशी आपला काही संबंध आहे, माणूसकी नाकारलेल्यांच्या बाजूने आपल्याला काही करावयाचे असते असे चुकूनही इथल्या लेखकांना वाटत नाही. पुस्तके लिहिण्यासाठी तो मजेत फिरेल. सुखाने प्रवास करील. मॅटर गोळा करील. माणसांच्या नशिबी लादली गेलेली दुःखे पाहून तो अस्वस्थ होणार नाही. त्याच्या जीवाचा भडका उडणार नाही. त्याच्या अस्तिवाची आग कधी होणारच नाही. कारण वाचकासाठी मनोरंजनपर साहित्य निर्माण करण्याआधी हा प्रत्यक्षाचा विव्हळणारा भाग त्याच्यासाठीही एक मनोरंजनाचाच विषय असतो.

'जेव्हा माणूस जागा होतो' ह्या पुस्तकाचे विश्व असे नाही. गोदावरी परूळेकरांच्या सदर पुस्तकाचे प्रयोजन मराठी लेखकांच्या प्रयोजन–प्रदेशात अंतर्भूत होत नाही. पुस्तक लिहिणे ही बाब गोदावरीबाईंच्या दृष्टीने फारच गौण आहे. मौज प्रकाशनातर्फ

प्रसिद्धी मिळेल, मान मिळेल ह्या हेतूने सदर पुस्तक लिहिले गेले नाही. गोदावरीबाईंचे पती श्री. शामराव परूळेकर ह्यांची इच्छा पूर्ण करावी ह्या हेतूने हे पुस्तक लिहिले गेले आहे. शिवाय ज्या मूल्यांसाठी त्यांनी त्या जंगल-पहाडातून झगडा दिला, हाल सोसले त्या मूल्यांच्या विजयाचा उच्चार इतरांनाही ऐकवावा, ही माणसांच्या पशूवत् जगण्याची खडतर, करुण कहाणी इतरांनाही ऐकवून जमल्यास मानवी मूल्यांच्या सन्मानाच्या शक्यता जन्माला घालाव्यात हाही हे पुस्तक लिहिण्याचा हेतू आहे असे म्हणता येते.

साहजिकच हे पुस्तक लिहायला मॅटर मिळावे म्हणून काही गोदावरीबाईंनी तो उंबरगाव, पालघर, डहाणू तालुक्यातील जंगल पायाखाली तुडविले नाही. पुढे पुस्तकाला मॅटर व्हावे म्हणून त्यांनी हालअपेष्टा सहन करीत जीवनातला बराच भाग खर्च करून त्या वारली-आदिवासींमध्ये गुलामीची, पशूवत् जीवनाची ज्वलंत चीड निर्माण केली नाही, त्यांच्यात माणूस प्रस्थापित केला नाही. गोदावरीबाईंच्या मनाला लागलेली भूकच मुळात वेगळी आहे. इथे खूपच सोप्या असलेल्या वाङमयीन श्रेयाची ही भूक नाही. तर निष्पाप, निरपराध मानवाला अमानुष क्रौर्याच्या, राक्षसी जुलुमाच्या घशातून सोडविण्याची ती भूक आहे; न्याय्य मानवी मूल्यांची भूक आहे.

त्या निष्ठेपायीच मुंबईपासून साठ मैलांवर असलेल्या उंबरगाव, डहाणू, पालघर या तालुक्यांतील जंगलात, दऱ्याखोऱ्यात, अर्धनग्न, अर्धपोटी आदिवासींवरती लादलेली गुलामी ही मनुष्यकृत आहे, ती नष्ट झाली पाहिजे म्हणून गोदावरीबाईंनी जीवाचे रान केलेले आहे. खरं तर मुंबईतील माणसांपेक्षा जंगलातील झाडे, डोंगर, दऱ्या ह्या आदिवासींना अधिक जवळच्या, सदाचारी वाटल्या असल्या पाहिजेत. म्हणून तर माणसांपासून दूर या झाडा-डोंगरांच्या आश्रयाने निर्धोकपणे त्यांनी आपले वंश वाढविले. पण या देशात इंग्रज आल्यानंतर बाहेरील हिंदू, मुसलमान, पारशी या भागात या दुर्दैवी लोकांचा शोध घेत गेले. ज्या माणसांपासून ते स्वतःला वाचवित होते त्यांच्या हाती अखेर हे दुर्दैवी सापडले आणि सुशिक्षित, धूर्त लोकांनी शंभर वर्षे ह्या आदिवासींच्या श्वासांवर नांगर फिरवून आपल्या सुखाचे पीक काढले. या दुष्टांनी आदिवासींना धमक्या देऊन, मारून, खून पाडून त्यांच्या जमिनी बळकाविल्या. चोर मालक झाले आणि मालकांना गुलाम, पशू व्हावे लागले. ह्या जमिनदारांनी आपल्या वासना-विकार स्वैर सोडून राक्षसी हुकूम सोडावेत. आदिवासींनी जनावरांप्रमाणे त्या हुकुमांचे पालन करावे. अन्यथा मालकांनी त्यांना मारावे. अघोरी शिक्षा कराव्या. खून करावे. हे सर्व ठरून गेले.

एक हजार चौरस मैलांच्या जंगलाला लागलेला हा राक्षसी वणवा होय. गोदावरीबाईंनी आपल्या सहकाऱ्यांबरोबर या वणव्यात स्वतःला झोकून दिले. हा झगडा म्हणजे एका अत्यंत कठोर, माणसांच्या जगाला कलंक लावणाऱ्या, सुधारलेल्या माणसांच्या साहित्य, धर्म, न्याय, समाज, नीती आदी सर्वच संस्थांची व्यर्थता सिद्ध करणाऱ्या, त्यांच्या बोलघेवडेपणाचे धिंडवडे काढणाऱ्या, भेसूर वास्तवाशी त्यांनी दिलेला झगडा होय. मानवाच्या स्वयंभू प्रतिष्ठेसाठी त्यांनी दिलेला लढा होय. ललितरम्य शब्दात पुस्तके लिहून सरकारदरबारी मान मिळविण्यापेक्षा मला ह्या लढ्याचे मूल्य मोठे वाटते. साहित्यापेक्षा, साहित्यिकापेक्षा मला हा माणुसकीचा सक्रिय गहिवर मोठा वाटतो. हा त्याग मोठा वाटतो. एका उत्कट कळवळ्याने त्या दुःखी, काळोख्या जंगलाला बाईंनी दिलेला प्रकाशाचा वास्तव आशीर्वाद मोठा वाटतो. "आम्ही माणुसकीच्या मारेकऱ्यांविरुद्ध, ह्या प्रतिष्ठित अशा माणुसकीच्या क्रूर शिकाऱ्यांविरुद्ध प्राणपणाने लढू." हा त्या जंगलात दुःखाने, अत्याचाराने जडमूढ होऊन पडलेल्या शोषीत भूमीने फोडलेला शब्द मला मोठा वाटतो. मोलाचा वाटतो.

याच देशातील या जनतेवर, आमच्याच देशबांधवांवर कल्पना फाटून चिंध्या होतील असे अत्याचार झाले. हे मुके बेवारस दुःख, हे पाशवी अत्याचार त्या उंबरगाव, डहाणूच्या जंगलात, दऱ्या-खोऱ्यात शंभर वर्षे सुरू होते. त्या डोंगर-दऱ्यांतून, त्या जंगलातून शंभर वर्षे पचविलेल्या ह्या अमानुष अत्याचारांचाच अगतिक वास घुमत असेल. काही अत्याचार मी इथे नोंदवितो.

(१) जमीनमालक व जंगलमक्तेदार आपली विषयलालसा भागविण्यासाठी आदिवासी बायकांचा सर्रास उपयोग करीत. तो त्यांना त्यांचा परंपरागत हक्कच वाटे.

(२) झिपर नावाचा आदिवासी कामावर(वेठीने) आला नाही म्हणून त्याला नांगराला जुंपले. पराणी मारली. रक्तबंबाळ केले. तशा धमक्या इतरांनाही देऊन कामे करवून घेतली.

(३) [वेठीने करवून घेतलेली] कोळशाची भट्टी एका आदिवासीकडून अजाणता बिघडली. तेव्हा त्याला जळत्या भट्टीत फेकून जाळले.

(४) जानू वारली गावाला गेला असता त्याच्या सुंदर बायकोचा उपभोग घेण्याकरिता तिला आवारात फरफटत ओढून नेले. तेव्हा अगतिक आदिवासी सुस्कारे टाकीत खालच्या मानेने खोपटात शिरले. दुसऱ्या दिवशी आल्यानंतर जानूने आरडाओरडा केला म्हणून खड्डा खणून त्याला पुरून टाकण्यात आले.

(५) कुठलीही बाकी नसताना वारल्यांवर बाकी काढली जाई. अशी बाकी दिली नाही म्हणून एका वारल्याला आडवे पाडून त्याच्या अंगावर मुसळ ठेवले. बाकी कबूल करीपर्यंत त्या मुसळाच्या दोन टोकावरील माणसे नाचत होती.

(६) एकाने कामावर जायचे नाकारले तेव्हा त्याला झाडाला उलटे टांगून मिरच्यांची धुणी दिली. गुदमरून जातानाच त्याच्या पाठीवर फटके मारले.

(७) प्रसूत झाल्याच्या तिसऱ्याच दिवशी एका बाईला वेठीने कामाला बोलाविले. ती गेली नाही म्हणून तिच्याजवळ तान्हे मूल असतानाच फडाफड तिच्या तोंडात मारल्या. अचकटविचकट शिव्या दिल्या. दुसऱ्या दिवशी ती कामाला आली नाही म्हणून तिच्या नवऱ्याला मारले.

(८) वारल्यांनीच लावलेल्या आंब्याच्या झाडाचा आंबा पाडून खाल्ल्याच्या गुन्ह्यावरून रूपजी नावाच्या आदिवासीला त्या आंब्याच्या झाडाला बांधून पाठ फुटेपर्यंत फटके मारले. तो गुरासारखा ओरडत होता.

(९) लग्नासाठी वारली जमीनदारांकडून कर्ज घेत. ते फिटेपर्यंत त्या ऋणकोला व त्याच्या बायकोला मालक सांगेल ते काम करावे लागे. (म्हणजे गुलामच व्हावे लागे). हे कर्ज जन्मभर फुकट काम करूनही फिटत नसे. हे जमिनदार गड्याला शहरातील वाड्यात बरेचदा ठेवत. त्याच्या बायकोला शेतावर आवारात ठेवले जाई. अशी ताटातूट लग्न झाल्याबरोबर होत असे. या सावकारांना मग बिनधोक निःशंकपणे आपलीच मालमत्ता समजून त्या बायांचा उपभोग घेता येत असे.

(१०) नन्हू घरत नावाच्या वारल्याला त्याच्याजवळ चोरटी बंदूक असल्याच्या आरोपावरून काठीचे फटके मारले. मारल्याच्या खुणा दिसू नयेत म्हणून दगड कापडात बांधून हातापायांवर, पाठीवर, पोटावर मनमुराद मारले. लंगोटी सोडली. मागच्या भागावर रॉकेल ओतले. पेटलेले लाकूड आणून आग लावण्याचा प्रयत्न केला. तो गुरासारखा ओरडत असतानाच तो बेशुद्ध पडला. पडतानाही त्याला मारले.

(११) देवजीची वीस वर्षाची मुलगी. बापाजवळ बंदूक असल्याचे ती सांगत नव्हती. म्हणून पोलिसांनी तिला अनेक वेळा वर उचलले. खाली आपटले. "अब्रू घेऊ !" म्हणून धाक घातला. ओरडू लागली तेव्हा सोडली.

(१२) अंबोली गावातील उमी नावाच्या मुलीला पकडली. कासोटा सोडला. अत्याचार करण्याची धमकी दिली. बंदुकीचे टोक शरीरात घालू अशी धमकी दाखविली.

(१३) वारली कामावर गेले नाहीत म्हणून पारशी जमीनदारांनी पोलीस व गुंडांच्या मदतीने मुसळ पार जमीनदोस्त केला. भांडी घराबाहेर फेकली. मडकी गाडगी फोडली. अल्युमिनिअमची भांडी ठेचून टाकली. जाती फोडली. खोपडी उध्वस्त केली. भात विस्कटले. मद्य ओतून दिला. बैलगाड्या मोडल्या. चाकांचे तुकडे केले. म्हाताऱ्यांचे-मुलाचे कपडे फाडले. त्यांना मारले. पैसे, कोंबड्या, अंडी, शेळ्या घेऊन पसार झाले.

असे क्रूर अत्याचार सतत नेमाने शंभर वर्षे चाललेले होते. त्या जंगलातच ते सुरक्षितपणे पचले असतील. १९४५ साली गोदावरीबाई त्या जंगलातील क्रौर्याला माणुकीचाच सवाल टाकतात. नंतरच्या काळात वारली माणुसकीच्या प्रकाशात उभा राहतो. शिव्या, मार हे नित्याचेच झालेले व्यवहार. शिवाय वारल्याचे कितीतरी अमानुष खून झाले असतील ते त्या जंगलातील झाडाझुडपानांच माहीत. 'नरेच केला हीन किती नर' ह्या ओळीचा अर्थ 'जेव्हा माणूस जागा होतो' हे पुस्तक वाचून आपल्यापुढे स्पष्ट उभा राहतो.

त्या जंगलातील, दऱ्याखोऱ्यातील अनाथ दुःखाला वाचा फोडताना गोदावरीबाईंना जे हाल सहन करावे

लागले त्यांचीही नोंद बाईंनी पुस्तकात केली आहे. अपमान, तुच्छता, विरोध, जाच सर्व सहन करावे लागले. त्यांना खुनाच्या धमक्या दिल्या गेल्या, तुरुंगात जावे लागले. त्या जडमूढ वास्तवाला स्वत्वाचा, माणुसकीचा आवाज देताना त्यांना नानाविध दिव्यांतून जावे लागले. त्यांनी जी मेहनत या आदिवासींसाठी घेतली त्याविषयी वाचून त्यांच्याविषयीच्या आदराने मन भरून येते... पण त्यांची मेहनत फळाला आली. जनावराप्रमाणे जीवन जगणारे वारली माणुसकीची, मानवी हक्कांची, न्यायाची भाषा बोलू लागले.

पुस्तकातील समजवादावरती अत्यंत छापील निष्ठा असलेल्यांनी मराठीत बरेच लेखन केलेले आहे. प्रत्यक्ष इथल्या जीवनाशी त्यांना काडीचाही संबंध नाही. येथील समाजवास्तवाशी ज्यांचा दुरूनही संबंध नाही त्यांच्या लेखनातील भूभाग आणि पोटतिडीक इथली नसल्याने खोटी ठरते. तशी ती कुठेही खरी ठरू शकत नाही. कारण ती छापील असते. प्रतिभेसाठी इतिहासात विसावा शोधणाऱ्या ऐतिहासिक कादंबरीकारांना, वरील समाजवादी लेखकांना हे लाजिरवाणे 'प्रत्यक्ष' कधीच कसे दिसले नाही ? "'लेखक' हे सुखाचे — दिल्या घेतल्याचे" हेच खरे का ?

आमच्याकडे सिद्ध, अंतर्ज्ञानी आणि दैवी सामर्थ्य असलेल्या अनेक व्यक्ती असल्याचे ऐकतो. त्यांनी केलेल्या चमत्कारांच्या कथाही वारंवार ऐकायला मिळतात. पण ह्या सर्वच शक्तीमंतांना मुंबईपासून साठ मैलांवर सुरू असलेले माणुसकीचे हे क्रूर विडंबन कसे दिसले नाही ? इंग्रजीमधील वाङ्मयीन क्लुप्त्यांची चोरटी आयात करणाऱ्या आमच्या चतूर लेखकांना हा जवळच चाललेला मानवतेचा विध्वंस, मानवी मूल्यांचा संहार कसा दिसला नाही ? त्या क्रूर दिवाळखोरांनी काढलेले त्या गरीब, निरपराध वारल्यांचे दिवाळे कसे दिसले नाही ? तथाकथित वाङमयत्वाचा वासच फक्त येणाऱ्या आजच्या साहित्याला हे प्रत्यक्ष जीवनाचे आव्हान स्वीकारता आले नाही ?

गोदावरीबाईंनी त्या भेसूर वास्तवाचे आव्हान स्वीकारले. कुठलीही पर्वा न करता ही बाई त्या भयावह जंगलातून, क्रूर, झिंगणाऱ्या जमीनदारांच्या दडपशाहीतून एकटी दुकटी फिरते; येणाऱ्या कितीतरी निर्वाणीच्या प्रसंगांना धैर्याने तोंड देते. गोदावरीबाईंच्या सदर पुस्तकाला वाङमयत्वाचा कुठलाही वास येत नाही. तिमिरापासून प्रकाशापर्यंतचा एक समग्र चित्रपटच इथे साकार होतो. हे लेखन म्हणजे माणूस जागा होण्याच्या कहाणीचा उच्चार आहे. वाङमयात आपल्याला जागा मिळावी म्हणून केलेली धडपड नव्हे.

सदर पुस्तकाचे जे रूप आहे तोच त्याचा जीवननिष्ठ घाट आहे. त्यातून वाहणाऱ्या जीवननिष्ठा, मानवी हक्का-न्यायासाठी, प्रतिष्ठेसाठी घेतलेले कष्ट हा ह्या पुस्तकातील प्रेरक जीवनगंध आहे. तो त्याचा अत्यंत प्रामाणिक आकृतिबंध आहे. तथाकथित वाङमयीन सौंदर्य (?) नाही म्हणून कुणी ह्या पुस्तकावर टीका करील. पण 'जेव्हा माणूस जागा होतो'ची कहाणी घडवणारी व लिहीणारी व्यक्ती माझ्या दृष्टीने फार मोठी आहे. शिवाय ती व्यक्ती कुठल्या पक्षाची धर्मा–पंथाची आहे हा विचार माझ्या दृष्टीने अत्यंत विनमहत्त्वाचा आहे. काळोखाचा वळी घेणाऱ्या प्रकाशाला मी फक्त प्रकाशच म्हणतो.

साहित्यापेक्षा, साहित्यिकापेक्षा मला माणूसच मोठा वाटतो. ह्या माणसासाठी जीवन वणव्यात भिरकावून देणारी व्यक्ती म्हणूनच मला मोठी वाटते. त्या व्यक्तीचे लेखन मला मानवी प्रतिष्ठेचे मोल पटविते. 'जेव्हा माणूस जागा होतो'ने मला असे मोल पटविले आहे. जीवनाच्या करूण आणि बेवारस हाक्याचा उच्चार मांडणारे हे लेखन माझ्या दृष्टीने म्हणूनच मला मोलाचे वाटते.

* *

जेव्हा माणूस जागा होतो : गोदावरी परुळेकर, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, गिरगाव, मुंबई–४ पृष्ठे १५९; किंमत १५ रुपये.

मराठी समीक्षेचे आदिपर्व : चिपळूणकर काल

कृ. पां. पाजणकर

'मराठी समीक्षेचे आदिपर्व' हा प्रा. भा. श्री. परांजपे यांचा प्रबंध. प्रा. परांजपे हे या भागात मराठी वाङमयाचे व्यासंगी अभ्यासक म्हणून विख्यात आहेत. प्राचीन मराठी वाङ्मयासोबतच आधुनिक मराठी साहित्य हाही त्यांच्या व्यासंगाचा व चिंतनाचा विषय आहे. त्यांचा हा प्रबंधही त्यांच्या आजवरल्या कीर्तीत भर टाकणाराच आहे.

पेशवाईच्या अस्तानंतर महाराष्ट्रात इंग्रजी राजवटीचा उदय व विस्तार झाला. गेल्या शतकाच्या पहिल्या अर्धकातच इंग्रजी राजवटीने येथे पक्के मूळ धरले होते. या इंग्रजी राजवटीने आपल्या सामाजिक जीवनाचा फार मोठा कायापालट घडवून आणला. एक प्रचंड वैचारिक मंथन सुरू झाले. जीवनमूल्यांच्या संदर्भात तर एक मोठी क्रांतीच घडून आली. आपले सबंध सामाजिक जीवन अंगोपांगाने ढवळून निघत होते. या जीवनमंथनातूनच नवे आधुनिक धर्तीचे मराठी वाङमय हळूहळू पण संथगतीने उदयास आले. आंग्लपूर्व काळातील वाङमय जुने किंवा प्राचीन ठरावे इतके हे नवीन उदयास आलेले वाङमय वेगळे निराळे होते. या आधुनिक वाङ्मयाचा जसजसा विकास व विस्तार होऊ लागला तसतशी त्यासंबंधींची चर्चा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष माध्यमातून होऊ लागली. वाङमयकार हे आपल्या अपेक्षा–आकांक्षा प्रस्तावनांच्या रूपाने सांगत होते. जाणकार संपादक आणि विचक्षण विचारवंत आपल्या प्रतिक्रिया सूचक स्वरूपात प्रकट करीत होते. काही उत्साही वाचकही आपल्या आवडीनिवडीची नोंद व्हावी म्हणून धडपड होते. या सर्व क्रियाप्रतिक्रियांच्या चर्वितचर्वणातून नकळत मराठी समीक्षेचा मूलस्रोत जन्म घेत होता. प्रा. परांजपे यांनी फार परिश्रमाने, गेल्या शतकात निरनिराळ्या निमित्तांनी व्यक्त झालेल्या विविध वाङ्मयीन आवडीनिवडी, अपेक्षा, आकांक्षा यांची सूक्ष्म छाननी करून, त्यांतून वाङ्मयीन समीक्षेचा धागा शोधन काढला.

प्रा. परांजपे यांनी पार पाडलेले हे काम अनेक दृष्टींनी अत्यंत अवघड होते. १८८१ पर्यंत निर्माण झालेल्या मराठी वाङ्मयासंबंधी व्यक्त झालेली मतमतान्तरे हीच त्यांची महत्त्वाची सामग्री होती. या काळात एक तर निर्माण झालेले वाङ्मयच काहीसे अपरिपक्व अवस्थेत होते. शिवाय असल्या वाङ्मयासंबंधी व्यक्त झालेली मते नैमित्तिक, प्रतिक्रियात्मक वा प्रासंगिक आवडीनिवडीच्या स्वरूपांची होती. कधीकधी तर ती अगदीच अप्रत्यक्ष रूपाने प्रकट झालेली असत. प्रा. परांजपे यांनी मोठ्या साक्षेपाने व चातुर्याने या विस्कळित व त्रुटित सामग्रीची छाननी करून त्यातील सुप्त समीक्षाविचारांचे सूत्र मांडून दाखविले.

आपले विवेचन प्रा. परांजपे यांनी चार प्रदीर्घ प्रकरणांतून विभागातले आहे. पहिल्या प्रकरणात त्यांनी आधुनिक वाङ्मयाच्या निर्मितीची सामाजिक पार्श्वभूमी विस्ताराने विशद केली आहे. हा काळ ऐहिक मूल्यांनी प्रभावित झालेला होता. या ऐहिक मूल्यांचे वाङमयातून होणारे नवनवे आविष्कार प्रा. परांजपे यांनी काळजीपूर्वक तपासले. नवनवीन रूपातून आविष्कृत होणाऱ्या ऐहिक मूल्यांची सुसंवद्ध संगती त्यांनी मार्मिकपणे लावून दाखवली आहे. कृष्णशास्त्री चिपळुणकरांचा 'आनंदवाद' लोकहितवादींचा 'उपयुक्ततावाद' किंवा कीर्तने–रानडे (वि. प.) आदींचा 'स्वदेशाभिमानवाद' यांच्यातील सुसंवाद व्यवस्थितपणे रेखाटण्यात प्रा. परांजपे यांना पुष्कळच यश लाभले आहे.

'नवी मूल्ये आणि जुनी कविता' या दुसऱ्या प्रकरणात प्रा. परांजपे यांनी प्रस्थापित होऊ लागलेल्या नवमूल्यांचा अधिक स्पष्टपणाने विचार केला आहे. इंग्रजी वाङमयविचार आणि इंग्रजी 'पांडित्य' यांच्या संपर्काने व प्रोत्साहनाने इकडील पारंपारिक दृष्टीत जो नवेपणा व व्यापकपणा येऊ लागलेला होता त्याची चर्चा लेखकाने सविस्तर केली आहे. या नव्या संस्कारित दृष्टीने तत्कालीनांनी जुन्या वाङमयाची जी समीक्षा केली तिच्यातून उद्भूत होणाऱ्या समीक्षा–मूल्यांचा शोध प्रा. परांजपे यांनी घेतला आहे. या काळात पाश्चात्यांना 'सर्वश्रेष्ठ' समजण्याची 'फॅशन' होती, असे गृहीत धरून त्यांनी नवसमीक्षादृष्टीतील

इंग्रजधारजिणेपणा 'वेचून काढण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, या काळातील वाङ्मयीन किंवा भाषिक कार्याचा व उपक्रमांचा आढावा त्यांनी फार परिश्रमाने घेतला आहे. रा. ब. रानडे, कुंटे, परशुरामपंत, तात्या गोडबोले, गणेशशास्त्री लेले, रा. व. पाळंदे, चिंतामणि पेठकर, शंकर पांडुरंग पंडित, रा. भि. गुंजीकर, दादोबा पांडुरंग आणि मिशनरी पंडित इ. वाङ्मयविवेचकांच्या मतांची लेखकाने पाहणी करून इंग्रजी आणि संस्कृत साहित्यमूल्यांचा तत्कालीन संकर उकलून दाखवला आहे. मात्र असे होताना पारंपारिक पक्षाला लेखकाच्या उदार हृदयाचा अधिक लाभ झाला, असे वाटल्यावाचून राहत नाही. 'पण नवल हे की, तुकारामाची मराठी टीकाकारांनी चालविलेली ही प्रशंसा त्याच्या कवितेशी इंग्रजी मूल्याच्या असलेल्या साधर्म्यामुळे वाहेर पडत होती; गुणाच्या जाणिवेने नव्हे.' (पान ६१–६२) असे प्रिय अनुमान मनात वागविणाऱ्या प्रा. परांजपे यांनी या प्रवृत्तीची टीका म्हणजे 'इंग्रजप्रणीत मताचे मराठी अनुवाद' ठरविणे, हेच त्यांच्या स्वीकृत तर्क-सरणीला धरून होणार! "या युगाला 'तमोयुग' म्हणून संबोधण्याचा वाङ्मयाच्या अभ्यासकांना, इति-हासकारांना जो मोह होतो" त्याचा आधार घेऊन प्रा. परांजपे यांच्यासारख्या साक्षेपी विवेचकानेही या युगावर अंधाराचा पडदा टाकला. असे का व्हावे, याचे मर्म प्रस्तुत प्रबंधाचा पुढील भाग वाचताच ध्यानात येते. प्रबंधाच्या उत्तरार्धात विष्णु कृष्ण चिपळूणकर यांच्या वाङ्मयविषयक विचारांचे मूल्यांकन करण्यात आले आहे. त्यात समर्थनाचाच भाग अधिक आहे. चिपळूणकरी 'साहित्यशास्त्र' मांडून दाखवण्यात प्रबंध-काराची प्रतिभा विशेष उत्साहाने रंगली असल्याने या 'साहित्यशास्त्रा'तील मनोहर वारकावे त्याने उत्तम टिपले आहेत.

गेल्या शतकातील मराठी समीक्षेचा सविस्तर व सूक्ष्म अभ्यास स्वतंत्र ग्रंथरूपाने उपलब्ध नव्हता. प्रा. परांजपे यांनी या ग्रंथाच्या निमित्ताने वाङ्मयाच्या अभ्यासकांना फार मौलिक साधन उपलब्ध करून दिले आहे. त्यांचे हे ऋण मराठी अभ्यासकांना मान्य करावेच लागेल. एक मोलाचा अभ्यासग्रंथ परिश्रमपूर्वक निर्माण करून मराठी भाषेतील विवेचक ग्रंथांत त्यांनी महत्त्वाची भर टाकली, यात संशय नाही. त्यावद्दल प्रा. परांजपे यांचे मनःपूर्वक अभिनंदन! उरलेली 'उपपर्वे' त्यांच्या-कडून लवकरात लवकर पूर्ण होवोत, अशी शुभेच्छा!

* *

'मराठी समीक्षेचे आदिपर्व' प्रा. भा. श्री. परांजपे, पद्मश्री प्रकाशन, हनुमान नगर, नागपूर–३, पृष्ठे १९२, किंमत ७.५० रुपये.

पुढील अंक : नाटक विशेषांक :

* **रुद्रवर्षा** (तीन अंकी नाटक)	: महेश एलकुंचवार
* **आजची नाटके**	: स्नेहप्रभा प्रधान
* **अवध्य आणि आजच्या नाटकामागील प्रेरणा**	: यशवंत मनोहर
* **गडकऱ्यांच्या प्रतिभेचे स्वरूप**	: त्र्यं. वि. सरदेशमुख
* **दारव्हेकरांची नाटके**	: वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे
* **तीन नाटिका**	: सरिता पदकी, शशिकांत नारायण केळकर, वसुधा पाटील
* **बेकेट**	: दि. ब. पंडित
* **ऋग्वेदकालीन नाट्य**	: हरिहर चंद्रशेखर घोंगे
* **माझे रंगमंचकीय दिग्दर्शन**	: पुरुषोत्तम दारव्हेकर

कालस्वर

अनंत अमदाबादकर

'कालस्वर' हे अतिशय आकर्षक नाव असलेले आणि पॉप्युलर प्रकाशनाने 'नवे कवी : नव्या कविता' ह्या मालिकेत प्रसिद्ध केलेले कवितेचे पुस्तक. पुस्तकाचे नाव आणि आतील मजकूर यांत पराकोटीची तफावत असणे ही गोष्ट जवळजवळ ठरून गेल्यासारखी आहे. नावाजलेले प्रकाशक आता कुठला वाङ्‌मयीन हैंदोस छापतील याचाहीं नियम राहिलेला नाही. प्रस्तुत पुस्तकाबाबत ही गोष्ट फारच खरी आहे. 'नवे कवी' यातील नवे या शब्दावर चार ओळी खर्च करणे व्यर्थ आहे. नव्या दमाचे म्हणून ज्यांची ओळख करून दिली जाते ते बहुधा नव्या दम्याचे निघतात.

'कालस्वर'मधील कविता वाचताना एक गोष्ट सहजच लक्षात येते की ह्या कवितांनी काही जुन्या व समकालीन कवितांचा संस्कार स्वीकारलेला आहे. भावडा स्वप्नाळू आशय, हळवेपणा, प्रणयालापविलाप, ऋतु-वर्णने, कवी म्हणून अनिवार्य असलेले निसर्गप्रेम आणि व्यथा–वेदना, सुखदुःख इ. भावजागृती सुलभ करणाऱ्या कल्पनांचा' घाऊक वापर करून लाडिक शब्दरचनेत तयार होणाऱ्या कवितांपैकीच 'कालस्वर' मधली कविता आहे. अशा कवितांमध्ये कवी स्वतःचा प्रतिध्वनी शोधत असल्याच्या किंवा स्वतःचा शब्द वेचित असल्याच्या खुणा आढळणे दुर्मिळच असते. शब्द व त्यात स्वतः-हूनच असलेला रूढ अर्थ, शब्दांना इजा होईल की काय ह्या कविमनाला साजेशा भीतीने माफकपणे वापरून कवितेचा चालू प्रकार बनवणे, भाषेशी या ना त्या संबंधाने लगट असणाऱ्या तांत्रिकाला फारसे अवघड नाही: आणि या दृष्टीने शब्दाइतके अबोल आणि निमूट असे वापरायला दुसरे काय आहे ?

परंतु इतके सोपे नसतात शब्द. 'शब्दब्रह्म' म्हणून ज्यांचा गौरव केला जातो ते शब्द प्रामाणिकपणे वापरले तरच शब्द असतात नाही तर 'ब्रह्म' बनून मानगुटीवर बसतात.

प्रस्तुत कवितासंग्रहात हेच घडले आहे. ह्या कवितांनी कालस्वर ऐकला नाही हे स्पष्ट आहे. कालस्वर हा शब्द मुखपृष्ठावर धंद्यासाठी बसविण्यात आला आहे. ह्या संपूर्ण कवितांतून कवी मुळापासून हादरला आहे, अस्वस्थ झाला आहे, सुखदुःखाच्या कुठल्या तरी धारदार क्षणांनी जखमी झाला आहे असे जाणवतच नाही. ह्या कवितांना केवळ उच्च मध्यमवर्गीय स्थूलता आणि सुखवस्तूपणाची कळा आलेली आहे. शब्दांत अभि-व्यक्तीची अपरिहार्यता जाणवत नाही आणि म्हणून शब्दही आपले स्वतःचे अर्थ उतरवून ठेवून नुसते लिपि-मात्र सांगाडे म्हणून कागदावर शिल्लक उरतात.

काही कवितांची ही शीर्षके पाहा—श्रावणसरी, काही सुचत नसते, ती न्हाते, पदर जळाला, ऊन, तुझे प्रेम पाहुनिया, तुझ्या प्रीतीने कळले, आज डोळा पाणी, आज माझे कोण, कळन न कळता, थेंब, यायची तू, वास फुलाचा घेताना, एक स्वप्न, व्यथा, पापणीच्या काठा-वर, आज हवेला, नाव न घेताच, कसे क्षणी भरे मन, भेटलीस तू, श्रावणसंध्या, मी पाहिलेली कळी, स्पंदन, वाट पाहता पाहता, कधी उमलले क्षण हे इ. शीर्षकां-वरूनही कविता कशी लाडे लाडे आणि हौले हौले वाव-रते हे लक्षात घेण्यासारखे आहे. यांतील प्रेम, सुखदुःख इ. भावनांचे स्वरूप स्थूल आहे. सोनकलश, फुलफुल-णारी, आरससरशी, सोनसाखळी, फुलपंखी मृदु, ध्यानलयी डोळे, इंद्रधनू, कवडसे, चंद्रमा, सैलसैलावगे इ. इ. अनेक (पाडगावकर फाउंड्रीतील) तरतरीत शब्दांचा वापर तर अमर्याद चेकाळला आहे. कल्पना-चमत्कृतीच्या बेबंद आणि बेताल हव्यासापायी विनोद-निर्मिती होण्यापर्यंत मजल गेली आहे. मासला द्यायचा झाला तर 'बेताल मी ! बेबंद मी !' ही कविता अडाणी कल्पनाविलासाने अतिशय थिल्लर व हास्यास्पद झाली आहे. नमुन्यादाखल त्यातील काही ओळी पाहा—

पृथ्वीस या चेंडूपरी लाथाडुनी देइन मी
बेताल मी ! बेबंद मी ! बेहोष मी ! बेफाम मी !
रक्तात या शक्ती असे, शक्तीत या युक्ती वसे
विश्वा, मला याच्यापुढे क्षुद्रा तुझी भीती नसे
काळा ! तुला एकाच रे घासामध्ये भक्षीन मी
बेताल मी ! बेबंद मी ! बेहोष मी ! बेफाम मी !
केली रतीला आजला मी मस्तकाखाली उशी
गारेप्रमाणे टाकिला मी आज खावोनी शशी
ही भावनांची अस्वले डांबून झालो मुक्त मी
बेताल मी ! बेबंद मी ! बेहोष मी ! बेफाम मी !

अहाहा ! काय हे कल्पनाचातुर्य ! मराठी वाचका, भाग्य तुझे !

आणि हा उल्हास सर्व संग्रहभर वेगवेगळ्या ढगांनी भ्रमतो. संकेतांना वह्यताडपणे चिकटून राहण्याची उदाहरणे तर सर्वत्र मिळतात. उदा०

वसुंधरेला इंद्रधनूचे स्वप्न गुलाबी पडे
(श्रावणसरी)

स्वप्न म्हटले की अर्थात् ते गुलाबीच पडायला पाहिजे. इंद्रधनूचे असले म्हणून काय झाले ? स्वप्नाचा रंग एकच. गुलाबी. (इथे स्वप्न जांभळे का नाही ? तांबडे का नाही ? असे प्रश्न विचारणे रसिकतेला सोडून होईल. मराठी साहित्यात तरी गुलाबी सोडून दुसऱ्या रंगात स्वप्न पाहिल्याचे उदाहरण नमूद नाही. "निद्रिस्त भूमिला स्वप्न जणो हे दिसले" अशी एक फक्त उल्लेखवजा नोंद बालकवींची आहे. त्यात वैद्यांनी इंद्रधनुष्य आणि गुलाबी रंग भरला, आणखी काय पाहिजे ?)

आणखी एक उदा. पहा—

व्यथेस फुटती ओठ दिशांचे
आ वासुन ती रडे उताणी (व्यथा)

आता व्यथेला उताणी करून रडविण्यात वैद्यांचा हेतू होता हे (व्यथा पालथी झाल्याशिवाय) कळायला काय मार्ग आहे ?

अशा स्थळांची मोजदाद नाही. आपण फक्त उदाहरणादाखल आणखी एक तऱ्हा पाहू. यात एखाद्या विषयावर कवी कल्पना करीत सुटतो. 'ऊन' ह्या कवितेत पहिल्या कडव्यात—

ऊन किती भोळसर
कळ्यावर उतरले

तेच दुसऱ्या कडव्यात—

बावळे भाबडे बनून खेळायला जाते

तिसऱ्यात—**धांदरट बनून गजावर आदळते,**
चवथ्यात—**वेंधळे होऊन कौलावर लवंडते,**
पाचव्यात—**ज्योतिष्याचे सोंग घेते,**
सहाव्यात—**ऊन बिचारे सरळ,**
धडा काही न शिकले असे होवून

सातव्या कडव्यात त्याला (उन्हाला) भणंग भिकारी बनवून टाकले आहे.

अशा तऱ्हेचे कल्पनाविलासाचे खेळ नाहीत असे पान कालस्वरमध्ये नाही.

अभंग वृत्तातही काही कविता संग्रहात आहेत. त्याबाबत एवढेच सांगण्यासारखे आहे की अभंग हे अतिशय साधे वृत्त असले तरी मजबूत आशयाशिवाय ते अभंग राहू शकत नाही.

चिंतनशीलता आणि तत्त्वस्पर्श यांच्या आभासाने कृतक्‌गांभीर्य निर्माण करण्याच्या खटपटीही अशाच फसलेल्या आहे.

भाषेसंबंधी 'शब्दकळा' असा शब्द वापरण्याची सोय नाही. शब्दसंग्रह मात्र कवीचा भरपूर आहे, आणखी तो वापरण्याचे तंत्रही कवीजवळ आहे, आणि म्हणूनच कवितेचा आभास वैद्य कालस्वरात निर्माण करू शकले आहेत.

एकूण शब्दसंमोहाने खुळी झालेली अशी ही कविता आहे. शेवटी या संदर्भात मला काही प्रेमळ सूचना कराव्याशा वाटतात.

(१) कवीने "प्राजक्त" हे टोपण नाव धारण करावे, कवीच्या तलम प्रकृतीला ते साजेसेच आहे.

(२) परीटदादा इ. काही कवितांचे नभोनाटचात रूपांतर करून त्यांना अधिक लोकसन्मुख करावे. शिवाय आकाशवाणीतर्फे (गोडच गोड) चाली लावून मिळण्याची सोय आहेच.

(३) प्रस्तुत पुस्तक राज्य साहित्य पारितोषिकासाठी अवश्य पाठवावे. (जेणेकरून त्यांना बक्षिस मिळून साहित्यिक मोक्षप्राप्ती होईल अशी आम्हाला उमेद वाटते).

आता प्रकाशकासंबंधी थोडेसे—'नवे—कवी : नव्या कविता' या मालेत सुरुवातीसच 'संध्याकाळच्या' कविता व 'रानातल्या कविता' हे दोन मातब्बर संग्रह प्रसिद्ध केल्यानंतर या मालेविषयी काही किमान अपेक्षा निर्माण झाल्या होत्या. काही जोमदार कवींचा शोध अपेक्षित होता. परंतु तसे न होता अतिसामान्य पद्य प्रकाशित करून प्रकाशन आपल्या प्रतिष्ठेचा गैरवापर करते व करू देते हे दिसून येते.

बाकी पुस्तकाचे मुखपृष्ठ, कागद, छपाई इ. सर्व अंगे कसोशीने जोपासली आहेत. मलपृष्ठावरील असंबद्ध मजकूर मात्र कुणी घासला हे कळण्यास मार्ग नाही. त्याखाली लेखकाचे नाव छापायला हरकत नव्हती. कदाचित पॉप्युलर प्रकाशनातील कोणी चाकर—समीक्षकाने तो लिहिला असावा.

शब्द नासवण्याच्या, कवितेसंबंधी भ्रामकता वाढविण्याच्या आणि वाचकांची रुची बिघडविण्याच्या उद्योगात सामील न झाल्याने पॉप्युलरचा धंदा बुडणार नाही, हे त्यांना आम्ही सांगावे असे नाही.

कवितेचा एक वाचक म्हणून कवितेसंबंधी प्रथमच लिहिलेल्या माझ्या मजकुरातील तळमळ वाचकांनी लक्षात घ्यावी एवढेच नम्रपणे सुचवावेसे वाटते.

* *

कालस्वर : शंकर वि. वैद्य
पॉप्युलर प्रकाशन, ३५—सी, ताडदेव रोड, मुंबई—३४.
पृष्ठे ८४; किंमत ३ रुपये.

तीन कवितासंग्रह

वसंत कृष्ण वऱ्हाडपांडे

: १

'अनिमिष' हा श्री. गोविंद कुळकर्णी यांचा एक वेधक कवितासंग्रह. सत्यकथा, प्रतिष्ठान, मनोहर या सारख्या प्रतिष्ठित नियतकालिकांतून प्रकाशित झालेल्या त्यांच्या कविता या संग्रहामुळे एकत्रित वाचण्याची सोय झाली आहे. संग्रहाची भलावणी करताना प्रा. सुधीर रसाळ यांनी श्री. कुळकर्णी यांची 'ही कविता निसर्ग-प्रतिमांच्या भाषेत बोलत जरी असली तरी ती विशुद्ध भावकवितेप्रमाणे केवळ संवेदन प्रतीतीच्या पातळीवर राहात नाही. त्या पलीकडे जाऊन ती एका मूलभूत आणि व्यापक अशा चिंतनाच्या पातळीवर स्थिरावताना दिसते. स्वतःचे अस्तित्व आणि 'आभाळा' पासून तो 'माती'पर्यन्तचे अपरंपार विश्व यांच्यातील नात्यांचा शोध ती घेऊ पाहते' असे म्हटले आहे. (विशुद्ध भावकविता केवळ संवेदनप्रतीतीच्या

पातळीवरच राहाते. त्यापलीकडे जाऊन ती मूलभूत आणि व्यापक अशा चिंतनाच्या पातळीवर स्थिर होत नाही. हा श्री. रसाळ यांच्या उपरोक्त विधानातून व्यक्त होणारा अभिप्राय अर्थातच विवाद्य आहे.) 'अनिमिष' हा संग्रह वाचत असताना मला मात्र प्रत्यय येत होता तो या कवितेच्या 'नाटकी' रूपाचा !

किंवहुना आजची बरीचशी कविता नाटकी आहे. आशयापेक्षा अभिव्यक्तीला गोंजारणारी आहे, प्रतिमांच्या रानात स्वत:लाच हरवून घेणारी आहे असे मला बरेचदा वाटते...'अनिमिष'मध्येही मला हेच आढळले. काळोख, सांज, आभाळ, चांदणे, क्षितिज, पाखरू इत्यादी शब्दप्रतिमांची चलनी नाणी आज काव्यव्यवहारात आवश्यकतेपेक्षा अधिक प्रमाणात आढळतात व म्हणूनच ती 'अर्थ' व्यवहारात नकोशी होऊ लागतात. 'ग्रेसं'च्या काव्यातून नव्याने या अशा प्रकारच्या प्रतिमासृष्टीचे प्रथमत: प्रभावीपणे दर्शन घडले व ते रसिकांच्या अंत:करणाला भिडले. कदाचित याच कारणामुळे असेल, अशा प्रतिमांच्या माध्यमातून अं:तकरणातील व्याकूळ उदासपणा अनाकलनीय भवानुभव व्यक्त करण्याचा मोह इतरांनाही होत असावा ! —

श्री. गोविंद कुळकर्णी यांच्या 'अनिमिष' या संग्रहाच्या संदर्भात हे विचार सुचावेत याचे कारण या संग्रहातील सर्वच कविता या अशाच 'प्रतिमा'धिष्ठित आहेत. किंवा 'प्रतिमासंपन्न' हा शब्द अधिक योग्य होईल. या कवितांवरील हा परप्रभावाचा पारदर्शक पडदा दूर सारून जर या संग्रहाकडे वळले तर रसिकांच्या मनाला वेध लावणारे काहीसे अशरीरी भावदर्शन या कवितांमधून निश्चितच घडून येते.

पंख मिटले तरीही आत असे डहुळले
खिन्न छायेत नभाचे जड काळीज हलले
गळाभर जळातून कुणीतरी हाक दिली
विद्रूपाच्या नग्नतेत सांजवेळ पाझरली...(पृ. १४)

अशासारख्या ओळी डोळे आणि मन क्षणभर बांधून ठेवतात. अशा बांधून ठेवणाऱ्या ओळी या संग्रहात सर्वत्र आहेत.

मात्र, या कवितांची विभागणी 'पापणीपलीकडे पसरलेली सायंकाळ', 'काळोख : काळोखासारखा', 'बुडून गेलेला मी. माझे डोळे', 'आभाळ; आभाळच आभाळ...' अशा पृथक विभागात का करावी आणि या विभागदर्शक ओळीच सलग क्रमाने छापून एका स्वतंत्र कवितेत त्यांची बांधणी संग्रहाच्या शेवटी का करण्यात यावी हे मला कळले नाही. (तसेच, संग्रहाच्या मध्येच पृ. ६१–६२ हे पूर्णत: कोरे का सोडले हेही समजले नाही.)– तरी पण, श्री. रसाळ म्हणतात त्याप्रकारची लक्षणीय रूप धारण करणारी शब्दकळा घेऊन अवतरलेली श्री. गोविंद कुळकर्णी यांची कविता मनाला वेधून घेते यात संशय नाही. आपल्यातील अर्थवलये रसिकांच्या मन:पृष्ठावर संथपणे पसरविण्याचे सामर्थ्य या कवितेच्या ठिकाणी आहे, यात शंकाच नाही. पण हे सामर्थ्य अजोड आहे व मराठी कवितेत काही अनोख्या जाणिवा प्रथमच इतक्या समर्थपणे व्यक्त होत आहेत, हा श्री. रसाळ यांचा अभिप्राय स्वीकारता मात्र येत नाही.

: २

'मनचि जाहले शब्द माझे' हा श्री. मधुकर पारळकर 'माधव' यांचा अभंग संग्रह. यापूर्वीच्या त्यांच्या रचना 'अभंग, श्लोकांजली, अभंगधारा' या संग्रहांतून रसिकांपुढे आल्या आहेत. मानवी मूल्यांच्या सिद्धांतावर अधिष्ठित अशी संतकवींच्या प्रकृतिधर्माशी तादात्म्य पावलेल्या मनोवृत्तीतून स्फुरलेले श्री. पारळकर यांचे उद्गार मराठी संतकवींच्या वैचारिक काव्यसंपत्तीचा वारसा घेऊन आलेले आहेत.

'प्रसवली माझ्या अंतरीची कूस
फुटले गर्भासी पंख माझ्या'

असे ते या अभंग निर्मितीबद्दल सांगतात. नामदेव, तुकारामादी संतांच्या एकतारीतून झरणारे भाव पारळकरांच्या अभंगांतून व्यक्त होत असल्यामुळे संतांच्या विश्वात्म कारुण्याचे व भाववळाचे दर्शन याही अभंगांतून घडते. मोजक्या शब्दातून व पारंपरिक परिभाषेतील क्लिष्टपणा टाळून केलेली ही अभिव्यक्ती आत्मचिंतनाभिमुखतेला चालना देते व जीवनविषयक सत्याकडे रसिकमनाला घेऊन जाते.

—मात्र हे भाववळ गाठीला बांधून प्रगट झालेले अभंगकाव्य भावभोळे व भावडे नाही. रोखठोकपणा येथे आपणाला सर्वत्र आढळेल. 'संसारीच आहे मोक्षाची साधना' हा श्री. पारळकरांचा विश्वास असल्याने

ऐहिकाच्या नावाने बोटे मोडण्यात त्यांची वाणी शिणलेली नाही. विश्वासाठी अविभक्त होणे ही देवभक्ताची खूण ते ओळखतात व त्यामुळेच त्यांचे हे अध्यात्मवादी काव्य ऐहिकाधिष्ठित झाले आहे. 'खापराचे कलश मांडून मंगल आकाशाची प्रस्थापना' करण्याची इच्छा बोलून दाखविणाऱ्या ह्या कवीच्या सहस्रावधी अभंगांतील एकशे अठ्ठावीस अभंगांची ही गाथा आजच्या अनोख्या कवितासृष्टीत वेगळेपणाने उठून दिसेल यात शंका नाही.

: ३

'मधुघट' हा श्री. म. दि. गिरडकर यांचा स्फुटकवितांचा चिमुकला संग्रह. त्यांच्या निवेदनानुसार या मधुघटात ग्राम्य (ग्रामीण) जीवनाचा मधू आढळेल. काव्यलेखनाच्या प्रारंभकालातील या रचना आविष्काराच्या दृष्टीने विशेष लक्षणीय नसल्या तरी मानवतेसाठी तळमळणारा कवीचा आत्मा या संग्रहातून व्यक्त होतो. श्रमिक–कृषिक इत्यादी उपेक्षितांच्या जीवनावरील, तसेच सरकारी योजनांचा पाठपुरावा करणारी कविता या संग्रहात यामुळेच बरीच आढळते.

* *

---

१. 'अनिमिष' गोविंद देशपांडे, प्रकाशक : विजय पाडळकर, 'भाग्यश्री', गणेशनगर, नांदेड. पृष्ठे ६४ किंमत ५ रुपये.

२. 'मनचि जाहले शब्द माझे' मधुकर पारळकर, नृसिंह प्रकाशन, सुभाष मार्ग, नागपूर–१. पृष्ठे ६६ किंमत ५ रुपये.

३. 'मधुघट' : म. दि. गिरडकर, उल्लास कवि मंडळ केळवद, जि. नागपूर, पृष्ठे ३६ किंमत रुपये १.५०.

ग्लोरिया

सुधाकर जोशी

प्रथमत: हे सांगून टाकायला पाहिजे की ग्लोरिया हा नुसता कवितासंग्रह नाही. सत्याऐंशी कविता व बारा रेखाटणे असा तो कविता व रेखाटणांचा संग्रह आहे. कवितांतून व रेखाटणांतून धुरींच्या एकंदर संवेदनेची समानशीलता जरी व्यक्त होत असली तरी रेखाटणे ही काही कवितांचा आशय स्पष्ट व वळकट करण्यासाठी किंवा अंतर्गत सजावट इत्यादी दुय्यम हेतूंची पूर्ती करण्यासाठी अंतर्भूत करण्यात आली आहेत असे समजणे अन्याय्य होईल. कदाचित धुरींच्या समग्र प्रतिभेच्या स्वरूपाचे आकलन व्हावे असाही ह्या योजनेचा उद्देश असेल. किंवहुना हाच उद्देश एकमेव असावा. तेव्हा समीक्षणाच्या सोईच्या व प्रामाणिकतेच्या दृष्टीने ह्या संग्रहाचे समीक्षण नेहमीच्या चाकोरीने म्हणजे थोडेसे कवितेविषयी, थोडेसे रेखाटणांविषयी लिहून जाणे, तेही साहित्यसमीक्षकाने, [कलासमीक्षकाने नव्हे] असे व्हायला नको. कवितांचे मूल्यमापन वेगळे व रेखाटणांचे मूल्यमापन वेगळे व्हायला पाहिजे.

आताशा कवी कविताही करतात, रेखाटणे व चित्रेही काढतात, समीक्षाही करतात, कथाही लिहितात. अष्टपैलू व्यक्तित्वाचा हा विलक्षण सोस समीक्षेला वाहून घेणाऱ्या काही मान्यवर व्यक्तींनाही आहे. कथा, नाटिका, एकांकिका, चित्र, शिल्प सर्वच प्रांतांतून आपण लीलया विहरू शकतो असे दाखविण्याच्या हव्यासापायी अष्टपैलू व्यक्तित्वही घडत नाही व एकंदर कला–वाङ्मय आदी सृजनाच्या शाखांचे नुकसानही होते. त्या त्या व्यक्तीच्या एकूण संवेदनेचा तो, माझ्या मते, अपव्यय ठरतो. सृजनाच्या विविध प्रान्तात वृथा हस्तक्षेप करण्यापेक्षा, जाणीव व तिच्या अभिव्यक्तीला जवळचे माध्यम स्वीकारणे, साहित्य किंवा निर्मितीच्या कोणत्याही प्रांताच्या समृद्धीसाठी जास्त पोषक राहील. नाही तर कालान्तराने सर्वच क्षेत्रात प्रतिभेचा (Capabilityचा) पातळ आविष्कार दिसून येण्याची (एक) व जे एका विभागात व्यक्त होते तेच थोडे वेगळ्याप्रकारे [माध्यमाच्या भिन्नतेमुळे] दुसऱ्यातही व्यक्त होऊन तोचतोपणाचा (Monotony) दोष माथी येण्याचा अशा (दोन) अवांछनीय शक्यता नाकारता येत नाहीत. धुरींच्या रेखाटणांच्या निमित्ताने प्रस्तुत विचार मनात आले.

गेल्या वर्षात बरेच कवितासंग्रह प्रसिद्ध झाले. मराठीतल्या मातब्बर प्रकाशकांपासून तर प्रकाशन-क्षेत्रात नव्यानेच पाऊल टाकणाऱ्या प्रकाशन संस्थापर्यंत (उदा. माग्रस) व शिवाय स्वत:चा संग्रह स्वत:च काढणाऱ्या घुरींपर्यंत अशा संस्था व व्यक्तींकडून संग्रह निघाले. ह्या बहुतेक संग्रहात घुरींचा संग्रह त्यांच्या कवितेविषयीच्या अपेक्षा उंचाविणारा आहे. संग्रहातील कविता ह्या तशा पूर्वीच सत्यकथा, प्रतिष्ठान, नवी दिल्ली वगैरेतून वाचनात आल्या आहेत. काही कविता सोडल्या तर बहुतेक सर्वच कवितांतून अस्तित्ववादी जाणीवेचा व तन्निर्मित नकारात्मकतेचा वावर आहे.

या संग्रहाचे वैशिष्ट्य असे की, मानवी जीवनात, विरोधात्मक पण अपरिहार्यपणे उगवणारे प्रसन्नता व विषण्णता यांचे सूर ह्यात अतिशय हळुवारपणे आणि उत्कटतेने फुंकले आहेत.

ग्लोरिया कवितेनंतर येणाऱ्या तीन-चार कविता आणि नंतरच्या भागातल्या काही कविता ह्या निसर्ग वस्तूंच्या [गवत, फुले, रानफुले, बाग, फुलपाखरे, पिवळचा जर्द पाकळचा, रंगाच्या धारा, दूरस्थ ताऱ्यांचे शुभ्र हास्य इ. इ.] प्रतिमायोजनांतून मानवी स्वभावातली मूलभूत प्रसन्नता प्रतिबिंबित होते.

ह्या मूलभूत प्रसन्नतेबरोबरच जीवनात उशीरा का होईना पण अटळपणे डोकावणाऱ्या विषण्णतेची बीजे पेरली गेली असतात. तिचे सर्वव्यापी आविष्करण मात्र व्यक्तीच्या विकासाबरोबर त्याच्या जीवनात तयार होत गेलेल्या अनेकविध व अनेकपदरी न्यूनांच्या कमीअधिक तीव्रतेवर अवलंबून असते. अनुभव दाहक व उदास करणारे, चैतन्याचा स्रोत रुद्ध झालेला, भविष्यात बोट दाखविण्यासारखे काहीही नाही, आणि वर्तमानकाळी अस्तित्वही तितकेच बेसूर : ["साऱ्याच बेसूर लयींच्या गुंता झालेल्या रेषा"] ह्या साऱ्यांच्या रसायनातून विषण्णतेने ओतप्रोत भरलेली दुसऱ्या प्रकारची कविता निर्माण होते. ग्लोरिया मधल्या बहुतांश कविता ह्या विषण्णतेला शब्दांकित करणाऱ्या आहेत. त्यात काही ठिकाणी स्वत:च्या अस्तित्वाबद्दल विस्मित होऊन विचारलेले, अनेक संदर्भांना स्पर्शणारे प्रश्न ('यात्रा') तर सकृतदर्शनी चैतन्याने भरलेले वास्तव हे अंती एका विराट ओसाडीचाच एक भाग बनणार असते. आपल्या वैयक्तिक अस्तित्वात चैतन्याचे, (बागेचे) काही मोजके क्षण सोडले तर बाकी सर्व अंधारजगाचे खाजगी प्रदेशच असतात. ही भयप्रद मी अस्वस्थ करणारी जाणीव घुरींना एवढी उत्कट व सर्वव्यापी वाटते की ती त्यांनी रेखाटलेल्या स्त्री-पुरुष संबंधाच्या संदर्भात सुद्धा प्रकट होणे अपरिहार्य असते. एकांतात दोघांची शरीरे तापली असतानाचे क्षण टिपतांना 'सरल्या सायंकालीन', 'मरणे', 'वासनेनी धगधगलेली शरीरे म्हणजे जणू पेटलेल्या चिताच', अशा मरणाचे संकेत प्राप्त झालेल्या कल्पना घुरींना सुचतात. ह्या विषण्णतेवर मात करणारा एकादा Transcendental क्षण घुरींना गवसतो. [माझे शब्द उच्चारतील यापुढे] पण तो विरळा.

घुरींच्या कविता वाचताना आणखी एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते. ती म्हणजे सध्या गाजत असलेल्या काही कवींच्या व घुरींच्या अभिव्यक्तीतील फरक. डहाके, काळसेकर, गुर्जर, ओक, खोत, ढसाळ, आर्दीच्या कवितांतून जो संताप, आक्रस्ताळेपणा, चिडचिडा उद्वेग, आणि भडकपणा व्यक्त होतो आणि तो व्यक्त करण्यासाठी जी शब्दकला राबविण्यात येते ती प्रस्तुत कवितेत जवळपास नाहीच. गाडी रूळ बदलताना सांध्याच्या होणाऱ्या खडखडाटासारखे आवाज कानावर वरील कवींच्या कविता वाचताना होतो. आक्रोश, आकान्त, अनेकविध व्यथा, भीती, संताप, मानवी जीवनाचे क्षुद्रपण त्याचा उपहास व नैतिकतेचे फोलपण, विसंगती (उक्ती व कृतीमधील) व त्यावरचे भेदक, विकट भाष्य, हे सर्व शब्दबद्ध करताना जी शब्दकळा ह्या ग्रुपची तयार होते ती फार प्रक्षोभक असते. डुक्कर, लांडगे, मुजोर, भडवे, शिस्न, हिजडे, छिनाल, प्रेतकळा, मांस, पूं, वगैरे पूर्वी फारसे वापरात (पुस्तकातून) न आलेले व म्हणूनच की काय ताज्या दमाचे शब्द वाचकाला स्तिमित करून त्याच्या संवेदनेला एक निश्चित स्वरूपाचे आवाहन करतात. भाषेच्या निवडीबद्दल आक्षेप मुळीच नाही. भाषा ही अखेर वाहन असते. ज्याने त्याने आपले वाहन निवडावे. पण एक विशिष्ट प्रकारची शब्दकला जेव्हा अनेकांच्या मालांची ने आण करणारी मालगाडी बनते तेव्हा तिच्यावर मर्यादा पडतात. तिला परिभाषेचे रूप येते आणि इतकेच नव्हे तर कवीच्या जाणीवा व्यक्त करण्यापेक्षा वाचकाच्या त्या त्या शब्दांशी निगडित असलेल्या विकारांना चिवडण्याचेच सामर्थ्य फक्त तीत शिल्लक राहते.

पुष्कळदा ह्यामुळे खरे प्रचीतीचे बोलणे आणि शब्दांची झूल पांघरून साहित्यात केलेले अतिक्रमण ह्यांतील फरक ओळखू येणेही कठीण होते. तेव्हा सध्या सर्रासपणे वापरात येणाऱ्या भाषामाध्यमाच्या मर्यादांच्या व त्यामुळे कवितेत आलेल्या निष्प्रभतेच्या (काही प्रमाणात) पार्श्वभूमीवर धुरींची रचना बरीच वेगळी व ताजी आहे. धुरींची रचना विलक्षण संयमित, कमी प्रक्षोभक परंतु आवाहनक्षमता तिळमात्र कमी नसलेली, संथ, सूचक, आंतर्लय असलेली आहे. मृत्यूचा संकेत धुरी 'हातापायातील रक्तवाहिन्यांवर । काळे पक्षी येऊन बसतात' सारख्या ओळीतून, किंवा व्यक्तीच्या खाजगी जगाचा विध्वंस झालाय हे सत्य, 'मनात साद नाही । दाद नाही । आवाज नाही । नुस्तं सूर्याखाली । सर्वदूर पसरलेलं जळकं गवत । आणि काही पक्षांची पिसं ।' अशा सूचक निसर्गप्रत्ययी प्रतिमांकनातून ध्वनित करतात. सर्व वस्तूंचा, जीवंतपणाचा विलय होणे अटळ आहे. मृत्यूचा थंड, गोठविणारा स्पर्श, सर्पसुंदर, वाईट, कठीण, मृदु वस्तूंवर पसरणार आहे. ह्या सत्याची भेदकता धुरी; 'एकटक पाहाताय या शहराचे डोळे । वास्तूतून रस्त्यातून बागांतून । अनवाणी हिंडणारी । ओसाडी 'सारख्या प्रत्ययकारी ओळींतून व्यक्त करतात. [ह्या ओळी वाचताना Ten Commandments' ह्या बायबलवरील चित्रपटातील, शहरातील रस्त्यारस्त्यातून हळूहळू वाहत पसरणाऱ्या प्लेगचे (मृत्यूचे) दृश्य आठवले.]

धुरींची कविता ही Controlled Rhythm ची कविता आहे. वास्तविक सुंदरतेचे व शारीर जाणीवा भोगण्याच्या उत्कट क्षणांचे किंवा नैराश्याचे दर्शन प्रतिमांचा–लखलखाट पद्धतीने त्यांना करायचे नाही. त्यांचे कविताविषय (आशय व अभिव्यक्तीचे द्वैत सोईसाठी थोडा वेळ मानले तर) जरी अद्यावत जाणीवांचे आलेख असले तरी त्यांचे कथन त्यांच्या संयमितपणामुळे व सूचकतेमुळे जास्त खोल, देखणे झाले आहे.

इलीयट, विल्यम्स, एझ्रापाउंड, मॅक्लीश, कमिंग्जच्या Broken Images and Tortured Rhythmच्या युगातच फ्रॉस्टची साधी, सरळ, सुंदर व अर्थाचे अनेक पदर असलेली सोपी व जुनी वाटणारी कथात्मशैलीने (Story telling) सामोरी येणारी कविता घडत होती. कवितेच्या प्रकृतीत रुक्ष सोपेपणा किंवा ढिसाळपणा न आणता तिला नव्याने स्वीकरणीयता (acceptability) प्राप्त करून देण्यात फ्रॉस्टचे जे स्थान अमेरिकन साहित्यात आहे तेच स्थान मराठी साहित्यात धुरींना मराठी कवितेच्या संदर्भाने मिळायला हवे. दुर्बोधतेचे कवच पांघरून समस्येसारखी त्यांची कविता वाचकासमोर उभी ठाकत नाही. मराठी कवितेत निरोगी वळणाची धुरींची कविता, कविता या प्रकाराबद्दलच अपेक्षा उंचावणारी ठरावी.

* *

ग्लोरिया (काव्य) गुरुनाथ धुरी, प्रकाशक : गुरुनाथ धुरी; मराठी विभाग, संघ लोकसेवा आयोग, नवी दिल्ली–११, पृष्ठे १२४, किंमत ५ रुपये.

जपान जसा दिसला

योगेश बऱ्हाणपुरे

आधुनिक पिढीला ज्या मोजक्या देशांबद्दल कौतुकयुक्त आदर आहे त्यांत जपानला अग्रक्रम आहे. दुसऱ्या महायुद्धात कोळसा–राख झालेला केवळ पंचवीस वर्षांत जागतिक औद्योगिक साम्राज्याचे नेतृत्व करण्याची ईर्षा बाळगतो म्हणून आदर आणि इवली विटकी विटकी माणसे हे गतवैभव प्राप्त करू शकतात याचे कौतुक. जपानचे सगळेच काही और दिसते. एकीकडे बौद्ध तत्त्वज्ञान, संस्कारांनी पावलोपावली लवणारा जपानी समाज शांतताप्रिय पौर्वात्य म्हणावा की पाश्चात्य संस्कृतीचा अर्क पचविणारा अत्याधुनिक पाश्चिमात्य म्हणावा याच संभ्रमात आपण राहतो. सतत ज्वालामुखी, भूकंप, वादळे यांना तोंड देत उन्नत असलेल्या, निसर्गाशी युद्ध मांडलेल्या या देशाने फुलदाण्या सजविण्याबाबत, फुलांना त्यांची नैसर्गिकता प्राप्त करून देण्यातही आघाडीच मारली आहे. उगवणे हा जपानचा धर्म आहे. उगवत्या सूर्याच्या, सूर्यपुत्रांच्या या विलक्षण देशाबद्दल कमालीची जिज्ञासा असणे अपरिहार्यच आहे.

जपानच्या औद्योगिक, भौगोलिक, तांत्रिक प्रगतीची माहिती संबंधितांना मराठी, इंग्रजीत प्राप्त आहे. पण सामान्य नागरिकाला जपानची माहिती करून देण्याचे महत्त्वाचे काम श्री. रवीन्द्र केळेकर यांनी पार पाडले आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

अतिशय साध्या, सरळ, रसाळ भाषेतील हे पुस्तक सर्वसामान्य भारतीयांपर्यंत पोचविण्याचे कार्य झाले पाहिजे.

श्री. केळेकर मूलत: श्रद्धावान, आध्यात्मिक पिंडाचे दिसतात. गोव्यासारख्या निसर्गाच्या काव्यात रुजलेले त्यांचे अंत:करण निसर्गवेडे असल्यास नवल नाही. जपान जसा दिसला हे सांगताना त्यांनी गद्यकाव्याचे सुंदर नमुने ठिकठिकाणी सादर केले आहेत. जपानच्या सांस्कृतिक जीवनाबद्दल जिज्ञासा त्यांच्य ाठायी आहे व जपानची अध्यात्मिक प्रकृती शोधण्याचा त्यांचा प्रयत्न सतत जाणवतो. त्या भारतीय जनकत्व असलेल्या, जपानच्या जीवनात पावलोपावली पालवणाऱ्या बौद्धधर्माचे जपानी समाजजीवनावर झालेल्या खोल संस्कारांचा साक्षात्कार त्यांना हरघडी होतो. शिन्तो धर्माचे शिष्टाचारांवर झालेले संस्कार, व ते अद्यावत ठेवण्यासाठी १९४३ मध्ये शासनाने नेमलेली समिती अशा क्षुल्लक वाटणाऱ्या पण जपानी जीवनात खास महत्त्व असलेल्या गोष्टींचीही नोंद घेतली जाते. वर्तमान जपानची ओळख करून घेतानाच ऐतिहासिक संदर्भ मोजक्या शब्दात देऊन भूत–वर्तमानाचे धागे जोडून घेतले आहेत.

या छोटया छोटया बेटांनी बनलेल्या देशात निसर्गाचे विलक्षण चमत्कार पहावयास सापडतात. त्यांचे चित्रदर्शी वर्णन पुस्तकात आहे. एका ठिकाणी एखादा चौकोनी तुकडा बर्फाचा तर अगदी जवळच गरम पाण्याचे झरे, दुसरीकडे जवळच धगधगत्या ज्वालामुखीचे अग्निरसाने माखलेले सुस्कारे सोडणारे गडगडणारे रौद्र रूप. जपानचा विलोभनीय निसर्ग हे श्री. केळेकरांचे खास आकर्षण अफाट पसरलेले तोक्यो शहर, जपानचा मानबिंदू असलेला फुजी पर्वत, आसो ज्वालामुखी, बेप्पू, शिकोकू बेटे, घरांच्या डोक्यावर उगवलेल्या बागा, गेयशा प्रथा, जपानी लोकांचे छंद यांचे वर्णन मुळातूनच वाचले पाहिजेत असे आहे.

हे सगळे वाचावे आणि संपविल्याशिवाय खाली ठेवू नये असे असले तरी काही कमतरता निश्चित भासते. ती म्हणजे जपानची ओळख एका निसर्गवेडया, श्रद्धाळू व्यक्तीने केले आहे. पाश्चिमात्य प्रभावाखाली दडपल्या गेलेल्या जपानात मिशिमा सारख्या लेखकाचे दु:ख कोणत्या प्रकारचे आहे; ही सर्व आर्थिक सुबत्ता असतानाच तिच्या तोडीस तोड असणारी मानवी दु:खे, प्रश्न, आपल्या व्यक्तिमत्वाचा शोध घेण्याची जपानी माणसाची धडपड यांची फारशी माहिती मिळत नाही. कदाचित श्री. केळेकरांचा कार्यक्रम त्या दृष्टीने आखलेला नसावा, कदाचित ते म्हणतात त्याप्रमाणे 'जपानमध्ये प्रत्येकाचा एक समूह असतो, त्या समूहाबाहेर जपानी माणसाला व्यक्ती या नात्याने स्वतंत्र स्थान नाही. व्यक्तिवादाचा संस्कार राष्ट्राच्या मानसावर नाही' हेही खरे असावे.

एक वाचनीय, माहितीपूर्ण पुस्तक उपलब्ध करून दिल्याबद्दल लेखक प्रकाशकांचे अभिनंदन !

* *

जपान जसा दिसला : रविन्द्र केळेकर,
कॉंटिनेंटल प्रकाशन, टिळक रोड, पुणे ३०
पृष्ठे १८०. किंमत ६ रुपये.

मुंगी उडाली आकाशी

शं. वि. जोग

मराठी माऊलीच्या थोर परंपरेतील एका महान् दैदिप्यमान् अमर चरित्राचे पद्माकर गोवईकर यांनी समरसून, काव्यमय भाषेत केलेले हे आख्यान. ज्ञानदेवांच्या व त्यांच्या भावंडांच्या अपूर्व जीवनातील पाने तन्मयतेने, यथोचित नाटचमयतेने आणि हळुवार हाताने उलगडण्याचा प्रयत्न लेखकाने येथे केला आहे. ज्ञानदेवांच्या अलौकिक व असामान्य जीवनगाथेला व तत्त्वज्ञानाला कलात्मक सूचकतेने कथारूप देणे याला प्रतिभेची असाधारण झेप पाहिजे. ज्ञानदेवांची कला, जीवन व त्याची अर्थगंभीरता, त्यातील अध्यात्मगूढता आपल्या शब्दकलेच्या पलीकडे आहे असे वाटते. तरीही या अलौकिकातील मूलभूत मानवी प्रेरणा, समस्या व प्रसंग चित्रित करताना, वैश्विक पार्श्वभूमीवर, कलात्मक समतोल व संयम राखून पर्याप्त यश कादंबरीकाराने मिळविले आहे असे म्हणावयास हरकत नाही. अर्थात् श्रद्धाळू भारतीय मनाला अशा संतचरित्रांची गोडी अवीट वाटते व कितीही वेळा ती गाईली, रचली तरी त्याची ओढ कमी होत नाही.

ही सबंध कथाच हृदय गलवलून टाकणारी. प्रसंग जिवंत व प्रत्ययकारी. काळजाला भिडणाऱ्या व दारुण वास्तवाला प्रगट करणाऱ्या घटना या सर्वांना एकत्र गुंफण्याची लेखकाची कलात्मक कुशलता जाणविल्याशिवाय रहात नाही. कादंबरीची सुरवातच नाटचमय प्रसंगाने झाली आहे. श्रीपादस्वामींनी सहज अजाणता रुक्मिणीला दिलेला आशीर्वाद, 'पुत्रवती भव'.. जणू दु:खपूर्ण भविष्याची नांदीच. काही प्रसंग विशेष चटका लावून जातात. घर सोडताना रुक्मिणीची झालेली कालवाकालव, मुक्ताची भुकेची तळमळ, ज्ञानदेवांचा भिक्षुकांनी केलेला अपमान आणि व्रात्य अवखळ मुलांनी त्यांच्यावर केलेली चिखलफेक, मुक्ता व निवृत्तीची आजोळी भेट, ज्ञानदेवांच्या समाधीच्या वेळचा करुणरम्य प्रसंग इत्यादी इत्यादी.

कादंबरीच्या अर्ध्या भागापर्यंत वाचकाला खिळवून टाकणारी व्यक्ती म्हणजे प्रथमत: पतीच्या विरहामुळे निर्माल्यवत् जीवन कंठणारी रखुमाई. संन्याशाची बायको म्हणून गावाने जिला विधवा ही कटू संज्ञा बहाल केली त्या रखुमाईचे पात्र कथेचे मध्यवर्ती सूत्र बनून राहते. तिच्या आंतरिक ओढाताणीचे, दु:खावेगाचे शब्दचित्र परिणामकारक झाले आहे. उदासीनतेची छाया ग्रासत असतानाही नक्षत्रासारख्या मुलांच्या भविष्याकडे पाहून, दु:खाचा प्याला पिऊन प्रसंगाला धीटपणे तोंड देणारी रखुमाई वाचकाला बांधून ठेवते. रूढ, जरठ, कालबाह्य धर्मकांड व विवेकशून्य अर्थहीन आचारधर्माने रखुमाईची झंझावातात इतस्तत: फेकल्या जाणाऱ्या पानाप्रमाणे केलेली पराधीन अवस्था वाचकास कासावीस केल्याशिवाय राहत नाही. एक दीन, सात्विक, सज्जन, संसारतापाने चित्त भांबावलेला माणूस म्हणजे विठ्ठलपंत. परिस्थितीच्या भोवऱ्यातून बाहेर पडण्याचा एकच मार्ग म्हणजे प्रस्थापित सामाजिक, धार्मिक शक्तींना शरण येणे. विठ्ठलपंत व रखुमाई यांचा पतिपत्नी या नात्याने घडलेला संबंध एका विराट, अटळ, अदृश्य जीवनशक्तीच्या लीलेचा एक भाग बनून जातो. त्याकाळी समाजाने वाळीत टाकणे म्हणजे किती भयंकर, अपमानास्पद, मरणप्राय अनुभव असतो याची प्रतीती विठ्ठलपंत रखुमाई यांच्या कष्टप्रद जीवनकहाणीतून पुरेपूर येते. निरर्थक, लब्ध प्रतिष्ठितांनी झिडकारलेले, पतित ठरविलेले जीवन जगताना रखुमाईच्या अंत:करणाची झालेली काहिली व तळमळ वाचकाला हलवून सोडते. (हा सामाजिक बहिष्काराचा दु:सह प्रकार आपल्या परंपरानिष्ठ व विषम समाजात काही वर्षांपूर्वीपर्यंत पहावयास मिळत होता.) ज्ञानदेवांचा इतक्या लहान वयातला समतोल, विवेक व मनाची शांती त्यांच्या योगी वृत्तीचा प्रत्यय आणून देत असले तरी निवृत्तीची बंडखोरी, पोडतिडीक व अन्यायाची चीड वाचकाच्या मनाला भिडल्याशिवाय राहत नाही. तरुण जिवंत मनाची साक्ष पटविणाऱ्या या गोष्टी आहेत. 'आपल्याला धर्मात जागा नाही' ही वडिलांची लाचार वाणी ऐकून तो खवळून ओरडतो, 'ते कोण आम्हाला प्रवेश वा बंदी करणारे?' सडेतोड, स्पष्टवक्ता निवृत्ती 'नमस्कार चमत्काराला होतो जाणीवेला नाही' हे ओळखून आहे. सर्व धर्ममार्तंडांच्या शुष्क काथ्याकूटात व दुराग्रही आचरणात सत्प्रवृत्त, भूतदयेने प्रेरित झालेल्या बळवंतशास्त्र्याची व्यक्तिरेखा मनावर आगळा परिणाम करून जाते. विसोबा सावकार उर्मट, अहंकारी, कर्मठ ब्राह्मण्याचा प्रतिनिधी.

त्याची स्त्री सरस्वतीबाई तशीच निर्दय व उद्धट. या संतापकारक पार्श्वभूमीवर एका अशिक्षित कुंभारणीची सक्रिय व सहजस्फूर्त सहानुभूती अधिकच प्रभावित करते. दुःख, विषाद, करुणा, सहानुभूती, संताप व मनुष्य जीवनातील केव्हाना केव्हा जाणवणारा एकाकीपणा व अगतिकता या मानवी भावनांनी कादंबरीच्या कथानकाला चिंतनाची बैठक लाभली आहे.

मानवतेचे अधिष्ठान गमावलेल्या जीर्ण, भग्न व खंडित समाजाचे व माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारणाऱ्या बंदिस्त मनोरचनेचे प्रतिबिंब पानापानातून पडलेले आढळते. पण त्या वेळच्या सामाजिक व आर्थिक विषमतेची कारणमीमांसा कथाप्रवाहातून अधिक व्यापकपणे अनुस्यूत झाली असती तर त्याची वैचारिक बैठक जास्त सघन व चिंतनीय झाली असती. पुस्तकाचा पुढचा अर्धा भाग नेहमीच्या परिपाठातील प्रसंगांनी परिपूर्ण झाला आहे. रेड्याच्या मुखातून वेद वदवणे, भिंतीचे उड्डाण, नामदेवासह भारताची परिक्रमा, भक्ति-ज्ञानविषयक संवाद, निवृत्ति–ज्ञानदेवादिकांच्या नामाभिधानाचे साधनमार्गावरील रूपकात्मक विवरण इत्यादी. अशा अतिपरिचित पारंपारिक व अंधश्रद्ध तुकड्यांमुळे पुढील भागात कथा उतरलेली वाटते. भावना व भक्ती यांचे महत्त्व ठेवूनही लेखकाला बुद्धिनिष्ठ वाचकाला समाधान देता आले असते तर जास्त बरे झाले असते.

गोवईकरांचे शब्दसामर्थ्य प्रभावी आहे. वर्णनशैली वातावरणनिर्मिती करण्यात सफल झाली आहे. निसर्गाचे वर्णन वास्तविक व हुबेहूब वठले आहे. मानवांच्या सुख-दुःखाशी निसर्गाचे नाते जोडून देऊन बऱ्याच ठिकाणी Pathetic fallacy चा उत्कृष्ट परिपोष साधला आहे. एका दिव्य व उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची कथा नेटक्या व परिणामकारक शैलीत मांडण्यामध्ये गोवईकरांनी आपली साहित्यिक गुणवत्ता कायम ठेवली आहे, असे म्हणावयास प्रत्यवाय नाही.

भावभक्तीचे सामर्थ्य पटवणारे शीर्षक – 'मुंगी उडाली आकाशी' – साधनावस्थेची शेवटची पायरी म्हणून कथेला एकत्र गुंफणारे आहे. छपाई व साजरे बाह्यरंग याबाबत काँटिनेंटलने आपले वैशिष्ट्य व परंपरा राखली आहे.

* *

मुंगी उडाली आकाशी पद्माकर गोवईकर,
काँटिनेंटल प्रकाशन, पुणे, ३०
पृष्ठे १८२; किमत ५ रुपये.

सुलताना रझिया

शशिकांत नारायण केळकर

डॉ. रफिक झकेरिया हे एक नावाजलेले इंग्रजी स्तंभलेखक आहेत. त्यांनी 'इलूस्ट्रेटेड वीकली ऑफ इंडिया' या साप्ताहिकातून लिहिलेल्या 'रझिया–क्वीन ऑफ इंडिया' या लेखमालेचा श्री. वा. रा. कान्त यांनी मराठीत अनुवाद केला व त्याचे पुस्तकरूप 'सुलताना रझिया' हे आहे.

रझिया सुलताना या राणीची कारकीर्द तेराव्या शतकात दोन तीन वर्षांकरिताच होती. दिल्लीच्या सिंहासनावर बसलेली, गुलाम घराण्यातील, इतिहासात नमूद असलेली भारताची सुलताना रझिया ही पहिली राणी होय. तिच्या अल्पावधीच्या कारकिर्दीतसुद्धा तिने आपल्या प्रतिभावान व्यक्तित्वाचा ठसा इतिहासावर उमटवला. ती तरुण, सुंदर, शूर व प्रगतीवादी राणी होती.

कठिण व संघर्षमय परिस्थितीत ती राज्यावर आली. प्रतिगामी, स्वार्थी व खुनशी सहकाऱ्यांना एकत्र ठेवून राज्यकारभार चालवताना तिने आपले सर्वस्व राजकारणकौशल्य पणाला लावले. आपली प्रगतिवादी उदार मते सहकाऱ्यांना पटवून देताना व अमलात आणताना तिने अतोनात परिश्रम घेतले. या तिच्या संघर्षमय जीवनाला साजेसाच असा तिचा शेवट शेवटी रणांगणावर लढत असतानाच झाला. याशिवाय तिच्या जीवनातील प्रणयप्रसंगांनी या तिच्या तेजस्वी व्यक्तित्वाभोवती एक रहस्यमय वलय निर्माण केले होते. तिच्या समग्र जीव-

नाला एक दैदिप्यमान शोकान्तिका म्हणूनच संबोधावे लागेल.

आतापर्यंत इतिहासात 'रझिया सुलताना' ही उपेक्षित व्यक्ती होती. तत्कालीन बखरकारांना तिचे महत्त्व कळले नव्हते. त्यामुळे तिच्यासंबंधी फार थोडी माहिती उपलब्ध आहे. तरी डॉ. झकेरीया यांनी सतत सात वर्षे या प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा निग्रहाने रझिया सुलताना या राणीच्या जीवन चरित्राचा शोध घेतला. तत्कालीन अस्सल फारशी ग्रंथांचा त्यांनी अभ्यास केला. यातून मिळालेल्या माहितीला आपल्या सर्जनशील प्रतिभेची जोड देऊन रझिया सुलतानाची ही प्रतिमा आकारास आणली.

हे पुस्तक वाचल्यावर रझिया सुलताना हे अलौकिक व्यक्तिमत्व होते याची खात्री पटते. भारतीय इतिहासपटावरील राणी झाशी, राणी दुर्गावती, राणी अहिल्याबाई, राणी नूरजहाँ यांमधे राणी रझिया सुलताना हिचा समावेश करावाच लागेल. या दृष्टिकोनातून डॉ. रफिक झकेरिया यांचे हे कार्य फारच महत्त्वाचे आहे व इतिहासप्रेमी व्यक्तींना हे पुस्तक म्हणजे अमोल ठेवाच वाटेल.

याशिवाय सर्जनशील लेखकांनासुद्धा रझिया सुलताना हे फार उत्तेजक व्यक्तिमत्त्व वाटावे. शौर्य, राजकारण, दीनदुबळ्यांचा कळवळा एवढ्याच चौकोनी ठसठशीत सद्‌गुणांनी तिचे जीवनचित्र घडले नव्हते. तसे असते तर ती एक केवळ अमानुष थोर स्त्री झाली असती. आणि त्यात कदाचित सर्जनशील कलावंताला तेवढा रस वाटला नसता. पण ती मानुष होती व हाडामासाची सुखदुःखे तिला पारखी झाली नव्हती. आधी अल्तूनीया बरोबरचे प्रेमप्रकरण व नंतर घोड्यांची निगा राखणाऱ्या सिद्दी याकूत बरोबरचे प्रणयप्रसंग केवळ भावनिक होते असे पटवून द्यायचा लेखकाने अपार प्रयत्न केला आहे. ऐतिहासिक व्यक्तींचे सद्‌गुण ग्राह्य धरून ते सारखे अधोरेखित करण्याचा भारतीय लेखकांचा एक मनोगंडच आहे. यामुळे या व्यक्तिमत्त्वांचा अस्सलपणा कमी होतो व ती केवळ कल्पनाचित्रे किंवा ध्येयचित्रे वाटतात. खरे म्हणजे इतिहासकाराच्या दृष्टीने चारित्र्य-हननाइतकाच चारित्र्य-आरोपण हा सुद्धा गुन्हा ठरावा.

याकूत हा ऊंच व शिडशिडीत बांध्याचा हबशी तरुण होता. त्याचा चेहेरा एखाद्या ग्रीक देवतेसारखा शिल्पसुंदर होता. त्याची मुद्रा किंचित फिकी, शामल, शांत व भावस्पर्शी होती. त्याचा चेहेरा रेखीव, केस काळेभोर व कुरळे होते. त्याच्या त्वचेचा रंग नितळ, पारदर्शक होता. त्याचे वागणे मोहक व आवाज मधुर झारदार होता. असे याकूतचे वर्णन लेखकाने केले आहे. या याकूतच्या प्रणयकथेने रझियाच्या व्यक्तिगत व राजकारणी जीवनात कल्लोळ उडवून दिला होता. विशेषतः डॉ झकेरीयांनी पुस्तकाच्या शेवटी उपसंहारात केलेल्या चर्चेवरून हे अधिक स्पष्ट होते. या साऱ्या संदर्भात रझिया सुलताना हे व्यक्तिमत्व व कथानक सर्जनशील कलावंताला आव्हानात्मक ठरावे. रझिया सुलतानावर लवकरच एक हिंदी चित्रपटसुद्धा येत आहे.

उपसंहारातील, डॉ. झकेरियांनी या पुस्तकाच्या अनुषंगाने, इतिहास लेखनाची केलेली चर्चा त्यांच्या व्यासंगाची कल्पना देते. विशेषतः इतिहासप्रेमी वाचकांना ती जास्त उत्तेजक वाटेल. पण त्या चर्चेत त्यांनी वेळोवेळी दिलेली अवतरणे निवेदनाच्या एकंदर सलगतेत व्यत्यय निर्माण करतात. मला वाटते संशोधनात्मक लिखाणातून अवतरणे देत जाण्याची ही पद्धत जुनी आहे. वाटल्यास पुस्तकाच्या शेवटी अवतरणांची एखादी सूची द्यावी. असा.

असे अभिनव प्रकारचे साहित्य मराठीत उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ. रफिक झकेरिया, श्री. वा. रा. कान्त, श्री. प्रभाकर गोरे व पॉप्युलर प्रकाशन यांचे अभिनंदन केले पाहिजे.

* *

सुलताना रझिया डॉ. रफिक झकेरीया, अनुवादक श्री. वा. रा. कान्त, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. किंमत ८ रुपये. पृष्ठसंख्या : १६५

॥ टि प णे ॥

भवानीशंकर श्रीधर पंडित

कै. भालचंद्र राजाराम लोवलेकर

एकोणिसशे पस्तीसची दिवाळी. जुन्या इंदूरात गोडबोल्यांच्या वाड्यात माझा मुक्काम होता. गोडबोल्यांच्या वाड्याला लागून लोवलेकरांच्या बंधूंचे घर आहे. तिथे भालचंद्र लोवलेकर आले होते. माझा मुक्काम वाजूला गोडबोल्यांच्या वाड्यात आहे ही बातमी कानावर पडताच कवी भालचंद्र माझ्या भेटीस आले. मी नुकताच दुपारची वामकुक्षी करून वर्तमानपत्रे चाळीत बसलो होतो. इतक्यात समोर उंबरठ्यावर कवि भालचंद्र लोवलेकर माझ्या समोर दत्त म्हणून उभे राहिले. लोवलेकर मध्यम उंचीचे, किरकोळ शरीरयष्टीचे आणि गव्हाच्या कांतीचे होते. त्या काळच्या पद्धतीप्रमाणे त्यांनी लांबरुंद स्वच्छ धोतराचे दोन्ही काच्ये कसले होते, अंगात अमेरिकन धाटणीचा ओपन कॉलरचा शॉर्ट कोट घातला होता, डोक्यावर घडीची काळी टोपी ठेवली होती आणि पायात कॅनव्हासच्या चपला घातल्या होत्या. त्यापूर्वी मी लोवलेकरांना कधी पाहिले नव्हते. त्यानंतरही कधी त्यांच्याशी माझी गाठ पडली नाही. परंतु आज पस्तीस वर्षानंतरही तो प्रसंग तसाच्या तसा माझ्या मनःश्चक्षूंसमोर उभा आहे.

लोवलेकरांना चौतीस वर्षाचे अल्प आयुष्य लाभले. एकोणिसशे अकरात त्यांचा जन्म झाला आणि एकोणिसशे पंचेचाळिसात ते दिवंगत झाले. त्यांच्या प्रतिभेचे फूल अजून पुरतेपणी फूलून त्याचा सुवास सर्वत्र दरवळला नव्हता, तोच कराल काळाचा गारठलेला निर्घृण हात त्यांचेवर पडला; आणि एकदा फुललेले ते फूल कायमचे कोमेजले. लोवलेकरांची सारी ह्यात इंदूरच्या संस्थानी नौकरीत व्यतीत झाली. इंदूरच्या होळकर कॉलेजात बी. ए., एल्. एल्. बी. पर्यंत त्यांचे शिक्षण झाले होते. शिक्षणानंतर इंदूरला नौकरी मिळाल्यामुळे तेथेच ते स्थायिक झाले होते. विद्यार्थीदशेपासून त्यांना कविता लेखनाचा छंद जडला. तो उत्तरोत्तर वाढत गेला. त्यांनी थोडे फार गद्यलेखनही केले आहे. परंतु त्यांचा स्वभाव प्रसिद्धिपराङमुख असल्यामुळे, ते विद्यमान असताना त्यांचे साहित्य बाहेर कुठे फारसे प्रसिद्ध झाले नाही. त्यांच्या निधनोत्तर त्यांच्या काही कविता 'अभिरुचि' व 'ज्योत्स्ने'त त्यांच्या मित्रांनी प्रसिद्ध केल्या. फेब्रुवारी १९४८ च्या 'अभिरुची'त 'काटेऱ्यांचा पाडाव' हा त्यांचा गद्यलेखही प्रसिद्ध पावला आहे. एकोणिसशे पन्नासात मुंबई मराठी साहित्य संघाच्या विद्यमाने 'मराठी कविता [१९२०–१९५०]' हा तत्कालीन कवींच्या कवितांचा संग्रह प्रकाशित करण्यात आला. त्यात 'शुभ्र पांढरी कापुस बोंडे' आणि 'चोरल कांठ' या त्यांच्या दोन निसर्गरम्य गोड गीतांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्यांच्या मृत्यूनंतर आठ वर्षांनी नोव्हेंबर एकोणिसशे त्रेपन्नमध्ये त्यांचे स्नेही नांदेडकर, पंडित व भागवत यांनी 'मराठी ग्रंथोत्तेजक मंडळ, इंदूर' यांच्या साहाय्याने 'दिवंगत भालचंद्र लोवलेकर यांची कविता' हे त्यांच्या निवडक चव्वेचाळीस कवितांचे पुस्तक मुद्रित स्वरूपात काढले. या पुस्तकातील कवितांची निवड सुप्रसिद्ध कवि मान्यवर रा. अ. काळेले यांनी केली आहे. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की, ऑगस्ट १९६७ मध्ये प्रसिद्धी पावलेल्या 'अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक' या ग्रंथाच्या सप्तम खंडात, 'व' पर्यंतची अक्षरे येऊनही 'ल' मध्ये लोवलेकरांचा समावेश झालेला नाही. याला कारण लोवलेकरांची विख्यातिविन्मुखताच आहे.

लोवलेकरांची आणि माझी जी एकदाच एक बैठक झाली, तिच्यात आमच्यातील चर्चेचा प्रमुख विषय, तत्कालीन कविता व कविताविषयक त्यावेळचा 'वाद' हा होता. त्याकाळी रविकिरणमंडळाच्या कवितेचा बोलबाला होता. त्या मंडळातले एक प्रमुख कवि माधव ज्यूलियन यांच्या सरणीचा लोवेलेकरांवर थोडा फार प्रभाव आहे;

आलीस ? ये, कुठे ती पण कालची धिटाई ?
उत्तान गोड भाषा हृदयी दपून राही
अंचळ् हमेशदावी खांदा नि उंच छाती—
उजवीकडील, त्यासी स्वातंत्र्य आज नाही.

हा 'बेफाम धुंद गज्जल' वरील विधानाची ग्वाही देईल. आमची चर्चा झाली तेव्हा मर्ढेकरांचा नुकताच कोठे क्षितिजावर उदय झाला होता. 'रवि किरणमंडळाची कविता कविताच नव्हे' या प्रचाराची 'टिमकी' वाजण्यास अजून थोडा अवधी होता. त्यामुळे लोवलेकरांची कविता गोविंदाग्रज, बालकवि आणि माधव ज्यूलियन—यशवंत यांच्या कधी बरोबरीने, तर कधी आगेमागे वाट चालत होती.

बालकवींप्रमाणेच लोवलेकरांना निसर्गाने झपाटले होते. त्यांच्या निसर्गविषयक गीतांचा 'एक विशेष' आहे. त्यांच्यातला निसर्ग कविकुलगुरूच्या मालवभूमीच्या परिसरातला आहे. त्यांची कविताकामिनी हिरवा लेहेंगा नेसलेली, कपाळावर सोन्याच्या तारेत गुंफलेले मोत्यांचे 'बोर' असलेली आणि अंगावर कुसुंबी ओढणी घेतलेली माळव्यातली रहिवाशी आहे; —

चोरल कांठ
पाउल वाट ।। ध्रु ।।
हळुहळु जाइल श्यामाराणी
घाटावर आणाया पाणी
हरळी दाट
मऊ सपाट ।।१।।
उंच उजाड
पिंपळझाड
ढौळी फांदी आणुनि बांधी, नवानारळी जाडा दोर
झोके काढी अल्लड पोर ।।३।।
झुरुमुर धार
दूध चिकार—
भरुनि कटोरा अहीर गोरा देतां, डोळां बोटे चार,
'नको नको 'चा नाजुक मार ।।४।।

ही या गीतांतील कडवी वाचताना जणू आपण पाताळपाणी—कालाकुंडाच्या घाटातील बोगद्यामधून चोरल नदीच्या काठाकाठाने आगगाडीतून जात आहोत; आणि तिच्या खोऱ्यातील शेतकऱ्याचे 'हे प्रेमजीवन' अनुभवीत आहोत असे वाटते.

हे निसर्गातले एक केवळ 'चित्रमय दृश्य' आहे. परंतु 'अंबरवाता 'त लोवलेकरांनी 'शब्दचित्रा 'त चैतन्य फुंकण्याची किमया साधली आहे. चांदण्या रात्री जमीनीवर घरादारांच्या आणि झाडाझुडपांच्या उठावदार 'पडछाया' उमटतात. घरादारांच्या पडछाया केवळ 'चित्रसदृश' असतात. परंतु झाडाझुडपांच्या पडछाया वाऱ्याच्या झुळुकीने झाडे हालू लागली म्हणजे हालू डोलू लागतात. ते 'रेखाचित्र' जिवंत झाल्यामुळे अधिक आकर्षक व विलोभनीय वाटते. तोच 'चमत्कार' लोवलेकरांच्या 'अंबरवाता 'त आहे.

अफाट उघड्या मैदानात ।। ध्रु ।।
या टोकाहुन त्या टोकास
असा सारखा चोविस तास
फिरे झिंगला अंबरवात ।।१।।
पूर्वेच्या खांद्यावर हात
दुजा पश्चिमा–राणि करात
पिंगा घाली गाणे गात ।।२।।
आकाशाला लावी हात
पाय हालवी उन्मादात
मजलेदार हसे झोकात ।।३।।
हिरव्या गवतावरती पाय
अल्लद टेकुन चालत जाय
ज्वारीची थरथरते पात ।।४।।

लोवलेकरांची कविता जितकी प्रसादपूर्ण तितकीच पाणीदार आहे. तिच्यात रूढ व सर्वांच्या ओळखीच्या थेट मराठी शब्दांचा अनिरुद्ध संचार आहे. त्यांच्याजवळ स्वतंत्र 'कल्पना' होत्या. 'चांदण्या' पाहून त्यांना वाटले;—

ताज्या सारवल्या भूमीवर जशा अक्षता लाख हजार
तशी पसरली नभोंऽगणावर ही नक्षत्रे अपरंपार.
गडद तमाच्या भेसुरतेचा भर्पूर भरलेला बाजार
काय दाखवायाला केला लख्पक् रत्नदिव्यांचा हार ?
सुपीक काळीमधे पेरिली ज्वारबिजे ही रुचिराकार
वाट न्याहळित हंगामाची अंधाराचा हा कृषिकार !

लोवलेकरांच्या अकाल मृत्यूने आधुनिक कवितेची कधीही भरून निघणार नाही अशी हानी झाली यात शंका नाही.

* *

शकुंतला जोग

डॉम मोरेस

हृषिकेश मुखर्जींचा आनंद सिनेमा पहात असताना सर्वात मन कशानं आकर्षून घेतलं असेल तर ते अमिताभच्या डोळ्यांनी. आणि ते डोळे पाहताना सारखं वाटत होतं की असे डोळे आपण कुठेतरी पाहिले आहेत. नेणिवेच्या मनानं बऱ्याच धडका दिल्यावर आठवलं की डॉम मोरेसचं छायाचित्र मी कुठे तरी कधी तरी पुसटतं पाहिलं होतं. आणि त्याचे डोळे असेच असावेत. विशाल, गंभीर, बोलके, एकाकी, शांत पण मध्येच आतली खळबळ दाखविणारे, कसली तरी अनामिक वेदना प्रतिबिंबित करणारे. परवा त्याचं आत्मचरित्र वाचलं आणि ते डोळे बरेच काही बोलले. मनावरचा एकेक पडदा सरकवून आतली बरी, वाईट, उदास, रंगीबेरंगी अनेक चित्रं त्यांनी दाखविली. आता जरी डॉम एकदम माझ्यासमोर येऊन उभा राहिला आणि प्रत्यक्षात त्याचे डोळे निराळेच असले तरी माझ्या मनात वास्तव्य करून राहिलेले डॉमचे डोळेच मला खरे वाटतील.

साधारण कुठल्याही लहान मुलाला आपण विचारलं, 'तू कोण होणार ?' तर तो सांगतो 'मी पोलीस होणार, नाही तर कंडक्टर होणार.' पण नुकतंच बोलू लागलेल्या डॉमला जर कुणी विचारलं असतं की 'तू कोण होणार ?' तर त्यानं सांगितलं असतं 'मी कवि होणार.' इतकं काव्य त्याच्या हाडीमासी खिळलंय्, श्वासात मिसळलंय्, रक्तात भिनलंय्. कांचनाच्या उवेत जन्मलेला डॉम बाळपणी पार्कमध्ये जाऊन, खेळण्याऐवजी पृथ्वीचं, दगडाचं, वाळक्या पानाचं पोत बघत बसे. धुळीचा रंग पाही. सागराचा प्रकाशात दिसणारा नीलिमा आणि सूर्याचा नारिंगी गोळा बुडून गेल्यावर दिसणारा रेशमी काळसरपणा त्याला मोहून टाकी. वडील टाईम्स ऑफ इंडियाचा प्रपंच करण्यात गढलेले. आणि घरात सहवासाला वेडी आई. बरोबरचं कुणी नाही. कुठंही गेलं तरी आई कधी सीन करील त्याची भीती. घरातही तिची केव्हाही फेकाफेक सुरू होई, आणि चिमुकला डॉम जीव मुठीत घेऊन थरथरत बसे. त्यामुळे तो जास्तच एकलकोंडा झाला. आणि या वातावरणाच्या दडपणानं त्याला जास्त जास्त काव्याशी मैत्री करणं भाग पाडलं. नाही तरी माणूस बेचैन, अस्वस्थ असेल तेव्हाच चांगली निर्मिती करू शकतो.

डॉमचा पिंड पाश्चात्य आहे. त्यानं आपल्या जन्मस्थानाचं वर्णन केलंय् तेच मुळी फार बोलकं आहे. गरम अबोल व्हरांडे, तिथे पेंगणारे शोफर्स. घराच्या मागच्या अंगणातलं काटचाकुटचांचं राज्य आणि अनंत नोकर वावरत असलेल्या माझ्या वडिलांच्या घरात मी जन्मलो. धामट, उदास, पारोसं भारतीय वातावरण त्याला बालपणापासूनच कधी आवडलं नाही. टवटवीत, उत्फुल्ल पाश्चात्य वातावरणाचा तो सदैव भुकेला होता. ग्वेलियर एल्विन्नी हे त्याच्या निदर्शनाला आणलं. ते स्वतः इंग्लिश असून त्यांचा पिंड भारतीय होता. तिकडे ते रमू शकले नाहीत. त्याच्यातल्या कवीचीही त्यांनीच डॉमला खरी ओळख करून दिली. आत्मविश्वास दिला. मेटॅफिजिकल कवींची ओळख करून घे. वर्डस्वर्थ, बायरन् हे त्यांनीच शिकवले. निसिम इझेकेलनंही त्याच्या काव्याची छाननी करून प्रतिभेला श्रमाची जोड हवी हे पटवलं. पण डॉम कलंदर आणि भटक्या झाला तो मात्र तेंडुलकरांच्या प्रभावानं. मुंबईतील गल्ल्यांत हिंडवून त्याला त्यांनी खऱ्या जीवनाची ओळख करून दिली. त्यांच्या 'डॉमस्की' या हाकेतच हृदयाला जाऊन भिडणारी तार होती. बारा तेरा वर्षांचा डॉम पांच पांच तास कन्हेरीच्या लेण्यात जाऊन बसे. घर, कुटुंब या संस्थेबद्दल दुरावा, अप्रीती त्याच्या मनात घर करून बसली.

एकाकीपणामुळे सवंगडयांऐवजी, क्रीडेऐवजी डॉम पुस्तकात रमलेला असे. आधीच समृद्ध असलेली त्याची कल्पनाशक्ती इतकी तीव्र झाली की तो वाचलेल्या पुस्तकांच्या गोष्टीत कल्पनेने नवनवीन घटना घुसडत असे. आणि खोलीत फेऱ्या मारत त्या स्वतःलाच हातवारे करत सांगे. त्याच्या वडिलांना त्याच्याबद्दल काळजी वाटू लागली. पण इथेच एक मोठा कवि घडत होता, आकार घेत होता.

बदामी चेहेऱ्याची, मेणवत्तीच्या ज्योतीसारख्या शांत डोळयांची आणि लांब लांब रेशमी पापण्यांची आपली आई बाळपणी त्याला फार आवडे. पण पुढे पुढे जसजशी तिची मनःस्थिती बिघडू लागली तसतसा तो तिच्यापासून दुरावला, तिचा राग करू लागला. आईचं सुख त्याला मिळेनासं झालं. म्हणूनच की काय अठरा वीस वर्षांच्या वयात तो आपल्यापेक्षा मोठया वयाच्या स्त्रियांवर प्रेम करू लागला. ती आईच्या प्रेमाची अतृप्त भूक होती की काय ? जांभळट डोळयांची ड्रॅगिका थोडयाच दिवस त्याच्या आयुष्यात आली. पण त्याच्या आईच्याच वळणाची हिस्टेरिक 'के' मात्र बरेच दिवस त्याचं ऑक्स्फर्डमधील विद्यार्थी जीवन व्यापून राहिली. तिच्या बाबत खरंच असं वाटतं की तिच्यावरचं त्याचं प्रेम म्हणजे मदर फिक्सेशन तर नव्हतं ? आईच्या बाबत त्याच्या मनातलं द्वंद्व स्पष्ट दिसतं. सतत तिला विरोध करणारा, तिच्या कॅथॉलिक निष्ठेची टर उडवणारा, चर्चमध्ये मुद्दाम न जाणारा डॉम व्हॉयलंट झालेल्या आईला प्रहार केल्याचं दुःख अजून जोपासतो. आणि सोळा या वर्षी ऑक्स्फर्डला जाताना बंगलोरला ल्यूनॅटिक होममध्ये आईला भेटायला जातो. त्यावेळी त्याच्या आवडीचं चीज जपून ठेवणाऱ्या आईच्या कुशीत शिरून अश्रू गाळतो. आणि इंग्लंडहून तिला लिहितो

Sorrow has stopped your eye,
Your dream is desolate

It calls me every day.
But I will not enter it.
You know I will not return.

डॉमच्या जीवनाच्या पार्श्वभागी एका शांत, गंभीर, प्रेमळ अशा भव्य व्यक्तित्वाची छाया आहे. आणि ती म्हणजे त्याच्या वडिलांची. भरकटलेल्या, वेचैन, एकाकी डॉमच्या अपरिपक्व व्यक्तित्वावर सतत या शेपाची अतोल, सावध सावली जाणवते. वाङ्मयीन निर्मिती हा गुणच मुळी डॉमनं वडिलांपासून घेतला. पत्नी वेडाच्या आहारी जाऊ लागल्यावर लहानग्या डॉमची जास्तच काळजी घेणाऱ्या, त्याला छातीशी धरणाऱ्या डॅडींच्या डिनर जॅकेटची वटनं, त्यांची सुखद बोच आणि सिगरेट, व्हिस्की, आफ्टर शेव्हचा सुगंध अजून डॉमच्या मनात रेंगाळतो आहे. सिंगापूरला दहावारा वर्षांच्या वहुश्रुत डॉमचं एका पोलीस ऑफिसरनं त्यांच्याजवळ कौतुक केलं तेव्हा डॅडींच्या चेहेऱ्यावर अभिमानाचं स्मित झळकलं. पण त्यामुळे शेफारून जाऊन डॉमनं जेव्हा जास्तच प्रश्न विचारून मंडळींना वोअर केलं, तेव्हा परतताना गाडीत त्यांनी त्याला एका वाक्यात समज दिली की, "स्वतःच्या गुणांचं प्रदर्शन करू लागलास तर मूर्ख ठरशील." 'Be a good boy' या एका वाक्यातच त्यांनी डॉमचा तोल सांभाळायला मदत केली आहे. त्याला स्वातंत्र्यही दिलं आणि संस्कारही केले.

अनुभूती ही निर्मितीच्या वाटेवरची फार मोठी उंच पायरी आहे. आणि ती सहज चढून जायला डॉमला परिस्थितीनं मदत केली. लहान वयातच त्याला इतकं जग पहायला मिळालं की त्याच्या कोवळ्या मनाचा गाभारा त्या अनुभवांनी भरून गेला. सहासात वर्षांचा डॉम कोलंबोला गेला, त्यावद्दल तो लिहितो,

That was an innocent Country.
Warlock and dwarf, the hairy forest, dragons
Somewhere there they said.....

त्या बालवयातही त्याचं निरीक्षण किती प्रखर होतं ! वडिलांच्या रजेत लहानपणीच ऑस्ट्रेलियाला गेलेल्या डॉमला अनेक देश, निरनिराळ्या प्रकारची माणसं, जंगलं, पक्षी, फुलं, सगळं सगळं विविधतेनं भरलेलं अनुभवावयास मिळालं. कविमनाच्या, स्वप्नाळू आणि मुख्य म्हणजे तीव्र निरीक्षणशक्ती असलेल्या डॉमची अनुभवाची पोतडी चांगलीच फुगली.

डॉम भावनाप्रधान तसाच बुद्धिवादीही असावा असं काही प्रसंगांवरून वाटतं. आईच्या अती देवदेव करण्यामुळेही त्याचा देवावरचा विश्वास उडाला असेल. सतत आईच्या कॉटच्या डोक्याशी उभा असलेला खाईस्ट वेडाच्या झटक्यात ती फोडते तेव्हा त्याची आतडी आणि मेंदू वाळलेल्या गवताचा आणि कागद कपटचांचा आहे हे लहान वयाच्या डॉमला जाणवतं. खऱ्या क्रुसिफिक्शनकडे वघावं तितका थक्क होऊन तो ते दृश्य बघतो. आणि म्हणतो; 'माझ्या आयुष्याचा एक भाग इथे फार वैचित्र्यपूर्ण रीतीनं संपला.' म्हणजेच त्याच्या श्रद्धेचंही क्रुसिफिक्शन झालं की काय ? त्याचप्रमाणे त्याचे म्हातारे आजोबा निवर्तल्यावर डोळे पुसत येणाऱ्या संबंधितांना तो लाईटली सांगतो की, 'झालं ते योग्यच झालं. ग्रँडपा म्हातारेच झाले होते.' आणि ते लोक आश्चर्यानं त्याच्याबद्दल कुजबुजू लागतात. असे काही प्रसंग पाहिले की कामूच्या आऊटसायडरजवळ त्याला उभा करण्याचा मोह अनावर होतो. लाडक्या आजारी कुत्र्याला आईनं घरात येऊ दिलं नाही म्हणून पावसात रेनकोट घालून कुत्र्यावर छत्री धरून तो रात्रभर वसला. अशा परस्पर विरोधी भावनांचा कल्लोळ पाहिला की वाटतं आईचा थोडासा वारसा त्याच्यातही आला आहे की काय ? कॅथॉलिक शाळेत दास कॅपिटल वाचणाऱ्या डॉमला ते जाळण्याची टीचरनं धमकी दिली, तेव्हा धर्म हा रानटी प्रकार आहे या आधीच वनलेल्या त्याच्या मताला बळकटी आली.

डॉमची जीवनसरिता नीट निरखली तर त्यात तीन प्रवाह लक्षवेधी आहेत. आणि ते म्हणजे कविता, कामिनी आणि वारुणी. तो कुठेही गेला तरी आधी कवींना भेटत असे, आपलं काव्य दाखवून त्यांचं मत अजमावत असे. स्पेंडरला तर तो वऱ्याच लहानपणी भेटला. पुढे यूरोपमध्ये ईलियटपासून गार्लंड, गॅसकॉईन, ऑडेन झालंच तर ब्रीट पोएटस् ॲलन गिन्सबर्ग, ग्रेगरीपर्यंत अनेकांना भेटला. काव्याचं हॉर्दनडन् पारितोषिक दुसऱ्या महायुद्धानंतर त्यालाच पहिल्यांदा मिळालं आणि ते मिळवणारा तो सर्वात छोटा कवी आहे.

पौगंडावस्था सुरू होण्यापूर्वीच त्याचा दुष्परिणाम डॉमच्या बाबत दिसतो. आणि तो म्हणजे सेक्सबद्दलचं अतीव आकर्षण. दहा वर्षांचा डॉम झोपला आहे असं समजून निश्चिंतपणे कपडे बदलणाऱ्या आँट 'ई' ला पाहून त्याच्या अंगातून वीज चमकून जाते आणि तेच दृश्य सारखं मनःश्चक्षूंसमोर तरळत राहातं. घरासमोरच्या स्वीमिंग पूलवर पोहायला शिकणं लांबच राहिलं पण स्वीमिंग ड्रेसमधल्या स्त्रिया निरखत बसणं, बोटीवर असलेल्या दुप्पट वयाच्या स्त्रीवर प्रेम करणं, या व अशा अनेक गोष्टी हेच सुचवतात. सबंध ऑक्स्फर्ड जीवनात 'के' बरोबर त्याचा सरळ सरळ व्यभिचार चालू होता. पण तरीही फ्लॉबर्टच्या मॅडम वॉव्हरीबद्दल आपल्याला जशी घृणा वाटत नाही, तसंच डॉमच्या बाबतही होतं. बालपणातला एकाकीपणा, आईचं वेड, कार्यमग्न वडील यामुळे त्याचा एकप्रकारचा इमोशनल इम्बॅलन्स झाला होता. तोच पौगंडावस्थेतलं वाभरट, बावरलेलं वर्तन त्याच्या हातून करवून घेत होता. आणि तोच मदिराक्षीप्रमाणे त्याला मदिरेच्याही आहारी नेत होता त्यानंच म्हटलं आहे,

I sowed my wild oats
Before I was twenty
Drunkards and turn coats
I knew in plenty.

अशा या डॉमला हेलनच्या रूपानं खरी स्त्री दिसली आणि देवानं न दिलेली बहीण त्याला तिच्यात गवसली. घर व्यवस्थित चालविणारी, पुरुषाची काळजी घेणारी, वेळप्रसंगी त्याची माता होणारी स्त्री स्वप्नाळू, रोमॅंटिक डॉमला आजवर आढळलीच नव्हती. घराची ऊब म्हणजे काय ते त्याला कळलं. आणि सुदैवानं ज्यूडिथ सारखी शहाणी समंजस पत्नी मिळाल्यामुळे एखाद्या पतंगासारखा कुठेही घिरट्या घालणारा डॉम उबदार, प्रेमळ घरट्यातला गृहस्थ झालाय्.

कवितेशी दाट मैत्री असली तरी गद्याशी डॉमचं मुळीच वैर नाही. **Above the tomb stones, small eye brows of mist were raised in perpetual surprise at death.** अशासारखी सहजसुंदर वाक्यं डॉमच्या आत्मचरित्रात ठायी ठायी सापडतील. भाषेत कुठेही कृत्रिमता नाही. निर्मळ वाहत्या झऱ्यासारखी ती दुडुदुडु धावते आहे. खरं सांगावयाचा आव आणून खुबीदारपणे चांगुलपणा आपल्याकडे घ्यायचा, असली ढोंगं नाहीत. आपले दोषही उघडपणे सरळसरळ सांगण्याचा परखडपणा डॉममध्ये आहे.

पौगंडावस्थेत भोगाची शिकार झालेला पण निरपेक्ष, प्रेमळ तसाच अलिप्त, चंचल तितकाच धीमा, परखड तसा संकोची डॉम आपल्या मनात खचित स्थान मिळवून जातो.

स्नेहप्रभा प्रधान

शहाणपण देगा देवा?

शहाणपण? शहाणपण म्हणजे स्वतःच्या एक एक स्वप्नाला स्वतःच्याच हातानं मूठमाती देणं. शहाणपण म्हणजे जगाशी मैत्री करणं आणि स्वतःशी शत्रुत्व. शहाणपण म्हणजे स्वप्नाळूपणाचा अंतःकरणं. शहाणपण म्हणजे कौमार्यावस्था गमावणं आणि व्यभिचार करणं.

व्यभिचार? हो, व्यभिचार. व्यभिचार फक्त शरीराचाच नसतो, मनाचाही असतो. जे पटत नाही ते करणं. असत्य, अन्याय, अत्याचार याविरुद्ध आक्रोश करणाऱ्या मनाची गळचेपी करून विदुषकाप्रमाणे या कानापासून त्या कानापर्यंत हसत राहाणं. ज्यांना लाथाडावंसं वाटतं त्यांना बाहुपाशात घेणं आणि ज्यांना कवटाळावंसं वाटतं त्यांच्याकडं पाठ फिरवणं.

पुरुष का स्त्री ? कुणाला कवटाळावसं वाटतं ? हं ! काय फरक आहे त्यामधे ? दोघंही एकाच जातीचे. मानव. मनाच्या व्यभिचाराला होमोसेक्शुअल, लेस्बियन अशी जात नसते.

शरीर बिटाळलं तर काही उपाय तरी करता येतो. पण मनं विटाळली तर, व्यभिचाराच्या दुर्गंधी चिखलात, किड्याप्रमाणे वळवळ करणाऱ्या विचारांना, सुंदर बाह्यांगाच्या संरक्षणाखाली, आरामात चव घेत घेत माणुसकीला पोखरता येतं.

शहाणपण ? शहाणपण म्हणजे महारोग. मनाचा महारोग. शरीराचा एक एक हिस्सा तो जसा बधीर करीत जातो, तसाच मनाचा महारोग संवेदनशीलता नष्ट करीत जातो.

"मी सुरक्षित आहे. दुसरा उगाचच जाचला जातो आहे. पण मला काय करायचं त्याच्याशी ? दुसरा जळतो आहे, पोळतो आहे ? पण मला नाही ना बसत त्याचे चटके ? मला झळ लागलीच तर बघून घेईन."

"कुत्री–मांजरी काय बाळगता ? त्यापेक्षा पोटची दोन मुलं पैदा केली असती तर ! कुत्री–मांजरं पैसे कमावून देणार आहेत का ? प्रकृती अस्वस्थ असल्यास शुश्रूषा करणार आहेत का ? कधी येणार शहाणपण तुम्हाला ? "

थोडक्यात, कुणासाठी काही केलं तर मोबदल्यात काही तरी मिळालं पाहिजे ! निदान तशी आशा तरी करता आली पाहिजे. कुत्री–मांजरं ? ती नुसतं अबोल प्रेम देतात. प्रेम ! प्रेमानं काय मिळतं ? भाजी, कपडे, औषध ? मानमरातब ? हिऱ्या–मोत्याचे ढीग ? बाणाप्रमाणे रस्ता कापत जाणाऱ्या मोटारी ?

प्रेम ! अहो, प्रेम चित्रपटातील कथानकासाठी. कादंबरीची पानं भरण्यासाठी. काव्याचा साज सजवण्यासाठी.

मुलं पैदा केली असती तर ? कशासाठी ? आईचं दूध मिळालंच तर, विष भिनल्याप्रमाणे तिच्याच स्तनांचा चावा घ्यायला ?

आई–बाप ? "मी तुम्हाला नऊ महिने उदरात बाळगलं, खस्ता खाल्ल्या—लेका, बापाचा उपहास करतोस ? मी–मी तुझा जन्मदाता ! आणि कारटे तू ? आमची इच्छा, आमच्या आकांक्षा, कशाचीच तमा नाही तुम्हाला ? "

मुलं ! आई–बाप ! एकाच घरात परिस्थितीनं डांबले गेलेले दोन पक्ष. धरलं तर चावतं, सोडलं तर पळतं. हा शहाणपणा !

एक मुलगी छोटीशी होती तेव्हापासून ओळखते मी तिला. खरं म्हणजे जन्मापूर्वीची आमची ओळख आणि जन्माला आलो तेही एकजीव होऊन. कुठल्याही सुंदर, कोमल किरणानं सूर्यफुलाप्रमाणे खिलायची ती. आणि प्राणिमात्राच्या थोड्याशाही विव्हळण्यानं कोमेजायची. मग तिला सापडले शब्द. तेव्हापासून शब्दांचा आकार घेऊन भावना तिच्या छोट्याश्या जिवणीतून मुक्तपणे वाहू लागल्या. ते दिवस कसे गुदगुल्या करणारे होते.

काही दिवसांनी शब्दांना लेखणीची सोबत मिळाली. त्या कुंचल्यानं हळुवारपणे ती विविध भावनांनी पानामागनं पानं रंगवू लागली. इंद्रधनुष्यासारखी अंतराळात तरंगणारी.

अंतःकरणाच्या गाभ्यातून सजीव होऊन येणारे ते निरागस, उबदार शब्द ! ते केवळ शब्दच नव्हते. अर्थानं रसरसलेली, गोड गोड फळं होती ती. त्यांना शहाणपणाची कीड लागली नव्हती. इतरांच्या अधाशी वासनांची पुसटही ओळख नव्हती तिला.

लिहिलेल्या शब्दाप्रमाणे बोलक्या शब्दांनाही 'ग' चा 'मा' करता येतो हे तिच्या सरळ, सत्वशील आई–वडीलांनीही कधी सांगितलं नव्हतं तिला. म्हणूनच ती शहाणी नव्हती. म्हणूनच तिचे फुलपाखरांसारखे, रंगीबेरंगी भावनानं नटलेले शब्द, हसत–बागडत, कधी दुःखाचे तर कधी आनंदाचे मोती विखरत साद–प्रतिसाद देत.

एकेदिवशी मात्र तिला कळलं की शब्दकोशातील आणि व्यवहारातील एकाच शब्दाच्या अर्थात फार फरक असू शकतो. गुलाबाच्या रेशमी पाकळ्यांना हलक्या–फुलक्या कोमल शब्दांचा साज सजवणारा कवी, राकट वृत्तीचा आवकट–विचकट कोट्या करणाराही असू शकतो. गर काढून तो फक्त पोकळ शब्द चोखतो.

- मोठी माणसं, साधु-संत, श्रोत्यांना केवळ मुग्ध करण्यासाठी सत्य, सदाचार, सच्चाई यासारखे सुकोमल आणि भरघोस शब्द वापरतात.

प्रेमाच्या, सुविचाराच्या पडद्याला, आडोशाला ठेवून माणूस, माणसाला, अजगराप्रमाणे आपल्या मिठीनं गुदमरून गतप्राण करू शकतो.

हे जेव्हा तिला कळलं तेव्हा ती दचकली. आंब्याला मोहोर यावा त्याप्रमाणे भावनांनी मोहोरलेली पत्रांची पानं आस्ते आस्ते गळून पडू लागली. वाढत्या व्यवहारी वृत्तीमुळे मित्र-मैत्रिणींच्या कोरड्या पडलेल्या शब्दांच्या वेचवपणानं ती बेचैन झाली. सावध झाली. पूर्णपणे नाही पण पायरी पायरीनं. वयात येणाऱ्या मुलीप्रमाणे शहाणपणाच्या सान्निध्यात नव्यानंच आलेल्या तिच्या भावना संकोचल्या, घावरल्या. परक्यांना पाहून आईच्या कुशीत शिरणाऱ्या मुलाप्रमाणे अंतःकरणाकडे परतल्या. अंतःकरणानं लगेच पंख आकसून घेतले. पिल्लांना पंखाखाली संरक्षण देणाऱ्या पक्षिणीप्रमाणे.

आणि तेव्हापासून, एकजीव झालेल्या आम्ही दोघी क्रमाक्रमानं अलग होऊ लागलो. एकीनं अंतःकरणातच दडून बसण्याचं ठरवलं तर दुसरी, अर्धवट शहाणी झालेली, जागृत झालेली, गुदमरलेलं मन जगापासून लपवण्याचा प्रयत्न करीत वरपांगी निडरपणानं वावरू लागली.

जग कुजबुजू लागलं, "काय धाडशीपणा, किती हुषार, किती स्वतंत्र वाण्याची ! हेवा वाटतो हिचा."

कुणी विचारावं, "का हो, कधी कुणावर प्रेम केलं आहे का तुम्ही ? म्हणजे, अगदी स्वतःला विसरून ?"

हृदयानं पंख आणखी घट्ट मिटले. कारण प्रश्न विचारणाऱ्या वहुतेकांना, फक्त शब्द माहीत होता. अर्थ नव्हे. उत्तरासाठी वंडखोर ओठावर शब्द आले पण आतून त्या दुसरीनं तिला मागे ओढले.

उत्तर विचारणारे निरुत्तरानं सुखावले. अभिमानानं छाती पुढे काढून निघून गेले. तोंपर्यंत दवलेले हुंदके आतून बाहेर पडले. बंडखोर ओठावर अस्फुट शब्द उमटले, "प्रेम ? माहीत आहे का तुम्हाला प्रेम कशाला म्हणतात ते ? तुम्हाला माहीत आहे फक्त एकच प्रेम. स्त्री-पुरुषांमधील—आणि तेही खऱ्या अर्थानं प्रेम नाहीच—केवळ वासनांचं मिलन. तृप्तीबरोबरच थंडावणारं. नुसत्या गरजेच्या वेळी ओळख देणाऱ्या शेजाऱ्याप्रमाणे."

प्रेम माहीत असणारे, 'प्रेम केलं का कधी ?' असा सवाल कधीच करत नाहीत.

प्रेम. प्रेम म्हणजे मैत्री. शब्दाविना बोलकी. निःस्वार्थ एवढाच जिच्यात स्वार्थ असतो ती. सुखाची भागिदारी मिळाली नाही तरी दुःखाच्या, संकटाच्या प्रसंगी एकदम दृश्य होणारी. अपमानांना गिळणारी. कुचंबणेचं वीष पचवणारी.

प्रेमाला लिंग नसतं. 'तो' प्रेम 'ती' प्रेम असं म्हणत नाही आपण. कारण ते बहुरूपी असतं. सुंदर आणि सतेज. दुःखाचे, दुर्दैवाचे घाव स्वतः झेलीत आवडणाऱ्या व्यक्तीचं संरक्षण करणारं. स्वतःच्या ठसठसणाऱ्या जखमांवर हास्याचं आवरण टाकून अधिकच तकाकणारं.

प्रेमाला रक्ताचं नातं लागत नाही. कायद्याचं नाही. वासनांना प्रेमाची गरज नसते, अत्युच्च प्रेमात सान्निध्याची ओढ असते, प्रेम माणसाबद्दल असू शकतं, प्राणिमात्राबद्दल असू शकतं. प्रेम सर्वव्यापी असू शकतं. ते जितकं सर्वव्यापी होतं तितकं ते निर्मळ होत जातं. ब्रह्मरूप होतं.

कोण पुटपुटलं, 'हा सारा मूर्खपणा ?'

आणखी कोण ? फक्त शहाणपणा-शहाणपणाच असं म्हणू शकतो.

निखालसतेचा, निरागसतेचा, वालिशतेचा, भोळेपणाचा, माणुसकीचा एक एक पारदर्शी पापुद्रा आपल्या राकट, बोथट बोटांनी खसकन ओढून, फाडून फेकून देणारे अनुभव आणि त्यांतून उगम पावलेला शहाणपणा.

संवेदनाशील हृदयावर धूर्तपणाचा, स्वार्थाचा, भीतीचा कडवट लेप चढवणारा शहाणपणा.

युक्तिवादात महत्त्वाचा वेळ दवडून माणुसकीचा घात करणारा—शहाणपणा.

आणि म्हणून ज्याला माणुसकी गमवायची नाही त्यानं मूर्खपणा पत्करला पाहिजे. लोक हसतील ? हसू दे. मूर्खपणाला विश्वासघाताचे चरे बसतात, बसू दे. मित्रमैत्रिणी, नातलग स्वार्थ साधून वर पुन: टिंगलं करतात, कीव करतात, करू दे.

प्रेम करणं आणि करवून घेणं कायराचं काम नव्हे. त्यासाठी असेल नसेल ते भांडवल गुंतवावं लागतं. अंत:करणाचे सारे कप्पे उघडावे लागतात. सावधगिरीचं छत्र नाकारावं लागतं.

जगायचं एकदा, मरायचंही एकदाच. मग ते कृपणासारखं का ? भीत भीत का ?

कुणी तरी म्हटलं आहे ना—

जब प्यार किया तो डरना क्या ।
प्यार किया कोई चोरी नहीं की ।
चुप चुपसे आँहे भरना क्या ।
जब प्यार किया तो डरना क्या ।

केवळ मूर्खपणालाच जमलं तर हे जमतं आणि म्हणूनच, नकोच ते, शहाणपण देगा देवा !

* *

भा. ज. कविमंडन

निखळले सांधे...

साऱ्याच गोष्टी अशा दवलेल्या झाल्या आहेत. या गोष्टींचा अर्थ समजतो ? ज्यांना तो समजतो, ते काही सांगू शकत नाहीत. सांगण्यास शब्द सापडत नाहीत. सांगणे हे शब्दांचे कामच नव्हे ! शब्द घशातून बाहेर पडतात. पण शब्दांशिवाय इतर अनेक आवाज कंठातून येतात. या आवाजांना टाळून शब्द बाहेर येतील का ? कोणत्या मार्गाने ? कसे ? शब्द बोलण्यास वेगळी जागा का नसावी ? अनेक ध्वनींचा एकच मार्ग ! आपण बोलावे. ते म्हणतात ...., रडतोय. ज्या कंठातून फक्त शब्दच बाहेर पडतात, त्यांच्याबद्दल एक भयानक भावना मन भरून राहते.

कसे फाडकन् बोलतात ! यांचे सुख, यांचे दु:ख किती स्पष्ट आहे ! स्पष्टता ! फार जवळ केलेली एक कल्पना. म्हणूनच फार दिसलेली एक कल्पना. स्पष्टता, पारदर्शकपणा ! एकेक कल्पना किती सोवळी आणि आकर्षक वाटते ! विचार स्पष्ट असावेत. विचारांचे आधार कोणते ते कळावे. आधार मजबूत असावेत. साधार विचार नव-नवीन अनुमानांकडे झेपावतात. काही तरी प्रसरण आपल्यातच सुरू आहे असे वाटायचे. हे स्पष्टतेचे लक्षण म्हणतात. स्पष्ट विचार वाढतात. वाढ नाही, विकास नाही म्हणजे जिवंतपणा नाही. यावर त्यावेळी विश्वास होता. जाणीव पारदर्शक असावी. प्रत्येक भावना कशी धमन्यातून वाहताना दिसावी. कुठून—कुठे ? भावनेचे धागे सरळ उकलावेत. अश्रूंचे निवेदन करणारी, हास्याचा अर्थ देणारी, गांभीर्याचे वजन पेलणारी एकेक पारदर्शक भावना असावी. भावनांच्या गोंधळाची, गुंतवळयाची चीड वाटायची.

एक स्वच्छ शुभ्र माणूस. शुभ्र कापरावर उभा आहे अनेक भोवरे त्याच्या पायांना ढकलीत आहेत. हा माणूस मात्र शांत उभा ! ताठ, अडग !......एक कॅलेंडर आहे झाले !

हे चित्र काल रंगविले, हे चित्र एक आकांक्षा म्हणून बाळगले. पण हे चित्र आज कुठे आहे ? अनेक भोवरे पायांपाशी थांबले नाहीत. त्या भोवऱ्यांनी एका शांत–प्रसन्न माणसाला कागदाच्या कस्पटासमान भिजवून

टाकले, कुजवून टाकले, ...विश्वास बसत नाही ? पण आता विश्वासाचा प्रश्नच कुठाय् ? विश्वास असलेल्या गोष्टी नाहीत. त्या अभावाचे समर्थन करण्याचा उत्साह कुठाय् ?

जो स्पर्श इथे झाला, तो इथेच का झाला ? त्या सर्वांना हा स्पर्श कधीच झाला नाही ? आमचे हे भाग्य....दुर्भाग्य ? समजत नाही.

चालायचे म्हणजे पाऊले उचलावीच लागतात. पण उचललेले पाऊल कोणतेच अंतर कमी करीत नाही. पाऊले उचलली जातात आणि अंतर समजत नाही. आम्हास दिशा नाही. दिशा कुठे आहेत ?

पाऊलांनी उचललेल्या व फेकलेल्या मातीचा हा पडदा. या पडद्याच्या मागे काय न् पुढे काय ? सारेच चौकोनी, सारेच पाहता येण्यासारखे लहान...आदळलेली पाऊले आमच्याच खाली खड्डा करीत आहेत. खोल–आणखी खोल. हा दिशापूर्ण गतिमान खेळ असा खोल शांत होणार आहे. गतिमान स्वस्थता ! सखोल झेप ! शरीर नसलेला आनंद !...अरे या शब्दांना फेकून द्या !

अनेक आवाजात आमच्या पावलांचा आवाज. आवाजांचे अनेक आवाज. या कलकलाटास विटलेले मन कशाला लाभले आहे ? मध्यरात्री अंधाराची रात्र नसते, झोप असते, स्वप्ने असतात, आणि एक शब्द दुसऱ्या शब्दाशी समागम साधीत असतो. मध्यरात्र इथे नाही...पण तिथे कोणीच नाही. अंधाराच्या घट्ट थरांवर पावले आदळून पुन्हा तेच ते आवाज येताहेत. काही अनुकूल प्रतिध्वनी मिळतात का ? प्रतीक्षा सुरू आहे !

प्रतीक्षा ! वाट पाहण्यात कसे दिवस निघून गेले ! आम्ही कुणाची वाट पाहिली ? पण दिवस तरंगत निघून जात. ते आलेच नाहीत. त्यांनाही शब्द हवेत का ? आमच्या भोवती आज हे कोण आहे ?

आम्ही हसलो की हे हसतात. आम्ही बोललो की हे ऐकतात. आम्ही पाऊले उचलताच हे हलतात. आमचे साथी. पण आम्हाला कधी विचारीत नाहीत, हे हसणे काय न् बोलणे काय न् हलणे काय ? आम्हाला निदान फाडून टाका रे !

पण हे कशाला विचारतील ? ते प्रश्न नाहीतच. प्रश्न आम्ही आहोत. प्रश्न त्यांचे नाहीतच. प्रश्न आमचे आहेत. ते...ते...नुसते सनातन साथी आहेत. एक काळीज पिरगाळणारा आमचा प्रश्न...सोपे, साधे, सरळ, नित्य, स्वस्थ त्यांचे उत्तर...

उत्तरांच्या या संमेलनात आमचा प्रश्न लाजून उभा आहे. हळुहळू संपत आहे. त्याचे संपणे हेच त्याचे उत्तर आहे, असे ते सांगतात. पण आमच्या प्रश्नाची लाज काही मानीत नाही. या प्रश्नाला आम्ही कुठे आणून सोडले आहे ? हा प्रश्न शब्द–ध्वनीत मिसळून बाहेर पडतो. पण आमचा आवाज एखाद्या वेगळ्याच पशुकोटीत गेलाय् की काय ?

या आवाजाचा अर्थच आम्हाला समजेनासा झालाय्. त्यांना हा आवाज अगदी स्पष्ट समजतोय् म्हणतात. त्यांना सर्व कसे चटकन् समजते. आमची स्पष्टतेची आकांक्षा त्यांच्यात पूर्ण झाली की काय ? त्यांच्या सर्वच गोष्टी सुरळीत, समरूप, नियमित असतात. They are cosmos ! याच कॉसमॉसच्या आकांक्षेने पेटून आज हाती नुसती राख जमली आहे. एक जळजळीत प्रश्न जळत सहन केला...ही राख !

साऱ्याच गोष्टी अशा रचून होत आहेत की, त्यांचा आकार आणि व्याप एक भय–स्वप्न होऊन आम्हाला गिळतो आहे. या स्वप्नांची मीमांसा करावी ? पण मीमांसेत स्वप्न असेल ? सारेच सांधे निखळत आहेत. निखळलेल्या जाणिवांचे हे भारावून भिजून गेलेले एक ओझे...उखडून गेलेल्या सांध्यांमधील गळत पसरणारी ठणक...जिवंत वस्तूप्रमाणे आम्ही फक्त जगत असताना हे केव्हा घडले ?

* *

वि. बा. प्रभुदेसाई

टका

आधुनिक भारतीय भाषांचे उगमकालीन आणि प्राचीन स्वरूप जाणून घेण्याचे एक महत्त्वाचे व विश्वासार्ह साधन म्हणजे कोरीव लेख. मराठी भाषेच्या उगमकालाचा आणि प्राचीनत्वाचा विचार करताना संशोधकांनी आतापर्यंत प्रामुख्याने भर दिला तो मराठीशी संबंधित अशा ताम्रपट व शिलालेख या 'कोरीव' लेखांवरच. या संदर्भात आणखीही ज्या एका साधनाचा आवर्जून उल्लेख करायला हवा ते महत्त्वाचे साधन म्हणजे 'टका'. डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी आपल्या 'प्राचीन मराठी कोरीव लेख' या पुणे विद्यापीठातर्फे १९६३ साली प्रकाशित झालेल्या बृहद्ग्रंथात मराठीशी संबंधित अशा अनेक ताम्रपटांचा व शिलालेखांचा मोठ्या साक्षेपाने आणि सहृदयतेने परिचय करून दिलेला आढळतो. पण मराठी भाषेच्या संदर्भात 'टका' या एका प्राचीन आणि अस्सल साधनाने आतापर्यंत विद्वानांचे लक्ष वेधले जाऊ नये, ही गोष्ट केवळ नवलाचीच नसून वस्तुस्थिति-निदर्शकही आहे.

'टका' म्हणजे काय? 'टका' हा शब्द मराठीमध्ये अनेक अर्थांनी रूढ आहे. 'महाराष्ट्र शब्दकोश'-कारांनी प्रस्तुत शब्दाचे जे अनेक अर्थ दिले आहेत ते असे आहेत. '१. एक नाणे. २. पैका, धन, द्रव्य. ३. कर. ४. १२० चौरस विघे जमिनीचे एक माप' [पृ. १३७२] याच शब्दकोशात 'टका—टकें' या शब्दाचे पुढील अर्थ दिले असून त्यांच्याकडे विशेष ध्यान दिले पाहिजे. '१. निशाण, ध्वज, छत्र, २. प्रतिमा, ठसा; ३. अग्रभाग, कोंब' [१३७२–७३.]

'ज्ञानेश्वरी'मध्ये 'टका' हा शब्द पुढील काही ओव्यांत आलेला आहे :—

स्त्री पुरुष नपुंसकें। हे व्यक्तिभेदांचे टके। अ. १५–१६५
तो पाला तेयां घुमे। टकेयांवरी॥ अ. १५–१५०
सदाचाराचिया सहसा। टके उठती बहुवसा। अ. १५–१८६

[ही सगळी उदाहरणे '**ज्ञानेश्वरी**' (संपादक वि. का. राजवाडे) सरकारी प्रत, आ. ३ री १९६३, मधील आहेत.]

या तिन्ही ठिकाणी 'टका' या शब्दाचे अर्थ 'टोक, मर्यादा' असेच अभिप्रेत असल्याचे दिसते.
[रा. ना. वेलिंगकर, ज्ञानेश्वरीचे शब्द–भांडार, मुंबई ११५९, पृ. १९३]

आता 'एकनाथी भागवता'तील पुढील उल्लेख पहा :—

उचंबळलेनि अतिसुखें। यात्रे निघावें येणें हरिखें।
दिंडीपताका गरुडटके। नामघोषें गर्जत॥ अ. ११–१२७८

[**एकनाथी भागवत** (संपा०– गो. ना. दातार) मुंबई १९०८, पृ. १९७]

तसेच तुकारामाच्या अभंगांतील पुढील निर्देश ध्यानात घेण्यासारखे आहेत.—

आषाढी कार्तिकी हो गरुडटकयां भार।–१५७५
गरुडटके टाळ मृदंग पताका।
सांगती ते एका एक सुख॥ –१९४९
गरुडटकयाच्या मारें। भूमी गर्जे जयजयकारें–२२५२

[**श्रीतुकारामबावांच्या अभंगांची गाथा**, (संपा० पु. मं. लाड) आ. २ री, मुंबई १९५५]

या सर्व ओव्यांतून आलेल्या '**गरुडटका**' या शब्दाचा अर्थ 'गरुडाचे चित्र काढलेला ध्वज, निशाण, पताका' असा आहे या गोष्टीकडे मुद्दाम लक्ष वेधले पाहिजे. 'मराठी व्युत्पत्तिकोश'कारांनी '**टका**' शब्दाचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केले आहे :—

"**टका** – पुं० निशाण, ध्वज, छत्र A flag, a canopy.
[(संस्कृत) **तञ्च** (?); (यादव कालीन मराठी) **टका** (ध्वज)]."

[कृ. पां. कुळकर्णी, **मराठी व्युत्पत्तिकोश**, मुंबई १९३६, पृ. ३३३.]

यापेक्षा 'महाराष्ट्र शब्दकोश'कारांनी दिलेली पुढील व्युत्पत्ती मला अधिक विचारणीय वाटते :—

"**टका** - [(कानडी) टंके=काठी, टेक्के=निशाण; तुल० (संस्कृत) टंक=तलवार]

[**महाराष्ट्र शब्दकोश**, विभाग तिसरा, पुणे १९३४, पृ. १३७३]

प्रस्तुत विवेचनात अभिप्रेत असलेला 'टका' हा निशाणासारखा असून तो काठ्यांना गुंडाळलेला असतो, हे ध्यानात घेता या शेवटच्या 'व्युत्पत्ती'त विशेष तथ्य वाटते. शिलालेख व ताम्रपट हे 'कोरीव' लेख आहेत. तर 'टका' हा कापडावर केलेल्या भरतकामाच्या आधारे सजविला जातो. सुई व रंगीत दोऱ्याच्या आधारे कापडावर अपेक्षित मजकूर आणि त्याला पूरक अशा आकृती काढलेल्या असतात. यातील मजकूर हा बहुधा एखाद्या देवतेच्या किंवा वीरांच्या स्तुतिपर असून त्यात कित्येक वेळा ऐतिहासिक महत्त्वाच्या व्यक्तींचा निर्देशही आढळतो. 'टक्या'तील चित्रे व मजकूर काही वेळा परस्परांना एवढे पूरक असतात की, मुक्तेश्वराने केलेले उत्तरा-अभिमन्यु विवाहप्रसंगी श्रीकृष्णाला धाडलेल्या कुंकुमांकित निमंत्रणपत्रिकेतील पुढील वर्णन अगदी सार्थ असल्याचा प्रत्यय येतो :—

"**तळीं अभिप्राय सकळ । अक्षरिं गुंफिला अर्थ विवळ ।**
जैसे पुष्पे आणि परिमळ । येक किं दोनि नेणवे ।।" (विराटपर्व अ. ८–१३).

संबंधित देवालयातील वार्षिक जत्रोत्सव किंव विशिष्ट पर्वणीच्या प्रसंगी जमलेल्या जनसमुदायासमोर 'टक्या'चे वाचन केले जाते. 'टक्या'चे कापड कालांतराने जीर्ण शीर्ण झाले किंवा फाटले म्हणजे जुन्या मजकुराच्या आधारे नवीन 'टका' तयार केला जातो. अशा रीतीने परंपरेने चालत आलेल्या जुन्या लेखांचे (शक्यतोवर) परंपरागत पद्धतीनेच जतन केले जाते. नवीन 'टका' तयार झाला म्हणजे पुष्कळवेळा जुन्या 'टक्या'तील काल-निर्देश कालाच्या उदरात गडप होऊन नवीन 'टका' तयार करण्यात आला त्यावेळचा कालोल्लेख नमूद केला जातो. त्यामुळे, मूळ 'टका' केव्हा तयार करण्यात आला ते निश्चितपणे सांगणे शक्य होतेच असे नाही. एवढे असले तरी भाषेचे प्राचीन स्वरूप अस्सल पुराव्याच्या आधारे जाणून घेण्याच्या बाबतीत 'टक्या'चे एक साधन म्हणून होणारा उपयोग कमी लेखण्याचे कारण नाही.

गोमंतकामध्ये उपलब्ध झालेल्या दोन 'टक्यां'तील काही मजकूर येथे नमुन्यादाखल उद्धृत करतो:—

"**सत्ताविसा रायांच्या कुमरांचा आमला घातला ।। आपण पोहार जगदेव आमला सूर्याच्या रथाखाली आमला चालविला कुमर सत्ताविस तितके राय आखोळिल्या ।। आपण जगदेवु ।।**" **—गांव डोंगरे येथील टका.**

"**गजागण बेतुराणा बोलावून आणिला माणिकेसि खांव घातला बारा रायांचा झुजार बारा राय खाड्चे खांडेस्थळि केले तेरावे रायाचा अंकणा घडि एक सिंह भैरपाळ शरणागता रक्षपाळ आले गेले याचा प्रतिपाळ उलंघुनि धाडिता बळि आश्रमांचा आंबला पोठिचे देती पण पाठिचे राखती शरणागतां वज्रपंचरा**"

—पैंगीण येथील वेताळाचा टका.

या दोन्ही 'टक्यां'संबंधीची विशेष माहिती कालनिर्देश, भाषिक वैशिष्टचे इत्यादी स्वतंत्र लेखाचा विषय आहे.

* *

दि. वं. पंडित

प्रियदर्शिनी

" माझ्या सांगाती पुढे चला. अजून आपल्या परमभाग्याचा क्षण गवसायचा आहे. तो अंतिम क्षण गवसावा म्हणूनच प्रारंभीचा क्षण उलगडलेला असतो." कवि डेव्हिस

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या जीवनातील परम भाग्याचा क्षण कोणता ? गेल्या मार्चमध्ये संसद निवडणुकांत त्यांनी कोणाचेही डोळे दिपावेत असे उज्ज्वल यश मिळविले तो की पाकिस्तानला लोळवून त्यांनी बंगला देश विमुक्त केला तो ? त्यांना हा प्रश्न विचारणारी जिज्ञासा शेवटी वेडी ठरली कारण या प्रश्नाचे उत्तर श्रीमती इंदिरा गांधी देऊच शकल्या नाहीत. त्यांना अजून पुष्कळ जीवन कंठायचे आहे, आह्वाने स्वीकारायची आहेत आणि परीक्षा उत्तीर्ण करायच्या आहेत. माणसाच्या जीवनातील परम भाग्याचा क्षण त्याच्या जीवनात पार पडला की त्याचा जीवनहेतू सिद्ध होऊन त्याच्या जीवनातील स्वारस्यच संपून जाणार. श्रीमती गांधींना आपले उर्वरित जीवन हेतुशून्य आणि नीरस असावे ही कल्पनाच मंजूर करता येत नाही. म्हणून वरील प्रश्नाला उत्तर देताना त्या मोठ्या शालीन वृत्तीने म्हणाल्या की वरील प्रसंग त्यांच्या जीवनातील फार मोठी आह्वाने होती ही गोष्ट खरी पण कोणत्याही जीवनातील अशी आह्वाने संपतच नसतात. माझे जीवनच आह्वानांशी झुंज करण्यात व्यतीत होत आले आहे म्हणून माझ्या जीवनातील परम भाग्याचा क्षण कोणता हे माझा मृत्यूच तुम्हास सांगू शकेल.

त्यांच्या या उत्तराच्या आड त्यांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान दडलेले आहे. आह्वानांचा स्वीकार स्वप्नाळू कर्तृत्वक्षीणता करू शकत नाही. त्यासाठी व्यक्तीच्या ठायी कणखर मनोवल आणि लढाऊ वाहुवल यांची सांगड असावी लागते. अशा प्रकारच्या वलांना जर नर्म वृत्तीची तरल झालर असेल तर त्यांना एक प्रकारचे शालीन सौंदर्यही लाभत असते. आपले उत्तर सादर करताना श्रीमती गांधींना रॉवर्ट व्राऊनिंगच्या पंक्तींचे स्मरण झाले त्याचे कारणही त्याच्या शब्दातील काव्यमय सौंदर्य हेच नाही का ? या शब्दांच्या सौंदर्याआड निर्धाराचे सामर्थ्यही दडलेले आहे. ' माणसाने आपली कंबर कसू नये आणि आपला दीप उजळू नये, हे महत्पाप होय ' हे व्राऊनिंगनेच म्हटलेले आहे, नाही का ?

प्रारंभ काळातील यशाने हुरळून जाणारी मंडळी अंतिम यशाच्या क्षणापर्यंत तग धरू शकत नाहीत कारण त्यांचा धीर मार्गातच मरगळून जात असतो. कर्तव्याच्या क्षणाला भयाकुलतेने हात गळाठून टाकणाऱ्या मरगळलेल्या मनाच्या जीवनाला अर्थच कोणता असा श्रीमती गांधींच्या नर्म वृत्तीचा सवाल आहे. त्यांच्या जीवनात भयाकुल मनाचा किंवा गळाठलेल्या हाताचा कधी विक्षेप आलेला नाही. तो यापुढेही कधी येणार नाही हा त्यांचा आत्मविश्वास आहे. हा आत्मविश्वास नव्या आह्वानांचा स्वीकार करायला उत्सुक असल्यावर त्यांच्या मनाने आजवरच्या यशातील सुभगता शोधीत का वसावे ? आणि ही सुभगता कोणत्या परिमाणाने आणि का तोलावी ? त्यांच्या परम भाग्याचा क्षण अजून त्यांच्या जीवनश्रद्धेला ग्रासू शकलेला नाही. कदाचित त्यांच्या मृत्यूपर्यंत देखील ग्रासू शकणार नाही. त्यावेळी इतरांनी त्यांच्या जीवनातील परम भाग्याचा क्षण शोधावयाचा आहे.

* *

अनुक्रमणिका

फ्लॉवर्स् प्लीज

सुधाकर जयवंत

रिक्शात सामान भरलं. सुधा रिक्शात चढली. त्यानं घर बंद केलं. कुलुप घातलं. खात्री करून तो स्वत: रिक्शात चढला. रिक्शावाला पाय मारू लागला.

ती कुठंतरी पहात होती. नाकाला पदर लावत. त्यालाच अस्वस्थ व्हायला लागलं.

तू आता अशी किती रडत बसणार आहेस ? तुला आधीच पक्कं ठरवून सांग म्हटलं होतं. बोंवलणार असशील तर परत जाऊ. कोणाकोणाचं सहन करत बसू एकटा. तू इकडे बोंबल, तिकडे पोट्टं जीव घेईल.

ती उगीच राहिली. कुणीच काही बोललं नाही. तो स्वत: वरच चिरडत पुटपुटू लागला.

वळणावर रिक्शा वळला. तशी तिची तगमग वाढली. चुळबुळ सुरू झाली.

आपण एकदा पाहून घ्यायचं पोरांना. पुन्हा आता कधी... तिला एकदम हुंदका आला.

पुन्हा तेच सकाळचं सोंग करायचं आहे. तू दिसलीस तर तुला तो सोडणार नाही. हातपाय पसरून किंचाळत बसेल.

पण त्यानं रिक्शावाल्याला रिक्शा थांबवायला सांगितलं. अंजनाच्या घराजवळ तो थांबला तेव्हा तिला उबळ यायला लागली होती. गळचाच्या शिरा फुलू लागल्या होत्या. डोळचात प्राण आल्यागत झाले होते.

आधार देत तिला उतरवलं. उतरल्या उतरल्या ती प्राणाच्या आकांतानं खोकलू, कुथू लागली. तिथंच तिला बसवली. आवाजानं अंजनाबाई बाहेर आली. पाणी दिलं. पाठीवर हात फिरवीत उभी राहिली. मुलं येऊन गोळा झाली. आईकडे बापाकडे पहात उभी राहिली.

आतून किंचाळण्याचा आवाज येत होता. धाकटचानं आवाज ओळखला. तो टाहो फोडू लागला. त्यानं आत जाऊन त्याला उचललं. नाक पुसलं आणि न बोलताच तो त्याला कडेवर नाचवू लागला.

आत आल्या आल्या तिनं त्याला घेतलं आणि ती मोकळेपणानं रडू लागली.

कसं थांबवावं, काय करावं त्याला समजेना. पण थोडचावेळानं सुधानंच स्वत:ला सावरलं. रिक्शावाला आत येऊन पाहू लागला. तेव्हा तिनं धाकटचाला अंजनाबाईजवळ दिलं. मुलींना नीट रहायला बजावलं. अंजनाबाईकडे पहात धाकटचाकडे बोट दाखवत ती बाहेर आली. अंजनानं मान हलवली. त्याला ते सगळं असह्य झालं. तो रिक्शात चढून बसला.

प्लॅटफॉर्म गर्दीनं फुलला होता. त्या सगळचा माणसांच्या जंगलात सगळे अनोळखी-परके. माणसा-सारखे दिसणारे प्राणी आपापल्या जगात पसार झाले होते. धावपळ, गोंधळ, आरडाओरडा यात कुठे तरी हारवलेली-कदाचित त्याच्यात कुठेच नसलेली सुधा. आणि सुधापासून कुठे तरी दूर असलेला परका तो.

सुधाची बिमारी तशी नवी नव्हती. त्यानं तिच्यासहित सुधाला जवळ केली होती. तिच्या घरच्या माणसांनी विरोध करूनही नेसत्या कापडांनी ती त्याच्याकडे आली होती. त्यावेळी तो एखाद्या देवतेसारखा आणि ती त्याला समर्पण होणाऱ्या फुलासारखी. आणि तिला फुलासारखंच जपायचं त्यानं ठरवलं होतं. बालिश उत्साहात अपार कष्ट करू आणि एक फुलबाग टिकवू-फुलवू-सिनेमातल्या एखाद्या ध्येयवादी हीरोसारखं.

पहिल्या मुलीनंतर सुधाचं ताजेपण कमी झाल्यासारखं त्याला वाटलं. मुलीमध्ये ती रमली असेल तर तसेही नाही. तिनं एक नवीनच छंद घेतला. तास-तास हारवून बसू लागली. दमा त्याच्यापासून लपवायचा प्रयत्न करू लागली. त्यानं अनेक ठिकाणी दाखवलं. भरती केलं. पुन्हा पुन्हा ती बरी झाल्यासारखी वाटे. पुन्हा पुन्हा ते बळावे. ओढाताण-खस्ता. तिच्या प्रकृतीवर-त्याच्या प्रकृतीवर होणारा परिणाम त्याला जाणवू लागला.

तिसऱ्याच्या वेळी डॉक्टरांनी बजावलं. पुन्हा परत आलात तर एकटंच परत जावं लागेल. माणसासारखं वागा. रस्त्यावर नागवावं तसं त्याला झालं. पण त्याचा इलाज तरी काय. कधीकधी जनावर त्याच्यात उफाळून येई. सगळा विरोध लटका पडे. मग सुधा विरोधच करीत नसे. एकदम समज आल्यासारखी, मिळूनच निर्णय घेतल्यासारखी वागायला लागे. मग त्याला तिची भीती वाटू लागे. रानटी, खुजे ठरतो असं वाटे.

गाडीत त्यानं सामान चढवलं. सुधाला बसवलं. अस्वस्थपणे तो इकडे तिकडे पहात राहिला. खाली उतरून सिगरेट पेटवत दम मारू लागला. गाडी हलली तसा तो आत गेला. सुधानं त्याच्याकडे बघितलंही नाही. म्हणजे आपण नसतो चढलो तरी. . .दुर्लक्षित झाल्यासारखं त्याला वाटलं. पण मग एकदम तिची करुणा आली. स्वतःच्या दंभाची लाज वाटू लागली. आता असा पोरकटपणा कामाचा नव्हता. आसक्ती संपली होती. तो ओशाळला. तिच्या जवळ एक पाय बाकावर घेऊन बसून राहिला.

तुम्ही पत्ता घेतला आहे बरोबर. तिथं कोणाकडे राहायचं. उगाच त्रास दुसऱ्याला. काय उपयोग सगळयाचा.

त्यानं पत्ता घेतला होता. वेल्लोरच्या दवाखान्यात जायचं. त्यापूर्वी त्याच्या मित्राकडे ऑगस्टीनकडे एक दिवस थांबायचं. त्याचे आईवडील आहेत. त्यांना पत्रही घातलं आहे त्यानं. अगदी परक्या देशात आल्यासारखं नको. टेकायला आधार.

ती बोलेना. तसा तोच बोलू लागला. इकडतिकडच्या गोष्टी. एकटाच ओशाळल्यासारखा हसू लागला. आपोआप चूप राहिला.

हॉस्पिटल. तिथलं नितळ वातावरण. लांबलचक वॉर्डस्. प्रेतासारख्या भयाण भिंती. निर्जंतुकांचा वास. तिखट. मरणाचा. आणि सिस्टर्सच्या शुभ्र कपड्यांचा खरखरीतपणा. सॅंडलसचा टकटकाट.

कसं असेल हॉस्पिटल. नागपूरसारखं. की मोठं. सुधानं मध्येच म्हटलं. मला भीती वाटते.

भीती. कशाची भीती. मी आहे बरोबर. सुधाचं तिऱ्हाइतपण जाऊन ती त्याच्यावर अवलंबून असल्याचं, त्याचा आधार शोधत असल्याचं त्याला एकदम जाणवलं. तो एकदम पोक्त, विशाल झाला. तिला धीर देऊ लागला.

मिशन हॉस्पिटल. परदेशी तज्ज्ञ. फार पवित्र वातावरण आहे तिथं. ठिकठिकाणी भेटणारा क्रॉस–लाल फुल्या. केरळी नर्सेस्. कोवळचा वयात कामाला जुंपल्यासारख्या. त्यांना भगतिणी व्हावसं आपणहून वाटलं असेल. सुधाची लक्षणं आताशा भगतिणीचीच. त्यांनी कोणती दुःख भोगली असतील.

आणि एखादं ऑपरेशनचं सांगितलं तर.

ते करायचं. आपण त्या तयारीनं निघालोच आहोत.

खूप दिवस राहावं लागेल.

राहू.

तिथं मुलांचं कोण करणार. खर्चाचं—


ते पाहू ग. त्याची किती काळजी करायची. हॉस्पिटमध्ये गेल्यावर ठरवू सगळं. आधी तपासून होऊ दे. फार विचार करायचा कशाला?

तो स्टेशनवर उतरला. अगदी वेगळी माणसं. त्यांची धावपळ. आरडाओरडा. भाषा. त्याला दचकायला झालं. कुठं आलो. कसं होईल. आभाळ झाकोळून आलं होतं. सुधाला उतरवून घेतल्यावर त्यानं पिशवीतली शाल दिली. उकाड्याचा, आभाळ भरून आल्याचा त्रास तिला होऊ लागला.

वाहनात बसल्यावर त्याचा धीर खचू लागला. सुचेनासं, कोंडल्यासारखं झालं. आता अर्धवट टाकून चालणार नव्हतं. निभावून गेलं पाहिजे.

सुधा शाल पांघरून बसली होती. पण जरा ताजी वाटत होती. तो खंगू लागला. तिला आशा वाटायला लागली. निर्णायक क्षण येत होता. आतावर तो धीर देत होता तर ती हतबल झाल्यासारखी दिसत होती.

तिला आता खूप आशा वाटत असावी. तो तिच्याकडे पहायचं टाळू लागला.



ऑगस्टीनचे म्हातारे वडील समोर आले. प्रेमानं आत घेऊन गेले. मोठ्या शहरातल्या दोन खोल्या. ऑगस्टीनची आई आत होती. पांढऱ्या केसांची ती सावळी बाई धीर देत होती.

आत सामान घेऊन तो टिनाच्या खुर्चीवर बसला.

काय करावं, काय बोलावं सुचेना. सुन्न झाल्यासारखं होत होतं. त्यानं कॉफी घेतली. सुधाकडे पाहिलं. ती सावरली होती.

शेजारची मुलं आत डोकावून गेली. तरतरीत उमलती मुलं. त्याला आपल्या मुलांची आठवण झाली. पण त्यानं स्वतःला बजावलं. सगळं सुरळीत होणार आहे.

कोंदटपणा वाढला तसा सुधाला त्रास होऊ सुरू झाला. खोकल्याची जबरदस्त उबळ. धपापणं. फुस्कारे टाकणं. वाढती घरघर. नको ते विचार येऊ लागले. सगळं उध्वस्त झाल्यावर फिरणारी, दारोदार लाचारासारखी माया, प्रेम मागणारी त्याची मुलं. सुधावर आपले जळणारे डोळे रोखत तो मग पहारेकऱ्यासारखा बसून राहिला.

ऑगस्टीनच्या आईवडिलांनी त्यांना बाहेरची खोली दिली आणि आपली अंथरुणं आतल्या खोलीत नेली. थोडं बरं वाटलं. ही अशी माणसं. कुणीच नसूनही कुणी तरी असणारी.

दुसऱ्या दिवशी निघायचं होतं. निर्णयासाठी. रात्रभर त्याचा डोळ्याला डोळा नव्हता. सारखं भटकणारं मन. सारखी तंद्री तुटायची. तो चमत्कारिकपणे सुधाकडे पाहायचा. तिची घरघर ऐकली की पुन्हा कुठे तरी गुंतायचा

पहाटे दार खडखडलं. अर्धवट तंद्रीत त्यानं दार उघडलं. पहाटेचा वारा एकदम आत घुसला. तो शहारला. बाहेर दोन मुलं उभी होती. शेजारची असावीत. तरतरीत. त्यानं मानेनं काय म्हणून विचारलं. मोठ्या मुलीनं ओंजळ पुढे केली. उघडली. पांढरी शुभ्र ओंजळभर फुलं. तो गोंधळला पहात राहिला.

फ्लॉवर्स. . फ्लॉवर्स प्लीज. त्यानं हात पुढं करून ती फुलं हातात घेतली.

फॉर हर. आंटी. ऽ.

मुलं मागच्या मागं पळून गेली. तो दारात उभा. एकदा हातातल्या फुलांकडे एकदा आत थकून पडलेल्या सुधाकडे पाहणारा.

卍 卍

अनुक्रमणिका

॥ प त्रे ॥

काव्यसमीक्षा : मूल्यसंकेतांची सापेक्षता

श्री. म. द. हातकणंगलेकर यांचे वरील विषयावरील विस्तृत 'टिपण' युगवाणीच्या नोव्हेंबर-डिसेंबर अंकात वाचण्यात आले. त्या वाचनातून वाङमयीन परिभाषेसंबंधी सुचलेले एकदोन विचार प्रस्तुत मांडले आहेत.

नवे मूल्यसंकेत निर्माण होत आहेत. हे स्थिर व प्रस्थापित झालेले नाहीत. हे नवे मूल्यसंकेत कोणते ? ते जुन्या मूल्यसंकेतांहून वेगळे आणि अधिक उपयुक्त का आहेत ? असा प्रश्न उपस्थित केला आहे. त्यावरून 'नवे' आणि 'जुने' यांची निश्चित कालमर्यादा लेखकाने स्पष्ट केलेली नाही. तसेच बहुतेक विचार पाश्चात्य टीकाकारांनी केला आहे असे म्हणून भारतीयांनी तसा प्रयत्न केलेला नाही असेही ते स्पष्टपणे सुचवितात.

(१) वास्तविक वाङ्मयीन मूल्ये निश्चित ठरविणे ही एक अत्यंत कठीण गोष्ट आहे. कारण 'वाङ्मय' ही एक अभिनव घटना (phenomenon) आहे. ती काल होती, आज आहे आणि उद्याही राहील. वाङमयाने धारण केलेली अनेक रूपे आहेत. जीवनाप्रमाणे वाङ्मय हे वेगवेगळया रूपाने अवतीर्ण झालेले दिसून येते. 'वाङ्मय हे जीवनरहस्याचा ग्रंथ लावीत असते तर टीका ही वाङमय रहस्याचा ग्रंथ उकलून दाखविते' हे साहित्यसम्राट केळकरांचे उद्‌गार प्रसिद्ध आहेत. प्रत्येक काळातील टीका ही त्या दृष्टीने पावले टाकते. ही टीका वाङमयाचे एक तत्त्वज्ञान बनवते. म्हणजेच वाङमयीन सत्यांचा शोध घेते. वाङमयव्यवहाराचा अर्थ लावणे, त्याची तत्त्वे शोधून काढणे हे तिचे कार्य आहे. आणि अशा या वाङमयव्यवहाराला नियमात बसविण्यासाठी टीकेला मूल्यांचा आधार घ्यावा लागतो.

आजच्या संदर्भात हा विचार श्री. हातकणंगलेकरांना अभिप्रेत आहे असे गृहीत धरले तर असेच म्हणावे लागेल की आज होत असलेला वाङ्मयविचार हळुहळू उत्क्रांत होत आहे. आज समीक्षेचे रूप द्विविध आहे. एका प्रकारात आपण कलाकृतीचे अनन्यसाधारण रूप लक्षात घेण्याचा प्रयत्न करतो; ती कलाकृती आहे का ? हे जाणण्याचा प्रयत्न करतो, तर दुसऱ्या प्रकारात आपण कला निर्मितीची प्रक्रिया काय असते हे जाणण्यासाठी त्या प्रक्रियेचा विचार करतो—करीत आहोत.

समीक्षाशास्त्रातील विविध मूल्यांच्या कल्पनेचा विकास अगदी प्राचीन काळापासून कसकसा होत गेला हे जर बघितले तर प्रथम समीक्षकांचे सारे लक्ष वाङमयाच्या बहिरंगावरच केंद्रित झालेले दिसून येते. त्यातून भामह-दण्डी जसे सुटले नाहीत तसा ॲरिस्टॉटलही सुटू शकला नाही. काव्यकलेचे मर्म कोणते ? काव्यातील सौंदर्याचे व आनंदाचे नियम तत्त्व कोणते ? हाही विचार भारतीयांनी केला. भामह-दण्डीपासून जगन्नाथपंडितापर्यंत संस्कृत साहित्यशास्त्र हळूहळू उत्क्रान्त झालेले आहे. काव्यलक्षण, काव्यप्रयोजन, काव्यकारण, काव्यघटक, प्रतिभा यासंबंधीची शास्त्रीय भूमिकेतून केलेली चर्चा व त्यामधून फलित झालेले साहित्यशास्त्र हे मूलत: सिद्धान्तानुगामी आहे. भामह-दण्डीच्या काळापासूनच साहित्यशास्त्राचा विकास झाला तर समीक्षेला तितकेसे महत्त्व दिलेले दिसत नाही.

समीक्षा म्हणजे प्रत्येक ललितकृती ही अनन्यसाधारण आहे, तिचा आस्वाद, रूपसिद्धीची मीमांसा, मूल्यमापन याच घटकांना समीक्षेत सर्वस्वी स्थान दिलेले असते. म्हणून साहित्यशास्त्र म्हणजे वाङमयसमीक्षा नव्हे ! समीक्षा ही आत्मनिष्ठ आहे तर साहित्यशास्त्र हे वस्तुनिष्ठ आहे. वर्तमान काळात निर्माण होणाऱ्या वाङमयाविषयी विचार करताना अत्यंत सावधगिरी बाळगणे आवश्यक ठरते.

(२) 'जुने साहित्यशास्त्र', 'नवे साहित्यशास्त्र' आणि 'सांप्रदायिक साहित्यशास्त्र' असे साहित्यशास्त्रात काही नवे जुने असू शकते का हाही एक प्रश्न निर्माण होतो. वास्तविक साहित्यशास्त्र म्हणजे वाङ्मयसमीक्षा नव्हे व वाङ्मयसमीक्षा म्हणजे साहित्यशास्त्र नव्हे! आधी भाषा व मग तिचे व्याकरण त्याप्रमाणे आधी वाङ्मय व नंतर त्याचे शास्त्र होय. आणि साहित्यशास्त्रात केवळ वाङ्मयाच्याच नव्हे तर वाङ्मयीन टीकेच्याही मुळाशी असलेली तत्त्वे शोधून त्यांची शास्त्रीय मांडणी करणे म्हणजे साहित्यशास्त्र होय. "वाङ्मयसमीक्षा ही संकलनात्मक (synthetical) असते तर साहित्यशास्त्र हे पृथक्करणात्मक (analytical) असते. वाङ्मयसमीक्षा ही प्रत्येक कलाकृती एक विशिष्ट बाब आहे म्हणून तिचे परीक्षण करते तर 'साहित्यशास्त्रा'त परंपरेने ठरलेल्या काव्यमीमांसेच्या तत्त्वांचा विचार व नववृत्तीच्या विकासाचा समावेश होईल असे त्या तत्त्वांचे विवेचन केलेले असते." (म. सा. शा., पृष्ठ ४४)

उषा मा. देशमुख

पड आणि पेड

माझ्या 'खोड' या कवितेसंबंधी एक सांगावसं वाटतं. 'पेड सुटले स्पर्शा'चे ही ओळ चुकीची छापली गेली असून वास्तविक ती मूळ कवितेप्रमाणे 'पड सुटले स्पर्शा'चे अशी हवी होती. 'पड' हा शब्द इथे 'पापुद्रा' या अर्थाने आला होता. शिवाय 'पेड' शब्द 'पड' या शब्दाच्या अनेक अर्थांपैकी एक होऊ शकतो. (सुगम मराठी शब्दकोश बनहट्टी + धर्माधिकारी, पान २५२).

मला वाटतं, पेड घवघवीत असतात; सुटले की मोकळेचाकळे होतात. पड नाजुक असतात, सुटण्याआधीच कुस्करले जाण्याची भीती असते. थोडक्यात सांगायचं तर आम्ही स्त्रिया 'वेणीचे पेड वळतो' पण 'सारणाच्या करंज्यांचे पड सुटतील अशा वेतावातानं त्या तळतो.'

पड आणि पेड यात एका मात्रेचा काय तो फरक! फक्त अर्थच्छटा स्पष्ट व्हावी म्हणून एवढ्या लगबगीने प्रपंच मांडला! बाकी छापण्यात तिळभरही 'खोड' नाही.

ज्योत्स्ना पांडुरंग दीक्षित

स्पॅनिश कवितांचा अनुवाद

मी स्पॅनिश कविता मुळातून किंवा इंग्रजी गद्य वा पद्य अनुवादाद्वारे फारशा वाचलेल्या नाहीत. मात्र श्री. मनोहर चिंतामणि वझे यांची 'स्पॅनिश कवितांचा अनुवाद' ही टिप्पणी व त्यांनी केलेला लोर्काच्या कवितेचा 'सांडयोद्धयाच्या मरणाचा शोक' हा अनुवाद वाचण्यापूर्वी मी लोर्काच्या तीन ट्रॅजेडीज इंग्रजीतून वाचलेल्या होत्या व त्यांपैकी 'यर्मा'चा रंगभूमीवरील एक चांगला प्रयोग पाहिलेला होता. श्री. वझेंची 'सहजनिर्मिती' ज्या कवितेच्या आधारे झाली आहे, तिचे इंग्रजीतील एक जाहीर वाचन ऐकून भारावलेल्या मैत्रिणीच्या तोंडून या कवितेचे वर्णन मी ऐकले होते. एका विशिष्ट क्षणी थिजलेल्या काळाचे गडद रूप नजरेसमोर एकएका निखळ रेषेतून साकार करणाऱ्या लोर्काच्या प्रतिभेचा तिच्याकडून परावर्तित होणारा परिणाम अनुभवला होता. आधी वाचलेल्या लोर्काच्या व त्याच्या विषयीच्या अल्प माहितीच्या आधारे. त्यामुळे 'सांडयोद्धया'वरच्या कवितेचा अनुवाद वाचताना जेव्हा रस जमेना तेव्हा हा दोष अनुवादाचा असावासे वाटले. मग हा ठेचकळवणारा अनुवाद पुन्हा वाचताना राग यायला लागला.

वझेंना दृक्संवेदना प्रकर्षाने जाणवल्या, इतर संवेदना तुलनेने क्षीण वाटल्या. त्यांनी लोर्काच्या व्यक्तिमत्त्वाची घडण काही प्रमाणात लक्षात घेतली. या कवितेने जी एक तीव्र भावानुभूती लाभली तिच्यामध्ये झपाटलेल्या अवस्थेत असताना, जितक्या जीवघेण्या सहजतेने कविता क्वचित् येते तितक्या सहजतेने हा अनुवाद झाला; स्वतःची कविता लिहित असताना सुद्धा इतकी दाहक तंद्री त्यांनी त्या वेळपर्यंत तरी भोगलेली नव्हती.—वझेंनी ही माहिती प्रस्तुत अनुवादाच्या संदर्भात दिलेली आहे. निर्मितीप्रक्रियेची उत्कटता व सहजता आणि कलाकृतीचे यश यांच्या परस्पर संबंधाच्या दृष्टीने त्यांना हा अनुभव नमूद करणे आवश्यक वाटलेले असावे.

कलाकृती किती सहजतेने घडली किंवा तिच्या निर्मितीच्या वेळी काय अनुभव आला वगैरे गोष्टी रसिकांची विशिष्ट जिज्ञासा पूर्ण करतात. अशी जिज्ञासा नेहमी आढळते व कलाकृतीच्या विश्लेषणासाठी कित्येकदा अशा माहितीचा उपयोगही होतो. पण

कलाकृतीचा थोरपणा किंवा हीनपणा या गोष्टींवर अवलंबून असतोच असे नाही.

वझेंची अनुवादाच्या वेळची भाववृत्ती हा त्यांचा वैयक्तिक अनुभव आहे. लोर्का असा झपाटून टाकतो हे कळण्यापुरता तो ठीक आहे. पण अनुवादाच्या बरे-वाईटपणाचा विचार करताना त्याचा विचार नको. त्यांचे हे लिहिणे थोडेसे 'सफाई' देण्यासारखे वाटले म्हणून असे लिहावे लागले. एखादा प्रचंड दुःखानुभव घेऊन लिहिलेली कथा किंवा नाटक अतिरंजित, खोटे वगैरे आहे असे कुणी म्हटले म्हणजे काही लेखकांना ही सत्य घटना मी प्रत्यक्ष अनुभवली अशी 'सफाई' देण्याचा मोह होतो या गोष्टी कलाबाह्य आहेत. प्रत्यक्ष कलाकृती समर्थ असेल तर तिच्यातील अतिरंजित व अवास्तव अनुभवही रसिकांना आपलेसे करतो. तसेच अत्यंत सहज वाटणारी कलाकृती (त्यात अनुवादही आला) अतीव कष्टाने पूर्ण झालेली असू शकते. बोजड, क्लिष्ट व 'लेबर्ड' वाटणारे साहित्य झपाटलेल्या अवस्थेत, सहज ओघात लिहिलेले असू शकते.

चांगली कविता पूर्णपणे न कळूनही आनंद देऊन जाते. विशिष्ट भावानुभव देते. पण केवळ हा भावानुभव अनुवादासाठी पुरेसा नसतो. कवीचे व्यक्तिमत्व, त्याचा परिसर, परंपरा, संस्कृती यांचा मागोवा घेत कवितेच्या योग्य संदर्भाकडे अनुवादकाला जावे लागते. ह्या पार्श्वभूमीवर शब्दांच्या छटा समजून घ्याव्या लागतात व त्यासाठी स्वभाषेतील योग्य शब्द निवडावे लागतात. मूळ कवितेचा भावानुभव वेगवेगळ्या वाचकांना स्वमर्यादेच्या प्रमाणात जास्त वेगवेगळ्या पातळीवर आस्वादता येईल तसाच परिणाम अनुवादातही साधला जावा इतपत अनुवाद मूळ कवितेच्या जवळ जायला हवा असे मला वाटते. मूळ कवितेचा भावानुभव आत्मसात् करतानाही अनुवादकाला मूळ कविता तिच्या योग्य संदर्भात समजावून घेणे प्राप्त आहे. हा आत्मसात केलेला अनुभव स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या मुशीत ओतण्याचे स्वातंत्र्य अनुवादक कसे काय घेऊ शकतो ? उलट त्याने स्वतःचे व्यक्तिमत्त्व पुसून टाकून कवीच्या व्यक्तिमत्वात शक्य तो शिरण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

स्वभाषेची मर्यादा राहणारच. मूळ नाद किंवा आकृतिबंध स्वभाषेत संक्रमित न करता आला तरी प्रतिशब्द निवडताना संवेदनेच्या, मूळ कवीच्या संस्कृतीच्या, त्याच्या परिसराच्या, परंपरेच्या, व्यक्तिमत्त्वाच्या आधाराने त्याच्या मूळ शब्दांना जवळचे असे स्वभाषेतील कोणते शब्द असू शकतील ते पाहणे अनुवादकाची जबाबदारी ठरते. श्री. वझे यांनी यासाठी काय प्रयत्न केले हे त्यांच्या टिप्पणीवरून लक्षात येत नाही.

वझेंना उपलब्ध झालेला गद्य अनुवाद कोणता हे त्यांनी नमूद केले नाही. बहुधा तो पेंग्विनच्या युरोपियन कविमालेतील अनुवाद असावा. या मालेतील लोर्काच्या पुस्तकात वर मूळ स्पॅनिश कविता व खाली सरळ इंग्रजी भाषांतर दिलेले आहे. दोन्ही भाषांवर जेव्हा अनुवादकाचे प्रभुत्व नसते तेव्हा सहसा वापरली जाणारी पद्धती अशी असते. दोन भाषा जाणणाऱ्या कवीने प्रथम स्वभाषेतील कवितेचा परभाषेत साधा शब्दशः अनुवाद करावयाचा, परभाषेतील कवीने मग या अनुवादाच्या आधारे व मूळ कवितेचे स्वतःला कळणारे लिप्यंतर पाहून स्वभाषेत काव्यरूप अनुवाद करायचा. पेंग्विन मालेत सरळ इंग्रजी गद्यानुवाद व मूळ कविता उपलब्ध आहेत. वझेंनी जर या पुस्तकावरून अनुवाद केला असेल तर त्यांनी केवळ इंग्रजी गद्य अनुवादावरून हा अनुवाद केलेला नसून मुख्यतः इंग्रजी अनुवादाचा वापर केलेला आहे. कारण "तंतोतंत पाच वाजता दुपारी" हा विचित्र वाटणारा अनुवाद करण्याचा मोह त्यांना "En Puntn" (तंतोतंत) या मुळातील शब्दामुळे झाला असावा. तसेच 'मूकतेचे कळप' मूळ "groupos de silencio" याचा हा अनुवाद. इंग्रजीवरून असा प्रकार होणार नाही.

"वाळूवर सांडलेल्या रुधिराचे मुस्कट" हा देखील मूळ कविता पाहाण्याचा परिणाम. पेंग्विन इंग्रजी अनुवादाप्रमाणे "वाळूवर सांडलेल्या रक्ताने भरलेले मुस्कट" असाच अर्थ कळतो.

"गाडीवरील किंवा चाके असलेली शवपेटी" असे चित्र इंग्रजी अनुवादाप्रमाणे डोळ्यांसमोर येत असताना 'सचक्र शवपेटी' असा मोघम अनुवाद करण्याचा मोहही मुळातील शब्दांमुळे झाला असावा.

मूळ भाषा अवगत नसेल तर अनुवादाच्या अनुषंगाने तिच्यातील शब्दरचना वगैरे अजमावून पाहणे, किंवा अनुवादातील एखादी छटा मूळ शब्दांमुळे स्पष्ट होते की काय हे पाहणे ठीक; पण आपणाला कळणाऱ्या भाषेतील अनुवाद त्याज्य ठरवून न कळणाऱ्या मूळ भाषेतून अनुवाद करू पाहणे धोक्याचे.

अकारण संस्कृत शब्दांचा नादहानी करणारा व अर्थ झाकळून टाकणारा भरणा व काही ठिकाणी सरळ सरळ चुकीची शब्दसंहिता असे अनेक दोष वज्रेकृत अनुवादात आढळतात.

माझ्या अल्प समजुतीप्रमाणे करून बघितलेला अनुवाद.

इग्नेशियो सांकेझ मेजियाससाठी (विलाप)

पाच वाजता दुपारी
ठीक पाच वाजले होते दुपारचे तेव्हा
एक मुलगा घेऊन आला सफेद चादर
पाच वाजता दुपारी
एक गवती टोपली चुन्यानं भरलेली
पाच वाजता दुपारी
बाकी सर्वभर मृत्यू आणि फक्त मृत्यूच
पाच वाजता दुपारी
वाऱ्यानं उडवले कापसाचे बोळे
पाच वाजता दुपारी
आणि ऑक्साईडनं उधळली काच अन् निकल
पाच वाजता दुपारी
आता झुंजताहेत कबूतर नि एक बिबळ्या वाघ
पाच वाजता दुपारी
आणि एक मांडी उजाड शिंगाबरोबर
पाच वाजता दुपारी
खर्जातला अंतिम स्वरझंकार सुरू झाला आहे
पाच वाजता दुपारी
आर्सेनिकच्या घंटा आणि धूर
पाच वाजता दुपारी
कोनाकोनावर मूक झालेले जमाव
पाच वाजता दुपारी
आणि फक्त खोंड विजयोन्मत्त
पाच वाजता दुपारी
जेव्हा बर्फाचा घाम फुटला
पाच वाजता दुपारी
जेव्हा आखाडा आयोडीननं भरून गेला
पाच वाजता दुपारी
मृत्यूनं जखमेमध्ये अंडी घातली
पाच वाजता दुपारी
पाच वाजता दुपारी
ठीक पाच वाजता दुपारी

(अर्थातच अपूर्ण)

वसंत माने

वि. सा. संघाचे सभासद व 'युगवाणी'चे वर्गणीदार यांना सूचना

विदर्भ साहित्य संघाचे आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे आहे. १९७१–७२ या वर्षाची साधारण सभासद वर्गणी दि. ३१ मार्च १९७२ रोजी संपते व नवीन वर्ष १ एप्रिल १९७२ पासून सुरू होते. सर्व सभासदांना विनंती करण्यात येत आहे की, दि. १ एप्रिल ७२ पासून सुरू होत असलेल्या १९७२–७३ या वर्षाची साधारण सभासदत्वाची वार्षिक वर्गणी रु. ५/– केंद्रीय कार्यालयाकडे त्वरित पाठवावी, म्हणजे ३१ मार्चनंतर प्रसिद्ध होणारे 'युगवाणी'चे अंक सभासदांकडे पाठविणे सोयीचे होईल. आजीव सभासदत्वाची वर्गणी रु. १०१/– (एकशे एक केवळ) आहे. सभासदांना 'युगवाणी' विनामूल्य मिळते.

वर्गणीदारांकरिता

'युगवाणी'ची वार्षिक वर्गणी रु. १०/ (दहा केवळ) असून वर्गणीदार कोणत्याही महिन्यापासून होता येते. या वर्गणीत वर्गणीदार झाल्यापासून एका वर्षातील अंक प्राप्त होतील. वर्गणीची रक्कम रु. १०/– पाठविताना "'युगवाणी'ची दि. माहे १९७ . . . पासून दि. माहे . . . . . १९७ . . . पर्यंतची वर्गणी पाठवीत आहे," असे स्पष्ट नमूद करावे, अशी विनंती आहे.

वर्गणी 'सरचिटणीस **विदर्भ साहित्य संघ, नागपूर १२**' या पत्त्यावर पाठवावी—

साभार पोच

(१) **सुलताना–रझिया** (कादंबरी)
डॉ. रफिक झकेरिया
अनु. : वा. रा. कान्त,
पॉप्युलर प्रकाशन, ३५–सी, ताडदेव रोड,
मुंबई– ३४–W. B. पृष्ठे १६५, किं. ८ रुपये.

(२) **किशोर** (मासिक) **नमुना अंक**
प्रकाशक महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
वार्षिक वर्गणी रु. ८ फक्त

(३) **भागवतोत्तम संत एकनाथ**
डॉ. शं. दा. पेंडसे,
नागपूर प्रकाशन, नागपूर–१२
पृष्ठे डेमी ३००; किंमत रु. १५

(४) **आधुनिक कवितेचे प्रणेते**
(भाग १ व २)
ले. प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित
नागपूर प्रकाशन, नागपूर–१२
पृष्ठे ५२२ एकूण; किं. प्रत्येकी रु. १२

(५) **रुबायत : उमरख़य्याम**
अनु. बा. ल. अंतरकर
हंस प्रकाशन, ४७४/१, सदाशिव पेठ, पुणे ३०
पृष्ठे २४; किं. रु. २

(६) **ऐतिहासिक मराठी नाटके** (प्रबंध)
डॉ. भीमराव कुळकर्णी,
जोशी–लोखंडे प्रकाशन, टिळक रस्ता, पुणे ३०
पृष्ठे ३६२; किं. रु. १५

(७) **कांचापाणी** (कादंबरी)
लेखक : 'एन'
देशमुख आणि कंपनी,
७३९, बुधवार पेठ, पुणे ३०
पृष्ठे २२५; किं. रु. १०

(८) **चंद्रफूल** (काव्य) : **संजीवनी**
प्रकाशक : स्त्री–सखी प्रकाशन,
किर्लोस्कर प्रेस, पुणे
पृष्ठे : १२०; किं. रु. ५


(९) **पंखपर्व** (काव्य)
मनोहर चिंतामणि वझे,
सुरुचि साहित्य मंदिर
अभ्यंकर पुतळा, महाल, नागपूर २
पृष्ठे क ते ज्ञ; किं. रु. ३

(१०) **मराठी समीक्षेचे आदिपर्व**
प्रा. भा. श्री. परांजपे
पद्मश्री प्रकाशन, हनुमाननगर, नागपूर ३
पृष्ठे १९२ किं. रु. ७.५०

मराठी संशोधन मंडळ, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मुंबई १४

(१) **मराठी संशोधन –४**
संपादक म. वा. धोंड,
पृष्ठे २१८; किं. रु. ५

(२) **क्रिस्ताच्या वधस्तंभारोहणप्रसंगीचे विलाप**
संपादक वि. बा. प्रभुदेसाई
पृष्ठे ५८; किं. रु. ४



मौज प्रकाशने

(१) **अरे संसार संसार** (कादंबरी)
प्रभाकर पेंढारकर
पृष्ठे १४७; किं. रु. ८.५०

(२) **मी, मी, मी, नटराज** (कादंबरी)
ए. वि. जोशी
पृष्ठे १२१; किं. रु. ७.५०

(३) **राखी पाखरू** (कथा)
चिं. त्र्यं. खानोलकर
पृष्ठे १७७; किं. रु. ९

(४) **अठरा लक्ष पावलं** (प्रवासलेख)
दि. बा. मोकाशी
पृष्ठे १८०; किं. रु. ९.५०

(५) **ऑक्टोपस** (कादंबरी)
श्री. ना. पेंडसे
पृष्ठे २४०; किं. रु. १२.५०
मौज प्रकाशन गृह, गिरगाव, मुंबई ४

सुविचार प्रकाशन मंडळ; पुणे, नागपूर.

(१) **चिरयौवन** (काव्य)
'अनिल'
पृष्ठे १४४ किं. रु. ५

(२) **दुर्दम्य** (कादंबरी) (खंड दुसरा)
गंगाधर गाडगीळ
पृष्ठे ४०६ किं रु. १५

(३) **सही आणि इतर कविता**
सरस्वतीबाई सुभेदार
पृष्ठे १२४ किं. रु. ४

॥ संघवार्ता ॥

मा. नी. गलगलीकर,
सरचिटणीस

कला–केंद्र

बुधवार दि. १९७१ रोजी सायं. ६ वाजता गडकरी सभागृहात जर्मन फिल्म शो दाखविण्यात आला.

युवा चित्राकृतींचे प्रदर्शन

सुवर्ण महोत्सवानिमित्त स्थानिक कलाकारांच्या चित्राकृतींचे प्रदर्शन शनिवार दि. २२ जानेवारी ७२ ते २६ जानेवारी ७२ पर्यंत भरविण्यात आले होते.

प्रदर्शनाचे उद्घाटन प्रा. वा. वि. करंजकर यांच्या हस्ते झाले.

सुवर्ण महोत्सव–१९७२–७३

वर्धापन दिन समारंभ

शुक्रवार दि. १४ जानेवारी १९७२ रोजी सायंकाळी ६–३० वाजता ४९ व्या वर्धापन दिनानिमित्त दैनिक 'लोकमत'चे संपादक श्री. पां. वा. गाडगीळ यांचे 'ललित साहित्य, मानवी दुःख आणि आचार्य धर्माधिकारी' या विषयावर व्याख्यान झाले.

कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला

यंदाच्या कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमालेनिमित्त बुधवार दि. १९ जानेवारी १९७२ ते शुक्रवार दि. २१ जानेवारी १९७२ पर्यंत पुण्याच्या मॉडर्न कॉलेजातील मराठी विभागाचे प्रमुख, पुणे विद्यापीठातील पदव्युत्तर विभागातील मराठीचे प्राध्यापक आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह प्रा. डॉ. भीमराव कुळकर्णी यांची 'दारुण नाटच व हास्य नाटच' या विषयावर तीन व्याख्याने झाली. या संदर्भात त्यांनी किर्लोस्कर, खाडिलकर, देवल, गडकरी, कुसमाग्रज, माधवराव जोशी, आचार्य अत्रे यांच्या नाटचकृतींवर विचार मांडले.

कै. रा. ग गडकरी स्मृतिदिन

रविार दि. २३ जानेवारी १९७२ रोजी सायंकाळी ६–३० वाचता कै. राम गणेश गडकरी स्मृतिदिनानिमित्त सोलापूर येथील दयानंद महाविद्यालयातील प्राध्यापक त्र्यं. वि. सरदेशमुख यांचे 'गडकऱ्यांच्या प्रतिभेचे स्वरूप' या विषयावर गडकरी सभागृहात व्याख्यान झाले.

‘ स्वरमंडळा ’तर्फे ‘ रागदर्शनमाला ’

विदर्भ साहित्य संघाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त ‘ स्वरमंडळा ’च्या वतीने ‘ रागदर्शनमाला ’ हा कार्यक्रम १५, २३, २७ व ३० जानेवारी १९७२ रोजी आयोजित करण्यात आला. यात श्री. अमृतराव निस्ताने, श्री. मधुसूदन भावे, सौ. उषा पारखी व प्रा. डॉ. व्ही. व्ही. देशपांडे यांनी अनुक्रमे कल्याण-प्रकार, सारंगप्रकार, कंसप्रकार व भैरवप्रकार यावर प्रात्यक्षिके सादर केली.

सांस्कृतिक समिती

संस्थेतर्फे सोमवार दि. ३१ जानेवारी १९७२ रोजी सायंकाळी ७ वाजता कै. गोविंदराव दोडके यांच्या स्मृतिदिनानिमित्त श्री. पां. ब. गाडगीळ यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पमाला घातली.

बालनाट्य महोत्सव — १९७१–७२

वि. सा. संघाच्या नाट्य समितीतर्फे यंदा दि. १, २, ८, ९ व १६ जानेवारी १९७२ रोजी झालेल्या बालनाट्य महोत्सव स्पर्धेत सांकृतिक सभा, रेशिमबाग या संस्थेचे ‘ राजकन्या नीलमपरी ’ हे नाटक प्रथम आले असून त्याला रंजन कला मंदिराने दिलेला रौप्य चषक व रुपये पन्नासचे रोख पारितोषिक मिळाले. द्वितीय क्रमांकाचे रुपये तीसचे रोख पारितोषिक सुरसंगमच्या ‘ देवबाप्पाची सप्रेम भेट ’ला मिळाले. हडस हायस्कूल्च्या ‘ जेव्हा अकलेला अक्कल फुटते ’ला तृतीय क्रमांकाचे रोख रु. वीसचे पारितोषिक मिळाले.


पुरुष भूमिकेत वैयक्तिक अभिनयाचे रु. १५–०० चे रोख पारितोषिक ‘ राजकन्या निलमपरी ’तील ‘ राजपुत्र ’ या भूमिकेबद्दल श्री. प्रियदर्शन माडखोलकर यांना तर ‘ जेव्हा अकलेला अक्कल फुटते ’मधील ‘ रघु ’च्या भूमिकेबद्दल श्री. हर्षवर्धन निमखेडकर यांना द्वितीय क्रमांकाचे रु. १०–०० चे रोख पारितोषिक प्राप्त झाले.

स्त्री भूमिकेबद्दल वैयक्तिक अभिनयाचे रु. १५–०० चे रोख पारितोषिक लक्ष्मीनगर नागरिक सभेने सादर केलेल्या ‘ नकटीचे लग्न ’ या नाटकातील कु. चारुशीला पत्तरकिने हिला व ‘ देवबाप्पाची सप्रेम भेट ’मधील ‘ मम्मी ’च्या भूमिकेबद्दल कु. पुष्पा कोल्हटकर हिला द्वितीय क्रमांकाचे रु. १०–०० चे रोख पारितोषिक मिळाले.

कुमार प्रशांत चोबे, नरेंद्र टिळक, अविनाश डबीर, ज्योती करंदीकर, लता राऊत, सरिता काळे या बाल कलाकारांना उत्तेजनार्थ प्रमाणपत्रे देण्यात आली.

या स्पर्धेत एकण १३ संस्थांनी १३ बालनाटके सादर केलीत.

परीक्षक म्हणून श्री. अभय पटवर्धन, श्री. चंद्रशेखर फडणीस व सौ. चंद्रप्रभा दिवेकर यांनी सहकार्य दिले.



आरण्यक : २

सुधाकर जोशी

अनुक्रमणिका

संकल्प : काव्यविशेषांक

श्रीज्ञानेश्वर ते एकोणीसशे एकाहत्तर

* काव्य म्हणजे काय ? * काव्याचे वर्गीकरण
* कवितेचे रसग्रहण * कवितेचे अध्यापन
* प्राचीन मराठी काव्यातील परिवर्तने
* अर्वाचीन मराठी काव्यातील परिवर्तने

* मर्ढेकरांनंतरची मराठी कविता

○ श्रीज्ञानेश्वर ○ नरेंद्र ○ होनाजी ○ कुंटे
○ केशवसुत ○ बालकवी ○ गोविंदाग्रज ○ तांबे
○ मर्ढेकर ○ कुसुमाग्रज ○ र. कृ. जोशी ○ इंदिरा

टिपणे ● विराणी ● भारूडे ● लावणी ● करूणाष्टके ● नाट्यपदे
● मध्वमुनीश्वर ● जनाबाई ● मोरोपंत ● सामराज ● भावगीत
● वामन पंडित ● महदंबेचे धवळे ● सुनीत ● मराठी ओवी ● समतत्व
● मराठी मुक्तछंद ● मराठी गद्यकाव्य ● प्रतिमा व प्रतीक ● वृत्तबद्धता

शिवकालातील दोन कवी तुकाराम : रामदास
प्राचीन मराठी काव्यसमीक्षा
अर्वाचीन मराठी काव्यसमीक्षा
समकालीन भारतीय काव्य

उपविभाग ॲंग्लोयुरोपियन कविता ○ बंगाली कविता
गुजराती कविता ○ उर्दू कविता ○ हिंदी कविता
आणि निवडक कवितांचा समृद्ध विभाग.

प्रकाशक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर–१२.
मुद्रक : पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर–१२.

अनुक्रमणिका